

# LIVES OF THE CÆSARS.

# रोम बादशाहांचा वृत्तांत.

"जें काईसाराचीं तीं काईसाराला आणि जीं देवाचीं तीं देवाला भरून द्या."

BOMBAY TRACT AND BOOK SOCIETY.
A. D. 1851.

मुंबईमध्यें अमेरिकन मिशन छापखान्यांत छापिलें.
सन १८५१.

## अनुक्रमणिका.


| गोष्टी. | | पृष्ठ. |
|---|---|---|
| १ | जुलियस सीसर | १ |
| २ | आगस्तस | ६६ |
| ३ | तैबीरियस | ८० |
| ४ | कालिगुला | ८८ |
| ५ | क्लाडियस | ९५ |
| ६ | नीरो | १०० |
| ७ | गाल्बा | १२८ |
| ८ | ओथो | १३१ |
| ९ | वितेलियस | १३३ |
| १० | वेस्पेशियन | १३५ |
| ११ | तैतस | १४० |
| १२ | डुमिशियन | १८२ |
| १३ | नरवा | १८९ |
| १४ | त्रेजन् | १९३ |

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ नारायण
दा. नों. ५८५५

# ज्यांस सीसर ह्मणतात त्या बादशाहांचा वृत्तांत.



## जुलियस सीसर रोम एथील पहिला बादशाह.

[इ० स० पू० ४६—इ० स० पू० ४२ पर्यंत]

इसवी सनापूर्वीं ४२ वर्षांवर जुलियस सीसर ह्मणून जो रोम एथें एक बादशाह होऊन गेला, तो, जे मोठे नामांकित व चमत्कारिक पुरुष या पृथ्वीवर झाले, त्यांत फारच कीर्तिवान होता. त्याच्या वेळीं जितकी पृथ्वी माहित होती ती बहुतकरून त्याने आपल्या विलक्षण शौर्याने व चातुर्याने जिंकिली ; यावरून तो मोठा पराक्रमी होता खरा, परंतु त्याने अणखी जीं कित्येक कृत्यें केलीं त्यावरून त्यामध्यें दुर्गुण कमी होते असें वाटत नाहीं. तो आपल्या हिताकडे मात्र लक्ष देत असे, लोकांचें काय झालें तरीं चिंता नाहीं. कोणती एकादी गोष्ट करण्याविषयीं त्याच्या प्रिय मित्रानी जर त्याला कांहीं प्रतिबंध केला, तर



पुणे मराठी ग्रंथालय
४३७ ब, नारायण पेठ, पुणे २

त्यांसींहि तो युद्ध करायास सोडीत नसे; ह्मणून कोणाच्यानेहि त्यास कांहीं करण्याविषयीं हरकत करवेना; शेवटीं तो इतका निष्ठुर झाला, कीं या पृथ्वींत आपली कीर्ति व्हावी, आपण आहों तोंपर्यंत सर्व मनुष्यानी आपणास भीत असावें, आपल्या पाठीमागें लोकांस आपलें स्मरण राहावें, आणि त्यानी आपली कीर्ति गावी, इतक्याच मात्र हेतूनें आपल्या फौजांकडून मोठमोठीं घोर युद्धें करवून त्याने हजारो लोकांचे प्राण घेतले. जुलियस सीसर यानंतर चाळीस वर्षांनी येशू ख्रिस्त या जगांत आला, यामुळें आपण नम्र व शांत होऊन सर्व मनुष्यांबरोबर ममतेने वागावें हा आपला धर्म आहे, हें त्याने ऐकलेंहि नव्हतें. त्यास वाटत असे कीं आपण सुख भोगावें आणि दुसऱ्यांवर अंमल बसवावा, हाच काय तो आपला धर्म; याकरितां इतरांस शाहणे आणि सुखी करण्याविषयीं तो कांहीं काळजी न बाळगितां, केवळ आपल्या हातीं सत्ता असावी एवढ्याविषयीं मात्र जपत असे.

जुलियस सीसर हा लहानपणीं फार हुशार दिसे, त्यावरून त्याचे मित्र ह्मणत कीं, पुढें हा मोठ्या पदवीस चढेल. याचें वय वीस वर्षांच्या आंत असतां याने त्या वेळचा रोम एथील अधिकारी जो सिल्ला त्याच्या विरुद्ध पक्षांतील कन्येशीं लग्न केलें, त्यावरून सिल्ला याने त्यास मारण्याचा निश्चय केला. सीसर यास मारावा असा कांहीं अन्याय त्याच्या हातून घडला नव्हता, ह्मणून सिल्ला हा त्याच्यासीं तंटा करण्यास कांहीं तरीं निमित्त शोधीत होता. एका दिवसीं सिल्ला याने त्यास सांगून पाठविलें कीं, तूं आपली परम प्रिय स्त्री कर्नीलिया इचा त्याग कर; ही गोष्ट त्याने

कबूल केली नाहीं, ह्मणून त्यास वाटलें कीं सिल्ला हा आपला घात करील; याजकारितां तो पळून देशांतरीं गेला; तेथें तो पुष्कळ दिवस भटकत फिरत होता.

त्याकाळीं तेथें चांचे (ह्मणजे समुद्रांतील चोर) फार धुंदाई करीत असत. ते आपलीं मोठमोठालीं तारवें घेऊन समुद्रांतून फिरत, आणि जीं गलबतें सांपडत तीं पकडून त्यांतील बहुतेक मनुष्यांस ठार मारून टाकीत, आणि जे पुष्कळ पैका देत त्यांस मात्र सोडून देत. यांच्या हातीं सीसर हा सांपडला आणि जेव्हां यानी त्यास आपल्या तारवावर नेलें, तेव्हां हे आपल्यास मारून टाकतील असें भय वाटून त्याला यांच्या हातून सुटून जाण्याची आशा अगदीं राहिली नाहीं; कारण, ते लोक इतके क्रूर होते कीं, आपल्यास एकादा पशु मारण्यास कदाचित् वाईट वाटेल, परंतु त्यांस तर मनुष्याचाहि प्राण घेण्यास कांहीं वाटत नसे. त्यानी सीसर यास ओळखिला नाहीं, तो कोणी साधारण मनुष्य असेल असें समजून ते त्यास ह्मणूं लागले कीं, जर तूं आह्मास रुप्याचे पन्नास टालेंट ह्मणजे सुमारें १,७०,००० रुपये देशील, तर आह्मी तुला सोडूं. सीसर याचे मिलिटस या शहरांत पुष्कळ द्रव्यवान स्नेही होते, त्यांस त्यानें लिहून पाठविलें कीं चांच्यांस जितका पैसा पाहिजे तितका भरून मला सोडवावें. तो पैका येई तोंपर्यंत सीसर याला त्या दुष्ट लोकांजवळ राहावें लागलें; अशा संकटांत जर दुसरा कोणी पडला असता, तर तो त्यांच्या त्या क्रूरपणाच्या गोष्टी ऐकून घाबरून गेला असता, परंतु सीसर तर तिळमात्रहि भ्याला नाहीं.

त्या चांचे लोकानीं, त्याच्या पूर्वीं थोड्याच दिवसांवर,

रोम शहराजवळ एका ठिकाणीं उतरून एका श्रीमान गृहस्थास धरून आपल्या तारवावर नेलें. आपणास कैद केलें हें पाहून त्या गृहस्थास फार राग आला, आणि असें वाटलें कीं, मी खरा रोमन आहें असें जर यांस समजलें, तर हे मला कदाचित सोडून देतील; ह्मणून तो त्यांस आपलें नांव सांगून ह्मणूं लागला, कीं मला लौकर माघारें उतरिलें पाहिजे. हें ऐकून चांचे लोक मोठ्याने हांसून त्या रोमनाची थट्टा करूं लागले; त्यानी प्रथम नमन करून त्यास आपल्या तारवावर कैद केलें ह्मणून त्याजवळ क्षमा मागितली; नंतर त्याच्या आंगांत एक सुंदर झगा घालून त्याचे पायांत जोडेहि चढविले; याप्रमाणें त्याला मोठ्या डौलाने सजविला. त्या बिचाऱ्या रोमनास ही थट्टाशी वाटली नाहीं; शेवटीं त्याने त्या चांच्यांस तारवाच्या बाहेर एक शिडी बांधतां पाहिलें, त्या शिडीचें खालचें टोंक पाण्यांत बरेंच होतें, परंतु तें केवळ तळास मात्र पोंचलें नव्हतें. त्यानी त्यास सांगितलें कीं तूं या शिडीवरून उतरून आमच्या गलबतांतून जा; कां कीं अशा थोर गृहस्थाची मर्जी मोडून त्यास बंदिवान करून ठेवणें, हें सगळी पृथ्वी प्राप्त होत असली तरी आह्मी करणार नाहीं. तेव्हां तो रोमन त्यांची प्रार्थना करूं लागला कीं, मला तारवांतच राहूं द्या. परंतु त्या दुष्ट चांच्यानी त्याचा हात धरून मोठ्या समारंभाने त्यास त्या शिडीजवळ नेलें, आणि मोठ्या नम्रतेने तिजवरून उतरायास सांगितलें. तेव्हां तो निरुपाय होऊन हळू हळू एक एक पायरी उतरूं लागला. त्या शिडीवरून गुढघ्या इतकें पाणीं होईपर्यंत खालीं उतरून पुनः वर येऊं देण्याविषयीं तो त्यांची काकुळती करूं

लागला; परंतु त्या चांच्यानीं त्याला अणखी पुढें जावयास सांगितलें; त्याने दुसरें पाऊल पुढें टाकतांच त्याच्या कंबरभर पाणीं झालें, तेव्हां त्याने आपल्यास परत येऊं देण्याविषयीं पुनः त्यांची विनंती केली; कारण ते चांचे एवढावेळ हांसतच होते, त्यावरून त्यास वाटलें होतें कीं हें सर्व थट्टेवरच चाललें असेल; परंतु त्यांनी त्यास अणखी खोल जाण्याविषयीं बलात्कार केला, शेवटीं तो बिचारा रोमन बुडून मेला.

सीसर याचा स्वभाव इतका धीट होता कीं, तो त्या क्रूर लोकांस अगदीं भ्याला नाहीं. हे रागावले असतां आपणास मारून टाकतील, असें जरीं त्यास माहित होतें, तरीं तो त्यांस चाकरांसारिखे वागवीत असे; आणि जसा काय हा तारवाचा मालकच त्याप्रमाणें त्यांजवर हुकूम चालवी. जेव्हां सीसर याजला निजावेसें वाटे, तेव्हां तो त्यांस अगदीं मुकाट्यानी राहावयास सांगे; आणि त्याप्रमाणें तो जागा होईतोंपर्यंत ते अगदीं मुके राहत; कारण सीसर याचें असें कांहीं तेज पडे कीं, तो जेथें जेथें जाई, तेथें तेथें सर्व लोक त्याची आज्ञा मोठ्या खुशीने मान्य करीत. केव्हां केव्हां सीसर कांहीं कविता करून त्यांस मोठ्याने वांचून दाखवी; आणि त्यापासून त्यांस आश्चर्य वाटलें नाहीं अथवा त्याची त्यानी तारीफ केली नाहीं ह्मणजे, तो त्यांस "तुह्मी मूर्ख आहां, दगड आहां!" असें ह्मणे; आणि वारंवार त्यांस हंसत हंसत ह्मणे कीं, "मी तुह्मा सर्वांस एकाद्या दिवसीं सुळीं देईन" परंतु याच्या ह्मणण्याप्रमाणें याच्या हातून घडेल असें त्यांस वाटत नसे; त्यांस वाटे कीं हा सगळा सीसर याचा विनोदच आहे,

ह्मणून तो असें ह्मणे तेव्हां ते पोट धरधरून हांसत; ही गोष्ट त्याच्या मनांतून खरीच करावयाची होती, असें जेव्हां शेवटीं त्यांच्या प्रत्ययास आलें तेव्हां त्यांस मोठें आश्चर्य वाटलें.

सीसर हा त्यांजबरोबर हंसून खेळून आपणहि त्या मंडळींतलाच असें दाखवी, परंतु सर्वकाळ त्यांचा सूड कसा उगवावा याचा विचार करीत असे. सीसर यानें मागितल्याप्रमाणें मिलिटस एथून द्रव्य आल्यावर तें त्या चांच्यांस देऊन आपण त्या तारवावरून निघाला. सीसर यास मोकळीक मिळतांच त्वरेनें जितकीं तारवें व खलाशी जमा करवतील तितकीं करून त्यानें एक लहानसें आरमार बनविलें; आणि ते चांचे लोक होते, तेथें जाऊन त्यांच्या तारवावर हल्ला केला. या समयीं एक मोठी भयंकर लढाई होऊन दोन्हीं बाजूंचे पुष्कळ लोक जखमी होऊन मेले; परंतु शेवटीं त्या चांचे लोकांचा पराजय करून त्यानें त्यांस कैद केलें, आणि त्यांची सर्व मालमत्ता जप्त करून पूर्वी त्यांस भय दाखविलें होतें त्याप्रमाणें त्यां सर्वांस सुळीं दिलें.

इकडे रोम एथें सिल्ला याचा अमंल अगदीं संपत आला होता, याजकरितां सीसर यास त्याचें कांहीं भय वाटत नसे, ह्मणून तो रोम एथें परत येऊन, जसे बहुतेक तरूण लोक मूर्खपणानें आपला वेळ आळसामध्यें घालवितात, तसें न करितां, मोठमोठीं संभाषणें करणें, चांगलीं सुंदर पत्रें लिहिणें आणि कविता करणें हें शिकायाकरितां त्यानें एक गुरू ठेविला. तेथें त्याच वेळीं सिसरो नामक दुसरा एक पुरुष याच विद्या शिकत होता; हे दोघेहि, जरी

उत्कृष्ट बुद्धिवान आणि उद्योगी होते, तरी त्यांतून सिसरो हा मोठा वक्ता व लिहिणारा झाला, आणि सीसर हा मोठा सैनिक झाला; याने जरीं सिसरोसारिखी मोठी कीर्त्ति मिळविली नाहीं, तरीं अधिकार मोठा मिळविला. जेव्हां हे दोघे एकत्र शिकत असत तेव्हां, सीसर हा कोणत्या तऱ्हेचा मनुष्य होईल हें समजण्याकरितां, तो जे बोले किंवा करी त्याजकडे सिसरो हा फार लक्ष देत असे. सिसरो हा मनुष्याची परीक्षा करण्याविषयीं जरीं मोठा चतुर होता, तरीं त्याचा या नव्या सोबत्याविषयीं बरोबर तर्क पोंचेना. कारण सीसर हा दररोज आपला पोशाक करण्यामध्यें व आपले केंस विंचरून नीट करण्यामध्यें फारच निमग्न असे; ह्मणून सिसरो याला वाटे कीं, रोम जिंकण्यासारिख्या मोठ्या आवश्यक गोष्टी त्याच्या लक्षांत क्वचितच येत असतील; अणखी तो ह्मणत असे कीं, जर घडून आलें तर हा जुलूमगार होऊन सर्व शहरावर अमंल करीलसें दिसतें.

जुलियस सीसर हा शरीरानें उंच होता, त्याचे डोळे काळे होते, व चेहरा उजळ होता. त्याला वारंवार भयंकर फेंफरें येत असे, तेणेंकरून तो एकाएकीं जमीनीवर अगदीं बेशुद्ध पडून त्याच्या शरीरास विलक्षण कांप सुटत असे; असें होतें तथापि निरुद्योगी किंवा आळशी बसण्यास त्याने आपल्या व्याधीचें निमित्त कधींहि सांगितलें नाहीं; तो सर्व मेहनतीचीं कामें करीत असे. एका प्रसंगीं एका हातांत पुस्तक आणि दांतांत आपलें हत्यार घेऊन दोनशें हात पोंहत गेला; हें काम साधारण बळवानाचें नव्हे. याप्रमाणेंच तो घोड्यावर बसण्यांतहि मोठा निपुण होता;

घोडा चौखूर उडत चालला असतांहि लगाम सोडून देऊन हा आपले हात पाहिजे तेव्हां मागें पुढें करीत असे; तसेंच आपल्या दोहों बाजूंस दोन कारकून घेऊन एकदम त्यांस पत्रें लिहायास मजकूर सांगत असे.

सीसर हा रोम एथील लोकांस इतक्या मोठमोठ्या मेजवान्या करी कीं तशा पूर्वीं कोणी पाहिल्याहि नव्हत्या सर्व लोक तेथें जाण्यास फार उत्सुक असत, याजकरितां ते त्यास खुशी करण्यासाठीं त्याला जें जें आवडे तें तें करीत; तेणेंकरून लोक त्याला दिवसानदिवस अधिक वश होऊं लागले. रोम एथें स्वारी निघे तेव्हां सीसर हा इतरांपेक्षां आपलें अधिक तेज पडावें, ह्मणून मोठा डामडौल करी. त्याची वर्तणूक फार उत्कृष्ट असे व त्याच्या बोलण्यांत इतका रस असे कीं, सर्व लोक त्यास चाहत आणि त्याचें कल्याण इच्छीत. असें असतां कित्येक लोकांस भय वाटूं लागलें कीं सीसर याच्या हातीं मोठी सत्ता येऊन शेवटीं हा आपल्यास राजा करील. त्यांस आपला स्वतंत्रपणा जाईल यांचें फार भय पडलें होतें, तेव्हां त्यांतून बहुतेक लोक तर असें ह्मणूं लागले कीं आह्मी मरून जाऊं पण आपल्यावर राजा होऊं देणार नाहीं; याकरितां ते सीसर यास यापेक्षां मोठा अधिकार मिळूं द्यावयाचा नाहीं, ह्मणून फार जपूं लागले.

या लोकांस वाटत असे कीं, सीसर हा फार उधळ्या आहे याजकरितां तो आपला सर्व पैसा खर्चून टाकून आपला नाश करून घेईल; परंतु मीटेलस नामक एक मोठा गृहस्थ रोम एथें धर्माध्यक्ष होता तो मरण पावल्यावर त्याचा अधिकार आपणास मिळावा, याकरितां सीसर याने

लौकरच लोकांचें अनुमत मिळविलें; त्यासमयीं यानें असें केलें नसतें तर याचा नाश लौकरच झाला असता.

तेथें सीसर याजपेक्षां वयानें मोठे असे पुष्कळ चांगले गृहस्थ होते, आणि त्यांचा धर्माध्यक्ष होण्याचा मनोदयहि होता; परंतु सीसर याचा आपणासच तो अधिकार मिळावा असा दृढ निश्चय होता, यासाठीं त्यानें मोठा प्रयत्न करून आपल्या पक्षास पुष्कळ लोक अनुकूळ करून घेतले.

त्या शहरांत कातुलस नामें कोणी संभावित गृहस्थ होता, तो धर्माध्यक्ष होण्याविषयीं फार उत्सुक होता ह्मणून तो सीसर यास सांगू लागला कीं, तूं जर या जागेविषयीं उद्योग करणार नाहींस तर मी तुला पुष्कळ पैका देईन; परंतु सीसर यानें त्यास उत्तर दिलें कीं मी अणखी पैका उसना काढून अधिक कर्जभरू होईन, पण ती जागा जाऊं देणार नाहीं. त्या जागेची नेमणूक होण्याच्या दिवशीं सीसर याची आई फार भिऊन गेली कारण कीं सीसर याला या जागेसाठीं फार लोभ सुटला आहे ह्मणून या शहरांतील मोठे मोठे लोक याचा कांहीं तरी नाश करतील; यावरून तो तिकडे जावयास निघाला तेव्हां तिच्या डोळ्यांतून अश्रु येऊं लागले, त्यासमयीं तो तिला आलिंगन देऊन हास्यवदन करून बोलिला कीं, आज एक तर मी ही जागा मिळवीन, नाहीं तर देशत्याग करीन. सीसर याच्या आईची ही भीति लौकरच नाहींसी झाली, कारण सीसर तो अधिकार मिळवून, व त्या हुद्याचीं वस्त्रें धारण करून लागलाच तिला हें आनंदकारक वर्तमान सांगायास परत आला.

त्या वेळीं रोम एथील मोठमोठ्या लोकांनी, प्रजासत्ताक

राज्य मोडून गादीवर राजा बसवावा असी गुप्त मसलत केली होती, ती प्रसिद्धीस आली. त्या लोकांमध्यें काटेलैन नामें एक गृहस्थ अग्रगण्य होता, तो मोठा धीट व चतुर होता, पण पैशाचा फार लोभी व मोठा दुष्ट असे; त्यानें स्वहस्तें आपल्या भावाचा व पुत्राचा प्राण घेतला; व दुसरींहि पुष्कळ क्रूर कर्मे केलीं. त्याने आपल्या मित्रांतून तीस असामीस मथवून त्यांस सांगून ठेविलें कीं, तुह्मी शहरांत जागोजाग एकदांच आग लावून द्यावी व मुख्य अधिकारी आणि सेनेट नामक सभा* यांस मारून टाकून मला रोमचा राजा करावा. ह्या कट करणाऱ्या दुष्ट लोकानी असा विचार केला कीं, मुख्य अधिकारी जो सिसरो याला प्रथम मारून टाकावा, नाहीं तर हा आपल्या कामाविषयीं मोठा हुशार आहे याजकरितां आपल्या मसलतीचा शोध लावून आपला मनोरथ सिद्धीस जाऊं देणार नाहीं; त्यांतून ज्या दोघानी सिसरो यास मारायाचें पत्करिलें, त्यानी असा बेत केला कीं दुसऱ्या दिवसीं सकाळीं तो निजून उठला नाहीं तोंच, कांहीं जरूरीच्या कामाकरितां आह्मास त्याची भेट घ्यावयाची आहे अशा मिषानें आपण त्याच्या एथें जाऊं आणि आपला बेत सिद्धीस नेऊं. त्याप्रमाणें दुसऱ्या दिवसीं ते त्याच्या खोलीजवळ आले आणि एकाएकीं त्याजवर हल्ला करून त्यास मारण्याच्या बेतांत होते; परंतु ही मसलत फल्विया नामक एका स्त्रीच्या ऐकण्यांत आली होती, तिने यांस पाहतांच सिसरो याचा प्राण वांचवावा या हेतूनें त्याजकडे धांवत जाऊन त्यास हें वर्त्तमान कळिवलें. तेव्हां सिसरो यानें

---

* राज्य कारभार चालिवण्याकरितां सर्व संमतानें नेमलेली सभा.

मोठ्या सावधगिरीने घरांतून नाहींसा होऊन लागलीच, या दुष्ट शत्रूंपासून शहराचा बचाव करण्याची तजवीज केली. काटेलैन हा तर निसटून गेला, पण बाकीच्या सर्वांस कैद करून सेनेट सभेपुढें चौकशीस आणिलें. सीसर हाहि त्या कटांतला असावा असा पुष्कळांच्या मनांत वहमा आला होता, परंतु त्याविषयीं पुरावा झाला नाहीं. आतां आहे एवढा मोठा अधिकार सीसर याच्या हातांत असूं दिल्याने पुढें आपल्या संस्थानास अपाय होईल यासाठीं, तो काटेलैन याचा खराच मित्र होता असा त्याजवर आरोप आणून इतर अपराध्याप्रमाणें त्यासहि देहांत दंड करावा, असें पुष्कळ लोकांनीं सिसरो यास सांगितलें; परंतु याने यासमयीं फार सत्याने न्याय करून सीसर यास कैद करूं दिलें नाहीं. सीसर याने या प्रसंगीं मोठें धैर्य दाखिवलें; सर्व लोक, या कटांतल्या लोकांसीं स्नेह आहे असें दाखवायास भिऊन गेले होते, कां तर लोकांच्या मनांत येईल कीं हेहि यांत सामील आहेत; असें असतां व आपल्यावर लोकांचा वहमा आहे हेंहि तो जाणत असतां, सेनेट सभेमध्यें उभा राहून बोलला कीं, या लोकांवर दया करून यांस मारूं नये. या समयीं ते लोक इतके संकटांत पडले होते कीं त्यांस कोणीहि त्राता राहिला नव्हता; आणि ज्यापेक्षां अशा प्रसंगीं सीसर याने त्यांस सहाय केलें त्यापेक्षां हा त्याने आपल्या धैर्याचा चांगलाच उपयोग केला असें दिसतें. नंतर केटो ह्मणाला कीं, या लोकांस मारणें जरूर आहे, कां कीं यांनीं सिसरो व सेनेट सभेचे सभासद यांस मारण्याचा बेत केला होता; अणखी त्याने बोलण्यांत हेंहि सुचिवलें कीं सीसर यास ही मसलत मा-

हीत असावी, नाहींतर काटेलैन व त्याचे मित्र यांस वांच-विण्याविषयीं तो इतका झटला नसता. त्यांच्या संरक्षणा-विषयीं एकहि शब्द बोलण्यास दुसऱ्या कोणास हिम्मत झाली नाहीं, ह्मणून जितके कटांतले असामी त्यांनी कैद केले होते, तितक्या सर्वांस मारून टाकिलें. हे इतके हुद्देदार व अब्रूचे लोक एकदांच मारिले गेले ही रोम एथें एक मोठी दुःखकारक गोष्ट झाली. रोम शहर जिंकावें व आपल्या मित्रांस मारल्याचा सूड उगवावा अशा बेताने काटेलैन याने बरीच फौज जमविली होती, परंतु तो लढाईंत लौकरच मारला गेला.

रोम शहरच्या लोकांची प्रीति आपल्यावर अधिक बसावी याकरितां सीसर हा, श्रीमंत लोकांचे विरूद्ध मसलत करणारे जे गरीब लोक असत त्यांचा पक्ष नेहेमी धरीत असे; आपल्यास फार मोठा अधिकार मिळावा असी ज्यांची इच्छा असती, त्यांची बहुतकरून ही असीच रीति असती गरीब गुरिबांस पुष्कळ द्रव्य देत असे, तेणें करून त्याने लोकांची प्रीति संपादन केली. असें पाहून सेनेट सभेनेहि तसेंच करण्याचा विचार करून जे लोक अन्नास महाग असत त्यांस दरमहिन्यास हवें तितकें अन्न देण्याचा हुकूम केला; याचा हेतु इतकाच कीं त्यांनी सेनेट सभेपेक्षां सीसर याचा उपकार कमी मानावा. ही त्यांची युक्ति बरीच सिद्धीस गेली, कांकीं गरीब लोकांच्या जे उपयोगी पडतात त्यांची मात्र बहुतकरून ते काळजी वाहतात; त्यांस सीसर याच्या साहाय्यावांचून जेव्हां पाहिजे तितकें अन्न मिळूं लागलें, तेव्हां ते त्याची अगदी पर्वा करीनातसे झाले.

सीसर यानें पुष्कळ पैका खर्चून स्पेन एथील सुभेदारीवर आपली नेमणूक करून घेतली, व तिकडे जाण्याकरितां रोम एथून निघण्याची तयारी केली. इतक्यांत याच्या सावकारानी त्यास शहराबाहेर जाण्याची मनाई केली, हें त्यास एक अकस्मात विघ्न प्राप्त झालें; परंतु रोम एथील दुसरा एक मोठा द्रव्यवान गृहस्थ क्रासस् यानें त्यास ८३० टालेंट ह्मणजे सुमारें २८,२२,००० रुपये दिले, तेणें करून तो आपलें कर्ज फेडून स्पेन देशास चालता झाला; हा गृहस्थ जर त्याचे उपयोगीं न पडता तर त्याचें जाणें झालें नसतें.

सीसर हा आल्प्स पाहाडांतील एका लहानशा गांवांतून जात असतां, त्याच्या एका मित्रानें हासून त्यास ह्मटलें कीं, असल्या गांवढ्या गांवामध्यें तर आपल्या मानमरातबाविषयीं कोणीच खातर बाळगणार नाहीं. त्यावर सीसर यानें उत्तर दिलें कीं, "रोम एथें दुसऱ्या पदवीवर असण्यापेक्षां मला तर असल्याहि गांवांत पहिल्या पदवीवर असणें फार आवडतें!"

सीसर हा प्रसंग पाहून दुसऱ्याकरितां आपल्या सुखांसहि अंतरे. एकदां त्याचा हुजऱ्या आजारी पडला होता आणि त्या प्रसंगीं सीसर याच्या बिछान्याशिवाय जवळ दुसरा बिछाना नव्हता, तेव्हां त्यानें त्यास आपल्या बिछान्यावर निजावयास सांगितलें, त्यामुळें रात्रीं त्याला निजायास बिछाना मिळाला नाहीं. अणखी एका दिवसीं असें झालें कीं, तो ज्या घरीं जेवायास गेला होता, तेथल्या माणसानीं स्वयपाकांत गोडें तेल घालावयाच्या ठिकाणीं दिव्याचें तेल घातलें, हें जर घरच्या यजमानास कळलें तर

त्याला वाईट वाटेल ह्मणून सीसर याने ही चुकी कोणाक-डूनहि यजमानाच्या कानीं जाऊं दिली नाहीं. यावरून असें दिसतें कीं इतरांस कसें वागवून घ्यावें हें तो जाणत असे.

सीसर हा शिकंदर बादशाहाचा इतिहास वाचीत असतां शिकंदराने तीस वर्षांच्या वयांत बहुतकरून सर्व पृथ्वी जिंकिली असें पाहून, त्याच्या डोळ्यांत अश्रु आले, आणि खिन्न होऊन बोलिला कीं, आतां मीहि वयाने त्याच्या एवढाच आहें, परंतु अजून त्याच्या इतकी कीर्ति मात्र मिळविली नाहीं. पुढें जुलियस सीसर याने शिकंदर बादशाहा इतकी कीर्ति लौकरच मिळविली, या दोघानी जितकी पृथ्वी जिंकिली तितकी कोणीहि जिंकिली नसेल. थोडक्याच दिवसांत त्याने सैन्याच्या बळाने आपले हजारो शत्रु मारून शहराचीं शहरें जाळून ओस करून टाकिलीं; आणि तेणेंकरून पृथ्वींतील बहुतेक देशांत शिकंदर व तसाच सीसर यांच्या जयाकरितां ज्या लोकानी प्राण दिले, त्यांच्या विधवा बायका व पोरकीं पोरें हीं आपल्या नवऱ्याकरितां व बापांकरितां शोक करीत बसलीं. सीसर हा मोठा विजयी राजा होऊन गेला असी कीर्ति लोकांत निरंतर राहावी, याजकडे मात्र त्याचें लक्ष होतें, पृथ्वीवर किती दुःख होत आहे याची काळजी तो अगदीं करीत नसे. एका प्रसंगीं तीन लक्ष मनुष्यें शस्त्रें ठेवून आपणास शरण आलीं आहेत याजकडे किंवा वास्तविक पाहतां याला जसा जिवंत राहण्याचा अधिकार होता, तसा त्यांसहि होता याजकडे, अगदीं लक्ष न देतां, जसा एकादा वेडा खाटकी

सर्व मेंढ्याचा कळप एकदम मारून टाकितो, तद्वत त्याने त्या सर्वांचे प्राण घेतले.

पुढें चाळीस वर्षांनंतर सीसर व शिकंदर यांजपेक्षांहि श्रेष्ठ असा एक पुरूष या जगांत आला, तो कोण ह्मणाल तर तो येशू ख्रीस्त होय, त्याने लोकांच्या कल्याणाकरितां जन्म घेतला. त्यासारिखा या पृथ्वीवर कोणीहि विजयी पुरूष झाला नाहीं, तथापि त्याने आपलें सर्व वैभव आमच्याकरितां एकीकडे ठेविलें. त्याच्या मनांत राजा होऊन पुष्कळ फौज ठेवायाची असती, किंवा आपल्या शत्रूंचा नाश करावयाचा असता, तर ईश्वर त्याला देवदूतांची फौज देता, परंतु तो असें करण्याकरितां आला नव्हता, तर शत्रूंस क्षमा करण्याकरितां, ज्यांचीं हृदयें फुटून गेलीं आहेत त्यांस नीट करण्याकरितां, जे आजारी होते त्यांस बरें करण्याकरितां, आंधळ्यांस दृष्टि देण्याकरितां, आणि जे ईश्वरी कृपेनें पापाचा पश्चात्ताप पावून त्याजवर विश्वास ठेवितील त्यांस तारण्याकरितां तो आला होता.

त्याने दुसऱ्यास दुःख होण्याजोगें कांहीं केलें नाहीं; तो या जगांत तेहेतीस वर्षें मात्र राहिला, परंतु त्याचें नांव निरंतर राहून त्याने जें लोकांचें कल्याण केलें तेंहि अनंत काळपर्यंत राहील; आणि तेणें करून लोक उपकार स्मरून त्याचा स्तव करितील. मनुष्यें स्वभावाने किती खुनशी, स्वार्थबुद्धि, व गर्विष्ट असतात हें सीसर यावरून तुमचे लक्षांत येईल; परंतु येशू ख्रिस्ताच्या उदाहरणावरून तुह्मी पाहाल कीं मनुष्याने किती दयाळू, सोशिक आणि क्षमाशील असावें.

सीसर हा रोम एथें परत आला, तेव्हां त्याने आपल्या

मुलीचें पोंपी ह्मणून तेथें एक थोर गृहस्थ होता त्यासीं लग्न केलें. पोंपी याने आपल्या बुद्धीच्या बळेंकरून त्या शहरांत पुष्कळ दिवसपर्यंत अंमल केला. हा सीसर यापेक्षां स्वरूपवान् होता, त्याचें तेज राजासारिखें पडत असे, ह्मणून त्याजपासीं कोणी गेला असतां याला त्याचा धाक वाटावा. याची सीसर यावर फार कृपा होती, ह्मणून याने त्यास त्या वर्षीं रोम एथें मुख्य अधिकाऱ्याच्या दोन जागा रिकाम्या होत्या त्यांतील एक देवविली. पोंपी, सीसर आणि क्रासस् यानीं आपणांमध्यें करार केला कीं, आपल्या तिघांच्या मसलतीशिवाय रोम एथें कोणतीहि गोष्ट होऊं देऊं नये; कारण त्यांचा असा हेतु होता कीं, दुसरा मुख्य अधिकारी बिब्यूलस याची कांहीं सत्ता चालूं नये, सर्व आपल्याच हातीं असावी. शेवटीं बिब्यूलस हा सीसर यास इतका भिऊं लागला कीं वर्षभर आपल्या घरांत लपून राहिला, त्याला बाहेर पडून सरकारकाम पाहण्याचा हिय्या झाला नाहीं.

बिब्युलस याच्या भित्रेपणामुळें जुलियस सीसर हा एकटाच दोघांचा अधिकार चालवीत होता, परंतु रोम एथें बंदोबस्त करण्यास दोन मुख्य अधिकारी लागत असत, ह्मणून लोक हसून ह्मणत कीं, या वर्षीं जुलियस आणि सीसर असे दोघे मुख्य अधिकारी आहेत. सीसर हा नाना तऱ्हेच्या युक्तींनी लोकांस खुशी करीत असे, याजकरितां लोक दिवसानुदिवस त्यास अधिक चाहूं लागले. त्याने त्यांस पुष्कळ जमिनी वांटून दिल्ह्या, आणि शहरांतील ज्या मनुष्याच्या कुटुंबांत तिहींपेक्षां अधिक मुलें असतील त्यास जमिनीचा वांटा मिळेल असें जाहीर केलें.

तसेंच गरीब गुरिबांस धान्यहि पुष्कळ वांटिलें. आतां हें कृत्य जर धर्मबुद्धीनें झालें असतें, तर त्यानें लोकांची दया जाणली हें चांगलें केलें, परंतु हें सर्व रोम एथें आपला अख-त्यार वाढावा या हेतूनें केलें, यावरून दिसतें कीं इतका उदार होण्याचें कारण स्वार्थबुद्धि होय; अणखी असें वाटतें कीं, लोकांस अन्न देऊन जसें त्याचें हित होत असे तसेंच जर त्यांचे प्राण घेऊन होत असते, तर तो तसेंहि करायास चुकताना.

पोंपी हा या वेळीं सीसर याच्या फार उपयोगी पडला त्याजवर पोंपी याची फार प्रीति होती ह्मणून पुढें त्याचें व आपलें वांकडें पडेल याविषयीं याच्या मनांत शंकाहि नव्हती. लोक आपलीं वस्त्रें जुनीं झालीं ह्मणजे टाकून देतात त्याप्रमाणें सीसर यानें आपले जुने मित्र आ-पल्या उपयोगी पडेनातसे होतांच त्यांस सोडून दिलें. सिसरो हा आपणास अडथळा करूं लागला असें पाहून सीसर यानें त्या मोठ्या वक्तयाचा नाशास प्रवृत्त होऊन त्यास रोम शहरांतून काढून दिला; नंतर तो पोंपी याचा नाश करण्याविषयीं उद्योग करूं लागला. पण ही गोष्ट सोपी नव्हती ह्मणून ही शेवटास जावयास फार दिवस लागले; याजकरितां अगोदर तो पोंपी याचे मोठे विश्वासू शिपाई मागून घेऊन गालदेशावर स्वारी करावयास गेला, या देशास हालीं फ्रान्स देश असें ह्मणतात.

या समयीं सीसर यानें, आपणामध्यें शौर्य आणि परा-क्रम हीं किती आहेत, हें दाखवलें. त्याचे शत्रु मोठे भयं-कर असून त्यांचा जमावहि मोठा होता, तथापि तो त्यांस प्रत्येक लढाईंत जिंकीत असे, तो जेथें जेथें जाई, तेथें तेथें

४३० ... दा. नं ५८५५

भय व थरकांप करून देई. त्याच्या जयामुळें त्याच्या शिपायांस मोठें स्फुरण आलें आणि त्यानें त्यांस पुष्कळ पैका दिला, यामुळें ते त्याच्यासाठीं मरायासहि सिद्ध झाले; आणि तेणेंकरून त्याने दहा वर्षांत लढाया मारून जितके शत्रु जिंकिले तितके पूर्वी कोणीच जिंकिले नसतील. त्याच्या फौजेने आठशें शहरें जिंकिलीं, व दहालक्ष मनुष्यें मारिलीं आणि तितकींच बंदिवान केलीं. या रानटी देशांत बायका पोरेंहि आपल्या स्वतंत्रतेकरितां आपले तुकडे होऊन जात तोंपर्यंत लढत; कित्येक ठिकाणीं तर नद्या व तळीं मुडद्यानी अगदीं भरून जात,असीं कीं त्यांवरून लोक पलीकडे जात असत. सीसर हा आपल्या एकाद्या शिपायाप्रमाणें स्वतां श्रम करीत असे, आणि बाणीच्या वेळेस तर नेहमी लढाईच्या तोंडीं असे. आपल्या खाण्यापिण्याची किंवा निजण्या बसण्याची अथवा लढाईंत मरण्या वाचण्याची अगदीं काळजी बाळगीत नसे; परंतु आपण शिपाई आहों हें दाखिवण्याची मात्र तो काळजी बाळगी आपण लढाईमध्यें शूरत्व केलें असतां, तें सीसर याच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं व आपल्यास मोठें इनामहि मिळेल, असी त्याच्या शिपायांची खातरी असे. आपल्या शिपायांस इनामें वांटण्याकरितां तो पैक्याची मात्र अपेक्षा ठेवीत असे. त्याच्या फौजेवर केव्हां केव्हां शत्रूचा फार नेट होई, अशा प्रसंगीं त्यांच्यावर जर दुसरा कोणी सरदार असता तर ते पळूनच गेले असते; परंतु ते सीसरकरितां ह्मणूनच शेवटपर्यंत टिकाव धरीत. जेव्हां रोमन शिपायास त्यांचे शत्रु बंदिवान करून नेत, तेव्हां ते त्यांस ह्मणत कीं, जर तुह्मी सीसर

यावर शस्त्र धराल तर तुह्मास जीवदान मिळेल, नाहीं तर तुह्मी मारले जाल; परंतु ते शिपाई हें ह्मणणें नकारून आपल्या सरदारापुढें आपली अप्रतिष्टा करून घ्यावी त्यापेक्षां मरावें हें बरें असें मानीत.

एकदां एक शिपाई भिऊन शत्रूपुढें उभा न राहतां पळून जाऊं लागला; तें सीसर याच्या लक्षांत येऊन युक्तीने त्यास धैर्य आणण्याकरितां त्याने त्याचा हात धरून सभोवतीं फिरविलें आणि ह्मटलें कीं, तूं तिकडे कोणीकडे चाललास तुझे शत्रू तर हे या बाजूला राहिले.

दुसऱ्या एका वेळीं नवैं लोक आपलीं बायका पोरें व सर्व मालमत्ता एका मोठ्या अरण्यांत लपवून ठेवून सीसर यावर एकाएकी चढून आले, आणि मोठ्या शौर्याने लढले, तेणें करून सीसर याच्या सैन्याचा बहुधा पराभव होण्याचा समय आला होता, आणि जेव्हां यांच्या कित्येक पलटणाचा मोड होऊन मोठमोठे सरदार मारले गेले तेव्हां याची फौज पळण्याचे बेतांत आली होती, परंतु सीसर हा हातांत एका शिपायाची ढाल घेऊन मारावें किंवा मरावें असा निश्चय करून रणामध्यें शिरला; तेव्हां आपला सरदार अशा संकटांत आहे हें पाहून त्याचें रक्षण करण्याकरितां त्याचें लष्कर शत्रूंवर चित्यासारिखें तुटून पडलें. याच्या शत्रूंचाहि लढाई करण्याचा असाच दृढ निश्चय होता, ह्मणून तेहि मागें हटेनात, परंतु शेवटीं रोमन लोकांनीं साठ हजार मनुष्यांस मारून बाकीचांस बंदिवान केलें.

पोंपी याचा स्वभाव मत्सरी नव्हता, ह्मणून सीसर याचा जय झाला ही बातमी ऐकतांच त्यास फार आनंद

होऊन, तो क्रासस् यास बरोबर घेऊन, ल्यूका एथें रोमन लोकांची छावणी होती, तेथें या जयाचा उत्साह करण्याकरितां सीसर यास भेटायास गेला. सेनेट सभेंतील सभासद यांसहि या जयानें फार हर्ष झाला; त्यानीं, सीसर याच्या सन्मानार्थ, नाचरंग वगैरे मौज एक सारिखी पंधरा दिवस चालविली; मग सीसर यानें लौकरच जर्मनी देशांत जाऊन तेथें चार लक्ष मनुष्यें ठार मारिलीं. नंतर रैन नदीपलीकडे जावें असें याच्या मनांत आलें, ह्मणून त्याच्या फौजेनें त्या रुंद व जोरानें वाहणाऱ्या नदीवर, पंधरा दिवसांत एक सुंदर पूल बांधून तयार केला. हें काम इतकें लौकर झालें ह्मणून, सीसर याच्या लढायांसारिखें हेंहि नवल करण्यास योग्य होय. हा पूल सीसर व त्याचें सर्व लष्कर मेल्यावरहि पुष्कळ दिवसपर्यंत टिकला व तेणेंकरून जर्मन लोकांस मोठी सोय झाली आणि देशास शोभाहि आली. ती नदी उतरतांच त्यानें पलीकडल्या लोकांवर हल्ला केला, आणि त्यांचे गांव जाळून त्यांच्या सर्व मालाची नासाडी करून टाकिली. ते लोक सीसर याचे शत्रु होते किंवा त्यानीं याचें कांहीं वाईट केलें होतें असेंहि नाहीं; याजकरितां हा देश सीसर याच सरदानें प्रथम जिंकिला, असी आपली कीर्त्ति व्हावी याशिवाय तो देश जिंकण्याचा सीसर याचा दुसरा कांहीं हेतु असावा, असें वाटत नाहीं.

इंग्रेज लोक ज्या बेटांत राहतात, त्याला आतांप्रमाणेंच तेव्हांहि ब्रिटन असें ह्मणत असत; परंतु तो अत्यंत गरीब स्थितींत होता ह्मणून त्याला ग्रेट ब्रिटन ह्मणजे मोठें ब्रिटन असें ह्मणत नसत. हा देश त्या काळीं इतका अप्रसिद्ध

होता कीं बहुतेक रोमन् लोकांस तो अमकीकडे आहे इतकेंहि माहीत नव्हतें; परंतु सीसर याने त्या देशाविषयीं कांहीं गोष्टी ऐकिल्या होत्या, व आपलें राज्य सर्व पृथ्वीवर पसरावें असी त्याची इच्छा होती, याजकरितां त्याने तो देश जिंकण्याविषयीं निश्चय केला. त्या देशाच्या किनाऱ्यावर मोत्यें पुष्कळ सांपडतात असें ऐकून तीं आपणास मिळावीं असें सीसर याच्या मनांत आलें; परंतु त्या देशांतून प्रत्यक्ष जाऊन आलेले कित्येक लोक सांगत कीं, तेथें थंडी फार व नेहमी धुकें पडलेलें असतें, यामुळें जंगली लोकां शिवाय इतरांस तेथें राहाणें फार विपत्तिकारक आहे.

त्या काळीं कांचेच्या खिडक्या करण्याची किंवा मेणबत्त्या करण्याची युक्ति निघाली नव्हती, याजकरितां, घरांत थंडी लागू नये ह्मणून खिडक्यास लांकडी दारें करून तीं निरंतर लावून ठेवावीं लागत, मग सहजच त्यांस साऱ्या दिवस काळोखांत राहावें लागे; परंतु एका भांड्यांत चरबी घालून त्यांत काठी पेटवून ठेवावी, एवढीच कायती घरांत उजेड करण्याची युक्ति त्यांस माहीत होती. त्यासमयीं इंग्लंड आणि स्काटलंड यांतील राहाणारे लोक यांस कापसाचीं वस्त्रें माहीत नव्हतीं, ते पशूचीं कातडीं पांघरीत आपल्या आंगास तांबडा व निळा रंग लावून चित्रविचित्र करीत, आणि आपले केंश लांब वाढूं देत, यामुळें ते दिसण्यांत फार अक्राळ विक्राळ दिसत.

त्या वेळीं ते लोक केवळ पशूसारिखे असून त्यांस शहाणपण, विद्या, कळा, कौशल्य हीं कांहींच माहीत नसतां, त्यानी आपला देश शत्रूंपासून कांहीं वेळ रक्षण केला होता, हीं गोष्ट किती आश्चर्यकारक होय! ते लोक

ज्या दुःखकारक अवस्थेंत होते तिचा जर क्षणभर विचार केला, तर तुमच्या ध्यानांत येईल कीं, ख्रिस्ती धर्म चोहीं-कडे पसरून, लोक नीतीने व एक मताने वागून परस्परांचें हित पाहताहेत, अस्या समयीं जन्म होणें ही किती नशीबाची गोष्ट होय.

या प्राचीन ब्रिटन लोकांस खऱ्या ईश्वराचें ज्ञान नव्हतें. यांचे उपाध्ये जे ड्रुइड ते मूर्ख व ढोंगी होते, ह्मणून त्यांस भलभलतेच उपदेश करीत. त्यांच्या पुष्कळ क्रूर चाली होत्या, ते आपल्या खोट्या देवांस संतुष्ट करण्याकरितां मनुष्यें बळी देत असत; सर्व रानटी लोकांच्या अशाच समजुती असतात कीं मनुष्याचा बळी दिल्याने आपण पापापासून मुक्त होऊं, हें मोठें आश्चर्य होय. येशू ख्रिस्ताच्या मरणाने सर्वांच्या पापाची क्षमा होईल, असें ईश्वराने एकदां प्रगट केलें होतें, तें लोकांच्या बरोबर ध्यानांत राहिलें नाहीं; परंतु त्यांस एवढी मात्र आठवण राहिली आहे, कीं, मनुष्याचा रक्तपात झाल्याशिवाय पापाची क्षमा होणार नाहीं; याजकरितां आपल्यास मोक्ष व्हावा या हेतूने मनुष्यबळी देवांस देण्याकरितां अजून कोठे कोठेंहि लोक आपल्या लहानशा अर्भकांचाहि प्राण घेतात.

सीसर हा मोठा धीट होता, त्याला असल्या क्रूर व लढाऊ लोकांच्या देशीं जाण्यास कांहीं भय वाटलें नाहीं; पण आपल्यास जिंकायास अजून एक देश आहे असें पाहून त्यास उलटा आनंद झाला. याचें आरमार ससेक्सच्या किनाऱ्याने जात असतां, तें जेथें जेथें उतरावयास लागे, तेथें तेथें ते पुष्कळ लोक जमून त्याच्या मचव्यांस किनाऱ्यावर उतरण्याविषयीं अडथळा करीत. रोमन लोकांचे

नावाडी चांगले हुशार व माहितगार नव्हते, त्यानी इतका लांब प्रवास पूर्वीं कधींहि केला नव्हता, ह्मणून वाटेस जेव्हां तुफान झालें, तेव्हां त्यांचीं आबड धोबड तारवें पुष्कळ बुडालीं व बाकीच्यांस फार दुःख सोसून उपास काढावे लागले. शेवटीं किनाऱ्यावर एका ठिकाणीं पांढऱ्या टेंकड्या दृष्टीस पडल्या तेथें ते मोठ्या प्रयत्नाने उतरले, (त्या ठिकाणीं आतां डोवर शहर आहे,) परंतु सर्वप्रदेश उजाड आहे घरें किंवा मनुष्यें अगदीं दृष्टीस पडत नाहींत असें पाहून सीसर यास मोठें आश्चर्य वाटलें. त्या लोकानी आपलें धान्य कांहीं जाळून टाकून बाकीचें जमीनींत पुरून ठेविलें होतें आणि आपलीं गुरें रानांत हाकून दिलीं होतीं त्यामुळें रोमन लोकांस खावयास कांहीं मिळालें नाहीं. रोमन लोकांच्या व त्यांच्या पुष्कळ भयंकर लढाया झाल्या, त्यांत ते गरीब लोक मोठ्या धैर्याने लढत, तथापि त्यांचा पराजय होत असे. रोमन लोकांच्या आंगांत चिलखतें असत त्यामुळें त्यांस बहुतकरून शस्त्र लागत नसे, पण ब्रिटन लोक अगदीं उघडे असत, ह्मणून सहज घायाळ होऊन फार मारले जात. रोमन लोक कधीं रानांतून जाऊं लागले असतां, ते लोक झाडींत लपून बसलेल्या ठिकाणाहून एकाएकींच त्यांजवर घाला घालून त्यांस मारीत, तेव्हां त्यांस मोठें आश्चर्य वाटे. या रीतीने तेहि त्यांचा सूड उगवीत असत, परंतु शेवटीं सीसर याने त्या देशाचा एक एक भाग जिंकून सर्व देश हस्तगत केला, हा देश फार दरिद्री व उजाड होता, ह्मणून आपल्या स्वाधीन ठेवण्यापासून सीसर यास कांहीं फायदा दिसला नाहीं, तेथें धान्यहि फार थोडें पिके या-

मुळें सीसर याच्या शिपायांस दूध व मास यांशिवाय दुसरें कांहीं खायासहि मिळत नसे. पण आतां तुमच्या पाहण्यांत किती फेर येतो ? आतां तेथील शेतांत उंची उंची धान्यें, व नाना प्रकारच्या उपयोगी वनस्पति पिकतात, आणि त्या देशाच्या किनाऱ्याजवळ येण्यासहि हल्ला करणाऱ्या लोकांस हिय्या होत नाहीं. त्या वेळीं त्या लोकांजवळ कांहीं पैका नव्हता, पण आतां सर्व पृथ्वीमध्यें मातबर देश ह्मटला ह्मणजे इंग्लंड आहे. त्या वेळीं रानांत लांडगे इत्यादि जसे क्रूरपशू होते तसे आतां नाहींत, व आतां त्या देशांत जिकडे तिकडे पुष्कळ सुंदर शहरें आहेत आणि तेव्हां एकहि शहर नव्हतें हें ऐकून तुह्मास मोठें आश्चर्य वाटेल. सीसर यानें जीं फार उपयोगी कृत्यें केलीं त्यांपैकीं त्यानें लंडन शहरचा किल्ला बांधिला हें विशेषेंकरून सांगण्याजोगें कृत्य होय, तो किल्ला अजूनपर्यंत आहे. जें शहर पुढें रोम शहरापेक्षांहि मोठें होईल अशा शहराचा आपण पाया घालीत आहों असी कल्पना रोमन लोकांच्या मनांत त्या वेळीं अगदीं आली नसेल; तसेंच आपले किल्ले व माहाल यांचे पडून ढिगार होऊन जातील, व आपले सर्व योद्धे मरून जाऊन त्यांच्या कीर्त्तीचाहि लय होईल, तेव्हां या शहराची वढती होण्यास आरंभ होईल असी गोष्ट त्यांच्या स्वप्नीं तरीं आली असेल, असें वाटत नाहीं.

या रानटी देशांत राहण्यास रोमन फौज फार कंटाळून गेली, याजकरितां सीसर यानें तो देश सोडण्याचा बेत केला आणि रोम एथें चमत्कार दाखिवण्याकरितां तेथून थोडेसे जंगली लोक बरोबर घेतले; सीसर या देशांत

इतका काळपर्यंत असतां त्याने त्या देशांतील लोकांस हितावह असें कांहीं केलें नाहीं, परंतु होते तसेच मूर्ख ठेवून पहिल्यापेक्षां अधिक दरिद्री मात्र करून टाकिले.

सुमारें याच वेळीं याने लाटीन भाषेंत एक ग्रंथ लिहिला, त्याचें नाव "सीसराच्या कामेंतार्या" असें आहे; यामध्यें त्याने आपल्या जयाचा सर्व वृत्तांत लिहिला आहे. हा ग्रंथ फार सुरस व चातुर्याने लिहिला आहे, यावरून दिसतें कीं सीसर हा मोठा योद्धा होता इतकेंच नाहीं, तर तो विद्वानहि तसाच होता.

आतां जसे नवे नवे ग्रंथ होतात तसे त्या वेळीं होत नसत, तेव्हां एकाद्याने पत्र लिहिलें तर ती गोष्ट इतकी अपूर्व वाटत असे कीं, तितकी आतां ग्रंथ लिहिल्यानेहि वाटत नाहीं. सालोमन ह्मणतो कीं "ग्रंथ करण्यास मर्यादा नाहीं;" परंतु त्याच्या वेळीं किंवा त्याच्या पाठीमागून पुष्कळ वर्षांनीं सीसर झाला, त्याच्या वेळेसहि आतां इतके ग्रंथ नव्हते; कां कीं छापण्याची युक्ति त्या वेळेस निघाली नव्हती. कोणाला एकादा मोठा ग्रंथ पाहिजे असल्यास त्याला त्याची प्रत आपल्या हाताने किंवा लेखकाकडून करवावी लागे; यामुळें कोणास ग्रंथसंग्रह करणें झाल्यास खर्च फार लागे; आतां एकाद्या साधारण मनुष्यापासीं जितके ग्रंथ असतात तितके त्या वेळीं एकाद्या श्रीमंताकडेहि नसतील. त्या काळीं लोकांस कागद ह्मणजे काय हें ठाऊक नव्हतें; कोणास कांहीं लिहिणें झाल्यास ते कातड्यावर लिहीत असत; जनावरांचीं चांमडीं लिहायाच्या उपयोगीं पडत असीं तयार करण्यास अतिशय मेहनत लागे, याजकरितां तीं फार महाग असत;

मग सहजच, श्रीमंत, मोठे मोठे अधिकारी, किंवा विद्वान लोक मात्र त्यांवर लिहीत असत. यासमयीं तेथें डाकेचे कारखाने किंवा डाकेच्या गाड्या हें कांहीं नव्हतें; ह्मणून कोणास पत्र पाठविणे झाल्यास त्यास मुद्दाम जासूद पाठवावा लागे; परंतु सर्वांसच जासूद पाठविणे ह्मणजे कठीणच, यामुळें थोडकेच लोक पत्रें पाठवीत; मग अर्थात कोणी दूरदेशीं गेला असतां त्यास त्याच्या कुटुंबाची किंवा मित्रांची खबर तो परत येई तोंपर्यंत अगदीं समजत नसे. सीसर हा मोठा विद्वान व शाहणा होता, आणि त्याची लिहिण्याची शैली फार चांगली होती, व ती लोकांस फार आवडतहि असे, ह्मणून छापण्याच्या युक्तीचा शोध लागेपर्यंत लोक त्याच्या ग्रंथाच्या प्रती करून घेऊन मोठ्या काळजीने रक्षून ठेवीत असत. आतां बहुतकरून लाहान मोठे सर्व लोक वाचायास शिकतात आणि ग्रेटब्रिटनमध्यें तर सीसराच्या कामेतार्या हा ग्रंथ ज्यापासीं नाहीं किंवा जो वाचित नाहीं असे थोडकेच गृहस्थ सांपडतील.

सीसर याने ज्या रानटी लोकांस पूर्वीं जिंकिलें होतें ते कांहीं दिवसानी एकाएकीच त्यावर उठले, ते मोठे शूर असून यासमयीं त्यांचा जमावहि मोठा होता ह्मणून सीसर याने, जर त्यांवर अकस्मात घाला घातला नसता, तर त्यानी रोमन फौज जिंकिली असती. सीसर याचा जिकडे तिकडे जय होई याचें कारण त्याची मार्ग क्रमण्याची त्वरा होय. याच्या शत्रूनी अटकल करावी कीं सीसर हा फार जलदीने आला, तर त्याला एथें येऊन पोंहचण्यास अमुक काळ लागेल; असा विचार करून ते स्वस्थ बसले आहेत तोंच अकस्मात येऊन त्याने त्यांची धांदल

करून टाकावी. काळोख्या रात्रींसहि याचें चालणें बंद पडत नसे; हा निजला असला तरी शिपायांनी याला पलंगासुद्धां उचलून डोकीवर घेऊन चालवीत असावें. जाण्याची इतकी जरी उतावळी असे, तथापि त्याच्या फौजेंत बंदोबस्त पराकाष्टेचा असे. तो वाटेनें जात असतां आसपास जीं गावें, किल्ले आढळतील तीं सर्व जाळून लुटून उजाड करून टाकी.

एकदां एक मोठी चमत्कारिक गोष्ट घडली त्यासमयीं सीसर यानें जसें आपलें चातुर्य दाखविलें तसें पूर्वीं कधींहि दाखविलें नव्हतें; रोमन फौज एक शहर घेण्याचा यत्न करीत होती, पण त्या शहराचा तट संभाळण्यास यांच्या सारिखीच फौज होती; त्यांचा जमाव व शौर्य यांच्या प्रमाणेंच होतें. सीसर याच्या मनांत तें शहर घ्यावें असें फार होतें, परंतु एकाएकीं त्यास बातमी पोहंचली कीं मागून रानटी लोकांची तीन लक्ष फौज आपल्या पाठीवर येत आहे. आपल्यास कुमक येत आहे असें जर त्या शहरच्या लोकांस समजतें, तर त्यांनी त्या लोकांस मिळून सीसर याच्या फौजेचे तुकडे तुकडे उडविले असते; परंतु सीसर यानें आपल्या फौजेचा बचाव करण्याची एक युक्ति काढिली, ती चांगली सिद्धीस गेली. त्यानें त्या शहराजवळ कांहीं शिपाई ठेवून पुष्कळ रिकामे तंबू देऊन ठेविले, जेणेंकरून शहरच्या तटावरून पाहिलें असतां सीसर अझून एथें आहे असें दिसावें; असें केल्यानंतर आपले निवडक शूर शिपाई बरोबर घेऊन त्या रानटी लोकांवर गेला तेव्हां ते लोक शहरापासून नजरेच्या टप्प्यांत आले होते. त्या

सैन्यांची गांठ पडतांच मोठी लढाई होऊन नेहमीसारिखाच याचा जय झाला.

एवढीं मोठीं दोन सैन्यें अगदीं त्या शहराजवळ फार वेळ लढत असतां, त्यांचा गोंगाट शहरांतील लोकांस ऐकूं आला नाहीं, हें मोठें नवल आहे; त्यांच्या मित्रांची कांहीं एक बातमी त्यांस कळली नाहीं, परंतु रोमन् लोक जेव्हां माघारे आले, तेव्हां मात्र त्यांस त्यांचा नाश झाला हें वर्त्तमान समजलें; त्या रानटी लोकांच्या सोन्या रुप्याच्या ढाली, त्यांचे तंबू व अणखी पुष्कळ सामान, हे लोक माघारें घेऊन आले, असें पाहून त्या शहरांतील वेढलेल्या लोकानी मोठा आक्रोश व शोक केला.

आतां तर असल्या लढाईचा गलबला पांच कोस तरी ऐकूं जाईल; कांकीं क्षणोक्षणीं तोफांचे व बंदुकांचे आवाज होत असतात; त्याकाळीं तरवारी आणि भाले यानी मात्र लढत असत. नंतर पुष्कळ वर्षानी बंदुकीच्या दारूची युक्ति एका बैराग्याने काढिली, ही युक्ति त्याने काढिली, तेव्हां इच्या योगाने कोट्यावधी प्राण्यांचा नाश होईल असें त्यास वाटलें नव्हतें, नाहींतर तो ही युक्ति लोकांस शिकिवताना.

शेवटीं त्या रानटी लोकांस सीसर याने जिंकून अगदीं जेर करून सोडिलें, त्यामुळें, पुढें त्यानी पुनः बंड केलें नाहीं. त्या लोकांचा हतभाग्य सरदार बंदिवानासारिखा रोमन् लोकांच्या स्वाधीन झाला; असला शूर मनुष्य अशा नीच अवस्थेस आला हें पाहून मोठें दुःख वाटतें. तो आपल्या चिलखतासुद्धां एका सुंदर व शृंगारलेल्या घोड्यावर बसून आला, आणि सीसर यास प्रदक्षणा घालून खालीं

उतरला, नंतर आपलीं सर्व अलंकार भूषणें काढून आपल्या जिंकणाराच्या पायां पडला. यावेळेस सीसर याने त्यास क्षमा केली असती, तर त्याचा मोठेपणा दिसून येता, पण त्याने तसें न करितां त्या सरदारास कैद करून ठेवायास सांगितलें; कारण सीसर याचा असा बेत होता कीं आपण लौकरच परत जावें आणि आपली स्वारी रोम एथें परत गेली ह्मणजे लोकांस चमत्कार दाखिवण्यास हे आपले बंदिवान व लूट बरोबर घेऊन जावी. याच वेळेच्या सुमारें, पोंपी यास दिलेली जी याची कन्या जुलिआ, ती अकस्मात मरण पावली; तेव्हां, रोमशहरचे लोक सीसर याच्या विजयाने फार चढून गेले होते, सबब त्यानी त्याच्या मानाकरितां, याच्या मुलीस आपला खर्च लावून मोठ्या समारंभाने पुरावी असा बेत केला.

आतां पृथ्वीमध्यें, सीसर यापेक्षां मोठा असा एक पोंपी ह्मणून जो याच्या कन्येचा प्रिय पति तो मात्र राहिला होता; तो याजवर फार ममता करीत असे, त्यामुळें आपलें यासीं वांकडें पडेल असें त्याच्या स्वप्नींहि नव्हतें; परंतु जे लोक मोठें पद मिळविण्याविषयीं फार लोभी असतात, त्यांस आपल्या बरोबरीचा कोणी असला, तर तें सहन होत नाहीं; आणि त्यांजपेक्षां कोणी मोठा असला, ह्मणजे तो तर त्यांच्या डोळ्यांत फारच सलतो. फार दिवसांपासून सीसर याच्या मनांत होतें कीं पोंपीचा नाश केल्या शिवाय राहूं नये; ह्मणून त्यासीं तंटा व्हावा, या हेतूने, कांहीं कारणावांचून त्याने त्यासीं अमर्यादेने व कृतघ्नपणें वागण्याचें आरंभिलें. त्याने गालदेश जिंकण्याकरितां पोंपी यापासून जे शिपाई मागून नेले होते, त्यांस

त्याजकडे परत पाठवितेवेळीं, आपल्या धन्यापेक्षां त्यानीं त्याजवर फार प्रीति करावी, या हेतूनें त्यांस मोठमोठीं इनामें दिल्हीं; हें सीसर यानें पोंपी यास राग येण्याजोगें पहिलें कृत्य केलें.

सीसर हा रोम एथील लोकांस व आसपासच्याहि लोकांस फार दिवसांपासून पुष्कळ द्रव्य देत असे, कां कीं, त्यानीं याच्या हितावर असून तेथील सर्व वर्त्तमानें यास कळवावीं; कित्येक सेनेट सभासद यांसहि त्यांच्या अंतस्थ कामगिरीबद्दल त्याजकडून इनामें मिळत असत; तो फार मोठमोठाले लाच देत असे, तेणेंकरून दूरदूरचे राजे रजवाडेहि त्याच्या चाकरीस सिद्ध असत.

याचें व पोंपी याचें वाकडें पडल्यामुळें, रोम एथील लोकांमध्यें दुफळी पडून दोन्हीं पक्षांच्या लोकांमध्यें वारंवार तंटे होऊं लागले. सेनेट सभासद व श्रीमंत लोक पोंपीच्या पक्षाकडे होते परंतु बाकीचे सर्व लोक सीसर याच्या पक्षाकडे होते; याचें कारण कीं, जेव्हां लोकांकडून कांहीं गैरवर्त्तणूक होई, तेव्हां सीसर हा नेहमी त्यांचा पक्ष धरी. एक दिवस सीसर यास मोठा मान द्यावा असें लोकांच्या मनांत आलें, पण तो तेथें नव्हता ह्मणून त्याचा मित्र कुरियो यासच त्यानीं फुलांचा मुकुट वगैरे घातला, तेणेंकरून पोंपी याच्या पक्षांतील लोकांस इतका राग आला कीं, त्यानीं कुरियो यास ठारहि मारिला असता; परंतु तो गुलामाचा वेष घेऊन भाड्याच्या गाडींत बसून पळून गेला, ह्मणूनच वांचला.

पुढें हा बखेडा रोम एथें फारच मातला; त्यामुळें लोक तेथें राहावयास फारच भिऊं लागले आणि सर्वांस मोठें

दुःख झालें असें दाखविण्याकरितां चालीप्रमाणें काळा पोशाक करूं लागले.

हें रोम एथील वर्त्तमान, जेव्हां सीसर यानें ऐकिलें, तेव्हां त्याच्या मनांत आलें कीं, आतांच आपण तेथें जावें, परंतु सेनेट सभेच्या हुकमाशिवाय कोणाहि सरदारास आपली फौज सोडून परत येण्याचा हुकुम नसे; तेव्हां आपली फौज बरोबर घेतां येईना यामुळें त्यास मोठी अडचण पडली, आणि काय करावें तें सुचेना. दुसरासा असतां तर, अशा वेळेस, आपण स्वस्थ बसून आपलीं कामें मित्रांस करायास सांगता; पण सीसर याला उगींच राहवेना; तो ज्या ज्या कामांत हात घाली त्या त्या कामांत त्याचा जय होत असे याजकरितां, मी जें करीन, तें सिद्धीस जाईल असें त्यास वाटून गेलें होतें. त्यानें, आतां पुढें कसें करावें याचें फार वेळ मनन करून, शेवटीं असा विचार केला कीं, आपल्याच इच्छेनें आपण रोम एथें जावें; आपण तेथें गेलें असतां, आपले मित्र आपल्यावर कोणत्याहि गोष्टीची तोहमत न येऊं देतां, पोंपी याचा त्याच्या पक्षाचा अगदीं नाश करितील, असें त्यास वाटलें.

आपल्या फौजेंतून थोडीशी फौज मात्र बरोबर घेऊन जावी, असा सीसर याचा बेत होता, ह्मणून त्याच्या मनांत आलें कीं, आपण बाकीच्यांस सोडून जाणार हें त्यांस समजूं देऊं नये; याजकरितां, आपल्या निघावयाच्या दिवशीं त्यानें सर्व फौजेस मोठी मेजवानी केली; आणि रात्री चांगला काळोख पडला तेव्हां तो उठून आपल्या सरदारांस ह्मणाला कीं, मी परत येईपर्यंत तुमच्या एक सारिख्या मेजवान्या व मौजा चालूं द्या. ते जर याच्या हुक-

माप्रमाणें करते तर मेजवान्याच खात बसले असते, कां कीं तो पुनः परत आला नाहीं. त्याकरितां गाडी तयार होऊन राहिलीच होती, तिजमध्यें बसून त्वरेने तो रोम एथें चालता झाला, आणि तीनशें स्वार, व पांच हजार पायदळ यांस पूर्वींच त्याने तयार होऊन राहावयास सांगितलें होतें, त्यांस बरोबर घेतलें.

तो रुबिकन नदीच्या तिरीं जाऊन पोहंचला, तेव्हां तेथें अंमळ थांबून विचार करूं लागला कीं, सेनेट सभेच्या हुकुमाशिवाय आपण रोम एथें जाणें हें मोठें साहस होय; कां कीं पोंपी व त्याच्या पक्षाचे लोक यांच्या हातीं मोठा अधिकार आहे, ह्मणून मला मारून टाकायास त्यांस उशीर लागणार नाहीं. तो जसजसा अधिक अधिक विचार करूं लागला तसतसें पुढें जाणेंहि प्राणसंकटाची गोष्ट आहे असें त्याला वाटूं लागलें; आपल्या फौजेस घेऊन परत जावें असाहि विचार बहुतकरून त्याच्या मनांत भरला; परंतु पुनः त्यास धैर्य येऊन त्याच्या भयाचें निवारण झालें, आणि तो नदींत उडी मारून “माझा कृतनिश्चय झाला” असें ह्मणून थेट रोम एथें चालता झाला, तो रोम एथें पोंचे तोंपर्यंत वाटेने कोठेंहि मुक्कामास राहिला नाहीं.

सीसर येतो असें रोम एथें समजल्यावर तेथें मोठी गडबड झाली आणि बहुतेक लोकांनी सीसर याच्या संरक्षणाकरितां हत्यारें घेतलीं, तेणेंकरून पोंपी व त्याच्या पक्षाचे लोक भिऊन जाऊन शहर सोडून निघाले, आणि लोकांस ह्मणाले कीं, रोम एथें जुलुमगाराचा अंमल नसावा, असें ज्यास वाटत असेल त्यानी आमच्या बरोबर चलावें;

तेव्हां, लागलेच दोघे मुख्य अधिकारी कांहीं सेनेट सभासद आणि शहरांतील श्रेष्ठ लोक, हेहि त्यांजबरोबर पळून गेले, कां कीं त्यानी सीसर व तत्पक्षी लोक यांस अडथळा केला होता.

पूर्वीं, जेव्हां पोंपी याने ऐकिलें कीं सीसर याच्या मनांत आपल्यापेक्षां वरचढ व्हावयाचें आहे, तेव्हां त्यास वाटलें कीं, ही गोष्ट सीसर याच्या हातून कसची सिद्धीस जाती! तो ह्मणे कीं, मी हूं ह्मटलें पुरे, ह्मणजे सर्व शिपाई तत्क्षणींच उठून माझ्या शत्रूंस जिंकून टाकितील. आतां पोंपी याला हा पळून जाण्याचा प्रसंग प्राप्त झाला, तेव्हां त्याचा फेवोनियस नामक एक मित्र, त्यास चिडिवण्याकरितां हंसून ह्मणाला, "कीं राव साहेब, हुं ह्मणण्याची वेळ हीच आहे."

पोंपी हा श्रीमंत व मोठा अंमलदार होता, तेव्हां हा फेवोनियस त्यास वांकडीं भाषणें बोलत असे; परंतु जेव्हां विपरीत काळ येऊन पोंपी यास दुर्दैव प्राप्त झालें आणि त्याच्या वहुतेक मित्रानी व त्याची स्तुति करणारे जे होते, त्यानी त्यास सोडिलें, तेव्हां तो त्याला पहिल्यापेक्षां फार मान देऊं लागला. तो त्याजवळ चाकराप्रमाणें हजर असे आणि त्यास अडचणीच्या प्रसंगीं सर्व प्रकारें सहाय करीत असे; त्याने त्याच्या बोलण्या चालण्यांत इतका मान राखावा कीं जसें काय सर्व रोम शहर ह्याच्या स्वाधीनच आहे.

पोंपी गेल्यानंतर, पाठीमागें रोम एथें जे लोक राहिले होते त्यानी आपला पक्ष धरावा ह्मणून सीसर त्यांसीं फारच ममतेने वागूं लागला; त्याचें बोलणें चालणें फार चांगलें होतें आणि त्याने कोणतेंहि कृत्य केलें तरीं, तें ममतेचें

करणें असें लोकांस दिसे; याजकरितां त्याच्या मनांत को-णाचेंहि मन वळवायाचें असलें, तर त्याला उशीर लागत नसे. सीसर यास तक्तावर बसविला, तर हा फार चांगलें राज्य करील, असें लोकांच्या मनांत यावें, ह्मणून त्यानें पुष्कळ लोकांस ऋणमुक्त केलें, आणि ज्यांस अन्यायानें देशपार केलें होतें त्यांस परत येण्यास मोकळीक दिली. याप्रमाणें, त्यानें थोडक्यांतच पुष्कळ लोक अगदीं आप-लेसे करून सोडिले, तेणेंकरून ते हा जें सांगेल तें करा-यास सिद्ध झाले.

नंतर लागलाच, तो आपली फौज घेऊन पोंपीवर मो-हिमेस गेला; वाटेनें तो फार जलदीनें चाले त्यामुळें त्या-च्या कित्येक शिपायांबरोबर टिकाव धरवेना. त्याच्या मनांत आलें कीं, आपली फौज फुटून असावी हें नीट नाहीं, याजकरितां आपण एकट्यानेच परत जाऊन मागून जी फौज येत आहे, तीस पुढें घेऊन यावें असा बेत करून तो मागें परतला, वाटेनें थोडासा समुद्र उतरावा लागतो त्या ठिकाणीं, शत्रूंचीं तारवें पुष्कळ आहेत, तीं आपल्यास कदाचित ओळखतील हें भय मनांत न धरितां एकटाच तरींत बसला. आपल्यास दैव अनुकूळ आहे ह्मणून नेहमीं कोणत्याहि कामांत आपला जय व्हावयाचाच, असा जो त्याचा निश्चय होता, त्याजवर मात्र त्यानें भरवसा ठेविला. आपल्यास खलाशानींहि ओळखूं नये आणि हा कोणी सां-गायाजोगा मनुष्य आहे, असेंहि कोणास वाटूं नये ह्मणून सीसर हा गुलामासारिखा वेश घेऊन त्या तरींत बराच वेळ मुकाट्यानी राहिला.

शेवटीं, समुद्रांत मोठें तुफान झालें आणि लाटा फार

मोठमोठ्या येऊं लागल्यामुळें ही नाव आतां बुडेल असें वाटूं लागलें; तेणेंकरून त्या खलाशानीं अगदीं भिऊन जाऊन आपल्या तांडेलास ती तर मागें फिरवायास सांगितली; तेव्हां सीसर याने एकाएकीं आपला वेश टाकून आपण कोण हें त्यांस समजाविलें, तेव्हां त्या खलाशांस मोठें आश्चर्य वाटलें. त्याने मोठ्याने ओरडून त्या खलाशांस हुकूम केला कीं "मित्रानों, पुढें चाला, तुह्मास अभय आहे, तुह्मी सीसर आणि त्याचें नशीब यांस नेत आहां." त्या वेळेस त्याच्या पुढें कोण बोलणार आहे; खलाशी त्याची मर्जी खुष करण्याकरितां एका क्षणांत, आपले पहिले सर्व श्रम विसरून आपली वल्हीं पहिल्यापेक्षां दुप्पट जोराने मारूं लागले; आणि आपलें जितकें सामर्थ्य होतें तितकें त्यानीं खर्चिलें, परंतु तें सर्व व्यर्थ जाऊन पाणीं नावेंत मारूं लागलें आणि लाटाहि पहिल्यापेक्षां फार उसळूं लागल्या, त्यामुळें सीसर याचें बोलणें सर्व व्यर्थ गेलें. ती तर माघारी फिरवावयास त्याने रुकार दिला, ह्मणून बरें, नाहीं तर तो बुडून गेला असता.

वायु, व समुद्र ज्याच्या आज्ञेंत होते असा या पृथ्वीवर एकच पुरुष होऊन गेला, त्यापेक्षां मोठा दुसरा कोणी झाला नाहीं. पाहा! तो सीसर यापेक्षां किती थोर बरें, जेव्हां येशू ख्रिस्ताने समुद्रास ह्मटलें कीं, "स्थिर राहा" तेव्हां तो लागलाच शांत झाला.

शेवटीं सीसर व पोंपी यांच्या फौजा समोरासमोर येऊन भिडल्या. असे हे एकाच देशांतले लोक, एकमेकांस शत्रूसारिखे पाहूं लागले व एकमेकास जिंकून पर-

पुणे मराठी ग्रंथालय ४३७ नारायण दा. नं. ५८५५

स्परांचा नाश करण्याची इच्छा धरूं लागले, हें पाहून फारच दुःख वाटतें. त्या वेळीं सीसर हा अर्ध्या पृथ्वीचा धनीपणा घेऊन, तृप्त झाला असता तर तसी गोष्ट होण्यास अवघड नव्हती; परंतु याच्याने सर्व अधिकार आपणास घेतल्यावांचून राहवेना. सीसर आणि पोंपी यांच्या नावांची कीर्ति आणि प्रतिष्ठा वाढविण्याच्या हेतूने सत्तर हजार रोमन लोक आपल्या रक्ताच्या पुराने त्या देशास बुडवायास सिद्ध झाले. यांचा काय परिणाम झाला तो तुमच्या लौकरच दृष्टीस पडेल. हे दोघे मोठाले सरदार, यांनी आपण जन्मभर सुख व सदाचरण यांत काळ घालवावा, तें टाकून अशा कर्मांनी थोडक्याच काळांत मारेकऱ्यांच्या हातून दोघेहि मारले गेले. इतके दिवसपर्यंत, सीसर यास आपल्या बरोबरीने शूर व चतुर असा कोणी सरदार लढायास भेटला नव्हता. ह्मणून पूर्वी जसा जसा त्याचा नेहेमी जयच होत असे तसा या प्रसंगीं झाला नाहीं. याच्या आणि पोंपी याच्या फौजांच्या कित्येक लढाया झाल्या, त्या बहुतकरून सीसर याने जिंकिल्या; परंतु शेवटीं सीसर यास त्याचें दैव प्रतिकूळ झाले असें दिसतें. पोंपी याने, आपल्या सैन्याचा पुढारी होऊन शत्रूवर मोठ्या शौर्याने हल्ला केला, तेव्हां एकहि मनुष्य त्यापुढें टिकला नाहीं; त्याने सीसर याच्या सैन्यास, मेंढ्यांच्या कळपासारिखें पिटून लावून जिकडे तिकडे कत्तल करून टाकिली. शेकडो लढाया ज्याने मारल्या असें जें सीसर याचें लष्कर तें, ह्या प्रसंगीं भयाने घाबरून पळूं लागलें, हें पाहून सीसर यास मोठें आश्चर्य वाटलें. मग रागाच्या आवेशाने, तो त्यांस शत्रूसमोर उभे

राहण्याविषयीं यत्न करूं लागला असतां, त्यांतून एकजण भयाने घाबरून न ओळखतां त्याला तरवारीचा घाव घालीत होता, इतक्यांत सीसर याचा कवच बाळगणारा मनुष्य जवळ होताच, त्याने आपल्या तरवारीच्या एका फटक्याबरोबर त्याचा हात उतरून सीसर याचा प्राण वांचविला.

असा हा पराजय झाल्यामुळें सीसर याला त्या रात्रीं जें काय दुःख झालें, तसें कधींच झालें नव्हतें आणि त्याच्या सैन्याने असा ठोकहि कधीं खाल्ला नव्हता. त्याला क्षणोक्षणीं वाटत होतें कीं, पोंपी आपल्या छावणींत येऊन आपल्या थकलेल्या व घाबरलेल्या लष्कराचे तुकडे करायास चुकणार नाहीं. प्रातःकाळ झाल्यावर सीसर ह्मणूं लागला कीं, जर कां पोंपी रात्रीं आपल्या छावणींत घाला घालता तर सर्वांची कत्तल करून निखालस जय मिळविता. सीसर याचे बहुतेक शिपाई फार वर्षें चाकरी करून ह्मातारे आणि अशक्त झाले होते, तशांत छावणींत ज्वराच्या अनर्थाने प्रति दिवशीं पुष्कळ मनुष्यें मरत होतीं, आणि पैका व सामग्री यांचीहि तंगी पडली होती, ह्मणून ते सीसर यास ह्मणूं लागले कीं, आपण मेहरबानी करून लढाई सद्यः तहकूब करावी; परंतु जर आपल्या मनांत लढाई करायाचीच असें असेल, तर आह्मी पाहिजे त्यावेळेस सिद्ध आहों.

इकडे पोंपी याचेहि मनांत लढाई तहकूब ठेवायाची होती; कां कीं एकाच शहरांतील दोन फौजा एकमेकांस मारून टाकितात, हें पाहून त्याला फारच वाईट वाटूं लागलें. अणखी त्याला असी आशा होती कीं, सीसर

याच्या छावणींत आजाराचा उपद्रव झाला आहे, तेणेंकरून तो लौकरच सल्ला करील आणि तसें झालें असतां, शेकडो जीवांचे प्राण वाचतील. पोंपी याचें सैन्य सीसर याच्या सैन्यासारिखेंच बाहादूर असून पुनः लढाई करण्यास तयार होतें, असें असतां, त्याच्या मनांत लढाई करायाची नव्हती, म्हणून तो शाहणा व दयाळू होता असें वाटतें; परंतु पुढें त्यानें आपल्या इच्छेप्रमाणें वर्त्तणूक केली नाहीं. पुष्कळ जीवांचें रक्षण होतें याच कारणामुळें, केटो याचाहि पोंपीसारिखाच लढाई तहकूब ठेवण्याचा मनोदय होता; पोंपी याचा जय झाल्यावर केटो हा रणभूमींतून जात असतां, जेव्हां मोठमोठे शूर सरदार व शिपाई यांची प्रेतें मैदानांत पडलेलीं त्याच्या दृष्टीस पडलीं, तेव्हां तो कपाळावर हात मारून घेऊन खळखळां रडूं लागला; यावरून रोम शहरचे लोकांवर त्याची फार प्रीति होती असें दिसतें.

शेवटीं, दुसऱ्या दिवसीं फरसेलीया शहरचे मैदानांत युद्ध व्हावें असा ठराव झाला; त्याप्रमाणें दोन्हीं सैन्यें मोठ्या हर्षानें लढाईकरितां तयार होऊन राहिलीं. त्या उभयतांसहि आपलाच जय होईल असी खात्री होती, म्हणून तीं दोन्हीं सैन्यें जय झाल्याप्रमाणें आनंद करूं लागलीं. पोंपीच्या लोकानी त्याची रावटी पुष्पानी शृंगारून त्याचे मित्रांसहीत त्यास एक मेजवानी केली, त्यावेळीं छावणींत जिकडे तिकडे जयजयकाराच्या ध्वनी उठूं लागल्या. हें युद्ध होण्याच्या पूर्वीं एक दिवस, सीसर आपल्या कामकाजाचा कसा काय बंदोबस्त करावा म्हणून, एकांतीं विचार करण्याकरितां बाहेर निघाला होता, त्या वेळीं त्यानें

एक तेजस्वी नक्षत्र आकाशांतून पडतां पाहिलें, तें याच्या छावणीवरून जाऊन पोंपीच्या छावणींत पडून नाहींसें झालें.

त्याकाळीं लोक शकुन पाहणें झाल्यास ग्रहांवरून पाहत असत; शकुन पाहताना त्यांस चंद्र बरोबर दिसला तर बरें, परंतु जर कदाचित त्याच्या आड ढगें आलीं असलीं, तर ते असें समजत कीं शत्रु आपला नाश करील; तसेंच ते पक्ष्यांचे उडण्यावरूनहि शकून पाहत असत. जर गरूडपक्षी एकाद्या छावणीवर फारवेळ झेपा घालूं लागला, तर त्या सैन्यास मोठा आनंद होत असे; परंतु कावळे येऊं लागले, तर ते अगदीं निराश होऊन जात. तें नक्षत्र पाहिल्यावरून सीसर याला असें वाटलें कीं, हा कांहीं शुभ शकुन असावा. मग त्याने जोशांना बोलावून त्याचें फळ कसें काय तें विचारिलें. हे लोक तर मोठे ठक असत, त्यांना इतर लोकांप्रमाणेंच पुढील भविष्य कळत नसे. कोणी कांहीं विचारलें असतां ते युक्तीने असें उत्तर देत, कीं त्याचा पाहिजे तो अर्थ व्हावा; त्याप्रमाणें त्यानी सीसर यास मोठ्या गंभीरपणाने सांगितलें कीं, तीन दिवसांत लढाई होऊन पुष्कळ फेरफार होईल. ही गोष्ट तर सर्वांस पूर्वींच ठाऊक होती.

सर्वांस माहित आहेच कीं, लढाई झाल्यावर कांहीं तरीं फेरफार होतोच. आतां, हे जोशी कोणत्या तऱ्हेचा फेरफार होईल तें तर सांगत नसत, ह्मणून पोंपी जिंको किंवा सीसर जिंको यांचे सांगणें कोणीकडून खरें व्हायाचेंच. त्यांचे प्रश्न पाहण्याचें अणखीहि पुष्कळ प्रकार होते, व हे लोकांस खरे वाटावे, ह्मणून ते कधीं कधीं मोठा आव घालून अनुष्ठानें करायास बसत, केव्हां केव्हां जनाव-

रांच्या पोटांतील आंतडीं व दुसरे कांहीं भाग बाहेर काढून त्यांचा प्राण गेला नाहीं इतक्यांत, त्यांत वाचल्यासारिखें दाखवून भविष्य सांगत. त्या लोकांच्या इतक्या भाविक भोळेपणाच्या गोष्टी ऐकून असें वाटतें कीं, ज्या लोकांस धर्मपुस्तकांत सांगितलेला खरा मार्ग ठाऊक नाहीं, ते फारच अज्ञान असतात. ग्रीसदेशामध्यें असी एक चाल होती कीं, ज्या कोणाला प्रश्न पाहावयाचा असेल, त्याने, देवळांत कोंबडीचीं पिलीं बाळगलेलीं असत तीं मोठ्या समारंभाने बाहेर काढवून, त्यांपुढें दाणा टाकावा. जर त्यानी त्या दाण्यावर घसरून तो खाऊन टाकिला, तर हातीं धरलेलें कार्य सिद्धीस जाईल असें त्याने समजावें; आणि जर, त्यानी तो दाणा खाल्ला नाहीं, तर त्याने चांगला योग येईपर्यंत तें कार्य तसेंच तहकूब ठेवावें. हे जोशी अणखी स्वप्नांचींहि फळें सांगत; परंतु आह्मास स्वप्नें काय पडलीं तीं सांगा, असें जर त्यांस ह्मटलें असतें, तर ते अगदीं गोंधळून गेले असते. पुढें होणार गोष्टी सांगाव्या ह्मटल्या, तर येशू ख्रिस्ताच्या भविष्यवाद्यानीच सांगाव्या, त्यांची भविष्य सांगण्याविषयीं पराकाष्ठा होती. ऐझाया नामक भविष्यवाद्याने तर पृथ्वीवर ज्या कित्येक झालेल्या गोष्टी, त्या घडून येण्याच्या पूर्वींचे शेंकडो वर्षांवर आपले पुस्तकांत लिहून ठेविल्या होत्या. त्याने सैरस बादशाह जन्मायाच्या पूर्वींचे त्याचें नाव, व तो कोणत्या रीतीने बाबीलन शहर जिंकील, हें भविष्य सांगितलें होतें; आपल्यास भविष्य कळावें ह्मणून, तो ठक जोशांसारिखा दांभीकपणाने अनुष्ठानें करीत नसे, फक्त त्याची निष्ठा मात्र

ईश्वरावर असे, तेणेंकरून, तो भगवंताचें स्मरण करी त्या काळीं त्याला भविष्य सांगायाचें ज्ञान प्राप्त होई.

फरसेलीया एथें लढाईकरितां सर्व सैन्य सिद्ध असतां, सीसर याने, आपल्या शिपायांतून एका वृद्ध व शूर शिपायास विचारिलें कीं, आज कोणाचा जय होईल असें तुला वाटतें? त्याने मोठ्या आनंदाने उत्तर केलें कीं, "जय तर आपलाच आहे, आज एक तर सीसर लढाईंत मेला असी कीर्त्ति होईल किंवा त्याने जय मिळविला असी होईल." कांहींका पळानी त्या शिपायाने रणांत शिरून शत्रूंचीं कित्येक मनुष्यें ठार मारिलीं, परंतु पोंपी याच्या एका शिपायाने त्याचे तोंडांत तरवार भोंसकली, ती आरपार निघून तो शूर शिपाई लागलाच मरण पावला.

पोंपी याच्या जवळचे स्वार फार सुंदर होते, व त्यांना आपले देखणेपणाचा फारच अभिमान होता, ह्मणून त्यानी असा नियम केला होता कीं, आपण, कुरूप दिसूं अशा ठिकाणीं वार लागला असतां वांचावें, त्यापेक्षां मरावें हें फार चांगलें. हा त्यांचा नियम सीसर यास कळतांच त्याने आपल्या शिपायांस सांगितलें कीं, तुह्मी, लढाईमध्यें पोंपी याच्या शिपायांस वार करणें, तो मुद्दाम त्यांच्या तोंडावर करीत जा असें होतांच ते स्वार, लढाईमध्यें उभे राहतनासे झाले, तेणेंकरून पोंपी याची बाकीची फौजहि घाबरून पळूं लागली. असी सुंदरपणाच्या अभिमानामुळें त्यांची अगदीं फजिती होऊन पोंपी याचा पराभव झाला, आणि सीसर याचें लष्कर पहिल्याप्रमाणें आपणास अजिंक्य असें ह्मणवूं लागलें.

पोंपी हा मोठा शूर शिपाई होता, तथापि आतां त्या-

चा पडता काळ आल्यामुळें तो मिसरदेशीं पळून गेला; तेथें टालमी नामें राजा राज्य करीत होता त्यावर याने पुष्कळ उपकार केले होते, ते असा संकटाच्या वेळीं नस्मरतां त्याने कृतघ्न होऊन असा हुकूम केला, कीं पोंपी हा आपले देशांत पाय ठेवतांच त्याला ठार मारावा त्याप्रमाणें कोणी त्याचें डोकें कापून धड समुद्र तीरीं तसेंच टाकिलेलें होतें; शेवटीं पोंपी याच्या लष्करांत ज्याने पूर्वीं चाकरी केली होती, असा एक मनुष्य तिकडून जात असतां तें धड त्याचे दृष्टीस पडलें, त्याने लागलेंच तें पोंपीचें असें ओळखून त्याच ठिकाणीं खाडा खणून गाडून टाकिलें.

पोंपीला मारून त्याचें शीर कापून माझ्या स्वाधीन करावें असें टालमीने मारेकऱ्यांस सांगितलें होतें; कांकीं त्याला असें वाटत होतें कीं, हें सीसर याला पाठविलें असतां तो फार खुशी होईल. तें पोंपीचें रक्तबंबाळ शीर आणि त्याची नेहमी हातांत घालायाची आंगठी, सीसर याने पाहतांच त्याचे आंगीं रोमांच उभे राहून तो ढळढळा रडूं लागला.

त्या वेळीं आपली ही दशा पोंपी सारिखीच होईल असें सीसर याच्या मनांत सहसा आलें नसेल. आपल्या शत्रूचा नाश झाला, व आपल्याजवळ फौज आहे तीहि आपल्याकारितां प्राण देण्यास सिद्ध आहे, याजकरितां आतां आपण निर्भय झालों असें त्याला वाटूं लागलें. सीसर इहलोकींची श्रीमंती व कीर्ति भोगीत होता, त्यावरून त्याचे मित्र व खुशामती लोक ह्मणत कीं, तो अमर आहे; परंतु थोडक्याच काळांत त्याला कसा मृत्यु आला तो पाहा. तो आजारी पडून मेला नाहीं, किंवा लढाईंतहि

मेला नाहीं. परंतु ज्यांजवर तो विश्वास ठेवून प्रीति करीत असे, त्यांच्याच हातून त्याचा घात झाला. यावरून आपण विचार करून पाहावें कीं, ईश्वर किती दयाळू व ज्ञानी आहे, कांकीं पुढें काय वर्तेल तें तो आपणास कळूं देत नाहीं; जर तें आपल्याला कळलें, तर आपल्याच्याने स्वस्थ राहवणार नाहीं कारण जें कांहीं चांगलें व्हावयाचें त्याजविषयीं आपण अधीर होऊं आणि वाईटाविषयीं मात्र धास्ती वाळगूं, याजकरितां तें समजत नाहीं ह्मणून ईश्वराचें आपणास फारच आभारी झालें पाहिजे. आतां सीसर आपला थोरपणा अगदीं निर्भय असें समजूं लागला; पोंपी याचे जितके मित्र होते तितक्यांस त्यानें क्षमा करून त्यांवर पुष्कळ उपकार केले. तो ह्मणे कीं, म्यां त्यांजवर कृपादृष्टि करावी हेंच माझे जयाचें सार्थक होय.

मिसर देशींचा राजा टालमी, ज्यानें पोंपीचा वध केला होता त्याची बहीण क्लियोपात्रा हिला गादीवर बसविण्याकरितां सीसर यानें त्याशीं युद्ध केलें. ह्या पृथ्वीमध्यें ती एक फार सुंदर व उधळी स्त्री होऊन गेली, तिच्या दुष्टपणाच्या व मूर्खत्वाच्या गोष्टी, ज्या अझून लोकांना स्मरतात, त्या सांगूं गेलें असतां एक मोठा ग्रंथ होईल. दररोज संध्याकाळीं, ती आपल्याकरितां साहा सात प्रकारचे स्वयंपाक तयार करवी, तिच्या स्वयंपाक्यास असा हुकुम असे कीं, स्वयंपाक चांगला ऊनऊन व ताजा आहे तोंच जर मी मागविला नाहीं, तर तो उडवून देऊन लागलाच दुसरा नवा करावा. धर्मपुस्तकांतील उदाहरण ह्यापेक्षां किती भिन्न आहे, हजारों लोकांस पुरें इतकें अन्न जो आपल्या एका शब्दानें उत्पन्न करायास समर्थ होता,

त्यानेहि त्यां सर्वांची तृप्ती झाल्यावर ह्मटलें कीं, "चुरा चारा गोळा करून एकहि कण निरर्थक जाऊं देऊं नका."

क्लियोपात्रा जसी उधळी होती तसीच दुष्टाहि होती; कोणत्या विषाने मनुष्याचा प्राण तात्काळ जातो हें समजावें, ह्मणून ती गुलामास आपल्या समक्ष आणवून त्यांस नाना तऱ्हेचीं तीक्ष्ण विषें प्यावयास देई, आणि त्यांचे प्राण जाते वेळींचे तडफडाट मोठ्या खुशीने पाही. तसेंच निरनिराळे जातीचे साप एकेकास डसवून कोणत्या सापाचें वीष जलद आहे तें पाही; शेवटीं आग्या घोणस या जातीचा एक साप आहे, त्याचे डंशाने मनुष्य लवकर मरतो असें तिला समजलें; पुढें कांहीं वर्षांनीं तिने त्याच जातीचा एक साप आपणांस डसवून आपला प्राण घालविला.

अशा या दुष्ट राणीचें सौंदर्य व छब पाहून सीसर फारच भुलून गेला होता. तिने कांहीं मागितलें असतां, तो तें द्यावयास कधींहि नकारीत नसे; शेवटीं मिसर देशाचे गादीवर तिला बसवायाचें त्याने कबूल केलें. क्लियोपात्रा एका जाजमाच्या गठ्यांत बसून कोणाच्या न कळतां त्याला छावणींत भेटायास गेली, तें पाहून सीसर याला फारच आश्चर्य वाटलें. या समयीं टालमी व क्लियोपात्रा या उभयतानी मिसर देशाचें राज्य करावें असा ठराव झाला, आणि त्याप्रमाणें त्या उभयतांस मोठ्या समारंभाने राज्याभिषेक झाला; परंतु अशा ह्या व्यवस्थेने त्या दोघांतून एकाचीहि समजूत पडली नाहीं.

सीसर याचा मोठा हुशार व चौकस असा एक दास होता, त्याने एका मेजवानीच्या दिवशीं, कित्येक मिसर दे-

शींचे दरबारी लोक, कांहीं खलबत करितांना पाहिले; त्यावरून ते कांहीं तरी कट रचीत आहेत असा त्याला संशय येऊन, ते काय बोलत होते त्याकडे त्याने आपला कान दिला; तेव्हां त्याला असें समजलें कीं, ते टालमी याचे मित्र आहेत ह्मणून रात्रीस सीसर याच्या जेवणांत कांहीं विषप्रयोग करून त्याला ठार मारावयाचा बेत करीत आहेत. मग एक क्षण न लावतां धांवत जाऊन त्याने आपल्या स्वामीस ह्या भयंकर कटाची बातमी सांगितली, त्यावरून सीसर याने त्यांतला मुख्य जो फोटीनस त्याला ठार मारवून बाकीच्यांस कैद केलें.

या समयीं टालमी हा भिऊन जाऊन दरबारांतून पळून गेला, आणि आपल्या सहायार्थ एक फौज जमवून रोमन लोकांस मिसर देशांतून हाकून लावावें, या हेतूने सीसर यावर हल्ला करण्याच्या उद्योगास लागला; त्या प्रसंगीं एक लढाई झाली, तींत पुष्कळ मिसर लोक मारले गेले, आणि टालमी हा कोठें गेला व त्याचें काय झालें हें कोणास कांहींच समजलें नाहीं. नंतर सीसर याने क्लियोपात्रा इला तें राज्य दिलें, तें तिने फार वर्षेपर्यंत चालविलें, आणि मूर्खपणा व दुष्टपणा यांहीं करून आपलें नाव सर्व पृथ्वीभर गाजविलें.

आलेक्शानद्रिया एथील पुस्तकसंग्रह याला याचसमयीं आग लागली, तेव्हां चाळीस हजार पुस्तकांचा नाश झाला, त्यामुळें तितकें ज्ञान पृथ्वींतून कमी झालें; कारण त्यावेळीं ग्रंथकर्त्ते थोडेच होते खरें, परंतु ते आपला काळ भलभलतींच पुस्तकें लिहिण्यांत घालवीत नसत, त्यांचे ग्रंथ मोठे ज्ञानपर असत, ह्मणूनच जे कोणी ते

ग्रंथ पढतात त्यांस अद्यापिहि पुष्कळ ज्ञान प्राप्त होतें.

पुढें सीसर, सीरिया वगैरे दुसरे देश जिंकण्याकरितां निघाला, तो तेथें येऊन पोहंचल्यावर लागलेंच त्याने शत्रूचें सर्व लष्कर मारून त्याचा अगदीं मोड करून टाकिला आणि आपण विजयी झाला. या जयाचें वर्त्तमान रोम एथें कळविण्याकरितां त्याने आपल्या एका मित्रास असें लिहिलें कीं, "मी आलों! म्या पाहिलें! म्या जिंकिलें!" असें लिहिण्याचें तात्पर्य हेंच कीं, कोणत्याहि प्रकारें आपली कीर्त्ति वाढावी हा सीसर याचा मुख्य हेतु होता, ह्मणून आपण किती त्वरेने जय मिळवितों हें सांगायाकरितां त्याने तसें लिहिलें. तसेंच प्राचीन ग्रंथ अवलोकन केलें असतां, त्यांत आपण हा चमत्कार पाहतो कीं, त्या काळचे मोठमोठे विद्वान पुरुषहि आपल्या चांगल्या कृत्यांची आपणच तारीफ करितात, हें असें करणें विचार करून पाहतां किती अप्रशस्त दिसतें बरें! धर्मपुस्तकांतहि आपणास सांगितलें आहे कीं, आपण निरंतर नम्रता धरावी; असें असतां, सीसर, सीसरो, आणि केटो, ह्यानी जी आपल्या लेखांत आपली स्तुति केली आहे, ती पाहून जसा काय त्यांची बरोबरी करणारा ह्या पृथ्वींत दुसरा कोणीच झाला नाहीं असें वाटतें. एकदां एकाने येऊन केटोजवळ सांगितलें कीं, अमुक मनुष्याने फार वाईट काम केलें, तेव्हां त्याने मोठें समाधान पावून त्यास उत्तर केलें कीं, "केटो ह्मणसील तर ह्या पृथ्वींत एकच आहे," ह्मणजे त्यासारिखा निर्दोषी पुरुष दुसरा कोणीच नाहीं.

केटोसारिखा विश्वासू मित्र पोंपीला दुसरा कोणीच

मिळाला नव्हता; तो फार शाहाणा व सद्गुणी होता, ह्मणून सीसर याचे मनांत फार होतें, कीं त्याला आपल्या कैदेंत ठेवावा; परंतु सीसर याच्या मनांतून त्याच्यासीं पुढें कसें वर्त्तायाचें होतें हें समजत नाहीं. सीसर हा मोठा अधिकारी पुरुष आहे, याकरितां तो हरतऱ्हेने आपणास आपल्या कबज्यांत आणूं शकेल, व तसें झालें असतां आपली अवस्था कठीण, ह्मणून त्याने आपली आत्महत्या करण्याचा निश्चय केला; कां कीं रोमन लोकांची असी समजूत होती कीं, शत्रूच्या हातांत सांपडल्यावर किंवा मोठें एखादें दुर्दैव प्राप्त झाल्यावर जिवंत राहावें त्यापेक्षां मरावें हें योग्य. पवित्र धर्मपुस्तकाच्या आधाराने आपण पक्कें समजावें कीं, आपणावर जीं संकटें येतात तीं ज्ञानी व दयाळू जो ईश्वर त्याच्या आज्ञेवांचून येत नाहींत; मनुष्यास काय काय उचित आहे तें सर्व तो जाणतो; आपल्याला जितकें आयुष्य त्याने दिलें आहे, तितकें सरलें ह्मणजे तो आपल्याला ह्या पृथ्वींतून घेऊन जातो याजकरितां आपणावर कसीहि दुःखें येऊन पडलीं, तरीं तीं आपणास स्वस्थचित्त करून सोसिलीं पाहिजेत; आणि असा विचार केला पाहिजे कीं, तीं दैवाने प्राप्त होत नाहींत, ईश्वरेच्छेनेच होतात. जो जो दिवस ईश्वर आपणास दाखवितो, त्या त्याकरितां आपण त्याचें आभारी व्हावें; कारण कीं आपणास त्याच्या जवळ जाऊन अक्षय राहण्याची योग्यता प्राप्त करून घ्यावयाची संधी सांपडती. केटो याला याविषयीं कांहींच ज्ञान नव्हतें, त्याने आपला प्राण देण्याविषयीं दृढ निश्चय करून आपल्या सर्व मित्रांस एका रात्रीस मेजवानी केली; त्यावेळीं त्यांजबरोबर त्याने

जें आनंदानें भाषण केलें त्यावरून त्याचे मनांत आपला नाश करून घ्यावयाचा आहे, हें कोणाचेहि लक्षांत आलें नाहीं. तो समारंभ आटोपल्यावर केटो, आपल्या खोलींत जाऊन, प्राण कोणत्या रीतीनें घालवावा ह्मणून एकांतीं विचार करीत बसला; तरवार पाहतो तों ती नेहमीच्या जागेवरून कोणी नाहींसी केली होती, ह्मणून त्यानें चाकरास हाक मारून ती लवकर आणायास सांगितली. आपला बाप, सीसर याच्या कबज्यांत राहाण्यापेक्षां आपल्याला ठार मारून घेईल असा त्याच्या मुलास पूर्वींपासून धाक होताच, आणि जेव्हां त्यानें ऐकिलें कीं, बापानें तरवार आणायास सांगितली, तेव्हां तो अगदीं घाबरून जाऊन धांवत बापाजवळ गेला; आणि डोळ्यांत आसवें आणून करूणा स्वरानें त्याची विनवणी करूं लागला कीं, माझ्यासाठीं तूं आपला घात करून घेऊं नको, आणि आजची रात्र ती तरवार माझ्याजवळ असूं दे.

केटोनें त्यास स्वस्थ चित्तानें उत्तर दिलें कीं, माझ्या मनांतून मरायाचें असलें तर मी हरतऱ्हेनें मरेन, याजकरितां माझ्या इच्छेप्रमाणें, बिछान्याच्या उशाकडेस ती तरवार नेहमी असती तसी असली पाहिजे व ह्यावेळेस माझ्याजवळ कोणी येतां कामास नये. असा हुकूम होतांच त्याचे मुलास व चाकरांस तेथून दूर व्हावें लागलें.

पुनः एकदां, केटो नागवी तरवार घेऊन आपल्या खोलींत एकटाच बसून मृत्यूचा विचार करीत बसला होता. अरेरे! ती किती भयंकर वेळ असेल बरें!

आपण काय करितों ह्याचा तो पुनः विचार करूं लागला, आणि प्लेटो नामें एका विद्वान दैवतपुजकानें

परलोकांविषयीं केलेला ग्रंथ घेऊन तो वाचूं लागला.

जर त्या काळीं केटोला पवित्र धर्मपुस्तक वाचायास सांपडलें असतें, तर तेणेंकरून त्याचे मनाची स्थिति किती पालटली असती! त्या काळचे लोकानी जीं दुःखें भोगिलीं तीं सांगतां येत नाहींत. मेल्यानंतर आपल्या आत्म्याचें काय होतें, हें समजायाचें त्यांस कांहींच साधन नव्हतें; त्यांतून कित्येक, आत्मा अमर आहे असें मानीत असत; परंतु त्याजविषयीं पुढें अशा कांहीं चमत्कारिक कल्पना काढिल्या होत्या कीं त्यांजवरून विचार करूं लागलें, तर आपली खातरी होती कीं, धर्मपुस्तकांत जो मार्ग दाखविला आहे तो, जर आपणास कळला नसता, तर मग आपली अवस्था फार भयंकर झाली असती.

त्या रात्रीस केटो याच्या खोलींत एक मोठा शब्द झाला, त्यावरून त्याचा मुलगा व चाकर आंत गेले, तेव्हां तो रक्तबंबाळ होऊन पडला आहे असें पाहून त्वरेने त्याचे घाय बांधूं लागले; परंतु ते सर्व, त्याने आपले हाताने सोडून टाकिले, तेणेंकरून तो मरण पावला.

ह्या चांगल्या व थोर मनुष्याचा दुःखकारक परिणाम पाहून सर्व लोक शोक करूं लागले; कारण कीं तो निरंतर वाजवी रीतीने वागत असे. ह्याने आपल्यास मारून घेतलें, ही बातमी सीसर याला समजल्यावर त्याने मोठा शोक करून ह्मटलें "केटो! तुझ्या मरणाने मला फार दुःख होतें, अरे तुला जीवदान दिल्याने जी माझी कीर्त्ति झाली असती, तिला तूं कां आड आलास?"

सीसर याने आपल्या बापास मारिला ह्मणून त्याचा सूड उगाविण्याकरितां पोंपी याच्या मुलानी एक मोठी

फौज जमा करून त्यावर चाल केली, तेव्हां मोठ्या निकराने लढाई झाली.

आरंभीं, सीसर याचे लोक हळूहळू मागें हटून शेवटीं पळण्याचे बेतांत होते, इतक्यांत सीसर त्यांच्या मध्यभागीं जाऊन मोठ्याने ओरडून ह्मणाला, "अहो! मला मुलांचे स्वाधीन करायास तुह्मास लाज वाटत नाहीं काय?" इतके शब्द त्यांच्या कानीं पडतांच त्यांस हुशारी येऊन त्यांनी मोठ्या शौर्यानें लढाई केली, आणि शत्रूचीं तीस हजार मनुष्यें मारून जय मिळविला. या लढाईंत पोंपीचा वडील मुलगा हा मारला गेला. ही लढाई आटोपल्यावर सीसर आपल्या एका मित्रास ह्मणाला कीं, "या मागें मी फक्त जयाकरितांच लढत असें, परंतु आज तर मी आपल्या प्राणाकरितां लढलों.

ही शेवटली लढाई जिंकून सीसर याने मोठी स्वारी बरोबर घेऊन रोम शहरांत प्रवेश केला; परंतु नगरकरी लोक त्याच्या मागल्या जयाने जसे खुश झाले होते, तसे आतां झाले नाहींत; कां कीं मागें त्याने परदेशचे लोकांस जिंकून जयाची स्वारी काढली होती, परंतु यावेळेस तर त्याने आपला परम मित्र पोंपी, जो रोम शहरांत एक थोर मनुष्य होऊन गेला, त्यालाच मारून मोठ्या उत्साहाने शहरांत प्रवेश केला; तेव्हां अर्थात ही गोष्ट त्या नगरकरी लोकांस बरी वाटली नाहीं. हरहर! पोंपी सारिख्या थोर मनुष्याची आणि ही दशा!

आतां सीसर याला जसे मान मरातब मिळूं लागले, तसे पूर्वीं कधींच मिळाले नसतील. सीसरोसारिखे शाहाणे व वक्ते असे पुरूष ह्या पृथ्वींत थोडकेच झाले अस-

तील; परंतु त्याला आत्मस्तुती करण्याची एक मोठी खोड होती, तेणेंकरून त्याच्या विद्येने जी त्याची कीर्त्ति व्हावयाची ती झाली नाहीं. ही खोड, ज्या मनुष्याला असती त्याचा सर्व लोक तिरस्कार करितात. सीसरो याने ह्या वेळीं मोठें औदार्य दाखविलें; त्याने पुढें होऊन सर्वांचे अगोदर ह्मटलें कीं, सीसर याला कांहीं तरी नवी पदवी द्यावी. मग त्यावरून दुसरेहि लोक, सीसर याची ज्या रीतीने खुशामत करून त्याला खुशी करवेल, त्या रीतीने ते करूं लागले. सीसर जिवत आहेपर्यंत शहरांतील सर्व अधिकार त्याजकडे असावा, असा ठराव झाला. जागोजागीं, त्याचे पुतळे करून मांडिले, व त्याच्या ज्युलियस या नावावरून एका महिन्यास जूलै असें ह्मणूं लागले. रोम एथील सर्व शिक्यांवर त्याची आकृति असावी असें ठरविलें. त्याच्या कित्येक मित्रानी सांगितलें कीं, सीसर याचे रखवालीस त्याजबरोबर नेहमी शिपायांचा पाहारा असावा; परंतु सीसर याने उत्तर केलें कीं, मला निरंतर शिपायानी रक्षावें, त्यापेक्षां लोकांची प्रीति संपादन करून निर्भय असावें हें अधिक आवडतें; कारण कीं, "निरंतर मरणाच्या धास्तींत असावें त्यापेक्षां एकदांच मरावें हें बरें."

आतां सीसर, लोकांस मोठमोठ्या मेजवान्या करूं लागला, त्यांत नाना तऱ्हेचीं पक्वान्नें असत, व त्यासमयीं तरतऱ्हेचे नाच रंग, तमासेहि होत असत; तसेंच लोकरंजनार्थ नाटकें व पेहलवानाच्या कुस्त्या होत असत. तमासगिरांजवळून त्याने लढाया करवाव्या, त्या मोठ्या चमत्कारिक असत; खरे लढाईप्रमाणेंच उभयपक्षीं हत्ती आणून

त्यांवर बुरूज रचीत, आणि शिपाई लोक एकमेकांवर भाले व तरवारी खरेंच टाकितात असें दाखवीत. तसीच समुद्रांतील लढाई दाखविण्याकरितां, लागलेंच त्याने एक मोठें तळें खणविलें. हें काम इतकें जलदीनें तयार झालें, ही कांहीं लहान सहान गोष्ट नाहीं, ह्यावरून पाहतां, त्याच्या आज्ञेंत सहस्रावधी मनुष्यें असावीं, असें वाटतें.

इतका मान व कीर्त्ति संपादन केली असतां सीसर याला समाधान वाटत नव्हतें; अजूनपर्यंत, त्याची राजा ह्मणविण्याची मात्र एक पायरी राहिली होती, तिजवरहि चढल्यावांचून त्याच्याने राहावेनासें झालें. वस्तुतः राजा हें केवळ पोकळ नाव होतें; कां कीं राजाला जितका अखत्यार असायाचा तितका सर्व याला होता, नाव मात्र काय तें नसतें, असें असतां याने, तें धारण करण्याविषयीं मोठा आग्रह धरिला; मग तें तर प्राप्त न होतां, उलटा त्याकरितां त्याने आपला जीव मात्र गमविला. त्या लोकांवर जो मुख्य अधिकारी असे, त्याला डिक्टेटर असें ह्मणत, व ते लोक डिक्टेटर याच्या अधिकाराखालीं असतां आपणांस स्वतंत्र असें मानीत; परंतु सीसर आपणास डिक्टेटर ह्मणवायाचे सोडून राजा ह्मणवूं लागला, असें त्यांच्या कानीं पडतांच, त्याना, ही गोष्ट अगदीं दुःसह असी वाटून, ते समजूं लागले कीं, आतां आपण गुलाम झालों.

सीसर याच्या कित्येक मित्रानी, लोक काय ह्मणतात हें पाहण्याकरितां, जागोजागीं त्याचे पुतळे होते, त्यांवर मुगूट घातले, परंतु लोकांस तें सहन न होतां, त्यानी रागाने ते मुगूट फोडून उडवून दिले. आणखी एका दिवसीं आंटनी याने, पुष्कळ लोकांसमक्ष सीसर याला थट्टेने

ह्मटलें कीं, हे राजा, हा घे तुला मुगूट; परंतु हें ऐकून लोकांस बरें वाटलें नाहीं, सबब, सीसर हा आपले मित्राकडे पाहून ह्मणाला, "मला तर सीसर ह्मणतात, राजा कोणी ह्मणत नाहीं." यावरून कोणी तरीं कांहीं उत्तर देऊन तो मुगूट स्वीकारायास सांगतील असी याला आशा होती; परंतु तसें कोणीहि केलें नाहीं, तेणेकरून याला फारच राग येऊन तो आपला ऊर उघडा करून ह्मणाला कीं, ज्या कोणाची खुषी असेल त्यानें मला ठार मारावें.

त्याचे मित्र, त्याला राजा करीत होते ह्मणून लोकांस फारच राग येऊन त्यानी, कित्येकांस बंदिखान्यांत पाठविलें; ते बंदीवान वाटेने जात असतां, लोकानीं त्यांचे बरोबरचे शिपायांची वाहवा करून ह्मटलें कीं, "तुह्मी ब्रूटससारिखे आहां," याचा अर्थ, जुनियस ब्रुटस नामें मागें एक पुरुष होऊन गेला, त्याने, टारक्कीन नामक कोणीएक मनुष्य आपल्याला राजा ह्मणवीत होता, त्याला टार मारिलें. सीसर याचे कारकीर्दींतहि ब्रुटस नामें एक पुरुष होता, तो जुनियस ब्रुटस याच्याच वंशांतला असें ह्मणतात. हा एक मोठा सद्गुणी पुरुष होऊन गेला; त्याला जें कर्त्तव्य तेंच तो करी, अन्यथा कधींहि करीत नसे. असें असतां, "बरें निपजण्यासाठीं आपण वाईट करूं नये," हा धर्मपुस्तकांतील नियम त्याला ठाऊक नव्हता, ह्मणून तो गैरसमजुतीनें चांगल्या हेतूमुळें भलत्यासच कर्तव्य असें मानीत असे.

ब्रुटस हा सीसर यावर प्रीति करीत असे खरा, परंतु त्यापेक्षां आपल्या देशावर त्याची प्रीति फार असे. याजक-

रितां, रोम शहर एकाद्या दिवशीं आपला स्वतंत्रपणा गमाऊन एका मनुष्याच्या ताबेंत राहील, हा विचार जेव्हां त्याचे मनांत येई, तेव्हां त्यास फारच दुःख होई. पाहिलें असतां ज्याची यावर पूर्ण कृपा, असा जो याचा परम मित्र सीसर, तोच त्या शहरचा राजा होणार, असी गोष्ट होती तथापि, तीहि त्याला अगदीं सहन झाली नाहीं. एकदां सीसर याने याचा प्राणहि वांचिवला होता, व त्याच्याच कृपेमुळें दरबारांत याला मोठा मानहि मिळत होता. याच्यासारिखा दुसरा कोणीहि मनुष्य त्याला प्रिय नव्हता; कारण कीं हा विद्वान व रास्त असून सर्व लोक याला चाहतात व याची तारीफ करितात, हें त्याला ठाऊक होतें. एकदां ब्रुटस आणि क्यासियस हे दोघेहि मुख्य अधिकाऱ्याच्या जागेकरितां झटत होते, तेव्हां क्यासियस याला, जरी त्या जागेविषयीं वास्तविक हक्क होता, तथापि सीसर याने म्हटलें कीं, माझ्याने ब्रुटस याला कोणतीहि गोष्ट नकारवत नाहीं; मग अर्थात तो हुद्दा ब्रुटस यालाच मिळाला.

क्याशियस हा सीसर याचा द्वेष करूं लागला, व त्याला मारायाचा बेत, पहिल्याने यानेच केला. ब्रुटस सारिखी शहरावर प्रीति असल्यामुळें, तें स्वतंत्र असावें असीच केवळ त्याला इच्छा होती असें नाहीं; तर, फक्त द्वेषामुळें मात्र सीसर याने अंमल चालवावा, हें त्याला आवडलें नाहीं; ह्मणून त्याने, सीसर याचा प्राण घेण्याकरितां गुप्त मसलत करून त्या कृत्यास पुष्कळ लोक जमविले. ब्रुटसहि आपल्याला मिळावा असी या सर्व कटवाल्यांची इच्छा होती; कारण हा सर्व लोकांस फार प्रिय आहे ह्मणून जें कांहीं करील, तें सर्वांस मान्य होईल;

याकरितां या कृत्यास याचें सहाय असावें ह्मणून त्यानीं पुष्कळ प्रयत्न केले. याला ह्मणूं लागले कीं, तुझ्या पूर्वजानें टारक्वीन याच्या हातांतून, जसी ही पृथ्वी सोडविली, तसी सीसर यास मारून त्वांहि सोडवावी.

दररोज रात्रीच्या समयीं, ब्रुटस याला बीन सहीचीं पत्रें यावीं, त्यांतील मजकूर कीं "ब्रुटस, तूं रोम शहर जुलूमगाराचे हातांतून कां सोडवीत नाहींस? अजून तूं झोपेंतच आहेस, जर तूं असें करसील तर तूं ब्रुटस नव्हस." अणखी अशा तऱ्हेचे, पुष्कळ शब्द त्याला लाऊन लिहिलेले असत. त्या सर्वांचें तात्पर्य हेंच कीं ब्रुटस हा सीसर याला मारीत नाहीं, हें फार अयोग्य काम करितो.

शेवटीं, क्यासियस व त्याचे मित्र यानीं मिळून ब्रुटस याची समजूत केली कीं, शहराचा बचाव करण्याकरितां, असलें अघोर कर्म करायासहि कांहीं चिंता नाहीं. ब्रुटस यासारिखा धैर्यवान व निग्रही मनुष्य कोणीच झाला नसेल; त्यानें जें काम पतकरावें तें शेवटासच न्यावें, मग अर्थात असला मनुष्य सामील झाल्यावर, त्यांना जो आनंद झाला तो सांगायास नको.

त्या कटवाल्यानीं असा बेत केला कीं ससिर याला मार्च महिन्यांत सेनेट सभेच्या घरांत मारावा. ही सुशोभित इमारत पोंपी यानें, आपल्या कारकीर्दींत बांधिली होती, व तींत त्यानें आपला एक पुतळाहि उभा केला होता.

एका दिवसीं, सीसर रस्त्यांतून जात असतां एक जोशी एकाएकीच त्याजवळ येऊन मोठ्या गंभीरपणानें ह्मणाला, "बाबा, मार्च महिन्याच्या पंधरावे तारिखेस तुला कांहीं

अरिष्ट प्राप्त व्हावयाचें आहे, त्याविषयीं तूं सावध राहा." कदाचित् त्या जोशाला हा कट ठाऊक असेल, ह्मणून त्याने, सीसर याचा प्राण वांचवायाकरितां, असी त्याला पूर्वींच सुचना केली; परंतु ती व्यर्थ, कारण सीसर हा मनाचा अढळ होता, व भविष्य सांगणें तो फारसें मानीत नसे, आणि जोशी हे तर त्याला केवळ ठक वाटत असत.

याला ज्या दिवसीं मारायाचा बेत केला होता, त्या दिवसीं तो जोशी याला पुनः भेटला, त्यावेळीं सीसर याने हंसून ह्मटलें, कां मार्च महिना तर आला, परंतु मला अझून कांहीं एक अरिष्ट प्राप्त झालें नाहीं. त्यावर त्या जोशाने ह्मटलें, "मार्च महिना आला खरा, परंतु पंधरावी तारीख अझून गेली नाहीं."

हा कट सिद्धीस जावा ह्मणून क्यासियस हा इतका उत्सुक व अतुर झाला होता कीं, सारा दिवस त्याचे मनांत हेंच घोळत असे; या भयंकर कृत्याचा घाट रचित असतां, त्याचेंच मन त्याला जाचित असे तेणेकरून तो फिकट झाला होता. कधीं कधीं सीसर त्याला अस्वस्थ पाही, त्यावरून त्याने एका दिवसीं आपले मित्रांस विचारिलें, अहो तुह्मास क्यासियसाविषयीं काय वाटतें ? मला तर त्याचें फिकट तोंड अगदीं आवडत नाहीं. दुसरें एके दिवसीं सीसर याचे मित्र त्याला सांगूं लागले कीं, आंटनी हा कांहीं कट रचीत आहे, तेव्हां त्याने तें न मानतां उत्तर केलें कीं, "मी धष्ट पुष्ट व तेजस्वी मनुष्याचें भय बाळगीत नाहीं, परंतु तुह्मासारिखे फिकट व रोडके कदाचित कट रचतील याचे मात्र मला भय वाटतें."

त्याला मारला त्याच्या आदल्या दिवसीं रात्रीं सीसर

हा आपला मित्र लेपिडस याच्या घरीं जेवायास गेला होता, हा त्या कटांत नव्हता; जर त्याला त्याची बातमी असती तर तो सीसर याला त्या अरिष्टांतून बचावता. तेथें भोजन आटोपल्यानंतर सर्व मंडळी गोष्टी करीत बसली असतां, सीसर हा पुष्कळ पत्रांवर सह्या करून, कित्येक दुसरींहि लिहीत होता; इतक्यांत बरकड मंडळीमध्यें गोष्टी वरून गोष्ट निघाली कीं, आपल्याला तर मागें पुढें केव्हां तरी मरायाचेंच, तेव्हां कोणत्या तऱ्हेचा मृत्यु उत्तम वरें; कित्येक लोकांचा एका क्षणांत प्राण जातो तो बरा, किंवा फार दिवस बिछान्यांत पडून आपल्या कामकाजाचा बंदोबस्त करून आपल्या सग्या सोयऱ्यांची आज्ञा घेतल्यानंतर प्राण जातो तो बरा. सीसर लिहीत बसला होता, त्याने, त्या मंडळींतून कोणी जबाब देण्याच्या पूर्वीं, मान वर करून मोठ्याने ह्मटलें, "कोणता मृत्यु उत्तम? एकाएकींच प्राप्त होतो तो." परंतु थोडक्याच वेळाने त्याला जो भयंकर मृत्यु प्राप्त झाला, त्याविषयीं त्याला कांहींच ठाऊक नसेल; कां कीं दुसऱ्या घटकेस काय होईल तें कोणाला कळत नाहीं. पुष्कळ ख्रिस्ती लोक, दर आदितवारीं ईश्वराची प्रार्थना करून, मागतात कीं, आह्माला लढाई, खून आणि अकाल मृत्यु हीं प्राप्त होऊं देऊं नको; परंतु सीसर यावर तर हे सर्व प्रसंग एकदांच गुजरले. याने पृथ्वींत सर्वांपेक्षां पुष्कळ कीर्ति मिळविली खरी, परंतु आतां तिचा लय होण्याची वेळ आली; ज्याकरितां हजारो लोक मरायास सिद्ध असत, असा जो सीसर, तो ज्यांवर प्रीति करून विश्वास ठेवीत असे, अशा आपले मित्रांचे हातून मरावयाचा होता. काय दुर्दशा ही! मनुष्यास

कितीहि संपत्ति प्राप्त होवो, परंतु ती सर्व व्यर्थ, तो एका क्षणांत नाहींसा होतो; मनुष्य ह्मटला ह्मणजे केवळ पाण्यावरच्या बुडबुड्याप्रमाणें होय; कां कीं तो जसा क्षणांत नाहींसा होतो तसा हाहि होतो; पाहा दुसऱ्या दिवशीं लागलाच सीसर हा मारला गेला आणि त्याचें शरीर धुळीस मिळालें, आणि जीवात्मा झाडाझडती देण्याकरितां ईश्वराजवळ गेला.

त्यास मारला त्याच्या आदले दिवशीं रात्रीस, त्याची स्त्री कालफरनिया इला मोठें भयंकर स्वप्न पडलें कीं, सीसर तिच्याजवळ असतां त्याला कोणी ठार मारिलें; तें पाहून ती मोठ्याने ओरडून जागी झाली, आणि सीसर याची विनवणी करूं लागली कीं, तूं कृपा करून उद्यां सेनेट सभेंत आऊं नको. सीसर याने, तिचें भय निवारण करण्याकरितां पुष्कळ यत्न केले, आणि त्या स्वप्नाचें फळ विचारण्याकरितां कांहीं मनुष्यें जोश्याकडे पाठविलीं; त्याला वाटत होतें कीं, तें कांहीं तरी शुभ सांगून तिचें भय निवारण करतील; परंतु तसें न होतां उलटा त्या जोश्याकडून असा निरोप आला कीं, आह्मी आज सकाळीं, ज्या जनावराला प्रश्न पाहण्याकरितां मारिलें होतें, त्याचें काळीज आह्मास सांपडलें नाहीं, त्यावरून वाटतें कीं कांहीं तरीं दुश्चिन्ह आहे. कोणतेहि जनावराला काळीज नाहीं असें कधींहि घडत नाहीं; परंतु त्या जोश्यांचे उत्तर ऐकून, कालफरनिया फारच काळजींत पडली; ह्मणून सीसर याने घरीं राहावयाचें कबूल केलें, आणि सेनेट सभेस निरोप पाठविला कीं, आज माझी वाट पाहूं नका.

जर तो घरीं राहिला असता, तर बहुतकरून त्याचा प्राण वांचला असता, परंतु अपाय होईल असी त्याला कांहीं शंकाहि आली नाहीं. कांहींका पळानीं, आलबीनस नामें त्या कटांतील एक मनुष्य, ज्यावर सीसर याची फारच प्रीति होती, तो त्याला भेटायाला येऊन ढोंगानें ह्मणूं लागला कीं, सीसर, तूं आज सेनेट सभेंत यावयाचा बेत मोडलास हें पाहून मला मोठें आश्चर्य वाटतें. मनुष्यानें स्वप्नें खरीं मानावीं हें पाहून तर मला हसें येतें; अणखी तो ह्मणाला कीं सेनेट सभा तुला आज राजा करणार आहे, ह्मणून, जर त्यांना सांगितलें कीं, आज तुह्मी परत जावें आणि हा बेत कालफरनिया इला चांगलीं स्वप्नें पडत तोंपर्यंत तहकूब ठेवावा, तर त्यांस फार राग येईल. पाहिलें असतां, मनुष्यावर कसेंहि संकट येऊन गुजरलें, तरीं तो तें सहन करील, परंतु आपली फजीती करून घेणार नाहीं. आपल्याला राजा केव्हां ह्मणतील याविषयीं सीसर तर फारच अतुर होता, तशांत ह्या कृतघ्नी मित्राची फुसलावणी मिळतांच त्याचे मनांत कांहीं शंका न येतां तो सेनेट सभेस जाण्याकरितां धांवत निघाला. तिकडे जातांना वाटेंत, एका गुलामाचे मनांतून सीसर याला त्याचे संकटाविषयीं कांहीं सुचना करायाची होती, परंतु मनुष्यांची गरदी फार होती ह्मणून त्याच्यानें त्याजवळ जाववलें नाहीं. ब्रुटस याच्या मित्रांचे ओळखीच्या एका मनुष्याला हा कट माहित होता, परंतु ही बातमी सीसर याला समक्ष सांगतां येत नाहीं असें पाहून त्याला फारच धास्ती वाटूं लागली; त्यानें ती बातमी एका कागदावर सविस्तर लिहून सीसर याला पाठविली.

ज्याजवळ हा कागद दिला होता, तो मनुष्य सीसर या-जवळ येऊन त्याचे कानांत ह्मणाला कीं ह्यांत तुला कांहीं लिहिलें आहे तें तूं लौकर वाच. सीसर हा जेव्हां जेव्हां तें पत्र वाचायास जाई तेव्हां तेव्हां पुष्कळ लोक त्याजबरोबर एकदांच बोलूं लागत, त्यामुळें मोठा गोंधळ होऊन त्याला तें पत्र तसेंच हातांत ठेवावें लागे.

सेनेट सभेंत प्रवेश करते वेळेस, तेथील सर्व सभासद त्याला ताजीम देण्याकरितां उठून उभे राहिले. त्यासमयीं सीसर याची जी वडेजाव झाली तसी पूर्वीं कधींच झाली नव्हती, ह्मणून, व असे थोरथोर मनुष्य आपणास मान देण्याकरितां उभे आहेत असें पाहून, त्यास वाटलें कीं आज मी धन्य होय. आंतनी सारिखे, सीसर याला मनापासून चाहणारे असे पुरुष, फारच थोडे होते; ह्मणून त्या कटवाल्यानी त्यालाहि मारायाचा बेत केला; परंतु ब्रुटस याच्या मनांतून फार रक्तस्राव व्हावा असें नव्हतें, सबब, त्याने ह्या कृत्यास रुकार दिला नाहीं. आंतनी हा मोठा बळकट पुरुष होता, यास्तव तो सीसर याचा बचाव करूं शकेल ह्मणून एक मनुष्याने उगीच ढोंग करून त्याला एक लांबच्या लांब गोष्ट सांगून दरवाज्याजवळ खोळंबवून धरिलें. एका सभासदाने उठून ब्रुटस याचे जवळ जाऊन त्याचे कानांत सांगितलें, कीं आजचा सर्व बेत मी जाणत आहें, त्यावरून त्या कटवाल्यास फार भय वाटलें; पुढें लागलाच तो मनुष्य सीसर याजवळ जाऊन त्याच्याशीं फारच हळूहळू कांहीं खलबत करूं लागला, त्यावरून, तो सर्व गुह्य उघडें करीत आहे, याविषयीं तर त्यांस कांहींच संशय राहिला नाहीं. मग

कासियस आणि त्याचे दुसरे कित्येक मित्र यानीं, विचार केला कीं, आतां सीसर याच्या हातांत सांपडावें, त्यापेक्षां त्याला मारण्याकरितां ज्या कटारी आणल्या आहेत, त्यानीं आपल्यालाच मारून घ्यावें हें बरें. परंतु ब्रुटस हा मोठा विचारी व तसाच सर्वांहून धीटहि होता; त्यानें सीसर याला त्या सभासदाशीं खलबत करते वेळेस हांसतां पाहिलें, त्यावरून तो आपले मित्रांस सांगूं लागला कीं, तुह्मी निरर्थक धास्ती धरूं नका, ते कांहीं या आपल्या मसलतीविषयीं बोलत नाहींत.

शेवटीं सीसर हा आपल्या नेहमीच्या जागेवर जाऊन सभासदांच्या मध्यभागीं बसून आपलें काम चालविणार, इतक्यांत सर्व सभासद त्याच्या खुर्चीभोंवतें मिळाले, आणि उगीच ह्मणूं लागले कीं, एका गुन्हेगाराला देशपार केलें आहे, त्याकरितां त्याला क्षमा असावी ह्मणून तुला अर्ज करायास आलों आहों. सीसर यानें त्यांस साफ सांगितलें कीं, हा तुमचा अर्ज चालणार नाहीं, असें असतां जेव्हां ते फारच अग्रह धरूं लागले, तेव्हां त्यांचा त्याला फारच राग आला.

सीसर याला मारायाच्या वेळीं, सर्वांना एकदम सुचना व्हावयाकरितां, त्यानीं असा बेत केला होता कीं, कोणी तरी जाऊन पहिल्यानें त्याचा झगा मानेवर ओढावा, त्याप्रमाणें मिटेलस सिंबर या नावाचे एका मनुष्यानें तसें केलें, तेव्हां लागलेंच सीसर यानें मागें पाहून रागानें ह्मटलें "खबरदार! एथें कांहीं दगा आहे."

त्या नंतर त्या कटांतील दुसऱ्या एका कासका या नावाचे मनुष्यानें सीसर याचे पानेवर तरवारीचा फटका

मारिला परंतु तो फार जोराने लागला नाहीं; कारण कीं, सीसर यावर पहिल्याने यानेच शस्त्र उचलिलें, ह्मणून अर्थात त्याच्याने सपाट्याने मारवलें नाहीं. त्यावर तो घाव पडतांच मोठा चकीत होऊन त्याने आरोळी मारिली, "अरे घातक्या, कासका! हें तूं काय केलेंस." हें पाहतांच तेथील कित्येक सभासद ज्यांना हा कट ठाऊक नव्हता, ते तेथून पळून गेले, आणि कित्येकांची भयाने बोबडी वळून गेल्यामुळे त्यांच्याने जागचें हालवलेंहि नाहीं. असा मोठा दंगा झाला असतां, सीसर याचा बचाव करायास कोणीच पुढें धजला नाहीं.

आतां त्या सर्व कटवाल्यानी आपल्या तरवारी उपसून सीसर यास चोंहींकडून घेरिलें; तो जेथें जेथें जाऊं लागला, तेथें तेथें कटारींचीं व तरवारींचीं तीक्ष्ण टोकें आपणाकडे रोंखलेलीं आहेत, असें त्याच्या दृष्टीस पडलें. मग एका क्षणामध्यें त्यावर चोंहींकडून घावांची वृष्टी झाली, तथापि त्याने आपला धीर सोडिला नाहीं. पारधी एकाद्या वनपशूला घेरून टाकितात, तेव्हां जसी त्याची अवस्था होती त्याप्रमाणेंच आतां सीसर याची झाली; परंतु तो त्यांतूनहि निष्टून जावयाचा प्रयत्न करीत होत्सातां आपल्या सहायार्थ कोणी यावें ह्मणून हाका मारूं लागला.

शेवटीं ब्रुटस याने पुढें होऊन सीसर याच्या पायांवर एक वार केला; तो कोणी केला, हें पाहण्याकरितां सीसर याने लागलेंच मागें पाहिलें, तों ब्रुटस हा त्याच्या दृष्टीस पडला. तेव्हां त्याने आपल्या संरक्षणार्थ कांहींएक यत्न न करितां झग्याने आपलें तोंड झांकून मोठ्या

दुःखाने ह्मटलें, ब्रुटस तूंहि ह्या कामांत काय आहेस!"

जुलियस सीसर मरण पावला त्यावेळीं, त्याला तेवीस वार लागले होते; त्याला मारते वेळेस त्या कटवाल्याना इतका खून चढला होता कीं, त्यानी न पाहतां एकमेकांसहि वार केले तेणेंकरून ते अगदीं रक्तबंबाळ होऊन गेले आणि पोंपी याच्या पुतळ्यावरहि रक्ताचे शिंतोडे उडाले.

सीसर याचें प्रेत जमिनीवर पडलें, तेव्हां कासियस मोठ्याने ओरडून ह्मणाला, "पाहा तो कवडीमाल मनुष्य कसा पडला आहे तो!" अरेरे! निराश्रित होऊन जमिनीवर पडलेल्या शत्रूस छळणें हें तर केवळ पाजीचें काम; तशांत सीसर यासारिख्या पुरुषाला तर असें हें बोलणें अगदीं अयोग्य होय; कां कीं त्यामध्यें पुष्कळ चांगले गुण होते व त्याच्या मागून जे बादशाह झाले त्यांप्रमाणें त्याने लोकांवर जुलुमहि केला नाहीं.

हा खून झाल्यावर लौकरच, ब्रुटस आणि कटांतील दुसरे मिलाफी हे जयाचा उत्साह करीत रस्त्यांतून एक सारिखे मिरवत गेले, आणि प्रत्येक मनुष्यास सांगूं लागले कीं, जुलूमगारास मारून टाकिला, आतां तुह्मी स्वस्थ आनंद करा; परंतु बहुतेक लोक तर, भयाने घाबरून व या घोर कर्माचा तिरस्कार करून आपलीं सर्व दुकानें व घरें दारें, बंद करून बसले. सीसर हा उदार होता, व तो लोकांवर फार प्रीति करीत असे, ह्मणून सर्वांस त्याचा कळवळा आला; आणि त्याने आपल्या मृत्युपत्रांत, प्रत्येक नगरकरी यास, पुष्कळ पैका ठेविला आहे असें जेव्हां

त्यांना समजलें, तेव्हां त्याच्या ह्या भयंकर मृत्युनें, त्यांस जो संताप व दुःख झालें, तें सांगायास नको.

आंतनी यानें सीसर याच्या प्रेताजवळ उभें राहून एक मोठें संभाषण केलें, त्यांत त्यानें सीसर याचे मोठमोठे जय, त्याचीं सर्व उदार कृत्यें, रोम शहराचें त्यानें जें कल्याण केलें तें, आणि त्या शहरच्या लोकांविषयीं त्यानें जी प्रीति दाखविली ती, असीं सर्व त्याचीं चांगलीं कृत्यें दर्शविलीं; नंतर, जवळच्या सर्व लोकांस, त्याचा झगा वर करून त्याला जे तेवीस वार लागले होते, ते दाखविले, आणि याच्या या चांगल्या कृत्यांस, हें बक्षीस मिळावें, असें ह्मणून रडूं लागला. ते लोक आंतनीचें भाषण, जों जों अधिक अधिक ऐकूं लागले, तों तों त्या कटवाल्यांचा त्यांस अधिक अधिक संताप येऊं लागला; शेवटीं, त्यांचें वैर इतकें पेटलें कीं, त्यानीं सभेंतील बांकीं वगैरे जितकें बसायाचें सामान होतें, तितकें फोडून, सीसर याचें प्रेत दहन करण्याकरितां त्याचें सरण रचिलें; मग तें पेटल्यावर, त्यांतलीं कोलतें हातांत घेऊन, ब्रुटस आणि कासियस यांच्या घरास आग लावून, सर्व नगरकरी लोकांस मारून टाकावें, या बेतानें वेड्यासारिखे रस्तोरस्तीं धांवत सुटले.

सीसर याच्या मागें, त्याचा पुतण्या ओकतेवियस आगस्टस यास तो अधिकार मिळाला. सीसर याच्या पाठीमागून जितके गादीवर बसले त्या सर्वांसहि जरीं बादशाह व सीसर हे किताब मिळाले, तथापि जुलियस सीसर ह्यासारिखे गुण त्यांतून थोडक्यांतच होते ह्मणून रोमन लोक त्याजविषयीं वारंवार शोक करीत असत,

धर्मपुस्तकांत, ज्या सीसरचा अत्यंत क्रूरपणा व जुलूम यांचें वर्णन केलें आहे तो जुलियस सीसर नव्हे, तर टैबीरियस सीसर होय. त्याने आपल्या दुर्गुणानी तर सर्व पृथ्वीस लाज आणली होती; त्याच्या आचरणावरून मनुष्याचें अंतःकरण किती दुष्ट होऊं शकतें हें आपणास कळतें; कारण हा असा कांहीं मनुष्य होता कीं, दुसऱ्यास कष्ट पडले ह्मणजे याला हर्ष वाटे. आपल्यास करमणुक व्हावी, तो वारंवार मनुष्यांस आणवून आपल्या डोळ्यासमक्ष मारवी. असो हा विषय निराळा आहे, ह्मणून त्याच्या अघोर कर्माचें वर्णन पुढें करूं.

येशू ख्रीस्त जन्मायाचे पूर्वीं चव्वेचाळीस वर्षांवर, मार्च महिन्याचे १५ वे तारिखेस, जुलियस सीसर, आपल्या वयाच्या छप्पन्नाव्या वर्षीं, ह्मणजे तो पृथ्वी जिंकायास निघाला, त्यानंतर बरोबर चवदा वर्षांनी मरण पावला. त्याला दहन करतें वेळेस रोम शहरांत लोकांची जसी गर्दी झाली होती तसी कधींच झाली नसेल. त्याच्या प्रेतास मान देण्याकरितां देशोदेशचे लोक जमले होते, परंतु त्यांत यहूदी लोक तर फारच होते. असे देशोदेशचे लोक ज्याला चाहत होते, व अत्युत्कृष्ट गुण आणि संपत्ति या दोहोंचीहि एककालींच प्राप्ति करून घेतल्यामुळें ज्याला पाहतांच सर्व लोकांस इतका कालपर्यंत मोठें आश्चर्य आणि कौतुक वाटत होतें, असा जो सीसर, त्याला थोडक्या परंतु धीट आणि दृढ निश्चयी अशा मनुष्यानी विश्वासघातानें ठार मारावें, हा किती भयंकर परिणाम होय बरें!

———



## आगस्तस, रोम एथील दुसरा बादशाह.

[इ० स० पू० २७—इ० स० नं० १५]

ज्या गृहस्थानी सीसर याला मारिलें त्यांतून स्वाभाविक मृत्यूने मेले असे थोडकेच; कित्येकानी तर स्वतः आपणास मारून घेतलें व कित्येकांस दुसऱ्यानी मारिलें.

सीसर याचा वध झाल्यानंतर लौकरच फिलिपि एथें एक मोठी लढाई झाली; असें सांगतात कीं, ही लढाई होण्याच्या पूर्वीं एका रात्रीं ब्रुटस याने स्वप्नामध्यें आपल्या राहुटींत भूत आलेलें पाहिलें. आपल्याला चांगली झोंप लागावी ह्मणून तो फार इच्छा करी, परंतु ती येत नसे; मध्यान रात्रीसच तो जागा होई, मग कालक्रमणाकारितां प्रातःकालपर्यंत वाचीतच बसे. एकदा मध्यान रात्रीस ब्रुटस हा, एका जायाला झालेल्या दिव्याजवळ वाचायास बसला असतां व छावणींमध्यें जिकडे तिकडे निवांत असतां त्याने एकाएकीच मोठी आरोळी ऐकिली; त्याव-

रून पाहतो तों दरवाज्याजवळ कोणी राक्षसासारिखा विक्राळ पुरुष याचेकडे उग्र दृष्टीने पाहत उभा आहे, असें त्याच्या दृष्टीस पडलें. त्याला ब्रुटस याने विचारिलें, "अरे तूं कोणी भूत आहेस कीं मनुष्य आहेस? तूं मजजवळ कशाकरितां येतोस?"

त्यावरून त्या पिशाच्याने उत्तर केलें, "ब्रुटस! मी तुझा वैरी समंध आहे! तूं मला फिलिपि येथें पाहसील."

ब्रुटस याने स्थीर चित्ताने उत्तर केलें कीं, "तर मग मी तुला तेथें भेटेन."

ब्रुटस आणि कासियस यांच्या फौजेचा पराभव झाल्यावर, कासियस हा, आपला चाकर पिंडेरस याला बरोबर घेऊन एका रिकामें तंबूत गेला, तेथें आपल्या झग्याने आपले तोंड झाकून मान उघडी ठेवून, ज्या तरवारीने त्याने सीसर यास मारिलें होतें, तीच पिंडेरस याजवळ देऊन, आपलें डोकें तोडायास सांगितलें. त्याने तें तत्क्षणींच केलें; मग जेव्हां ही दुःखकारक बातमी ब्रुटस याला समजली, तेव्हां तो रडून ह्मणाला, कीं, "खऱ्या रोमन लोकांमध्यें कासियस हा शेवटला होता."

नंतर, त्याकाळचे अघोर चालीप्रमाणें ब्रुटस यानेहि आपल्यास मारून घेण्याचा लौकरच निश्चय केला. तो ह्मणाला कीं, "जरी आपला देश पूर्वीप्रमाणें स्वतंत्र करण्याचें माझ्या हातीं नाहीं, तरी स्वतः आपणास मारून घेऊन गुलामगिरींतून आपल्याला मोकळा करण्याचें माझ्या हातीं आहे." मागें केटो याने आत्महत्या केली, ह्मणून ब्रुटस याने त्यास दोष लाविला होता, परंतु बहुधा असेंच आढळतें कीं, मनुष्यें ज्या गोष्टीसाठीं इतरास दोष

लावितात त्याच आपण स्वयें आचरितात. अणखी तो असें ह्मणाला होता कीं, "आपल्यावर संकट येऊन गुजरलें असतां त्यासमोर उभें न राहणें हें तर निखालस अयोग्य व गांडूपणाचें काम होय." आतां तो केटोप्रमाणेंच स्वतः तें कर्म करायास प्रवर्त्तला; ह्मणून तो ह्मणूं लागला कीं, मी तर तरवारीने आपल्यास मारून घेईन, परंतु शत्रूपासून कधींहि पळून जाणार नाहीं.

ब्रुटस याने आपल्या मित्रांस हें अघोर कृत्य करायास सांगितलें, परंतु त्या सर्वांनी तें नकारिलें ह्मणून, त्याचा एक दास होता, त्यास त्याने तें करण्याविषयीं हुकूम केला तें पाहून स्ट्रेतो नामें त्याचे एका मित्राने मोठ्याने ओरडून ह्मटलें, "अंतकाळीं ब्रुटस याला त्याच्या मित्रांतून कोणी उपयोगी पडला नाहीं, ह्मणून त्याला गुलामाची गरज लागली असें मी कधीं होऊं देणार नाहीं." मग स्ट्रेतो याने त्याची तरवार आपल्या दोन्ही हातानी उभी धरली आणि ब्रुटस याने तिजवर उडी मारितांच ती पाठींतून पार होऊन त्याचा प्राण गेला. ब्रुटस याचें शीर सीसर याच्या पुतळ्याच्या पायाजवळ टाकण्याकरितां रोम एथें पाठविलें; आणि त्याची राख त्याचे स्त्रीचे स्वाधीन केली; तिला अतिशय दुःख झालें होतें, ह्मणून तिने त्यांतले जळते निखारे खाऊन आपला प्राण दिला.

स्ट्रेतो हा ब्रुटस याला अंतकाळीं उपयोगीं पडला ह्मणून त्याची फारच वाहवा झाली; परंतु अशा मैत्रीची आतां गरज लागत नाहीं, ह्मणून ख्रिस्ती लोकानी ईश्वराचें किती आभारी झालें पाहिजे. प्राचीन काळामध्यें आत्महत्येचें पाप किती होत होतें, हें, आथेन्स शहरांतील

तिमन नावाचे एका गृहस्थानें प्रसिद्धपणें सर्व लोकांपुढें भाषण केलें, त्यावरून ध्यानांत येईल. तो ह्मणाला मा-झ्या वाड्यांत एक अंजीराचें झाड आहे, त्यावर आजपर्यंत पुष्कळ मोठमोठ्या लोकांनीं फास घेतले, परंतु, आतां तें कापून त्या जागेवर मी इमारत बांधणार, याकरितां सर्वांस जाहीर करितों कीं, ज्या कोणाचीं प्राण देण्याची इच्छा असेल त्याने तें झाड कापल्याचे पूर्वीं तेथें जावें."

सीसर याचा मित्र आंतनी व त्याचे पुतणीचा मुलगा आगस्तस या दोघां थोर मनुष्यांतून रोम एथें कोण बाद-शाह होईल याविषयीं फार वेळ संशय होता. बहुधा असें घडतें कीं, जे पुरुष फार झटून उद्योग करितात त्यांचाच नेहमी जय होतो. आगस्तस याने आपल्या स्वतांच्या हिताकडे सतत लक्ष दिलें होतें, त्यामुळें त्याचें कार्य सा-धलें; आणि आंतनी हा, मिसर देशाची सुंदर व उडाव राणी, जिने मागें सीसर व पोंपी याना मोहीत केलें होतें, तिला भेटायास गेला, त्यामुळें त्याने आपलें हित करून घेण्याची संधी अगदीं गमावली.

क्लियोपात्रा ही, एका फार सुंदर नावेंत बसून सीड्नस् नदी उतरून आंतनी यास सामोरी आली. त्या नावेचें वराम सोन्याने मढविलेलें होतें, तिला जांबळे रंगाचीं शिडें लाविलीं होतीं व तिजवरील वल्हीं रूप्याचीं होतीं; तसींच तींत तऱ्हेतऱ्हेचीं वाद्येंहि वाजत होतीं. त्या राणी-च्या पलंगाचे दोहों बाजूंस कामदेवाच्या चित्रांप्रमाणें सजिवलेलीं मुलें वारा घालीत होतीं, आणि सभोंवतीं जि-कडे तिकडे सुगंधी लाविल्या होत्या. क्लियोपात्रा ज्या पलं-गावर ओठंगली होती, त्यावरच्या गाद्यांवर सोनेरी टिक-

त्यांचा कशीदा काढला होता ; आणि ती कामदेवाची स्त्री रती, इच्यासारिखी, फुलें व अलंकार घालून, सजली होती.

क्लियोपात्रा इच्यासारखी दुसऱ्यास भुलवायाची कौशल्ये थोडक्याच स्त्रीयांचे आंगीं असतील. आंतनी याला खुष करायास ती प्रतिदिवसीं नव्यानव्या मौजा शोधून काढीत असे. ती त्याजबरोबर जुगार खेळे, मद्यप्राशन करी, आणि पारध करायासहि जाई; रात्रंदिवस त्याच्या रंजनार्थ, भोरपी, तमासगीर, नकले आणि गवैये वगैरे ठेविले होते. असा तो त्या मिसर देशाचे दुष्ट व उधळे राणीचे नादीं लागून आपलें काम काज, व इष्ट मित्र वगैरे सर्वांस विसरला.

एकदा क्लियोपात्रा हिने आंतनी याची थट्टा केली त्या मुळें त्याची फार फजीती झाली. एका दिवसीं तीं उभयतां मासे धरीत होतीं, तेव्हां आंतनी याचे गळास कांहींच न लागल्यामुळें तो निराश झाला; मग त्याने आपल्या एका चाकरास हळूच सांगितलें कीं, तूं पाण्यांत बुडी मारून माझ्या गळास एक मोठासा मासा अडकीव. ही त्याची युक्ति सिद्धीस जाऊन त्याने तसें तीन चार वेळां केलें. शेवटीं क्लियोपात्रा हिला तें समजल्यावर तिने आपल्या एका पाणबुड्यास हळूच सांगितलें कीं, पाण्यांत जाऊन आंतनी याचे गळास एक सुका मासा अडकीव. तेथें पुष्कळ लोक जमले होते, त्यानी त्याचे गळास जेव्हां सुका मासा पाहिला, तेव्हां ते मोठ्याने हसूं लागले, तेणेंकरून आंतनी याला फारच लाज वाटली.

आंतनी याने क्लियोपात्रा इसीं लग्न करण्याकरितां आपली स्त्री आक्तेविया इचा त्याग केला, ह्मणून त्याचा

मेहुणा जो आगस्तस त्याला फारच राग आला; मग आपल्या बहिणीसाठीं आंतनी याचा सूड उगविण्याकरितां आगस्तस याने लढाईची सिद्धता केली. ही लढाई करण्याचा मुख्य हेतु असा दिसतो, कीं, आंतनी याच्याजवळ फार मोठा अधिकार आहे ह्मणून तो जिवंत आहे तोंपर्यंत आपल्याला निरंतर धास्तींत असून त्याच्या आधीन असावें लागेल ह्मणून त्याला नाहींसा करावा. दोन्ही बाजूंच्या आरमाराची आक्सीयम एथें गाठ पडली; आंतनी याला मिसर वगैरे लोकांची कुमक होती आणि आगस्तस यास इतालीयन लोकांची होती. या लढाईवरून आपणास कळतें कीं, जे कोणी आपलें आयुष्य सदासर्वकाळ विलासांत घालवितात, ते आपणास मोठमोठीं कामें करण्याविषयीं अगदीं नालायक करून घेतात; अणखी जे कोणी स्वच्छंदपणाने राहतात त्यांच्या विपरीत जर एखादी गोष्ट झाली, तर ते लागलेच भांडायास उठतात.

क्लियोपात्रा इच्या रणभीतीमुळें आंतनी याच्या आरमाराचा पराभव झाला, तेव्हां तो मोठ्याने ओरडून ह्मणाला कीं, जिच्यासाठीं मी लढत होतों तिनेच मला शत्रूचे स्वाधीन केलें. ती भित्री राणी पळून जाऊन, ज्या माहलांत तिने आपला खजीना दडवून ठेविला होता त्याची आंतून सारीं कवाडें लावून घेऊन आंत लपून बसली; आणि क्लियोपात्रा मरण पावली असें आंतनी यास सांगून पाठविलें. आंतनी यास तें खरें वाटून त्याने, शोकामुळें आपल्या इरास नामें चाकरास बोलवायास पाठविलें. त्या चाकराने मागें त्यास शपथपूर्वक सांगितलें होतें कीं,

पुणे मराठी ग्रंथालय
४३७ नारायण
दा. नं. ४०५५

जेव्हां तुला मारून घ्यावयाचें असेल तेव्हां मला सुचना पाठीव ह्मणजे मी त्याविषयीं तुला सहाय करीन.

ह्या विश्वासु चाकराला आंतनी याचा हुकूम होतां क्षणीं, त्याने आपली तरवार उपसून त्याला मारितों आहे असें दाखवून, ती आपले छातींत मारून घेऊन आपला प्राण सोडिला. मग आंतनी याने स्वतांच आपल्यास एक वार केला; परंतु तेणेकरून त्याचा प्राण जाण्याचे पूर्वीं त्याला कोणी सांगितलें कीं, क्लियोपात्रा अझून जिवंत आहे, तेव्हां त्याने ह्मटलें मला ह्या क्षणीं असाच रक्तबंबाळ तिजजवळ न्या. ती मिसर देशाची राणी ज्या माहालांत दडून राहिली होती तेथें याला नेल्यावर, तिने आपले सर्व बळ खर्चून याला दोराने खिडकींतून वर ओढून घेतलें, नंतर त्याची ती दशा पाहून, आपलीं वस्त्रें फाडून, ऊर कुटित बसली आणि फारच आक्रोश करूं लागली; तेव्हां, आंतनी याने तिची विनवणी करून ह्मटलें कीं, "तूं अवसान गाळूं नको आपल्या मनाला विवेक कर. माझ्या दुर्दैवाचा शोक न करितां, म्या जें सुख भोगिलें त्याकरितां तूं आनंद मान. मी आजपर्यंत पुष्कळ अंमल चालेविला, व कीर्त्तिहि पुष्कळ मिळवून ऐश्वर्यहि पुष्कळ भोगिलें आतां माझें कांहीं करायाचें राहिलें नाहीं; याजकरितां मी आपला नाश करून घेतला यांत कांहीं वाईट झालें नाहीं."

नंतर लौकरच आगस्तस याने क्लियोपात्रा इला कैद केली. दुसरे लोक इचें सौंदर्य वाखाणीत असत तसें याने वाखाणिलें नाहीं, परंतु, जयाचा उत्साह करीत परत घरीं जाते वेळेस रोमन लोकांस दाखविण्याकरितां

तिला बरोबर न्यावें असा बेत केला. हें वर्त्तमान तिला समजल्यावर तिनें निश्चय केला कीं, आपला प्राण द्यावा ह्मणजे हा त्याचा मनोदय सिद्धीस जाणार नाहीं; परंतु ह्या तिच्या बेताचा वहमा आल्यावरून तिला इतके जपूं लागले कीं, ती कदाचित् आपल्या झग्यांत एखादी कटार लपवून आपल्याला मारून घेईल ह्मणून तिचा झगाहि झाडून पाहत असत.

एका दिवसीं एका कुणब्याने, क्लियोपात्रा ज्या बंदिशाळेंत होती तिच्या दरवाज्याजवळ येऊन, तेथील पाहारेकऱ्यांस कांहीं सुंदर अंजिरें दाखविलीं आणि त्यांतून कित्येक त्यांस देऊन सांगितलें कीं, कृपा करून ही टोपली इला पोहंचती करा; त्याप्रमाणें त्यानीं ती राणीला पोहंचती केली; परंतु त्या सुंदर फळाखालीं आग्या घणस लपविला होता, त्याचा त्यांस कांहीं एक संशय आला नाहीं.

ती टोपली तिजजवळ येऊन पोहंचल्यावर क्लियोपात्रा ही, स्नान करून व आपला राजकीय पोशाक चढवून, उंचीं उंचीं पक्वान्नें सिद्ध करवून रात्रीस जेवावयास बसली, आणि त्यासमयीं तिने इरिस व च्यारमीयन नामक तिच्या दोघी आवडत्या दासी खेरीज करून बाकीच्या सर्वांस तेथून जावयास सांगितलें. कांहीं वेळाने पाहेरकरी क्लियोपात्रा इच्या खोलींत जाऊन पाहतात तों, आग्या घणस याच्या दंशाने ती आपल्या सोनेरी पलंगावर मेलेली आहे; इरिस ही तिच्या पायासीं मेलेली पडली आहे आणि च्यारमीयन ही, अर्धमेली होत्साती आपल्या स्वामिनीचे मस्तकावरील मुगुट नीट करीत आहे असें त्यांच्या दृष्टीस पडलें. आगस्तस याचे जासूदानी येऊन जेव्हां हें पा-

हिलें तेव्हां त्यानी रागाने ह्मटलें, "हें ठीक केलें काय?" च्यारमीयन इने प्राण सोडते वेळीं ह्मटलें, "होय तें ठीकच झालें, मिसर देशच्या राजाच्या वंशास तर असें करणें योग्य होय."

आगस्तस सीसर याला इतकें मोठें राज्य प्राप्त झालें कीं, तितकें त्यावेळीं कोणाच्या ऐकण्यांतहि नसेल. तो जयाचा उत्साह करून लोकांस मेजवान्या करूं लागला तेणेकरून ते लोक ऐष आरामांत अगदीं निमग्न झाले. शिपायानी आपली चांगल्या विश्वासाने चाकरी करावी व त्यांची आपणावर प्रीतिहि बसावी, ह्मणून त्याने त्यांचें वेतन दुप्पट वाढविलें. आगस्तस याच बादशाहाने प्रथमतः रोम शहरांत स्वस्थता करून आपल्यास मोठेपणा प्राप्त करून घेतला. याला लढाई करावी असें वाटत नसे ह्मणून शिपाई लोक त्यावर फार प्रीति करीत असत.

त्याचा सत्कार करण्याकरितां लोकानी त्याच्या माहलाच्या दरवाज्यांवर निशाणें लाविलीं आणि सर्वानी शपथ घेऊन सांगितलें कीं, आगस्तस याने आजदिवसपर्यंत जे कायदे केले आहेत, ते आह्मी मानूं इतकेच नाहीं, तर अणखी पुढें जे करील तेहि मानूं. पाहिलें असतां असें हें करणें शुद्ध अविचारी होय, परंतु तें त्या प्रसंगीं हितावह झालें, कां कीं, आगस्तस जे हुकूम करी ते बहुधा चांगलेच असत.

त्याने हुकूम केला कीं, ज्या ज्या दिवसीं शहरांत प्रवेश केला त्या दिवसीं कोणत्याहि मनुष्यास फांशीं देऊं नये. तसेंच कुलीन गृहस्थ व स्त्रिया यानी अतःपर नाटकगृहांत कधींहि नाचायास जाऊं नये. आणि पेहलवानाजवळून

वर्षांतून तीन वेळा मात्र लढाया करवाव्या; कां कीं, त्या लोकांच्या टोळ्याच्या टोळ्या वारंवार लढवीत तेणेकरून त्यांतले पुष्कळ पेहलवान मरत असत.

आगस्तस हा आपला पुष्कळ वेळ विद्वान व चतुर मनुष्याचे मंडळींत घालवीत असे, तो कवतें करून त्यांपुढें मोठ्याने वाची आणि त्यानी त्यांत चुक्या काढिल्या असतां फारसा रागावतहि नसे. याच्या कारकीर्दींत हारेस, व वर्जिल हे दोन मोठे नामांकित ग्रंथकार झाले, त्यानी केलेले ग्रंथ अझूनपर्यंतहि लोक मोठ्या आवडीने चितात.

तो लोकांबरोबर मोठ्या ममतेने वागे, त्याचे मित्र आजारी पडले असले, किंवा त्याजकडे कांहीं कार्य प्रयोजन असलें, तर तो त्यांना भेटायाकरितां त्यांच्या घरीं जात असे. एका दिवशीं त्याला एके गृहस्थाने जेवायास बोलाविलें, परंतु स्वयंपाक अगदीं वाईट झाला होता, ह्मणून आगस्तस याने परत येतेसमयीं त्या गृहस्थास ह्मटलें कीं, "आपण इतके जिवलग आहों असें मला वाटत नव्हतें."

एकदां त्याच्या एका वृद्ध शिपायाच्या मुकदम्याचा तपास व्हावयाचा होता, तेव्हां तो पक्षपाताने होतो किंवा कसें, हें पाहण्याकरितां त्याने, बादशाहास अदालतींत यावयास सांगितलें. आगस्तस याने त्यास ह्मटलें कीं, मला कांहीं काम आहे सबब तेथें माझा एक मित्र आहे तो तें करील. त्यावरून त्या शिपायाने ह्मटलें, "माहाराज, आपणाकरितां लढाई करण्याचा प्रसंग आला होता तेव्हां मी स्वतः जाऊन लढलों, मजकरितां दुसरे कोणास पाठविलें नाहीं." हें ऐकून बादशाहाने मनांत राग न

आणितां त्याचें ह्मणणें मान्य केलें आणि आपण स्वतः अदालतींत गेला. लोकानी त्याला अपशब्द बोलून त्याची फार निंदा केली, तेव्हां त्याने फारच स्तुत्य असी वर्त्तणूक केली. त्याला आलेलें एक पत्र अझून रक्षूण ठेविलें आहे, त्यांत तैबिरियस याने जेव्हां त्यास फारच आग्रह करून सांगितलें, कीं, अमक्याने तुझा अपमान केला त्याकरितां तूं त्यांचा सूड कां उगवित नाहींस, तेव्हां हा त्यास लिहितो कीं, "मला, जे कोणी वाईट ह्मणतात त्यांविषयीं तुला इतका राग येण्याची जरूर नाहीं; परंतु ते मला कांहीं अपाय करितील. तो त्यांस करूं मात्र दिला नाहीं ह्मणजे झालें."

आगस्तस याचें वय चौऱ्याहत्तर वर्षांचें झाल्यावर त्याने, आपल्या बायकोच्या पहिल्या घरचा मुलगा तैबिरियस्, याजकडे राज्यकारभाराचा खटला सोंपून, आपण स्वस्थचित्ताने आपलें ह्मातारपण घालवूं लागला. परंतु असें असतां, रोमन् लोकांवर प्रीति करण्यांत किंवा त्यांचे सुखाची वृद्धी करण्यांत त्याने किमपिहि अंतर पडूं दिलें नाहीं. तैबिरियस हा इतका दुष्ट व ठक आहे, हें जर त्याला ठाऊक असतें, तर त्याला हा अखत्यार सोंपल्याचा फारच खेद झाला असता, कां कीं, तैबिरियस् हा लोकांसीं पुढें फारच क्रूरतेने व दुष्टपणाने वागूं लागला.

आपलें सौंदर्य सर्वानी वाखाणावें असें आगस्तस याला मनापासून वाटत असे; याने कोणाकडे पाहिलें असतां जर त्यानी खालीं मान केली, तर याला मोठा हर्ष होई, आणि असें वाटे कीं, माझ्या तेजापुढें त्यांचें तेज कांहींच नाहीं. केवढा वेडेपणा हा! असल्या थोर मनुष्यास तर

तो अगदीं अयोग्य होय. आगस्तस याच्या अंगीं दुसरे चांगलेहि गुण पुष्कळ होते. तो मोठा विद्वान होता व ग्रीक भाषेंत तर तो फारच प्रवीण होता, त्या भाषेंत त्याने कित्येक पुस्तकें लिहिलीं परंतु दैवयोगाने तीं राहिलीं नाहींत.

आगस्तस हा, म्हातारपणीं दुराचरणाचा फार तिरस्कार करूं लागला; तैबिरियस् याला दिलेली याची पहिल्या स्त्रीपासून झालेली कन्या जुलिया, ही व्यसनी निघाल्यामुळें हा फारच दुःख करूं लागला; तिला क्षमा करण्याविषयीं सांगितलें, तेव्हां त्याने रागाने उत्तर केलें कीं, "विस्तव आणि पाणी यांचें कदाचित सख्य होईल, परंतु तिचें व माझें कधींहि व्हायाचें नाहीं.

आतां बादशाह शाहत्तर वर्षांचा झाल्यावर त्याने आपलें मृत्युपत्र केलें. जो मनुष्य आपले लेंकरांचें कल्याण इच्छित असेल त्याला, ही मृत्युची तयारी करणें आवश्यक आहे; कां कीं पुष्कळ लोकानी आपलीं मृत्युपत्रें लिहिण्याची हयगय केल्यामुळें, आपल्या पाठीमागें आपल्या अत्यंत प्रियकर मुलांमध्यें तंटे बखेडे होण्यास कारण करून ठेविलें.

आगस्तस यास वाटलें कीं, आतां मी खराच मरतों, तेव्हां त्याने एक आरसा आणवून त्यांत शेवटीं आपलें रूप पाहून सांगितलें कीं, नेहमींपेक्षां आज माझे केश चांगले विंचरून ठेवा; तसें केल्यावर त्याच्या बिछान्याजवळ त्याचे मित्र शोक करीत बसले होते त्यांसीं तो बोलूं लागला. "कां तुह्मास कसें वाटतें मी आपलें आयुष्य चांगल्या रीतीने घालविलें कीं नाहीं;" दरबारी लोक जवळ होते

त्यानी लागलेंच उत्तर केलें, "माहाराज! आपलें आयुष्य फारच योग्य रीतीने गेलें." तें ऐकून बादशाहाने प्राण सोडिते वेळीं, मोठ्याने ह्मटलें, "असें आहे तर तुह्मी टाळ्या वाजवून मला शाबासकी द्या पाहूं!"

खरा ख्रिस्ती यास आपलें आयुष्य बरें किंवा वाईट गेलें हें सांगायास खुशामती मित्रांची गरज नाहीं, त्याचेंच मन त्याला सांगतें; त्यांत अंतकाळीं तर तें जसें वास्तविक सांगतें तसें कोणीच सांगत नाहीं. "चांगलें करणारा एकहि मनुष्य नाहीं," हें धर्मपुस्तकांतलें वाक्य खरें मानून तो इहलोकींच्या कीर्तीची अपेक्षा न करितां, येशू ख्रिस्तावर विश्वास ठेवून मरण काळीं त्याजकडून आपल्या पापाची क्षमा मागतो. तारणारा याने कधींहि पाप केलें नसतां तो मेला याचें तात्पर्य हेंच कीं, त्याच्या सर्व पापी लोकानी, त्यावर विश्वास ठेवून ह्या जगांतून दुसऱ्या चांगल्या जगांत जाऊन तेथें सुखरूप असावें.

आगस्तस सीसर याच्या राज्यांत जुडिया प्रांतांमध्यें येशू ख्रिस्ताचा जन्म झाला, ही या पृथ्वीवर एक मोठी गोष्ट घडली. आपण धर्म पुस्तकांतील लूकास याच्या दुसऱ्या अध्यायाच्या पहिल्या ओवींत वाचतों कीं, "त्या काळानंतर असें झालें कीं सर्व देशांतील लोकांची नांवनिशी लिहावी ह्मणून केसार अवगुस्तस [बादशाह] याची आज्ञा झाली." आपण मरण पावल्यानंतर शेंकडो वर्षांनीहि आपली जाहिरात पृथ्वींतील सर्व देवळांत व कुटुंबांत वाचतील आणि आपण जय मिळविल्यावरून आपली आठवण निघायाची त्यापेक्षां बेथ्लीहेम या शहरांतील एका लहानशा कुटुंबावरून आपल्या नावाची वारंवार आठवण

होईल असें त्या समयीं आगस्तस याच्या लक्षांत अगदीं आलें नसेल.

आगस्तस यानें आरंभीं फारच रक्तपात केला होता, परंतु शेवटीं त्यानें लोकांचें फार कल्याण केलें तेणेकरून कोणी निर्भीडपणें ह्मटलें कीं, "जर आगस्तस हा जन्मलाच नसता किंवा जन्मून मेला नसता, तर त्यांत मनुष्यमात्रांचें फार कल्याण होतें."

---



# तैबीरियस, रोम एथील तिसरा बादशाह.

[इ० स० १५——इ० स० ३८]

मनुष्याची कितीहि उत्कृष्ट बुद्धि असली तथापि त्याचें अंतःकरण चांगलें असलें पाहिजे, नाहीं तर ती, कांहीं-एक उपयोगी न पडतां, उलटी असल्या मनुष्यापासून अपाय होण्यास मात्र कारण होती. तैबीरियस बादशाह हा अशा प्रकारचाच मनुष्य होता, ह्या पृथ्वींत त्याच्यासारिखा आजपर्यंत कोणीच झाला नसेल. हा सिंहासनारूढ झाला त्यावेळीं याच्याठायीं कारभार चालविण्याजोगी उत्कृष्ट बुद्धि होती, तसेच सेनापतिचा हुद्दा चालवायास चातुर्य व धैर्यहि पुष्कळ होतें, आणि मनुष्याची परीक्षा करण्यांत तर याचा हात कोणाच्यानेहि धरवताना, तर मग याला चांगला राजा व्हायाला काय पाहिजे असावें बरें? चांगलें अंतःकरण तें असतें तर तेणेंकरून त्याचें मन सुनीतीकडे लागलें असतें, परंतु तें तितकेंच

नसल्यामुळें तो या पृथ्वींत एक मोठा खुनशी व जुलुमगार राजा होऊन गेला.

तैबीरियस हा रोम शहरचा बादशाह झाला त्या वेळेस त्याचें वय पन्नास वर्षांवर होतें, आणि त्याची वर्त्तणूक इतर मनुष्यांपेक्षां वाईट दिसत होती असेंहि नाहीं, ह्मणून हा पुढें इतका उग्र व करदमकाळ होऊन लोकांवर जुलूम करील असें कोणासहि वाटत नव्हतें. कदाचित् त्याच्याहि मनांत असी कल्पना आली नसेल कीं, आपल्याला अखत्यार, धन, व अपरिमित थोरपणा प्राप्त झाला असतां आपण इतकें दुष्ट होऊं. पहिल्याने तर त्याने मोठें ढोंग करून आपण अगदीं गरीब व मायाळू असें दाखविलें; परंतु त्याचा तामसी स्वभाव त्याच्या गुरूस ठाऊक होता; त्याने ह्या त्याच्या नीच व क्रूर शिष्याच्या स्वभावाविषयीं एकदां असें ह्मटलें होतें कीं, "हा रक्ताने भिजविलेला असा एक मातीचा गोळा आहे." हा लटका गरीबपणा धारण करायाचें कारण हें होतें कीं, त्याचा पुतण्या जरमानिकस हा सर्व रोमन लोकांस मोठा प्रिय होता ह्मणून त्याची याला फार भीति वाटत होती. जरमानिकस हा शूर, सुंदर, आणि मायाळू असून लोकांचा तर केवळ जिवाचा कलीदा आणि शिपायांचा सखा असा होता, ह्मणून तैबीरियस पेक्षां ह्यालाच राजा करावा असें पुष्कळांचे मनांतून होतें. रोमन लोकांची त्यावर इतकी प्रीति आहे, हें तैबीरियस याला सहन न होऊन त्याने द्वेषाने त्यास विषप्रयोग करून मारविलें, व त्यानंतर कांहीं दिवसानी त्याच्या दोघां पुत्रांसहि उपासी मारविलें. ह्या दोघां मुलांतून द्रुसस नामें एका मुल-

ग्याला ज्या तृणावर निजावें लागत असे, तेंच आंगाखालचें तृण चावून त्याने नऊ दिवसपर्यंत प्राण वांचविला होता.

आतां तैबीरियस हा, ढोंग टाकून देऊन लोकांस आपलें खरें स्वरूप दाखवूं लागला; जे जे थोर व प्रतिष्ठित ह्मणून गृहस्थ होते त्यांचे प्राण घेण्याचें काम आरंभिलें; आणि तेणेकरून लौकरच त्याने आपल्याहि प्राणास संकटांत घातलें. दुष्ट मनुष्याला दुःखी करणें ह्मटलें ह्मणजे फारसें अवघड नाहीं, त्याला जें जें कांहीं पाहिजे असेल तें तें लागलेंच हजर करावें, ह्मणजे तेणेकरून तो लौकरच कंटाळतो आणि मग त्याच्याठायीं समाधान नाहींसें होतें. तैबीरियस हा, नानातऱ्हेचे विषयोपभोग भोगून शेवटीं त्यांविषयीं अगदीं निरिच्छ होऊन गेला, मग कांहीं तरी उद्योग असावा ह्मणून, त्याने सर्व मनुष्यांस आपल्याच सारिखें दुःखी करायाचें मांडिलें.

त्याने कधीं कधीं रागाचे आवेशाने पुष्कळ मनुष्यांस एकदम ठार मारून टाकावें, आणि कधींकधीं त्यांस अर्धमेले करून त्यांच्या त्या विपत्ती पाहून हर्ष मानित असावा. जरमानिकस याचा निरो नामक एक लहान मुलगा होता, त्याला मारायाकरितां, तैबीरियस याने तयार करविलेलीं शस्त्रें, त्यास दाखविल्यावर तो भयाभित होऊन त्याने, आपली आत्महत्या करून घेतली. जरम्यानिकस याची विधवा स्त्री आग्रिपिना ही रोम शहरांत एक मोठी गुणी होऊन गेली; तिने आपल्या पतीचा व मुलाची ही असी दशा पाहून उपासी राहून प्राण द्यावयाचा निश्चय केला; परंतु ही बातमी बादशाहाला समजल्यावर त्याने हुकूम केला कीं, जबरीने तिचें तोंड उघडून घशांत अन्न

घालावें; मग कांहीं दिवसांनी, जेव्हां त्याचे मनांत आलें तेव्हां त्याने तिलाहि ठार मारविलें.

एकदां एक स्त्री आपल्या मुलास ठार मारिलें ह्मणून रडत बसली होती, तें बादशाहाच्या दृष्टीस पडल्यावर त्याने, तिलाहि मारायास सांगितलें. लोकांस ठार मारतांना पाहणें बादशाहास फार आवडत असे; एकदा एका अपराध्यास सुळीं द्यावयाचें होतें, तेव्हां तो तमाशा पाहवयाकरितां हा तेथें गेला होता; परंतु त्या अपराध्याने त्या यातना चुकवाव्या ह्मणून स्वहस्तें आपल्यास मारून घेतलें, त्यावरून बादशाहाने मोठ्या रागाने ह्मटलें, "अरे माझ्या हातून सुटण्याचा त्या मनुष्याला कसा हिय्या झाला!" दुसऱ्या एका मनुष्यास मारायाचा होता, त्याने बादशाहाची प्रार्थना करून सांगितलें कीं, मला एकदां लवकर मारून टाकावें, त्यावरून तैबीरियस याने उत्तर केलें, "तूं मनांत पक्कें समज कीं, तुझ्या यातना कमी कराव्या इतका तूं कांहीं माझा जिवलग मित्र नाहींस.

एका दिवशीं एका बंदिवानास चरकांत घालून मारावयाचा होता, व त्याच दिवशीं बादशाहचे घरीं त्याचा एक मित्र मेजवानीस यावयाचा होता, तो आला असतां, पाहारेकऱ्यानी न ओळखतां त्यासच धरून चरकांत घातला; तो अर्धमेला झाल्यावर बादशाहास ही चुकी समजली, तेव्हां त्यास त्या बापुड्याची कांहीं दया न येतां, त्याने त्या पाहरेकऱ्यांस इतकेंच ह्मटलें कीं, "ज्या अर्थी तुह्मी हें काम आरंभिलें आहे, त्या अर्थी तें पुरें करून त्या मनुष्यास दुःखा वेगळा करा."

एकदां एक मडें जात होतें, त्याबरोबरचे एका मनु-

ष्याने थट्टेने ओरडून ह्मटलें, स्वर्गवासी आगस्तस यास सांगून पाठवा कीं, गरीब लोकांकरितां त्याने जी ठेव ठेविली आहे, ती अझूनपर्यंत त्यास मिळाली नाहीं." तें बादशाहास समजतांच त्याने त्या मनुष्यास कैद करवून त्याचा हिसा त्यास देवविला, आणि मग, त्याला फांसीं द्यावा असा हुकूम केला. त्याला रस्त्यांतून ओढित नेत असतां तैबीरियस याने त्यास ह्मटलें कीं, "जा, आणि आगस्तस यास सांग कीं, मला आपला हिसा पोहोंचला."

तैबीरियस हा जेव्हां तेव्हां जोश्यांस आपले ग्रह कसे काय आहेत असें विचारीत असे; व ते पुसायाकरितां तो त्यांस एखाद्या उंच कड्याच्या शिखरावर एकांतस्थळीं नेऊन, मग तेथून परत येते वेळीं त्यांचा कडेलोट करवी. एका संध्याकाळीं फ्रासिलस नामक एका जोश्याने, तैबीरियस याचे प्रश्नाची उत्तरें देऊन त्याचीं अगदीं खातरी करून दिली, आणि त्यास सांगितलें कीं, तुझ्या नशीबी फार चांगलें लिहिलें आहे. बादशाहाने फ्रासिलस याला विचारिलें, "अरे, तुला आज काय होईल तें तुझ्याने सांगवेल?" तो अंमळ थांबून विचार करूं लागला; मग त्याला एकाएकीच भयाने कंप सुटून तो ह्मणूं लागला कीं, मला तर आपला काळ आलासा वाटतो! हीच घडी मला शेवटलीसी दिसती!" बादशाहास वाटलें कीं, फ्रासिलस याने आपलें अरिष्ट खरेंच सांगितलें, ह्मणून तो त्यास अलिंगन देऊन, तेव्हांपासून तो जोशी जें जें भविष्य सांगे, तें तें खरें मानूं लागला.

पृथ्वीच्या इतिहासांत, ह्या काळासारिखा दुसरा अघोर काळ निःसंशय कधींहि आला नसेल. रोम शहरचे

बादशाहानी तर मनुष्याचें अंतःकरण स्वाभाविक किती दुष्ट आहे हें दाखविण्याकरितांच जन्म घेतला असें दिसतें. तैबीरियस हा, धन, अखत्यार, आणि वैभव यांत अगदीं गरक झाला होता, तथापि रानांतील हिंस्त्र पशूंमध्यें आणि त्यामध्यें थोडकेंच अंतर होतें; त्याच्या इतक्या ऐश्वर्यानें त्याला खरा थोरपणा किंवा वास्तविक सुख अगदीं प्राप्त झालें नाहीं. ह्या राजाच्या कारकीर्दींत, जेव्हां मनुष्यांच्या अपराधांची पराकाष्ठा झाली, तेव्हां पाप्यांस तारण्याकरितां येशू ख्रिस्त मरण पावला. तो इहलोकींचा मान व सुख यांचा अगदीं धिःकार करीत असे; त्याला दौलत, पदव्या, किंवा, इतमाम हीं कांहींच नव्हतीं. तो दिव्य होता ह्मणूनच थोर होता असें नाहीं, तर त्याच्या पवित्रतेवरून व चांगुलपणावरूनहि त्याचा थोरपणा दिसून येतो. यावरून तैबीरियस यानें जेव्हां पैलेट यापासून ख्रिस्ताचे मरणाची, मरून पुनः उठल्याची, व त्यानें जे जे चमत्कार केले त्यांची हकीकत ऐकिली, तेव्हां ती त्याच्याहि मनांत ठसून त्यानें ती सेनेट सभेस विदीत केली, आणि ह्मटलें कीं, आजपासून रोमन लोकानी येशू ख्रिस्ताला देव असें मानावें. तैबीरियस यानें केलेले हुकूम क्वचितच खालीं जात, परंतु ह्याप्रसंगीं मात्र सेनेट सभेने त्याचें अगदीं ऐकिलें नाहीं, त्यानी हिम्मत धरून असा हुकूम केला कीं, सर्व ख्रिस्ती लोकानी रोम शहरांतून ह्या क्षणीं निघून जावें, परंतु बादशाह हट्ट धरून त्यांच्या तर्फेचा झाला, ह्मणून ख्रिस्ती लोक त्याच्या राज्यांत निर्भयपणें राहिले.

रोम शहरापासून कांहीं अंतरावर केप्रीयें नामें एक

फार सुंदर बेट आहे, तेथें, तैबीरियस हा मौजा मारण्याकरितां वारंवार एकटाच जात असे. तो ह्मातारपणींहि लोकांवर करडा अंमल चालवीत असे; तो कपटी व क्रूर असल्यामुळें, त्याचें मन किती दुःखी व अस्वस्थ होतें, हें, सेनेट सभेला त्यानें पाठविलेल्या एका पत्रावरून कळून येईल; "मी हाल्लीं जीं दुःखें भोगितों त्यांपेक्षांहि अधिक भोगून मरावें कीं काय, आतां म्या लिहावें काय व न लिहावें काय हें मला कांहींच सुचत नाहीं."

तैबीरियस हा, लोकांवर एकसारिखा वीस वर्षेपर्यंत जुलूम करून, शेवटीं दुखण्यांत पडला; घेरी येऊन तो वारंवार पडे, तेणेंकरून त्याला वाटलें कीं मी आतां खचीत मरतों. त्यानें मागें जीं जीं वाईट कर्मे केलीं, त्यांकरितां, अशा समयीं ह्मटलें ह्मणजे त्याला किती पश्चात्ताप व्हावा, परंतु तो न होता आपल्या पाठीमागें आपल्यापेक्षांहि वाईट असा मनुष्य कोण शोधून काढावा याची त्यास फारच काळजी पडली. मग शोधाअंतीं तैबीरियस यास कालिगुला याशिवाय दुसरा कोणी वाईट मनुष्य सांपडला नाहीं; त्यास त्यानें आपल्या पाठीमागें बादशाह करावा असें ठरविलें, आणि ह्मटलें कीं, "जरमानिकस याच्या मुलास मी जिवंत ठेवितों, कां कीं, त्यानें कालेंकरून सर्व लोकांस दुःख द्यावें, आणि त्यापासून आपल्याच नाशास कारण व्हावें; व त्याप्रमाणेंच तो होईल असी माझी खात्री आहे."

कालिगुला यानें आपल्या क्रूरतेची व दुष्टपणाची जी प्रतीति लौकरच दाखविली, ती तैबीरियस यास अगदींच माहित नव्हती. बादशाहास मारून टाकण्याविषयीं फार

अतूर होऊन, त्याने, त्याच्या एका माक्रो नामक प्रियकर दरबारी मनुष्यास मथविला, आणि बादशाह निजला होता त्या खोलींतून सर्वांस बाहेर घालवून त्यास बिछान्यांतच दडपून मारिला.

याप्रमाणें तैबीरियस, ज्याने शेंकडो जणांस हालहाल करून मारिलें, तोहि शेवटीं एकाएकी मारला गेला; यावरून पाहतां, रोमन लोक, या बादशाहाचा जुलूम इतका काळपर्यंत मुकाट्याने सोसून राहिले, हा एक मोठा चमत्कार वाटतो.

ज्या देशांत ख्रिस्ती धर्म आहे, त्यांत चांगले चांगले कायदे व विचारशील लोक असतात, ह्मणून तेथे जे कोणी दुर्गुणी, क्रूर, किंवा अन्यायी असतात, त्यांस कायद्याप्रमाणें शिक्षा होऊन इतर लोक त्यांचा धिःकार करितात; व हे कायदे, राजा व प्रजा या उभयतांसहि समान लागू असतात. आतां जर एकाद्या अगदीं भिकाऱ्यासहि अपराधाशिवाय ठार मारिलें, अथवा एक आठवडापर्यंत तुरूंगांत घातलें, तर किती गवगवा होईल बरें! ग्रेटब्रिटन एथील कायदे व सरकार यांस आतां सर्वत्र मान देतात; परंतु त्याकाळीं जें बेट तैबीरियस याच्या राज्याचा दूरचा, केवळ रानटी, असा एक परगणा होता.



# कालिगुला, रोम एथील चौथा बादशाह.

[इ० स० ३८——इ० स० ४२]

जे कोणी हलकेपणाने थोर लोकांची खुशामत करितात, त्यांस मोठा हुद्दा प्राप्त झाला असतां ते, आपल्यापेक्षां जे कनिष्ठ असतात त्यांबरोबर मोठ्या डौलाने व गर्वाने वागतात. कालिगुला हा लहानपणापासून आपल्या स्वार्थाकरितां फार हलकेपणा करीत असे, तैबीरियस याने त्याची आई आग्रीपिना व त्याचा भाऊ द्रुसस यास ठार मारिलें, तथापि त्याच्या तोंडांतून त्यांच्या दयेविषयीं, अथवा दुःखाविषयीं एक शब्दहि निघाला नाहीं. त्याने आपली स्वार्थबुद्धि भिडेच्या पडद्याखालीं अगदीं झांकून ठेविली होती. एका नामांकित वक्त्याने तर असें ह्मटलें आहे कीं, "या सारिखा हलका गुलाम अथवा तुच्छ धनी कधींहि झाला नसेल !"

कालिगुला या गादीवर बसला तेव्हां रोमन लोकांस

वाटलें कीं, आह्मी क्रूर, खुनसी, आणि जुलमी अशा पुरुषाच्या हातून सुटून आपला प्रियकर आणि शूर जो जर्मानिकस त्याचा तरूण मुलगा कालिगुला याच्या अमलाखालीं आलों, हें फार बरें झालें; परंतु त्याने लवकरच मूर्खपणाचीं कामें करण्यास आरंभ केला. हा कोणी साधारण मनुष्य असता तर त्याचें हें आचरण लोकांस केवळ विनोदास मात्र कारण झालें असतें, परंतु तो बादशाह होता आणि तशांत स्वभावाने दुष्ट होता ह्मणून त्याच्या मूर्खपणामुळें मोठमोठीं क्रूर कर्में घडूं लागलीं, तेणेंकरून मोठें भय पडून, लोकांस त्या गोष्टीविषयीं विचार करणें प्राप्त झालें. कालिगुला याने आपल्या राज्याच्या आरंभींच, सर्व लोकानीं माझी पूजा करावी, असा हुकूम केला. त्याने एक देऊळ बांधून त्यांत आपल्यासारिखी एक सोन्याची मूर्त्ति करून स्थापिली, आणि लोकानीं तेथें बली वगैरे द्यावा असें केलें. नेहमी तो आपल्या माहालांत जसा पोषाग करी, त्यासारिखाच त्या आपल्या प्रतिमेसहि चढवायास सांगे आणि आपण मनास वाटेल त्या देवाचें नाव प्रति दिवसीं धारण करीत असे. त्याला कधीं इंद्र, कधीं मंगळ, आणि कधीं शुक्र व्हावें असें वाटे. रोम एथील मोठमोठे गृहस्थ कालिगुला याचे उपाध्याय होण्यास इच्छीत, व हा अधिकार प्राप्त व्हावा ह्मणून, ते त्याची फार हलकेपणाने विनवणी करून त्याला चांगल्या चांगल्या अपूर्व जिनसा आणून अर्पण करीत. आपण आणि मुख्य देव यांचें संभाषण होत असतें, असें लोकांस दाखविण्याकरितां, तो बादशाह, ढोंगाने इंद्राच्या मूर्तीजवळ बसून फार वेळ फुस्फुस करी आणि पुढें काहीं दि-

वसानीं त्याने असा हुकूम केला कीं, माझ्या स्त्रीची व व घोड्याचीहि पूजा करावी.

कालिगुला याने आपल्या प्रीतींतल्या घोड्यासाठीं संगमरवरी दगडाचा एक तबेला बांधविला, आणि त्याचा दाणा खाण्याचा कोठिंबा, हस्तिदंती मोठा नकसीदार असा करविला. त्या घोड्याला रात्रीं चांगली झोंप लागावी आणि कोणी त्रास देऊं नये ह्मणून त्याजवळ रात्रभर पाहारेकरी पाहारा करीत असत. बादशाह, कधीं कधीं, ह्या घोड्यास आपल्या मेजावर, सोनेरी वर्ख लावलेला दाणा खावयास घाली, आणि द्राक्षमद्य, सोन्याच्या भांड्यांत घालून त्यास पाजी. हा बिचारा गरीब प्राणी स्वच्छंदाने शेतांत इकडे तिकडे उड्या मारून नुसती चार आणि पाणी यांहींकरूनच किती सुखी झाला असता! कोणीहि आपल्या प्रीतींतल्या जनावराविषयीं मूर्खपणाने असी वर्त्तणूक केली नसेल; परंतु सांप्रतकाळीं मात्र, आपल्या कुत्र्याविषयीं अथवा घोड्याविषयीं अतिशय प्रीति दाखविणारे गृहस्थ, पुष्कळ सांपडतील. त्या काळीं एका खिस्ती ग्रंथकर्त्याने आपल्या ग्रंथांत स्त्रियांस असी सूचना केली आहे कीं, "मोत्यें, पोपट, मोर, आणि कुलंगें कुत्रें" यांविषयीं फार प्रीति असूं नये. परंतु हा ग्रंथकर्त्ता, जर जिवंत होऊन आला, तर मोठमोठे संभावित गृहस्थी आपला काळ आणि प्रीति, जीं आपलीं मुलेंबाळें व सोयरीं धायरीं यांकडे खर्चायाचीं, तीं आपल्या कुत्र्याकडे खर्चितात, असें पाहील. जीं मिष्टान्नें, भुकेने मरणाऱ्या मनुष्यांस दिलीं असतां त्यापासून त्यांचे प्राण वांचतील, तीं

जे लोक जनावरांकडे निरर्थक उधळितात त्यांस काय ह्मणावें बरें!

कालिगुला हा फार हलक्या मनाचा मनुष्य होता, व याच्या कर्मणूक करण्याचा प्रकार याच्या सोबत्याप्रमाणेंच होता. हा त्यांजबरोबर नाटकगृहें, तालिमखाने यांत जाऊन, कुस्त्या, वनपशूंच्या लढाया आणि नानाप्रकारचे रिकामे खेळ पाहत बसून रात्रंदिवस काढीत असे; आपल्या खेळास अडथळा होईल याकरितां तो नाटकगृहांतून कोणास जेवायास देखील उठूं देत नसे, त्यांकरितां जेवण तयार करवून तेथेंच आणवीत असे. असें होतां होतां त्या सर्वांस या गोष्टीचा किती कंटाळा आला असेल बरें!

कालिगुला हा बहुधा आपण मारलेल्या रोमन लोकांचीं प्रेतें आपल्या वनपशूंस खावयास घाली; आणि त्यांस नेहमी खावयास मिळावें ह्मणून दहादहा दिवसांनीं पुष्कळ लोकांस मारून त्यांजकडे पाठवी, आणि थट्टेने ह्मणे कीं, मी आपला "हिसाब चुकवीत आहें." आपल्या देशास वृद्ध, व अशक्त मनुष्यांचें पोषण करण्याचें ओझें, अतःपर पडूं नये ह्मणून, तो त्यांस सिंहापुढें टाकवीत असे. त्यानें असा हुकूम केला होता कीं, कोणाला मारणें झाल्यास हळूहळू मारावें, कां कीं "त्यांला मरणाच्या यातना समजल्या पाहिजेत." अशा भयंकर वेळीं तो तेथें नेहमी जाई आणि त्या बापुड्यांची हेलना करून त्यांच्या शरिरास आणि मनास जें दुःख होई तें पाहून मोठा आनंद मानी. कालिगुला यानें पुष्कळ सेनेटर मारिले; त्यानी स्वतःच आपणास मारून घेतलें असें लोकांनी समजावें, ह्मणून

त्याने त्यांच्या घरीं त्यांस बलावण्याकरितां जासूद पाठवावे, जसें कोणी ह्मणेल कीं त्यांच्या मरणाविषयीं त्याला कांहींच माहित नाहीं. या लोकांस, रोमन बादशाहाच्या अमलांतून सुटून, निर्धास्तपणें जाऊन राहाण्यास कोठेंहि ठिकाण नव्हतें; कां कीं जंगली लोकांच्या देशांशिवाय सर्वत्र यांचाच अंमल चालत होता, आणि रानटी लोक तर, एकाहि रोमन मनुष्यास आपल्या देशांत येऊं देत नसत, व तशांत त्यांची भाषाहि समजत नसत.

आतां या राज्यांत क्रूरपणाची पराकाष्ठा होऊन लोक अगदीं त्रासून गेले. कालिगुला याने, ज्या गृहस्थांस मारायाचें होतें, त्यांची याद करविली होती, तींत आपलें नाव गुप्तपणें लिहिलें आहे असें, त्याच्या बायकोस समजल्यावरून, सर्व लोकांस या अशा राजाच्या जुलुमापासून व मूर्खपणापासून सोडिवण्याविषयीं ज्यांहीं कट केला होता त्यांच्या त्या कटास, ती सामील झाली. ही मसलत कांहींसी उघडकीस येऊन, एका भोरपिणीविषयीं वहमा आला; तेव्हां तिने त्या कटांतील सर्व गृहस्थांचीं नावें सांगावीं ह्मणून कालिगुला तिला फार यातना करूं लागला. या सर्व यातना तिने मोठ्या आश्चर्यकारक धैर्याने सहन केल्या; शेवटीं तिचे सर्व अवयव, सांधे सोडवून, निरनिराळे केले; परंतु जरी तिला ते सर्व गृहस्थ माहित होते, तथापि ती प्राण जाईपर्यंत एकाचेंहि नाव कबूल झाली नाहीं. तिला मारायास नेत असतां तिने, एका मनुष्याच्या पायाचा आंगठा हळूच दाबून त्याला खूण केली कीं, तूं या कटांत आहेस, हें मला ठाऊक आहे. त्यासमयीं तो मनुष्य, आपल्यास ही उघडकीस आणील

ह्मणून फार भिऊन गेला; ही आपला प्राण देईल पण विश्वासघात करणार नाहीं, असी कल्पना तेव्हां त्याच्या मनांत अगदीं आली नाहीं.

पालेटैन ह्मणून एका जातीचा खेळ आहे, तो चालत असतां बादशाहास मारावा, असा चीरीया नामक त्या कटांतील जो प्रमुख त्यानें बेत केला. त्या दिवसीं, कांहीं अपाय घडेल असें कालिगुला याच्या स्वप्नींहि नव्हतें; आणि तो नेहमीपेक्षां फार आनंदांत होता. यासमयीं बादशाह, लोकांच्या समुदायामध्यें कांहीं फळें इत्यादि अपूर्व पदार्थ टाकवीत होता आणि ते घेण्याकरितां लोकांमध्यें जी हिसकाहिसक वगैरे दांडगाई होत होती, तिची मौज पाहत बसला होता. मग विश्रांति घेण्याकरितां कांहीं वेळ इकडे तिकडे फिरून स्नानास जाऊं लागला, इतक्यांत ते कट करणारे लोक, आपण बादशाहाच्या सेवेंत हजेर आहों असें दाखवून, त्याच्या सभोंवतीं मिळाले. बादशाह आपल्या स्नानाच्या ठिकाणीं एका अरूंद रस्त्यानें जात आहे इतक्यांत चीरिया यानें आपल्या कटारीनें त्याला भोंसकून खालीं पाडिलें आणि ह्मटलें कीं, “ जुलूमगारा! याविषयीं विचार कर !”

कालिगुला यानें आपल्या रक्षणाकरितां मोठी शर्त केली, आणि कोणी आपल्यास लवकर येऊन साहाय्य करावें ह्मणून मोठ्यानें ओरडून ह्मणाला कीं, मी अजूनपर्यंत जिवंत आहें. परंतु ते कटवाले लोक पुष्कळ होते त्यामुळें त्यांचा कांहीं उपाय न चालतां हा मारला गेला, तेव्हां याला तीस वार लागले होते.

हा बादशाह मरण पावला त्या वेळीं एकुणतीस वर्षां-

चा होता, असा अल्प वयांतच हा इतका दुष्ट झाला होता, तेव्हां जर हा अणखी वांचता तर अघोर पापी होऊन मग हा काय करिता ? याने या आपल्या फक्त चार वर्षांच्या कारकीर्दींत इतके अपराध केले; त्यावरून याने फार दिवस राज्य केलें नाहीं, व हा फार दिवस वांचलाहि नाहीं ह्मणून सर्व लोकांस आनंद झाला. सिनिका याने जें ह्मटलें आहे तें खरें आहे, कीं "मोठ्या दुर्गुणास मोठ्या अधिकाराचा जोर मिळाला असतां काय होतें हें दाखविण्याकरितां ईश्वराने कालिगुला यास उत्पन्न केलें असें दिसतें."



# क्लाडियस, रोम एथील पांचवा बादशाहा.

(इ० स० ४२ ——— ५५ पर्यंत.)

कालिगुला याचा चुलता क्लाडियस याला सर्व लोकानी मूर्ख असा ठरविला होता; ह्मणून तो दरबारांत आला असतां त्याला कोणीहि विचारीत नसे, व त्याचा सर्वजण तिरस्कार करीत. त्याचा पुतण्या कालिगुला यास मारिला तेव्हां हे आपल्यासहि मारितील असी त्यास धास्ती पडून तो एका गुप्त स्थानीं आपला प्राण रक्षावा ह्मणून लपून बसला होता; परंतु त्यास लोकानी तेथूनहि शोधून काढिला, आणि आपल्या खांद्यावर बसवून नेऊन रोम एथील बादशाह केला. या समयीं याच्या वयास पन्नासावें वर्ष होतें.

याच्या सारिखा अकल्पित लाभ कोणासहि झाला नसेल, तो रोमन लोकांतून कोणालाहि आपली स्वतांची पूजा करूं देत नसे, लोकानी मागील राजाच्या कारकी-

र्दीत अनुभवलीं दुखें विसरून जावीं असें तो सांगूं लागला. हा फार चांगल्या रीतीनें राज्यकारभार चालवूं लागला व लोकांचा न्याय फार शांतपणें करूं लागला. यानें, जान दी ब्यापतीस्त याचा शिरछेद करणारा जो हेरड आन्तीपास त्याचा पुतण्या आग्रिपा याला जुडिया प्रांत परत दिला; आणि ब्रितन एथील लढाईंत कैद करून आणलेला जो वेल्स प्रांतींचा मोठा शूर राजा काराक्त-कस याला क्षमा केली.

रोमन लोकांचा असा अभिप्राय होता कीं ब्रितनदेश फार रानटी अवस्थेंत आहे, व तेथें नेहमी फार धुकें असतें, आणि तो फार दूर आहे ह्मणून तेथें कोणाच्यानेहि जाव-वत नाहीं; परंतु जेव्हां अशा देशांतील राजास कैद करून रोम एथें आणिला तेव्हां त्यांना फार चमत्कार वाटला. काराक्तकस याचें नाव त्याच्या शूरत्वाविषयीं रोम एथें-हि प्रख्यात झालें होतें, आणि या प्रसंगीं त्याला रोम एथील रस्त्यांतून बंदिवान करून नेत असतां त्या विपत्तींत-हि त्याला मोठा मान मिळाला. असें संकट त्याजवर गुदरलें असतांहि त्यानें आपल्या मनाचा मोठेपणा सो-डिला नाहीं, व तो तिळमात्रहि खंती न होता त्या सुशो-भित शहराकडे पाहून ह्मणाला कीं, "आहाहा! ज्या लो-कांजवळ इतकें ऐश्वर्य आहे त्यानी, ब्रितन एथील गरीब अशा माझ्या लाहनश्या झोंपडीचा हेवा करावा, ही केवढी अघटित गोष्ट ?"

प्राचीन काळीं जशा सुंदर इमारती रोम एथें बांधले-ल्या होत्या त्यांप्रमाणेच सांप्रत काळीं ग्रेतब्रितन एथेंहि बांधल्या आहेत; परंतु त्यांचे मालक काराक्तकस जसा

आपल्या लाहानशा झोंपडींत राहावयासाहि तृप्त होता, त्याप्रमाणें तृप्त नाहींत; त्यांना स्वदेशाचें कल्याण करण्यापेक्षां परदेशांत जाऊन ख्याली खुशाली करणें, मौजा मारणें व अणखी कांहीं दुर्गुण लावून घेणें, हें विशेष आवडतें. काराक्कस याने तर आपल्या देशाकरितां प्राणहि दिला असता; परंतु हालीं ब्रितन् लोकांत असे पुष्कळ सांपडतील, कीं ज्यांना आपल्या देशांत राहणेंहि आवडत नाहीं.

जे मागें कित्येक दुर्गुणी बादशाह झाले त्यांप्रमाणेंच क्लाडियस् यानेहि, आरंभीं राज्यकारभार हुशारीने चालविला; परंतु अपरिमित सत्ता प्राप्त झाली असतां जसे भयंकर परिणाम होतात, त्याप्रमाणें, एवढी मोठी सत्ता प्राप्त झाल्यामुळें यालाहि तसेंच झालें. याने लोकांस अगदीं बिघडवून दुर्गुणी व दुष्ट करून टाकिलें. याला दुर्दैवाने अतिशय वाईट असी स्त्री मिळाली होती; ती सुंदर होती खरी, परंतु फारच दुष्ट होती, तिच्या दुष्टपणामुळें शेवटीं क्लाडियस यालाहि तिला मारून टाकावी, असें वाटलें.

आपल्याला ठार मारणार हें वर्त्तमान मिस्सेलीना राणीला जेव्हां समजलें, तेव्हां तिचे सर्व मित्र व आई खेरीज करून सर्व घरांतील मनुष्यें तिला सोडून पळून गेलीं. तिने आमदानीच्या दिवसांत आपल्या आईकडे एकहि दिवस लक्ष दिलें नसतां, तिंने मात्र या प्रसंगीं तिला सोडिलें नाहीं; कां कीं सर्वांची प्रीति जरीं तुटली तथापि आईची ममता तुटत नाहीं.

आतां मिस्सेलीना हिला बागेंत आपल्या आईबरोबर

एकटीच राहाण्याचें जरूर पडलें, ती एथें आपल्या पूर्वींच्या वैभवासाठीं निरर्थक शोक करीत बसे; तें कोणी पाहिलें असतां त्याला तिचा विलाप पाहून फारच दुःख होई. तुला जर रोम एथील राणीप्रमाणें मरायाचें आहे तर तूं आपली आत्महत्या करून घे, असें हिची आई वारंवार सांगत असे, त्याप्रमाणें शेवटीं मिस्सेलीना हिनें आपल्यास मारून टाकण्याकरितां हातांत एक कटार घेतली, परंतु तिचा धीर झाला नाहीं. नंतर लवकरच इरोडस नामक एका सरदारानें बागाचा दरवाजा उघडून येऊन एका तडाक्यानें तिला ठार मारून टाकिलें.

क्लाडियस यानें लागलेंच आग्रिपीना नामक एका सुंदर स्त्रीसीं लग्न केलें; ती गर्विष्ट, लोभी आणि घातकी असे. ती बादशाहबरोबर फार नीच रीतीनें वर्त्तणूक करी, व त्याजकडून पुष्कळ जुलमाचीं कामें करवीं. एका दिवसीं तो पुष्कळ दारू प्याला असतां कोणी एकानें त्याला असें ह्मणतां ऐकिलें कीं, "माझ्या स्त्रियांची वाईट वर्त्तणूक कांहीं दिवस सोसून शेवटीं त्यांना मारून टाकावें असें माझ्या दैवीं आलें आहे." हे शब्द आग्रिपीना हिच्या कानीं गेल्यावर तिला आपल्या जिवाविषयीं फारच धास्ती सुटली, ह्मणून तिने, क्लाडियस यास मारण्याचा बेत केला.

बादशाहाच्या आवडत्या पदार्थांत अळबें ह्मणून एका जातीची विषारी वनस्पति आहे ती घालून रात्रीस मोठ्या चमचमित भोजनाची सिद्धता केली. ते पदार्थ त्याला फार आवडत असत, व ते फार रुचिकरहि होते, ह्मणून, त्यांत विष घातलें आहे, असें बादशाहास न उमगतां त्यानें ते यथेच्छ खाल्ले. क्लाडियस याला लागलेंच तें विष या-

धलें, तथापि तो तत्क्षणींच मेला नाहीं. तेव्हां आग्रिपीना हिच्या मनांत आलें कीं, हें कर्म उघडिकीस आलें असतां आपणाला शिक्षा होईल; यास्तव, तिने तें अघोर कर्म शेवटास नेण्याकरितां एका वैद्यास लांच देऊं करून बोलावून आणिला. त्याने बादशाहाचा घसा कसा काय आहे हें पाहण्याचें मिष करून एका पिसाच्या शेवटीं एक फार जलाल विष लावून तें त्याच्या घशांत ठेवून दिलें. तेणेंकरून क्लाडियस तत्काळ मरण पावला.

त्या काळांत या पृथ्वीवर मोठें पद ह्मटलें ह्मणजे रोम एथील बादशाहाचें, असें असतां तें पद चालविणारे जे पुरुष झाले त्यांतून योग्य असे थोडकेच, व तेणेंकरून सुखी झाले असेहि थोडकेच; ज्यांना खरे मित्र मिळाले होते असे थोडकेच, आणि आपले दिवस स्वस्थतेने घालवून शेवटीं स्वाभाविक मरणाने मेले असेहि थोडकेच!

---



# नीरो रोम एथील साहवा बादशाह.

[इ० स० ५५ पासून ६९ पर्यंत]

नीरो यासारिखा क्रूर व दुष्ट मनुष्य या पृथ्वीवर कोणीच झाला नसेल; त्याने रोम शहरांतील शेंकडो लोकांचे प्राण घेतले; जितके ख्रिस्ती लोक त्याला सांपडले तितक्यांस ठार मारिलें; आणि सेंतपीतर आणि सेंतपाल ह्मणून जे येशू ख्रिस्ताचे प्रेषित त्यांचाहि त्याने वध केला. तथापि नीरो हा जेव्हां लाहान मुलगा होता, तेव्हां कोणासहि वाटत नव्हतें कीं, हा पुढें इतका वाईट निघेल; कां कीं, तो क्रूरतेचा फारच तिरस्कार करी, आणि कोणी जनावराला जरी मारिलें, तरी तें त्याला अगदी सहन होत नसे. यावरून, आपण मनांत वाईट विचार येऊं देण्याविषयीं मुलापासून जपत असावें, नाहीं तर ते दिवसानुदिवस अधिक अधिक बळकट होत जातात.

मुलें जेव्हां लाहान असतात, तेव्हांच त्यांस कळलें पा-

हिजे कीं, ह्या पृथ्वींत निरनिराळ्या ठिकाणीं नेणारे असे दोन मार्ग आहेत; त्या दोहोंतून कोणत्या तरी एकाने मनुष्यास जावें लागतें; एक, धर्म आणि पवित्रपणा यांचा आहे, आणि दुसरा अधर्म व दुष्टपणा यांचा आहे. प्रत्येक मनुष्य प्रति दिवसीं जसें आचरण करितो, त्याप्रमाणें तो बरा किंवा वाईट होत जातो; ह्मणून आपण कोणत्या मार्गाने जात आहों ह्याकडे आपणास फार लक्ष दिलें पाहिजे. जीं मुलें नीतीने वागायास इच्छितात, त्यांस तो मार्ग भर दोन प्रहर सारिखा प्रकाशीत दिसतो; व जीं दुर्गुणी मनुष्यांच्या संगतीस लागून अनीतीने वागतात, तीं नीरोसारिखीं दररोज अधिकाधिक दुष्ट होऊन शेवटीं आकस्मात नाश पावतात.

सिनिका नामें एक विद्वान दैवतपूजक मोठा तत्वज्ञानी होऊन गेला, तो नीरो याच्या लाहानपणांत त्याचा गुरु झाला होता; याजकरितां आपण विचार करावा कीं, जितकें त्याला ज्ञान होतें तितकें त्याने आपले शिष्यास दिलें असेल. परंतु नीरो याची आई आग्रिपीना ही तर एक पराकाष्टेची दुष्ट स्त्री होऊन गेली; सिनिका यास, नीरो याला ज्ञान शिकावयास जितके आयास पडले, तितके तिला आपल्या मुलास दुर्गूण शिकवायास पडले नाहींत.

नीरो हा लाहान असतांच त्याचा बाप वारला, ह्मणून आग्रिपीना हिनें लागलेंच क्लाडियस बादशाहबरोबर लग्न लाविलें. क्लाडियस बादशाह इतका बुद्धिहीन असे कीं, ती त्याला अगदीं आपल्या सूत्राने वागवी, आणि त्याच्या लक्षांत कधींहि आलीं नसतील, असीं क्रूर कर्में त्याजवळून

करवीं. क्लाडियस याच्या पहिल्या स्त्रीचा, फार प्रियकर व मनोरंजक असा ब्रितानिकस नामें एक मुलगा होता, त्यावर याची फारच प्रीति असे, व तो रोमच्या राज्याचा वास्तविक वारसहि होता; परंतु आग्रिपीना हिने आग्रह धरून नीरो यासच पसंत करविलें, आणि क्लाडियस याजवळून ह्मणविलें कीं, माझ्या पाठीमागें नीरो यास राज्य मिळावें, माझ्या मुलास मिळूं नये; असा प्रकार घडून आल्यावर सर्व रोमन लोकांस फारच आश्चर्य वाटलें.

आग्रिपीना ही, बादशाहच्या हुकुमाशिवाय त्याच्या जिवलग मित्रांसहि दोषी ठरवून त्यांस देहांत शासन करी; आणि आपले स्वतांचे मित्रांस मोठमोठ्या पदव्या देऊन त्यांच्या हातीं सत्ता देई. परंतु तिच्या मनांत नेहमीं वागत असे कीं, ब्रितानिकस हा लाहान आहे तोंच त्याला आपल्या अखत्यारांत ठेवावा, ह्मणून त्यावर फार प्रीति करितें असें बाहेरून दाखवी, परंतु अंतरयामीं, त्याचा केव्हां नाश करीन असें तिला झालें होतें.

बादशाह निर्बल झाल्यामुळें त्याच्याने ह्या निराश्रीत व हतभाग्य मुलाचा सांभाळ करवला नाहीं, ह्मणून तो आपल्या दुष्ट शत्रूच्या कबज्यांत सांपडला. रोमन लोकांच्या हयगईमुळें, त्या मुलाच्या अरिष्टाची बातमी त्यांस फार उशीराने पोंहचली, ह्मणून त्यांच्याने ह्याचा बचाव करवला नाहीं. एका अर्थी, तो लाहानपणीं मेला हें बरेंच झालें, कां कीं, मोठा अखत्यार मिळविल्यावर नीरोसारिखा दुष्ट होऊन ह्मातारपणीं मेला असता तर फार वाईट झालें असतें.

सर्व लोक, जरीं ब्रितानिकस याच्या तर्फेचे होते, तरी

आग्रिपीना हिला जेव्हां जेव्हां संधी सांपडे, तेव्हां तेव्हां ती, नीरो याला वाढविण्याकरितां लोकांजवळ आपली भीड खर्चित असे. एका पंचाक्षऱ्याने आग्रिपीना हिला सांगितलें कीं, जर तुझा मुलगा रोम शहरांत राज्य करूं लागला, तर तो तुझ्या मृत्यूस कारण होईल; तिने त्या-वर उत्तर केलें कीं "नीरो याने माझा प्राण घेतला तरी घेऊं दे, परंतु माझ्या डोळ्यांदेखत तो एकदा बादशाह झाला ह्मणजे झालें." नीरो याला थोरपणा मिळवायासाठीं तिने पुष्कळ अघोर कर्मे केलीं इतकेंच नाहीं, तर त्या कार्याकरितां तिने आपला प्राणहि दिला असता; परंतु काय उपयोग, तिच्याने त्याला वास्तविक सुखी करवलें नाहीं. आग्रिपीना हिने आपल्या पुत्रास रोम शहरचा बादशाह केल्यामुळें सर्व पृथ्वी त्याच्या अमलाखालीं आली परंतु त्यापासून त्या दोघांसहि कांहीं फायदा झाला नाहीं; कां कीं, तीं अधम होतीं ह्मणून इहलोकीं क्लेश भोगून मरण पावलीं.

नीरो यास राज्याभिषेक झाल्यावर, आरंभीं त्याने जि-तकें ज्ञान व रास्तापण दाखविला तितका दुसरे कोणतेहि बादशाहाने दाखविला नाहीं. सर्व प्रसंगीं, तो आपला गुरू सिनिका याच्या उपदेशाप्रमाणें चाले, तेणेंकरून त्याची वर्त्तणूक लोकांस इतकी आवडली कीं त्याच्या रा-ज्याची पहिलीं पांच वर्षांपर्यंत त्याची वाहवा झाली आणि ब्रितानिकस यास एकीकडे ठेवून नीरो यास बादशाह केला ह्मणून कोणासहि कांहीं वाईट वाटलें नाहीं.

आग्रिपीना ही, आपल्या भ्रताराच्या मृत्युमुळें फारच दुःखांत आहे असें उगीच ढोंगाने दाखवूं लागली. तिने

त्याचें उत्तर कार्य मोठ्या समारंभानें करविलें या प्रसंगीं, नीरो यानें सिनिकाकडून लिहविलेलें भाषण तेथें वाचून दाखविलें; त्यांत क्लाडियस याचें असें वर्णन केलें होतें कीं, ह्या पृथ्वींत त्यासारिखा शाहणा व थोर मनुष्य कोणीच झाला नसेल. परंतु तेथें जितके लोक होते, त्या सर्वांस ठाऊक होतें कीं, तो केवळ खुळा होता.

ब्रितानिकस हा आपला फार लाडका आहे, ह्मणून त्याला आपल्या खोलींतून बाहेर येऊं देत नाहीं, अशा निमित्तानें आग्रिपीना हिनें त्यास कोणाच्याहि दृष्टीस पडूं दिलें नाहीं. नीरो यास माझ्याच योगानें राज्य प्राप्त झालें आहे, ह्मणून त्यानें नेहमी माझ्या अखत्यारांत राहावें असें तिला वाटत होतें व त्याप्रमाणें, हा नवा बादशाहहि पहिल्यानें तिच्या इच्छेनुरूप वर्त्तत असे; परंतु मूर्खत्वानें, ती फारच जुलूम करूं लागली, तेणेंकरून तिनें आपली सत्ता लवकरच गमावली. नीरो यास विचारल्याशिवाय तिनें पुष्कळ मनुष्यांस ठार मारविलें. तिच्या नवऱ्याचा नारशीसस नामें एक मित्र होता, त्याजवळून तिनें आत्महत्या करविली. नीरो याच्या मनांतून त्याचा जीव वांचवायाचा होता, परंतु त्याचें तिच्यापुढें कांहींच चाललें नाहीं.

नीरो हा सतरा वर्षाचा होईपर्यंत, आपला गुरू सिनिका याच्याच अनुमतानें वागत असे; त्यानें राज्यकारभार चालविण्याकरितां घालून दिलेले जे चांगले रास्त नियम, त्याप्रमाणेंच हा राज्यकारभार चालवूं लागला; तेणेंकरून सर्व लोकांस वाटूं लागलें कीं, रोम शहरांत आजदिवसपर्यंत, याच्यासारिखा दयाळू व उदार बादशाह कोणीच झाला नाहीं. अपराध्यांस ठार मारण्या-

च्या ठरावपत्रावर त्याला सही करावी लागे; तेव्हां तो कधींकधीं मोठ्या दुःखानें ह्मणे, "अरेरे! मी लिहावयास शिकलों नसतों तर फार चांगलें झालें असतें!" एका प्रसंगीं, यानें सेनेट सभेला आनंद वाटण्याजोगी वर्त्तणूक केली, त्यावरून ते सभासद याची स्तुति करूं लागले, तेव्हां यानें उत्तर केलें कीं, मी स्तुतीस पात्र होईपर्यंत तुह्मी माझी स्तुति करूं नये.

आग्रिपीना हिजकडे राज्यकारभार संबंधीं कांहींच काम नसल्यामुळें तिला फार राग आला, आणि जरी नीरो तिच्यासीं सत्कारपूर्वक वर्त्तत होता, तरी, त्यावर आपला अखत्यार चालविल्याशिवाय आणि आपल्या इच्छे-प्रमाणें अघोर कर्मे केल्याशिवाय तिच्यानें उगीच राहावलें नाहीं. ती नेहमी आपला अखत्यार वाढविण्याविषयीं प्रयत्न करूं लागली, तेणेंकरून शेवटीं, नीरो यानें अगदी त्रासून जाऊन तिला नाहींसी करून टाकण्याचा बेत केला. आग्रिपीना हिला हें वर्त्तमान समजतांच, संतापून तिनें लागलाच ब्रितानिकस यास बाहेर काढून ह्मटलें कीं, रोम शहरचा हा खरा बादशाह आहे, ह्मणून मी नीरो यास पदच्युत करून यालाच गादीवर बसवीन.

आतां, नीरो हा आपला गुरू सिनिका याचें अगदी ऐकेनासा झाला; आणि त्याच्या आईनें, ही असी भीति घातल्यावरून, त्यानें ब्रितानिकस यास ठार मारण्याचा निश्चय केला. कोणत्या विषानें त्याचा प्राण घ्यावा, हें समजण्याकरितां, त्यानें नाना तऱ्हेचीं विषें जनावरांस घालून तीं कसकसीं तडफडून मरतात हें पाहिलें; आणि मग, त्यांतून तात्काळ प्राण घेणारें असें एक विष ब्रिता-

पुणे मराठी ग्रंथालय
४१७ ब, नारायण ..., पुणे

निकस यांजवळून बलात्कारें प्राशन करविलें, तेणेंकरून तो थोडक्याच तासांनीं मरण पावला.

सर्वांस ठाऊक आहेच कीं, हिंस्र पशूस एकदा रक्ताचा स्वाद समजला असतां तो अधिकाधिक हिंसा करूं लागतो, तद्वत नीरो याने ब्रितानिकस याचा प्राण घेतल्यावर त्याच्या दुष्ट स्वभावाची पराकाष्ठा होत चालली. मग जसजसा तो मोठमोठीं अघोर कर्मे करूं लागला, त्या त्याप्रमाणें त्यास अधिकाधिक आनंद वाटूं लागला; नीरो याने ब्रितानिकस त्याचा वध केल्यावर, लवकरच, दुसरी बळ आपल्या स्वतांच्या आईची दिली. तिने, आपल्या पुत्रास सिनिका याच्या सन्मार्गाविषयींचा उपदेश ऐकूं दिला नाहीं, तेणेंकरून त्याचें मन बिघडलें, ह्मणून ही तिला ईश्वरें शिक्षा केली असें दिसतें.

जीं मुलें आईबापांच्या अतिशय लाडामुळें बिघडतात, तीं शेवटीं अगदीं नावडती होतात. नीरो यास, आपल्या आईस त्रासवून दुःख देण्यांत फारच मौज वाटूं लागली; त्याने तिला चिडवण्याकरितां तिच्या माहालाच्या खिडक्या खालीं गाणीं गावविलीं तसीच, तिला आपल्या माहालांत येण्याची मनाई केली; तिच्याजवळ पाहारा करणारे जे शिपायी होते त्यांस काढून टाकिलें; स्वतः तिची भेट घेणें अगदी टाकून दिली; आणि जे कोणी तिच्या भेटीकरितां तिच्या घरीं जात, त्यांसहि तेथें जाण्याची बंदी केली.

इतकें झालें असतांहि आग्रिपीना हिने आपला गर्व व अहंकार टाकिला नाहीं; त्यावरून तिला आपल्या हुकमांत ठेवण्याविषयींची नीरो याची निराशा होऊन त्याने तिला

मारायाचा निश्चय केला. पहिल्याने त्याने तीस विषप्रयोग करण्याचा यत्न केला, परंतु तिला कांहीं औषधाचें ज्ञान होतें, ह्मणून तिने लागलाच उपचार करून तें विष उतरिलें.

तिचा नाश करण्याकरितां त्याने दुसरी एक युक्ति काढिली, परंतु तीहि सिद्धीस गेली नाहीं. तिला निजायाकरितां एक खोली तयार करविली. त्या खोलीचें छप्पर अशा बेताने अलगज ठेविलें होतें, कीं, ती रात्रीस निजल्यावर त्यास जरा ढका लागला असतां तें तिच्या आंगावर पडून त्याखालीं दडपून ती मरून जावी; परंतु ही बातमी तिला समजल्यावर तिने त्या खोलींत पायहि ठेविला नाहीं, असें झाल्यावर, मग तिला कोणत्या युक्तीने पेचांत आणावी याविषयीं नीरो यास कांहीं सुचेनासें झालें.

नंतर, त्याने एक तारूं बांधावयास सांगितलें, तें असें चमत्कारिक होतें कीं, त्याची कळ दाबतांच त्याचे सांधे सुटून निरनिराळे व्हावें; बादशाहांस प्रथम वाटलें कीं ह्या युक्तीने आपली आई खचित बुडून जाईल. परंतु तें तारूं तयार झाल्यावर त्यांत बसून एक लाहानसी फेरी मारून येण्याच्या निमित्ताने आग्रिपीना इला बोलावणें केलें त्याप्रमाणें ती त्या तारवांत बसून फिरायास गेली असतां संकेताप्रमाणें ओंड पाण्यांत त्याची कळ दाबायाची ती त्या खलाशानी उथळ पाण्यांतच दाबिली व आग्रिपीना ही चांगली पोहणार होती, त्यामुळें ती तरत राहिली; इतक्यांत तिच्या जवळून दुसरें एक तारूं जात होतें, त्यांतील खलाशानी तिला वर घेऊन रोम शहरास सुखरूप पोहंचविली.

हा त्याचा दुष्ट बेत फसल्यामुळें त्यास फारच क्रोध आला; आणि ह्यावेळेपासून तो आग्रिपीना इला मारण्याचा बेत प्रसिद्धपणें सांगू लागला, तो ह्मणे कीं जोंपर्यंत ही जिवंत आहे तोंपर्यंत माझ्यानें निर्भय राहवणार नाहीं.

आनिसीटस नामक ज्या मनुष्यानें आग्रिपीना इला मारण्यासाठीं कळीचें तारूं केलें होतें, त्यालाच नीरो यानें तिचा वध करायास उभा केला. ह्या मनुष्यानें तें काम करण्याचें कबूल केल्यावरून नीरो यास वाटूं लागलें कीं, आतां आपण आग्रिपीना इच्या कटकटींतून लौकरच सुटूं, त्या आनंदांत असतां त्यानें मोठ्यानें ह्मटलें कीं, "आजच मी खरा बादशाह झालों."

आनिसीटस यानें, बरोबर कांहीं शिपाई घेऊन आग्रिपीना इच्या घरास वेढा घातला, नंतर तो तिच्या खोलीचें दार फोडून आंत शिरला; तेव्हां हा एकाएकीच आला हें पाहून तिला कांहींसें भय वाटलें, परंतु तिनें बाहेरून अगदीं निर्भय आहें असें दाखवून, आनिसीटस याला मोठ्या गंभीरपणानें ह्मटलें कीं, "जर तूं माझी प्रकृती विचारण्याकरितां एथें आला अससील, तर बादशाहास सांग कीं, मी फार चांगली आहें; परंतु जर दुसऱ्या कांहीं वाईट हेतूनें एथें आला अससील, तर मला वाटतें कीं, माझ्या हत्येचा तूं मात्र दोषी होसील, माझा मुलगा होणार नाहीं."

ह्या तिच्या बोलण्यास कांहीं एक उत्तर न देतां एका शिपायानें आपला सोटा तिच्या मस्तकावर मारिला तो लागतांच, तिनें तेथून पळून जाण्याची आशा सोडिली; मग त्यांनीं तिला अणखीहि पुष्कळ फटके मारिले, तेणे-

करून ती मरण पावली; तिने प्राण सोडिते वेळेस नीरो सारिखा राक्षस पोटीं आला, ह्मणून फारच शोक केला.

जर, आग्रिपीना हिने आपल्या दुष्ट आचरणाने लहानपणापासून आपल्या मुलाचा स्वभाव बिघडविला नसता, तर तिचा असा परिणाम कां झाला असता; कां कीं, सालोमन सांगतो, "ज्ञानी पुत्र बापाला दृष्ट करितो परंतु मूर्ख पुत्र आपले आईला दुःखदायक आहे." दृष्टांत वचनें १०

ह्या वेळेपासून, बादशाह मूर्खपणाने अगदीं भीड सोडून जें जें क्रूर कर्म करावेसें वाटे, तें तें करूं लागला; तेव्हां सिनिका यास त्याचें हें दुराचरण पाहवेना, ह्मणून तो दरबारांत जाण्याचें सोडून देऊन आपला काळ अध्ययनांत घालवूं लागला. नंतर नीरो हा उनाड मित्रांच्या संगतीने फारच कुकर्मं करूं लागला; त्याने गुलामाचा पोशाक करून सारी रात्र त्यांबरोबर गल्लोगल्लीं भटकत फिरावें, लोकांवर सर्व प्रकारें जुलूम करावा. अशा अनार्थामुळें लवकरच शहरचे लोक उठून दंगा करूं लागले.

मजवर लोकानी प्रीति करावी, त्यापेक्षां त्यानी माझा तिरस्कार करावा हें मला बरें वाटतें, असें नीरो याला ह्मणतां कोणी ऐकिलें होतें; आणि वास्तविक पाहतां, सर्व मनुष्य मात्राने त्याचा तिरस्कार करावा हेंच त्याला घटत होतें. त्याने आपली स्त्री आक्तेविया, इला ठार मारिली आणि पोपिया नामें एका अगदीं दुर्गुणी स्त्रीस राणी केली; आपली चुलती डुमिशिया इला विष घालून मारविली; आणि मोठमोठ्या विद्वान व प्रतिष्ठित अशाहि पुष्कळ लोकांस, मारण्याचा हुकूम केला. त्यांतून कि-

त्येकानीं तर त्याच्या हातून सुटावें ह्मणून विषप्रयोगानें आपली आत्महत्या करून घेतली.

अशा अनर्थामुळें, आतां शहरच्या मुख्य मुख्य लोकानीं नीरो याला मारण्याचा कट रचिला; परंतु एपिकेरीस ह्मणून एक स्त्री होती, तिला हें गुह्य सांगितलें होतें, तिच्या हयगईमुळें तें उघडकीस येऊन तिला फारच दुःख भोगावें लागलें. तिने त्या कटांतील लोकांचीं नावें सांगावीं, ह्मणून नीरो याच्या हुकूमावरून तिला चरकांत घातली, तथापि तिने एकाचेंहि नाव सांगितलें नाहीं. नंतर तिला कोरड्यांचा मार देऊन लोखंड तापवून त्याचे लास दिले, तरीहि तिने आपलें धैर्य सोडिलें नाहीं; मग शेवटीं, आपल्या रूमालाने गळफांस घेऊन तिने आपला प्राण दिला.

तुह्मी कटांत सामील आहां, ह्या निमित्ताने लोकांस मारायास नीरो यालाहि चांगली सवड सांपडली. त्याने शहरांतील मोठमोठ्या प्रतिष्ठित अशा साहा असामीस व दुसऱ्याहि कित्येक संभावित लोकांस निर्दयपणाने ठार मारविलें. यावेळेस नीरो याने आपल्या क्रूरपणाची पराकष्ठा करून दाखविली; त्याने मोठा नामांकित तत्वज्ञानी जो सिनिका, त्याजवरहि तोहमत आणून, तो एका खेडे गांवांत राहत होता तेथें त्याच्या घरीं जासूदाबरोबर निरोप पाठविला कीं, तूं बादशाहाचा प्राण घेण्याच्या कटांत सामील आहेस, ह्मणून तुला गुन्हेगार ठरविला आहे. त्या वेळीं सिनिका व त्याची स्त्री पालिना हीं उभयतां, एका मेजावर जेवायास बसलीं होतीं. हा बादशाहाचा

निरोप कळतांच, आपला घात खचित होईल असें त्याला वाटलें, तथापि तो तीळपात्र घाबरला नाहीं.

ह्या आपल्या निरोपाने, सिनिका यास कांहींच भिती उत्पन्न झाली नाहीं, हें पाहून नीरो यास फारच राग आला; तेव्हां त्याने त्यास हुकूम पाठविला कीं, तूं ह्या क्षणींच आपल्यास मारून घे.

हा भयंकर हुकूम त्या तत्वज्ञान्याने मोठ्या शांतपणाने ऐकून आपल्या इष्टमित्रांकडे पाहून हास्यवदन करून ह्मटलें; मजजवळ तुह्माकरितां ठेवायास कांहीं नाहीं, परंतु सहनशिलतेविषयीं एक चांगलें उदाहरण मात्र ठेवितों.

सिनिका याने आपली प्रियकर स्त्री पालीना हिला जेव्हां शेवटीं कुशल असो असें ह्मटलें, त्या वेळीं मात्र त्याला गहींवर येऊन त्याच्या डोळ्यांत अश्रू आले, आणि आपल्या वियोगाकरितां तिने दुःख करूं नये, ह्मणून तो तिची समजूत करूं लागला.

येशू ख्रिस्तावर ज्यांचा विश्वास आहे त्यांकरितां, जेथें मृत्युने वियोग झालेले मित्र पुनः एकमेकास भेटतात, असें दुसरें एक जग आहे, असें जर सिनिका यास माहित असतें व ईश्वरी कृपेने त्या उभयतां स्त्रीपुरूषांचा ख्रिस्तावर विश्वास असता, तर त्यांचा वियोग होतेसमयीं त्यांस इतकें दुःख झालें नसतें व हीं थोडकीं दुःखाचीं वर्षें गेल्यावर आपण आपल्या पतीस पुनः जाऊन भेटूं, असी पालीना इची खातरी होऊन तिने इतका शोक केला नसता; परंतु खरा ख्रिस्ती यास ज्या या आशेने आनंद होतो, ती सिनिका यास ठाऊक नव्हती, नाहीं तर तिच्या

योगाने त्याचें अज्ञान व भ्रांति यांचा नाश होऊन, या जगांतून दुसऱ्या चांगल्या जगांत जाते वेळेस ख्रिस्ती यांस तेथील निर्भयतेच्या योगाने जसा अतिशय आनंद होतो तसा या दैवतपूजक पंडितासहि झाला असता.

पालीना ही फारच शोक करूं लागली; तिला आपल्या पतीमागें जिवंत राहणें बरें वाटेना, ह्मणून तिने त्याबरोबर आपलाहि प्राण देण्याविषयीं आग्रह धरिला. सिनिका याने तिचें निवारण करण्याविषयीं पुष्कळ यत्न केला, परंतु तिने हट्ट धरल्यामुळें त्याला तिचें ह्मणणें कबूल करावें लागलें; मग त्या उभयतानीं प्राण जाण्याकरितां आपल्या दोन्ही हातांच्या शिरा टोंचविल्या.

हें भयंकर कृत्य चाललें असतां, सिनिका हा आपल्या जवळच्या मनुष्यांबरोबर स्वस्थचित्ताने भाषण करून, आपले चिटनीसांस कांहीं अगत्याचीं पत्रें लिहावयास मजकूर सांगत होता. त्याचे इच्छेप्रमाणें, त्याचा प्राण लवकर गेला नाहीं, ह्मणून त्याने कांहीं विष आणवून खाल्लें तथापि त्यापासूनहि कांहीं झालें नाहीं; नंतर रक्त लवकर वाहून जावें, याकरितां त्याने आपणास ऊन पाण्यांत बसवायास सांगितलें; तरीहि त्याचा प्राण गेला नाहीं, शेवटीं एका भट्टींत बसतांच त्यांतील धुराने गुदमरून लागलाच तो मरण पावला.

इकडे पालीनाहि पुष्कळ रक्त वाहिल्यामुळें बेशुद्ध पडली, परंतु तिच्या दासीनी चांगली तजविज केल्यामुळें ती सावध झाली. पुढें तिने आपल्या पतीची उत्कृष्ट वर्त्तणूक ध्यानांत आणून व त्याप्रमाणें वागण्याचा निश्चय करून पुष्कळ वर्षें अगदीं एकांत वासांत काढिलीं.

नीरो याच्या कारकीर्दींत जीं क्रूर कर्में झालीं, त्यांचें वर्णन करूं गेलें तर एक मोठा ग्रंथ होईल; त्याला रक्तस्राव करण्याची इतकी आवड होती कीं, तो न्यायाधीशाची वाट न पाहतां, लोकांस अपराधी ठरवून स्वमुखें त्यांस मारावयाचा हुकुम करी; आणि त्यांच्या यातना पाहवयास मौजेने उभा राही. लोकांच्या ध्यानीं मनीं हि नाहींत अशा अपराधांची त्यांवर तोहमत आणून त्याने त्यांस खरे अपराध्याप्रमाणें शिक्षा करावी. चाकरांही आपल्या धन्यांवर कुभांड रचावें ह्मणून त्यांस उत्तेजन देई; तसेंच मुलानी आपल्या आईबापांस दोषी ठरविलें असतां त्यांसहि बक्षिसें मिळत, असें होतां होतां शेवटीं रोम शहरांत रक्तपाताची पराकाष्ठा होऊन गेली.

ही एक चमत्कारिक गोष्ट आहे कीं, नीरो हा भयंकर वृत्तीचा मनुष्य असतांहि त्याला गायनाचा व कवितेचा फारच शौक होता; बहुतेकांचें असें मत आहे कीं, ह्या दोन गोष्टींनी कसेंहि कठीण हृदय असलें तथापि त्याला द्रव येतो. नीरो याचा आवाज जरी हलका व कर्कश होता, तथापि त्याला इतका अहंकार होता कीं माझ्यासारिखा गवयी ह्या पृथ्वींत कोणीच झाला नसेल; गायनकलेमध्यें आपलें कसब दाखविण्याकरितां तो प्रसिद्धपणें नाटकगृहांत जात असे.

बादशाह गाऊं लागला असतां लोकांस मोठ्याने वाहवा ह्मणून त्याला शाबासकी द्यावी लागत असे; कां कीं त्या जुलूमगाराने लोक आनंदी दिसतात कीं नाहीं, हें पाहण्याकरितां नाटकगृहांत ठिकाणोठिकाणीं पाहरेकरी ठेविले होते. बादशाह सोंग आणी त्यावेळेस तेथून

उठून जाण्याची कोणत्याहि मनुष्यास परवानगी नसे, त्यामुळें कित्येक लोक तर व्याकूळ होऊन तेथेंच पडत, व कित्येक भिंतीवरून उड्या टाकून पळून जात तेथें अतिवृद्ध असा एक सेनेट सभासद होता, त्याला झोंप येऊं लागली तेव्हां त्यास असा हुकूम केला कीं, जर तूं निजलास तर तुला ठार मारून टाकूं; एकदां एका नामांकित गवय्याची फार वाहवा झाली, त्यावरून बादशाहास वाटलें कीं, यानें आपली बरोबरी केली, सबब त्यास तेथेंच ठार मारून टाकिला.

नीरो याला रथ हाकायाची फार आवड असे, असें सांगतात कीं एकदां यानें दाहा घोड्यांचा रथ हाकिला होता. आपण पेहलवान आहों हें दाखविण्याकरितां त्यानें कोणाच्यानें ओळखवणार नाहीं, असा एक कागदाचा उत्कृष्ट सिंह करविला, आणि त्यावर मोठ्या शौर्यानें हल्ला करून एका क्षणांत त्यास खालीं पाडिला त्या वेळीं सर्व लोकांनीं त्यास शाबासकी दिली.

मी जीवंत आहें तोंच सर्व पृथ्वी जळून जाईल तर फार चांगलें होईल, असें नीरो याला ह्मणतां कोणी ऐकिलें होतें, पुढें दैवयोगें असें घडून आलें कीं, रोम एथें मोठी आग लागली तेव्हां ती नीरो यानेंच बुध्या लाविली असावी, असा सर्व लोकांस वहमा आला. ती आग साहा दिवसपर्यंत एकसारिखी चालली होती. ती विझविण्यास कोणासहि हुकुम नव्हता, ह्मणून कित्येक दुष्ट लोक, आह्मास बादशाहाचा हुकुम आहे असें सांगून, शहरांतील मुख्य मुख्य घरांस आग लावूं लागले; त्या समयीं नीरो हा एका उंच किल्यावर जाऊन या भयंकर अनर्थाची

मौज पाहत बसला होता. ह्या प्रसंगीं रोमशहरांत अतिशय नासाडी झाली; लोकांचीं घरें जळून गेल्यामुळें त्यांस कोठेहि आश्रय नाहींसा होऊन ते स्मशानांत जाऊन राहिले.

रोमन लोक फार कोपले असें पाहून नीरो याला भय वाटूं लागलें, ह्मणून तो टपका आपणावरून काढून टाकून, त्यावेळीं रोम शहरांत ख्रिस्ती लोक राहत होते त्यांचेंच हें काम असें ह्मणूं लागला. मग एका क्षणांत त्या लोकांची कत्तल होण्यास आरंभ झाला. त्या पवित्र लोकांविषयीं कोणास कांहींच माहित नव्हतें, याकरितां कोणी त्यांचें उणें सांगितलें असतां तें लागलेंच खरें मानीत; आणि ते सद्गुणी होते ह्मणून दुष्ट लोक त्यांच्या आचरणावर कांहीं तरी दोष ठेवीत.

ख्रिस्ताच्या मरणाचें स्मरण राहावें, एतदर्थ ख्रिस्तीलोक नुस्ती भाकर व द्राक्षरस यांचें भोजन करीत असतात; ह्या भोजनाचा अर्थ त्या दैवतपूजकांस बरोबर न समजून ते ह्मणत कीं, ख्रिस्ती लोक अशा भोजनसमयीं मनुष्याचें मांस भक्षण करितात; यावरून असें दिसतें कीं, ते त्या लोकांचे विचार अगदीं समजत नसत, व निर्दयपणानें त्यांविषयीं भलभलतेंच सांगत.

सज्जन पाप्यांस त्यांचे भयाविषयीं सावध करावयास सर्वकाळ उत्सुक असतात, असें असतां ख्रिस्ती लोक दैवतपुजकांस नरकांत घालतील असा ते त्यांजवर उलटाच आरोप आणीत; येशूचे भक्त दयाळू असतात, व त्यांस कोणी दुःख दिलें तरी ते त्याला क्षमा करितात, असें असतांहि रोमन लोक त्यांस ह्मणत कीं, "तुह्मी मनुष्य मात्रांचे शत्रु आहां."

नीरो याने ख्रिस्ती लोकांची ही असी हाणमार चालविली, त्यावेळीं रोम शहरांत सेंत पाल ह्मणून एक ख्रिस्ती उपदेशक होता, त्याला पूर्वींप्रमाणें पुनः एकदां नीरो यापुढें हजर होण्यास हुकूम झाला. त्यासमयीं, ख्रिस्ती उपदेशकामध्यें धैर्य व निश्चय हे गुण जसे असावे, तसे त्याने दाखविले, व त्याला ते फारच शोभतहि होते; कां कीं असा निश्चय व असें धैर्य ईश्वरी कृपेवांचून प्राप्त होत नाहींत. जेव्हां याला बादशाहाचें बोलावणें आलें, तेव्हां सर्व मनुष्यानी भिऊन जाऊन याचा त्याग केला. ज्याच्या निष्ठेविषयीं याची पक्की खातरी होती असा जो डिमस नामें याच्याच बरोबर ख्रिस्ती धर्म सांगत फिरणारा एक मनुष्य त्यानेहि त्याला ह्या प्रसंगीं सोडिला. मागें या साधूने फिलिक्स आणि आग्रिपा यापुढें धैर्य धरून जसें ख्रिस्ती धर्माचें प्रतिपादन केलें, तसेंच आतांहि रोम शहरच्या जुलूमगारापुढें एकटाच उभा राहून ख्रिस्ती धर्माचें स्थापन केलें.

याप्रमाणें नीरो याने व त्याच्या जवळचे शिपाई वगैरे लोकानी पाल या साधूच्या तोंडांतून ख्रीस्ती धर्माचा अगदींच स्पष्ट अर्थ ऐकिला याच साधूने फिलिपैकरांस पत्र पाठविलें, त्याच्या पहिल्या अध्यायाच्या तेराव्या ओवींत असें लिहिलें आहे कीं "ख्रिस्तासाठीं जीं माझीं बंधनें तीं अवघ्या सर्कारवाड्यांत आणि इतर सर्वांस प्रगट झालीं आहेत." नीरो हा कठीण हृदयाचा व दुष्ट असा होता, ह्मणून त्याचें मन जरी ईश्वराकडे वळलें नाहीं, तथापि त्याचा खिसमतगार व बहुतेक दुसरे चाकर यांहीं ख्रिस्ती धर्म स्वीकारिला; कारण पाल याने फिलिपैकरांस जें पत्र पाठविलें

त्याच्या शेवटीं तो असें ह्मणतो कीं, "सर्व जे पवित्र ते आणि विशेषेंकरून जे काइसाराच्या घरांतील ते तुह्मास क्षेम सांगतील." अ० ४. ओ० २२.

नीरो याने पाल याची कांहीं एक दया न जाणतां, त्याला इतर ख्रिस्ती लोकांबरोबर दोषी ठरवून इ० स० ६६ या वर्षीं त्याचा शिरछेद केला. सेंत पीतर ह्मणून दुसरा एक साधू होता, त्याचाहि या समयीं वध झाला; कित्येकांचें असें ह्मणणें आहे कीं, त्याने रोम शहरांत आल्यावर दोन पत्रें लिहिलीं, तीं पवित्र धर्मपुस्तकांत वाचायास मिळतात. पूर्वीं या साधूने, समेरिया प्रांतामध्यें सिमन नामें एका जादुगिराला त्याच्या ठकविद्येविषयीं दबावलें होतें, तो यासमयीं, पुनः रोमन लोकांस ठकवीत असतां याच्या दृष्टीस पडला.

जेव्हां पीतर याला सांगितलें कीं नीरो तुला खूसावर मारविणार आहे, तेव्हां त्याला वाटलें कीं, आपल्या स्वामीसारिखें मरण आपल्याला अगदीं अयोग्य आहे ह्मणून त्याने नीरो याजवळ मागून घेतल्याप्रमाणें, खालीं डोकें वर पाय करून त्याला क्रूसावर चढविलें. पीतर याला क्रूसावर देण्याच्या पूर्वीं पुष्कळ वर्षांवर येशू ख्रिस्ताने त्याला जें ह्मटलें होतें, तें आतां प्रत्ययास आलें, "मी तुला खचीत खचीत सांगतों जेव्हां तूं तरुण होतास, तेव्हां तूं आपली कंबर बांधून जेथें तुझ्या मनास वाटलें तेथें गेलास; परंतु जेव्हां ह्मातारा होसील तेव्हां आपले हात लांब करसील आणि तुला बांधून जेथें तुझ्या मनास वाटणार नाहीं तेथें तुला दुसरा नेईल. तो कोणत्या प्रकारच्या मरणाने देवाचें गौरव करणार, तें सुचवून त्याने असें

ह्मटलें." योहान्न अध्याय २१. ओ० १८. १९. ह्या साधुला मारल्याच्या पूर्वीं त्यानें दोन पत्रें लिहून ठेविलीं होतीं, त्यांतील दुसऱ्या पत्राच्या शेवटीं, व सांगितलेलें भविष्य किती लवकर घडून येईल हें त्याला माहित होतें, कारण तो ह्मणतो कीं, "जोंपर्यंत मी ह्या देहरूप राहोटींत आहें, तोंपर्यंत तुह्मास आठवण देऊन सावध करणें हें मला योग्य वाटतें. कारण मला ठाऊक आहे कीं, आमच्या प्रभु येशू ख्रिस्तानेंहि मला दाखविल्या प्रमाणें माझी राहोटी लवकर सोडून द्यावयाची आहे." पेत्रसाचें दुसरें पत्र अ० १. ओ० १३.१४.

पीतर याच्या पूर्वीं कांहीं वेळ त्याच्या स्त्रीचा वध झाला; तिला मारायास नेत असतां जेव्हां ती त्याच्या दृष्टीस पडली, तेव्हां त्यानें तिला पुष्कळ उपदेश करून ह्मटलें कीं, "आतां प्रभुचें स्मरण कर." पीतर आपल्या स्त्री सहवर्त्तमान पुष्कळ वर्षें सुखानें राहत होता, व तो आपल्या मुलाच्या विद्याभ्यासाकडे फारच लक्ष देत असे.

लोकांस दुःख देऊन त्यांचा इतका संहार केला, तथापि नीरो याची इच्छा तृप्त झाली नाहीं; ख्रिस्ती लोकांच्या टोळ्यांच्या टोळ्या मारते वेळीं, त्यांना ज्या यातना होत त्यांची मौज पाहण्याकरितां, तो गाडीवानाचा पोशाक करून तेथें जाई; आणि पाहिजे तसे त्या बापुड्यांचे हाल करवी.

रोम एथील आग विझविल्यावर नीरो हा आपल्याकरितां एक सुंदर इमारत बांधूं लागला, तिला "सोनेरी माहाल" असें नाव दिलें, कां कीं असें उत्कृष्ट काम रोम नगरांत पूर्वीं कधींच झालें नव्हतें. त्यानें ८० हात

उंच असा एक आपला पुतळा करवून तो ह्या इमारतीचे दरवाज्यावर ठेविला, आणि चंद्र व चांदण्या जश्या आपल्या मार्गाने फिरतात, तसें दाखविण्या करितां त्या माहालांतील मुख्य खोलीचें छप्परावर त्यांचीं चित्रें काढवून तें छप्पर फिरेसें करविलें. ही विशाळ इमारत पुरी झाली त्या वेळीं नीरो याने मोठ्याने ह्मटलें कीं, "मनुष्यास राहवयास घर जसें असावें तसें आतां शेवटीं मला मिळालें."

रोम शहरांत दररोज इतकी कत्तल होऊं लागली कीं, तिची गणना करितां येत नाहीं; कां कीं संपत्तीवान मानकरी, सद्गुणी किंवा कोणी कसाहि असला तथापि याच्या ह्या तडाक्यांतून सुटणें फार कठीण होतें. ज्याने बादशाहाकरितां पुष्कळ जय मिळविले होते असा जो कारबुलो, त्यालाहि ठार मारिलें. पुढें, थ्रेशिया नामें एक मोठा विद्वान व सद्गुणी पुरुष रोम एथील दरबारांत मोठा तत्वज्ञानी होऊन गेला त्याचाहि त्याने प्राण घेतला-हा तत्वज्ञानी मरतेवेळीं आपल्या मित्रांबरोबर आत्मज्ञानाच्या गोष्टी करीत होता. पेत्रोनियस नामें कोणी एक थोर गृहस्थ, लोकांस मोठमोठ्या मेजवान्या करीत असे, त्याजवर कांहीं आरोप आणून त्यास आत्महत्या करायास सांगितली, नीरो याला एकदां फार राग येऊन त्याने, आपली स्त्री पोपिया हिला लात मारली, तेणेंकरून ती मरण पावली. असें सांगतात कीं, नीरो याला ह्या पृथ्वीवर पोपिया शिवाय दुसरें कोणीहि प्रिय नव्हतें, तेव्हां असी जर गोष्ट खरी असलीं, तर ह्या प्रसंगीं त्याला किती दुःख व पश्चात्ताप झाला असेल. जे लोक लहानपणापासून आपले मनोविकार आंवरायास शिकतात, त्यांस

क्रोधाच्या स्वाधीन असणाऱ्या लोकांस काय काय दुःखें भोगावीं लागतात, याची कल्पनाहि करवत नाहीं.

असें होतां होतां शेवटीं पृथ्वीला नीरो सारिख्या राक्षसाच्या पिडेपासून दूर होण्याची वेळ आली; रोमन-लोक जे इतके वर्षेंपर्यंत हाय हाय करीत ह्याच्या जुलूमाखालीं राहिले होते, त्या सर्वांनी एकाएकींच कटकरून त्याचा जुलूम व गुलामगिरी यांपासून सुटण्याचा निश्चय केला.

गाल देशांत पाठविलेच्या सैन्यावरील एका विंडे नामें शूर सरदाराने प्रथमतः हा दंगा सुरू केला. त्याने सर्वांची खातरी करून सांगितलें कीं, लोकांस हल्लींच्या गुलामगिरींतून सोडवावें इतक्याच मात्र हेतुने मी हें काम पत्कारिलें आहें; माझा अखत्यार वाढावा असी माझी इच्छा नाहीं. याजकरितां, गालबा ह्मणून एक पुरुष धैर्य आणि सद्गुण यांविषयीं प्रसिद्ध होता, त्याला रोम शहरचा बादशाह केला असी दंवडी पिटविली, तेव्हां सर्व लष्करी लोक आनंदाने जयजयकार करूं लागले. हा जुलूमगार केव्हां पदभ्रष्ट होईल याविषयीं विंडे हा उतावळा होऊन ह्मणाला कीं, "जो कोणी मला नीरो याचें शीर आणून देईल, त्याला मी आपलें स्वतःचें शीर अर्पण करीन."

ह्या अकस्मात रचलेल्या कटाची बातमी जेव्हां नीरो याला पोहंचली; तेव्हां तो कांहीं एक भीति मनांत न आणितां नेहमीप्रमाणें नाटकगृहांत मौज करण्याकरितां गेला. त्याला आपलें राज्य गेलें याविषयीं कांहीं वाईट वाटलें नाहीं; परंतु पडसें येऊन त्याचा आवाज बसला

ह्मणून त्यांस फार वाईट वाटलें; तेथें विंडे याने त्यास वाईट गातो असें ह्मटलें तेव्हां जितका राग आला, तितका त्याला वाईट बादशाह ह्मटल्याने आला नाहीं. परंतु कांहीं दिवसानी जेव्हां नीरो यास बातमी लागली कीं, पूर्वीच्या आपल्या अटकळीपेक्षां शत्रूंचा जमाव फारच वाढला आहे, व शहरच्या सर्व लष्कराने गालबा यास खराच राजा केला, तेव्हां मात्र तो भिऊन जाऊन अगदीं निराश झाला, आणि भयाने घाबरा होऊन आपल्या गादीवरून उठून त्याने खाणे खावयाचें मेज उडवून देऊन, आपलीं वस्त्रें फाडून टाकिलीं; खोलींत शोभेकरितां जीं सुंदर सुंदर भांडीं ठेविलीं होतीं, तीं फोडून टाकिलीं; आणि मग तो ह्मणूं लागला कीं, आतां माझा अगदीं नाश झाला. नीरो हा कोपल्यामुळें व तसाच भ्याल्यामुळें क्षणोक्षणीं मोठे अनर्थ करूं लागला; सर्व सेनेटसभासदांस विषप्रयोगाने मारून टाकीन, व जे शेंकडो सिंह बांधून ठेविले आहेत, त्यांस मोकळे करून शहरांतील सर्व लोकांचा नाश करीन, असीं असीं भयें दाखवूं लागला.

गालबा यास दिवसानदिवस अधिक अखत्यार मिळूं लागल्यामुळें सर्व लोक नीरो याजकडे दुर्लक्ष करूं लागले. थोडेसे जे याचे मित्र होते, त्यांवर मात्र याची कृपा होती, परंतु ते विश्वासघातकी व दुष्ट स्वभावाचे होते ह्मणून अशा संकटसमयीं त्यांच्या हातीं जें कांहीं लागलें, तितकें लुटून त्यापासून दूर झाले; कां कीं, दृष्टांतवचनांत १७ अध्यायाच्या १७ व्या ओवींत ह्मटलें आहे कीं, "सखा सर्वदा प्रीति करितो आणि एकादां भाऊ कष्टाला जन्मला असेल." या वचनाचें सज्जनांस

मात्र स्मरण होतें, ज्यांची सगी सोयरीं याने मारलीं होतीं तितके सर्व लोक आतां याचा सूड उगविण्यास तयार झाले.

नीरो याच्या दुष्टपणाला भिऊन लोक त्याच्या आज्ञा मानीत असत; परंतु आतां त्याच्याने आपल्यास कांहीं इजा करवत नाहीं असें पाहून ते त्याचें ऐकेनातसे झाले. हा जुलूमगार अगदीं दीन होऊन घरोघर आश्रय मागत फिरूं लागला, परंतु कोणींहि त्याला दरवाजा उघडिला नाहीं; त्याचे स्वताचे चाकरहि त्याला लुटून त्याजवळून पळून गेले; असा सर्वांनी त्याचा त्याग केल्यावर त्याला जें भय व धास्ती उत्पन्न झाली ती सांगायास नको. कधीं कधीं तो असें ह्मणे कीं, मी शोक करीत सेनेटसभेजवळ तरी जातों, ह्मणजे माझे मागील दुराचरणाची मला क्षमा होईल; परंतु काय करील, बाहेर पडण्याचा त्यास हिय्या होईना; कां कीं, तो बाहेर पडतांक्षणींच त्याचे तुकडे करून टाकण्याकरितां त्याच्या माहालासभोवतीं लोकांचे थवेचेथवे अगदीं तयार होऊन राहिले होते. एक विष भरलेली रुप्याची डबी तो नेहमी आपले जवळ बाळगीत असे, तीहि त्या जवळून कोणी चोरून नेली होती, नाहीं तर त्याने त्यांतून कांहीं विष खाऊन आपला शेवट केला असता; असा तो निरुपाय होऊन शेवटीं तैबर नदींत तरी बुडून मरावें या बेताने आपल्या खोलींतून बाहेर निघाला, परंतु रस्त्यांतच हिम्मत खचून तो माघारा आला.

थोडक्याच काळामागें जेव्हां नीरो याने येशूच्या भक्तांस मारिलें, तेव्हां त्यानी मरतेवेळीं अगदीं न घाब-

रतां शांत वृत्ति धरिली होती, आणि नीरो हा तर मरते समयीं अगदीं घाबरून गेला, केवढें वैपरित्य हें! मोठा भयंकर मृत्यु प्राप्त होईल, असें त्या दोघांसहि ठाऊक होतें, तथापि पाल याने अगदीं खंती न होतां ह्मटलें कीं, अर्पण होण्याकरितां आतां मी सिद्ध आहें. माझी जाण्याची वेळ जवळ आली." त्याने आपल्या सर्व आयुष्य मृत्यूची तयारी करण्यांत घालविलें, त्याला स्वर्गाची फारच आस्था होती, यास्तव त्यास मृत्यु ह्मणजे मोठाच लाभ वाटत होता, ह्मणून त्याला देह ठेवण्यासारिखें चांगलें दुसरें कांहींच वाटत नव्हतें.

परंतु इकडे नीरो याला तर मृत्यु जवळ आला पाहून मोठें भय सुटलें, तेव्हां नगराबाहेर दोन कोसांवर, एका खेडेगांवांत फेयन नामें कोणी मनुष्य राहत होता त्याच्या घरीं तो आश्रयाकरितां जाऊन राहिला.

तो आपला सारा पोशाक करायास न थांबतां एक काळ्या रंगाचा झगा मात्र आंगावर घेऊन तोंड लपवून नगरांतून पळाला; तेव्हां त्याजवळ बाकी सारे चार चाकर राहिले होते तेवढे त्याच्या समागमें निघाले. रस्त्यांत जिकडे तिकडे नगरकरी व लष्करी लोक, जळो नीरो याचें राज्य असें ह्मणून त्याला शाप देत आहेत व त्याचा मोड झाला ह्मणून आनंद करीताहेत, असें त्याने पाहिलें. वाटेमध्यें एका मनुष्याने त्याला विचारिलें अरे नीरो याचें काय झालें तें तुला समजलें; बादशाह आपले तोंडावरील रुमाल नीट करीत असतां तो अकस्मात हातांतून खालीं पडला, तेव्हां त्या वाटेने दुसरा एक शि-

पाई जात होता, त्याने त्याला लागलेंच ओळखून नीरो ह्मणून हाक मारिली.

याप्रमाणें, झटाझट लोक आपल्याला ओळखूं लागले, असें पाहून त्याने घोड्यावरून उतरून त्याला एका शेतांत लावून दिला, आणि तो ओल्या चारींतून पायाने चालूं लागला; पुढें जातां जातां त्याला जंगल व कांटेरी झाडी लागली, तेणेकरून त्याच्या हातास व तोंडास पुष्कळ कांटे रुतले. शेवटीं, जेथें त्याला दडून राहावयाचें होतें, त्या घराजवळ तो पोहंचला परंतु त्याला कदाचित कोणी शत्रु पाहील या भयास्तव दरवाज्यांत पाय ठेवण्याचा त्याचा हिय्या होईना; मग त्याच्या एका चाकराने त्या घराच्या मागल्या भिंतीस रांगत जातां येई असें एक भोंक पाडिलें त्यांतून तो आंत गेला. तेथें याजकरितां तयार करविलेली एक लहानसी अंधारी कोठडी याच्या दृष्टीस पडली, तींत पहिल्याने कोणी गुलाम दडून राहिला होता तेथें त्याला निजावयास एक फाटका बिछाना, खावयास जाडी भरडी भाकर, आणि प्यावयास जवळच्या खंदकांतील घाणेरडें पाणी, यांशिवाय दुसरें कांहीं नव्हतें. हतभाग्य बादशाह निराश होऊन आपल्या आसपास पाहूं लागला, तेव्हां त्याच्या सोनेरी माहालाचें त्याला स्मरण होऊन मोठ्या दुःखाने ह्मणाला, "हरहर! नीरो याने आतां हें सुख भोगावें काय!"

तेथें तो अगदीं अस्वस्थ होऊन त्याला आपण केलेल्या अपराधाविषयीं क्षणोक्षणीं अधिकाधिक भय वाटूं लागलें; तो आपल्या मनांतील भयंकर विचारांवर कवनें करून तीं ह्मणून दाखवी, आणि काळक्रमणार्थ कांहीं तरी

उद्योग असावा ह्मणून आपलें थडें बांधण्याकरितां दगड गोळा करी आपल्याला अकालमृत्यु प्राप्त होणार यासाठीं जरी तो फारच शोक करीत होता, तथापि तो आपल्या मनांत समाधान पावून ह्मणे कीं, जर मी मेलों तर सर्व पृथ्वीमध्यें उत्कृष्ट असा जो गवयी तो रोम शहरांतून नाहींसा होईल!

मग कांहीं काळाने नीरो यास त्याच्या एका चाकराने एक भयंकर बातमी सांगितली कीं, तुला उघडा करून कोरड्याचा मार देऊन ठार मारावा, असा सेनेट सभेचा हुकूम झाला आहे. हें ऐकतांच बादशाहास वाटलें कीं, असे हालहाल झाल्यावर मरावें त्यापेक्षां स्वहस्तें एकदांच मारून घ्यावें, हें बरें; ह्मणून त्याने लागलीच एक तरवार उचलली, परंतु त्या वेळेसहि त्याला धीर झाला नाहीं, कां कीं स्वहस्तें प्राण घेणें तरी फार कठीण आहे, असें त्याच्या मनांत येऊन त्याने ती तरवार एका बाजूस उडवून दिली.

नंतर त्याने आपल्या चाकरांची विनवणी करून ह्मटलें कीं, तुह्मी कोणी तरी माझ्या डोळ्यासमोर आपल्यास मारून घ्या, ह्मणजे तें पाहून तसें करायास मलाहि धीर होईल; परंतु ही त्याची विनंती कोणीहि ऐकिली नाहीं; कां कीं बादशाहाच्या मौजेसाठीं प्राण देण्याची वेळ निघून गेली. यावरून पाहतां इतकेंच दिसतें कीं, नीरो याची अझूनपर्यंतहि स्वार्थबुद्धि व दुष्टपणा गेला नाहीं; तो क्षणभर सुखाकरितां आपल्या विश्वासू मित्रांसहि मारायास तयार झाला.

नंतर नीरो आपल्या भित्रेपणाचा धिक्कार करून, "आ-

हाहा, नीरो सारिख्याची आणि असी वर्तणूक !" मला हिम्मत धरूं द्या पाहूं !" असें मोठ्याने ह्मणून तो आपल्यास धीर देऊं लागला.

असें असतां अझून त्याला मारून घ्यावेंसें वाटलें नाहीं; मग शेवटीं शिपाई लोक जवळ आले, असें ऐकतांच त्याला वाटलें कीं, आतां जर क्षणभर विलंब लाविला, तर ते आपणास बंदीवान करितील, व हालहाल करून मारतील; याजकरितां त्याने एक कटार घेऊन ती आपल्या छातीवर ठेविली; परंतु त्याला ती मारून घेण्याची हिम्मत झाली नाहीं; ह्मणून त्याने आपल्या एका जवळच्या मनुष्याकडून तें काम करविलें.

या प्रकारें नीरो हा आपले वयाच्या बत्तीसाव्या वर्षी मरण पावला; त्याने जें तेरा वर्षें राज्य केलें, त्यावरून मनुष्याने दुष्ट वासना मनांत राखिल्याने दुर्गुण कोठवर वाढत जातात, आणि त्यांचा किती भयंकर परिणाम होतो, याचें आपणास एक उदाहरण सांपडतें. जर नीरो याला कोणी लहानपणीं सांगितलें असतें कीं, तूं पुढें ह्याप्रमाणें अघोर कृत्यें करसील, तर बहुतकरून त्यानेहि सिरिया प्रांताच्या हजाएल नामें राजाप्रमाणेंच उत्तर केलें असतें; कां कीं अलीशा भविष्यवाद्याने जेव्हां त्या राजास सांगितलें कीं, तूं पुढें हळू हळू दुष्ट होऊन, पुष्कळ तरूण मनुष्यांस मारसील, पुष्कळ घरें जाळसील, व बाळकांस भिंतीवर आपटून टाकसील तेव्हां हजाएल राजाच्या आंगीं रोमांच उभे राहून त्याने मोठ्या रागाने ह्मटलें, "तर तुझा चाकर कुत्रा [आहे]! ह्मणून तसी अघटित गोष्ट करील काय !" राजकथा; प्र० २ अ०

८ ओ० १३ जे कोणी नीरो याचे अपराध व अघोर कृत्यें वाचितात, त्यांचे जसे रोमांच उभे राहतात त्याप्रमाणेंच त्याला जर लहानपणीं समजलें असतें कीं, मी पुढें असा राक्षस होईन, तर या भयंकर आचरणानें त्याच्या आंगींहि रोमांच उभे राहिले असते.



## गाल्बा, रोम एथील सातवा बादशाह.

[इ० स० ६८ मध्यें राज्य करूं लागला.]

नीरो याच्या मागून जे बादशाह झाले, त्यांतून कित्येक तर नाटकांतील सोंगाड्यांप्रमाणें होते; ते जसे क्षणभर तमाशा करून लागलेच नाहींसे होतात, त्याप्रमाणेंच हे बादशाह अगदीं थोडे दिवसपर्यंत अधिकार चालवून नाहींसे झाले. गाल्बा याने सारें सात महिने राज्य केलें त्यांत तो फार उत्तम रीतीने वर्त्तला. पहिल्याने त्याने बादशाह होण्याचें नकारिलें, आणि आपले दिवस सुखाने व स्वस्थतेने जावे, ह्मणून तो स्पेन देशांतील एका नगरांत जाऊन राहिला; परंतु एक जासूद त्याच्या पाठीमागून जलदीने जाऊन, रात्रीं त्याच्या निजायाच्या खोलींत गेला, आणि रोम एथील लोकानी तुला बादशाह केला असें सांगूं लागला.

हें वर्त्तमान ऐकून गाल्बा यास फार आनंद झाला; परंतु पुढें आपला परिणाम काय होईल, हें जर त्याला कळलें असतें, तर, तात्काळ त्यानें आपला प्राण दिला असता. हा फार संपत्तिवान् असतांहि, वारंवार असें ह्मणत असे कीं, मला, फार शाहाणा आणि भला असा जो किंतस कातुलस, त्याचा आप्त ह्मणविण्याविषयीं जितका अभिमान आहे, तितका माझ्या संपत्तीविषयीं नाहीं; कातुलस हा आपण मोठें व्हावें, किंवा आपणास अधिकार प्राप्त व्हावा, याविषयीं कधीं प्रयत्न करीत नसे, ह्मणून लोक त्यास फार मान देत असत; येणेकरून त्याचें आयुष्य सुखांत आणि स्वस्थपणांत गेलें; तसें त्याला बादशाह केल्यानें गेलें नसतें.

गाल्बा हा राज्य करूं लागला, त्यावेळीं त्याचें वय बाहात्तर वर्षांचें होतें; पाहिलें असतां अशा वयांतीत मनुष्यास इतक्या खटपटींत पडणें योग्य नव्हतें. त्याला पुत्र नव्हता, ह्मणून त्यानें पैजोनामक एका अल्पवयी मनुष्यास दत्तक घेण्याचा विचार केला. हा पैजो सभ्य, दृढनिश्चयी आणि सद्गुणी होता, ह्मणूनच गाल्बा याची त्यावर इतकी कृपा झाली. ओथो हा त्याचा फार दिवसांचा स्नेही असतांहि, पैजो याला दत्तक घेतला ह्मणून त्याला फार राग आला, तशांत याचा उधळेपणा व ख्याली खुशाली यामुळें याला फार कर्ज झालें होतें, ह्मणून त्यानें जबरदस्तीनें बादशाह होण्याचा बेत केला.

लष्करी लोकांस लांच देऊन फितूर केल्यावर त्यांनी ओथो याला उचलून छावणींत नेलें; तेथें आपल्या तरवारी उपसून, लोकांस भिववून त्यांस पुढें जाण्याविषयीं

ज्यानीं अडथळा केला त्यांस मारून, ते बाजारांत धावले. गाल्बा याने ते आपल्याकडे आले असें पाहून, त्यांच्यासीं मोठ्या थोरपणाने व धैर्याने वर्त्तणूक केली; परंतु ते आपल्या नाशाविषयीं उद्युक्त आहेत, असें जेव्हां त्याला समजलें, तेव्हां त्याने आपलें डोकें पुढें करून ह्मटलें कीं, माझा वध करून जर लोकांचें कल्याण होत असेल तर तो खुशाल करा, मजकडून कांहीं हरकत नाहीं. इतक्यांत एका शिपायाने लागलेंच त्याचें डोकें तोडून आपल्या भाल्यास अडकविलें, आणि ओथो यास नेऊन दाखविलें; तेव्हां त्याने तें साऱ्या शहरांत मोठ्या धिक्काराने फिरवायास सांगितलें. गाल्बा याचें धड कांहीं काळपर्यंत तसेंच रस्त्यांत पडलेलें होतें, शेवटीं एका गुलामास त्याची दया येऊन त्याने तें पुरून टाकिलें. या जगांत असें वारंवार पाहण्यांत येतें कीं, जे लोक अत्यंत उंच दशेप्रत येतात, त्यांचा परिणाम फार भयंकर रीतीने होतो.



# ओथो, रोम एथील आठवा बादशाह.

[इ० स० ६९ मध्यें राज्य करूं लागला.]

ओथो हा आपणास नुकताच बादशाह ह्मणवूं लागला होता, इतक्यांत त्याने आत्महत्या करून घेतली. त्याने सारें तीन महिने पांच दिवस राज्य केलें. "विश्वासू मनुष्य कोणत्याहि देणगीस पात्र होय," असें हा वारंवार ह्मणत असे, ह्मणून गाल्बा याचा विश्वासू मित्र जो मेरियस सेलसस याला त्याने क्षमा केली, व आपल्या घरगुती कलहांकडे अगदींच लक्ष दिलें नाहीं, त्यामुळें याचा राज्यकारभार आरंभीं सुरळीतपणें चालूं लागला; परंतु जर्मनी देशांतील सैन्याने, आपला सरदार वितेलियस याला बादशाह केला, तेणेंकरून लढाई चालू होऊन, ओथो याच्या स्वारांचा पराजय झाला. या प्रसंगीं एका राजपक्षीय मनुष्याने आपली तरवार उपसून "राजा, तुझे

शिपाई तुजसाठीं काय करायास सिद्ध आहेत हें पाहा," असें ह्मणून त्यानें आपणास मारून घेतलें. वितेलियस याचे स्वार, ओथो याच्या स्वारांस चिडविण्याकरितां, ह्मणत कीं, "शस्त्ररहित असून दीन आणि वृद्ध असा जो गाल्बा त्याचा मात्र शिरच्छेद करून तुह्मी डौल दाखवितां, परंतु समोर उभे राहून उघडपणीं लढाई करीत नाहीं, यावरून तुह्मी लुचे दिसतां."

ओथो याचे शिपाई जितके त्यास चाहत होते, तितके दुसऱ्या कोणत्याहि बादशाहाचे शिपाई त्यास चाहत नसतील. त्यानें आपणास तरवारीनें मारून घेतलें, असें ऐकून ते मोठा आक्रोश करीत त्याच्या माहालांत गेले, आणि तेथून त्याच्या प्रेतास मोठा उंच पोषाक चढवून त्यानीं त्याला मोठ्या समारंभानें नेऊन जाळिलें. कांहीं लोकानीं तर त्याच्या सरणावर आपल्या मशाली टाकून देऊन आपणास मारून घेतलें. ओथो याजविषयीं त्याच्या लोकांची इतकी प्रीति होती कीं, ते त्याच्या मागें वितेलियस याचा द्वेष धरून त्याचा सूड उगविण्याविषयीं प्रवृत्त झाले. हा बादशाह मरण पावला त्या वेळीं याचें वय सारें सदतीस वर्षांचें होतें. लोकानीं या आपल्या प्रियकर बादशाहाच्या स्मरणार्थ एक स्तंभ बांधविला आणि त्यावर "मार्कस ओथो याच्या स्मरणार्थ" असीं अक्षरें कोरविलीं.

---



# वितेलियस, रोम एथील नववा बादशाह.

[इ० स० ७० रांत राज्य करूं लागला.]

नवा बादशाह, वितेलियस, हा जरी शूर सरदार होता, तथापि त्याला राजपद मिळाल्यावर तो फार आळशी व खादाड झाला; त्यामुळें सर्व लोक त्याचा धिक्कार करूं लागले. ज्यांस नेहेमी मिष्टान्न भोजनास मिळतें, आणि उत्तम पोषाग वापरायास मिळतो, अशा लोकांमध्येंहि हलक्या मनाचे आणि नीच असे लोक आढळतात; कारण कीं, वास्तविक मोठेपणा हा सद्गुण आणि औदार्य यांपासून प्राप्त होतो. वितेलियस हा, दास आणि मुखस्तुति करणारे आश्रित, यांच्या समागमें आपल्या माहालामध्यें जरी मोठ्या आनंदांत असे, तथापि लोक त्यास फारच तुच्छ मानीत. याला इतकी खाखाई उठली कीं, आपलें दिवसांतून पुष्कळदां जेवण व्हावें



पुणे मराठी ग्रंथालय
४३७ब, नारायण पेठ, पुणे २

ह्मणून त्याने आपणास वांतीची सवई लावून घेतली; आणि भोजनाचा खर्च आपल्या आंगावर पडूं नये ह्मणून, त्याने आपल्या प्रजेंतून सकाळीं एकाच्या घरीं, दुपारीं दुसऱ्याच्या घरीं याप्रमाणें त्रिकाळहि मेजवानीस जाण्याचें आरंभिलें. शेवटीं, रोम एथील एकूनएक मनुष्य त्याचा द्वेष करून तिरस्कार करूं लागले. वेस्पेशियन याने त्याच्या सैन्याचा पराभव केला तेव्हां, वितेलियस हा फारच भिऊन गेला. तो आपल्या माहालांतून मोठ्या दुःखाने बाहेर निघाला, त्या वेळीं त्याचे सर्व चाकर, मोठा आक्रोश करीत त्याच्या भोंवतीं मिळाले; आणि त्याला जिवदान असावें ह्मणून शत्रूंची प्रार्थना करूं लागले. पण बादशाहाप्रमाणें त्याच्या शिपायानी आपला धीर न सोडितां, एक दिवसभर फार निकराने लढाई केली; तेणेंकरून, रोम एथील रस्त्यामध्यें प्रेतांच्या राशी पडल्या. त्यांचा केवळ मोड झाला असें पाहून तो बादशाह एका कोपऱ्यांत दडून बसला; वेस्पेशियन याच्या लोकानी त्याला शोधून काढून त्याच्या मुसक्या बांधिल्या, आणि त्याच्या गळ्यांत एक फांस घालून भर रस्त्यांतून त्याला उघडा करून नेला. ते लोक त्याच्या क्रूरपणासाठीं आणि अधाशीपणासाठीं मोठ्या कठोर शब्दानी त्याची निंदा करीत त्याच्या बरोबर चालले. शेवटीं त्यानी बुक्या मार मारून त्याचा प्राण घेतला; आणि त्याचें प्रेत एका आंकड्यास अडकवून रस्त्यांतून ओढीत नेलें, आणि तें मोठ्या तिरस्काराने तैबर नदींत फेकून दिलें.



## वेस्पेशियन, रोम एथील दहावा बादशाह.

[इ० स० ७०—७९ पर्यंत.]

वेस्पेशियन, हा मोठा लढणारा होता, त्याचे सद्गुण आणि बुद्धि पाहून रोमन लोकानी त्याला आपला बादशाह केल्यावर त्याने हें एवढें मोठें पद फार योग्यतेनें संभाळिलें, ह्मणून ते आश्चर्य करून त्याची स्तुति करूं लागले. त्याने आपल्या सर्व शत्रूंस क्षमा केली; सद्गुणी मनुष्यांस बक्षिसें दिलीं; आणि आपण स्वतः कित्ता घालून रोमन लोकांच्या सर्व चाली सुधारिल्या.

प्लिनि यास, वेस्पेशियन याची चांगली माहिती होती; तो आपल्या लेखांत याविषयीं असें लिहितो कीं, "मोठ्या अधिकारामुळें या बादशाहाच्या वर्तणुकींत कांहीं फेरफार तर झाला नाहीं, परंतु पूर्वीं याच्या मनांत जीं चांगलीं कृत्यें, करावयाचीं होतीं, तीं करण्यास मात्र याला चांगली संधी सांपडली.

वेस्पेशियन हा फार दयाळू व न्यायी होता, आणि तो सत्याचा तर केवळ ताजवाच होता. याला कोणी कांहीं गोष्ट सांगायास आला असतां, ती त्याला यथातथ्य सांगावी लागत असे. आपलीं आईबापें मोठ्या कुळां-तलीं नव्हतीं किंवा त्यांकडे कांहीं मोठा अधिकारहि नव्हता, असें सांगायास दुसऱ्या एकाद्या थोर मनुष्यास लाज वाटली असती; परंतु वेस्पेशियन हा हें लपवीत नसे. दुसरे कित्येक राजे याजपेक्षां अधिकाराने कमी अ-सतांहि फार गर्व करून आपणास "राजाधिराज" ह्मण-वीत; परंतु वेस्पेशियन यास लोकांनी मोठमोठे किताब दिले तरी त्यांकडे हा लक्ष देत नसे. हा कागद पत्रा-वर फ्लेवियस वेस्पेशियन, इतकीं आपल्या नावाचीं मात्र अक्षरें लिहून सही करी.

ह्या बादशाहास ख्यालीखुशाली अगदीं आवडत नसे, आपल्या रयतेने खाण्याविषयीं व खर्चाविषयीं बेताने राहावें ह्मणून आपण स्वतांच फार साधेपणाने वागे. आप-ल्या शिपायांनी आपल्याचप्रमाणें शरिराने मजबूद असावें ह्मणून तो त्यांस ऐष आरामांत अगदीं पडूं देत नसे; जे को-णी आळशी असत किंवा उनाडकी करीत त्यांस तो मोठी शिक्षा करी. एका शिपायाने आपल्या पोशाकास कांहीं सुगंध लाविला असें वेस्पेशियन याला कळलें तेव्हां ला-गलेंच त्याने त्यास चाकरीवरून काढून टाकिलें. तो ह्मणत असे कीं या वस्तु स्त्रियांसच योग्य, शिपायांस तर लसणीचाच वास चांगला आहे. अणखी एका प्रसंगीं कोणी जासूदांनी प्रवास करण्याकरितां, राजा जवळ पा-यांत घालायास जोडे मागितले त्यावरून तो ह्मणाला कीं,

इतःपर तुह्मी ही गोष्ट मजजवळ काढूं नका, तुह्माला प्रवासास अनवाणीच गेलें पाहिजे.

याच्या अंतकाळाच्या पूर्वीं कांहीं दिवसांवर याला मारण्याचा कोणी कट केला होता; तो उघडकीस आला, तेव्हां त्या सर्व मारेकऱ्यांस याच्या समोर आणिलें; त्यावेळीं हा राग न आणितां व त्यांतून एकासहि शिक्षा न करितां ह्मणाला कीं, "मला या मोठ्या अधिकारामुळें किती घोर आहे हें जर माझ्या शत्रूंस माहित असतें तर ते इतका हेवा न करिते."

दुसऱ्या एका प्रसंगीं वेस्पेशियन याचा तिरस्कार करणारा असा एक मनुष्य याच्या कबजांत आला; तेव्हां त्याला शिक्षा करायाची ती न करितां त्यानें त्याला कोतवाल केला आणि ह्मटलें, कीं, अणखी एकदां जर या मनुष्यावर म्या दया केली, तर हा कृतज्ञ होऊन माझी चाकरी इमानानें करूं लागेल.

वेस्पेशियन यानें कित्येक सुंदर इमारती बांधविल्या त्यांविषयीं सर्व लोक मोठें आश्चर्य करीत, आणि आतां रोम एथें कोणी गेला असतां अद्यापि त्या त्याच्या दृष्टीस पडतात. त्यानें आपला पुत्र तैतस याच्या सन्मानार्थ जी मेहराब बांधविली, ती अझूनपर्यंत जसीची तसीच आहे. कोलिसियम या नावाचें त्यानें एक मोठें नाटकगृह बांधविलें, तेथें हा रोमन लोकांच्या कर्मणुकेकरितां वनपशू, पेहलवान, इत्यादिकांस लढवीत असे. काय चमत्कारिक खेळ हा! हे पेहलवान लढाई करितां करितां एकमेकांस ठार मारीत; हा तमाशा पाहायास हजारो लोक जमा होत असत; हा खेळ रोमन लोकांस फार आवडत

असे, व तो पाहायास स्त्रियांचाहि मोठा थाट जमे; परंतु हें क्रूर कर्म पाहावयास जाऊं नये असें त्यांतून कोणाच्या-हि मनांत येत नसे. एका पेहलवानाने दुसऱ्यास चीत केलें ह्मणजे त्याला मारावें किंवा सोडावें ह्मणून तो सभोवतालच्या लोकांकडे पाही; त्यांच्या मनांतून त्या चीत झालेल्या पेहलवानास जिवदान द्यावयाचें असलें ह्मणजे ते आपले आंगठे वर करीत, नाहीं तर खालीं करीत ह्मणजे तो तत्काळ त्या पेहलवानास तरवारीने भोस्कून टाकी. कित्येक पेहलवान आपल्या डोळ्यांस पडदे बांधून घोड्यावर बसून लढत; कित्येक रथांताहि बसून लढाई करीत; परंतु सर्वांच्या शेवटीं ज्यांची लढाई होई, त्यांस मरेपर्यंत लढावें लागे. यावरून पाहतां प्रेषित सेंत पाल ख्रिस्तीयन लोकांच्या धर्मसंबंधीं लढायांविषयीं बोलत असतां असेंच ह्मणतो कीं, "ईश्वराने आह्मा उपदेशकांस मरावयासाठींच धर्म सांगायास शेवटीं पाठविलें."

जुलियस सिसर याच्या मागून कित्येक फारच दुष्ट बादशाह झाले; असीं मनुष्यें या पृथ्वीवर झालीं होतीं असें आतां लोकांस स्मरण झालें ह्मणजे फार लाज वाटती; परंतु यावरून इतकें दिसून येतें कीं, मनुष्यांचा ठायीं जर सद्गुण नसले तर तीं नीच जनावरांपेक्षांहि तुच्छ होतील. नीरो यापेक्षां अधिक रक्तस्राव वाघासहि आवडणार नाहीं, तसेंच वितेलियस यापेक्षां अधिक खादाडपणा गिधाडहि करणार नाहीं. वेस्पेशियन याच्या सद्गुणाकारणें रोमन लोक त्यावर फार प्रीति करूं लागले-हा बादशाह दाहा वर्षें राज्य करून मरण पावला. मरण काळीं तो असें ह्मणाला कीं, 'बादशाहास उभ्याने मरणें

योग्य आहे!' त्याने प्राण जाई तोंपर्यंत आपणास उभें धरून ठेवावें ह्मणून सांगितलें होतें; अशा वेळीं मान अप्र-मान पाहणें हा मोठा चमत्कार होय!

---



# तैतस, रोम एथील अकरावा बादशाह.

[इ० स० ७९—इ० स० ८१ पर्यंत.]

वेस्पेशियन याच्या मागें तैतस हा बादशाह होणार ह्मणून लोकांस फारच आनंद झाला; कारण त्यांची असी खातरी होती कीं, या बादशाहाचा पुत्र चांगला सुशिक्षित व सद्गुणी असून आपल्या बापाप्रमाणेंच शाहाणपणाने वर्त्तेल.

येशू ख्रिस्त मरण पावल्यानंतर सुमारें तीस वर्षांनी तैतस यास त्याच्या बापाने यरूशालेम शहर यहूदी लोकांपासून जिंकून घेण्याकरितां, लष्कराचा सेनापति करून पाठविला; तेव्हांपासून त्याचें नांव इतिहासामध्यें प्रसिद्धीस येऊं लागले.

या लष्कराने त्या शहरास वेढा घालून जसी त्या लोकांची दुर्दशा केली, तसी दुसरी कोठेंहि झाली नसेल; त्यावेळीं तेथें जुन्या करारांत (निघणें अ० १२ ओ० ११

यांत) सांगितल्याप्रमाणें, वल्हांड सणाकरितां देशोदेशचे हजारो लोक जमले होते. पुष्कळ यहूदी जमावे ह्मणून तेथें असा एक कायदा केला होता कीं, ज्या कोणाचें घर शहरांत असेल, त्याने भाडें घेतल्याशिवाय आपल्या घरांत मावतील तितके पाहुणे राहूं द्यावे.

पापी मनुष्यांकरितां मरावें ह्मणून येशू ख्रिस्ताने जेव्हां त्या शहरात प्रवेश केला त्याकाळीं त्या शहरांतील लोक श्रीमंत व प्रतापी होते, तेथें मोठमोठाल्या इमारती होत्या, शहरच्या भिंती मजबुद होत्या, त्या लोकांचें लष्कर पुष्कळ असून बहादूरहि होते, सर्वत्र अगदीं स्वस्थता होती; आणि तेथल्या देवालयासारिखें दुसरें सुंदर देवालय या पृथ्वींत कोठेंच नव्हतें; त्यावरून सर्वांस वाटत होतें कीं, तें शहर सदैव तसेंच राहून दिवसानुदिवस अधिक बलाढ्य होत जाईल. त्या शहराची दशा काय होईल ती येशू ख्रिस्ताशिवाय दुसऱ्या कोणास ठाऊक नव्हती; या पुण्यक्षेत्राकडे पाहून तो रडला याचें कारण तुह्मास ठाऊक आहे काय? त्याला तेथें भयंकर मृत्यु लवकरच प्राप्त व्हावयाचा होता ह्मणून तो रडला असें नाहीं; तर यरूशालेम शहरावर त्याची फार प्रीति होती, व त्याच्या शत्रूंची काय दशा होईल तीहि त्याला काळजी होती, ह्मणून त्यांची त्यास दया येऊन तो रडूं लागला. धर्मपुस्तकांत सांगितलें आहे कीं, येशू त्या शहराजवळ आला, तेव्हां तो रडून ह्मणाला कीं, "तुझे शत्रू चर खणून तुला वेढितील आणि चहुंकडून दाटी करतील. अणखी तुझीं लेंकरें तुझ्या सहवर्त्तमान दाबून टाकतील आणि दगडावर दगड राहूं देणार ना-

हींत, तुजवर असे दिवस येतील. [लूकास अ० १९.ओ० ४] अणखी तो अतिशय शोक करून ह्मणाला; "हे यरूशालेमा, यरूशालेमा, भविष्यवाद्यांस वधविणाऱ्या आणि आपल्या जवळ पाठविलेले यांस धोंड्याने मारणाऱ्या, जसी कोंबडी आपल्या पिलांस पंखांखालीं एकवट करिती, त्याप्रकारें तुझ्या लेंकरांस एकवट करावयास मला किती वेळां इच्छा झाली आहे, परंतु तुह्मी मानिलें नाहीं; पाहा, तुमची वस्ती, तुह्माकरितां ओसाड राहावयाची आहे." [मात्थी अ० २३ ओ० ३७; २४.१—१६; लूकास अ० २१. ओ० २०]

तैतस जन्मायाच्या पूर्वींच हें असें येशूने ह्मटलें होतें, आणि पाहा कीं, जरी या भविष्याविषयीं तैतस याला कांहींच ठाऊक नव्हतें, तरी त्याने आपलें लष्कर घेऊन यरूशालेम शहराची ख्रिस्ताच्या ह्मणण्याप्रमाणें नासाडी केली. असें होण्याचें मुख्य कारण हेंच कीं, यहूदी लोकानीं पाप केल्यामुळें ईश्वराचा त्यांवर क्षोभ होऊन त्याने रागें भरून ह्मटलें कीं, "तुमची दुर्दशा पाहून मी हंसेन व तुह्मास भय प्राप्त होईल तेव्हां मी वेडावीन."

त्या शहरांतील ख्रिस्ती लोकानी येशूची सुचना ऐकून त्याच्या सांगितल्याप्रमाणें केलें, तेणेंकरून ते यहूद्यांची जी दुर्दशा झाली तींतून बांचलें; का कीं, जेव्हां त्यानीं रोमन फौज जवळ येत आहे असें ऐकिलें तेव्हां ते शहर सोडून पाहाडांत पळून गेले, आणि वेढा उठेपर्यंत पेल्हा या ठिकाणीं स्वस्थ दडून राहिले.

तैतस हा यरूशालेम एथें आला त्याच्या पूर्वींपासूनच त्या शहरांतील यहूद्यांची दुफळी पडून ते निरंतर भांडत होते; त्यांतील एका पक्षाकडे जान नावाचा कोणी

मनुष्य मुख्य होता, व दुसऱ्याकडेस सिमन ह्मणून होता, ह्या दोघांतून महादुष्ट कोण होता हें सांगतां येत नाहीं; कां कीं, दोघानीहि सर्व देशभर रक्तपात केला, आणि सोयऱ्या धायऱ्याकडून परस्परांमध्यें भर रस्त्यांत मारामारी करविल्या, व जे कोणी त्यांस आड आले त्यांचीं घरेंदारें लुटून त्यांस ठार मारिलें. यरूशालेमाच्या दरवाज्याजवळ रोमन लोकांची फौज पाहतांच जान व सिमन हे दोघेहि भिऊन गेले. मग त्यानीं असा निश्चय केला कीं, ह्या नव्या शत्रूला मागें पिटून लावण्याकरितां आपण आपलें भांडण विसरून सैन्य गोळा करावें.

रोमन लोकांचें लष्कर यरूशालेम एथें पोहंचल्यावर त्या शहराच्या आसपास जे सुंदर व रमणीय बाग व वनें होतीं त्यांमध्यें त्यानी आपली छावणी केली आणि तैतस याचा तंबू एका रुंद व सत्तर हात उंच अशा भिंतीवर मारिला, तेथून आर्बस्थान व दूरचा समुद्र यांचा सुंदर देखावा दृष्टीस पडत होता. ह्या भिंतीजवळ शहराची भिंत होती तिजवर वीसवीस हात लांब व स्फटिकासारिखे शुभ्र अशा विशाळ दगडांचे मजबूत आणि सुंदर असे किल्ले बांधिले होते. ह्या किल्ल्यांचे सर्व भाग असे कांहीं सफाईनें जडविले होते कीं, कोणी ह्मणेल ते खडकांतून कोरूनच काढले आहेत, ह्मणून ज्यानी ज्यानी ते पाहिले आहेत ते ते त्याचें आश्चर्य करून फार तारीफ करितात.

सिमन आणि जान यानी तैतस याला ठकविण्याकरितां एक चांगली युक्ति काढिली होती, परंतु ती त्यांच्या इच्छेप्रमाणें बरोबर सिद्धीस गेली नाहीं. त्यानी आप-

सांत मोठें भांडण झालें असें दाखविलें, नंतर जान याचे कित्येक शिपाई पराभव पावल्याप्रमाणें शहरांतून बाहेर पडून रोमन लोकांच्या छावणींत आश्रय मागायास गेले. तैतस हा तेव्हांच समजला कीं, हें आपल्याला दग्याने धरून न्यावयाकरितां सिमन याचें सारें कृत्रीम आहे, याजकरितां त्याने आपल्या फौजेस हुकूम केला कीं, त्यांकडे कोणी लक्ष देऊं नये. तें शहर तैतस याच्या सहज हातीं लागावें ह्मणून ते ढोंगी शिपाई चोरवाट दाखवितों असें त्यांस सांगूं लागले, त्यानी एथपर्यंत ढोंग केलें कीं, शहरच्या तटावर जे त्यांचे यहूदी रखवालीस होते त्यांना ठार मारितों असें दाखवून त्यांवर दगड सुद्धां मारिले. इतकें केलें तथापि तैतस हा अगदीं फसला नाहीं; कित्येक रोमन शिपायांस वाटलें कीं, आपला सरदार असी चांगली संधी दवडितो हा त्याचा अगदीं वेडेपणा आहे; सबब ते त्याचा हुकूम न मानितां, त्या कपटी यहूद्यानी शहरांत प्रवेश करण्याच्या जो चोरमार्ग दाखविला होता तेथें गेले, परंतु त्यांस या आपल्या अविचाराचा लवकरच पश्चात्ताप करावा लागला; कां कीं, ते आपल्या छावणीपासून दूर गेले नाहींत इतक्यांत त्या यहूद्यानी त्यांजवर हल्ला करून त्यांस घेरून टाकिलें, त्यासमयीं ते रोमन शिपाई सर्व मारले गेले, फक्त तीन असामी मात्र जिवंत माघारे आले; ते छावणींत येतांच तैतस याने हुकूम केला कीं, त्यानी सांगितलेलें ऐकिलें नाहीं, सबब त्या तिघांसहि मारून टाकावें; परंतु त्यासमयीं सर्व लष्कराने तैतस यास फारच विनयपूर्वक अर्ज केल्यामुळें त्याने त्यांस क्षमा केली.

आतां त्या शहराच्या वेढ्याचें काम मोठ्या निकरानें चालविलें. तैतस याचा निकेनर ह्मणून एक मित्र होता, त्याला तटावरून कोणी बाण मारून फार घायाळ केलें; त्यावरून तैतस यानें यहूदी लोकांवर अतिशय संतापून लागलाच हुकूम केला कीं, सर्व झाडें तोडून टाकून शहरच्या आसपासचीं घरें जाळून टाकावीं. तटाजवळ उंच उंच बांद होते त्यांवर तीरकमठेवाल्यांस उभें करून जे कोणी दृष्टीस पडतील त्यांस मारावें, असा हुकूम केला. आणि त्या क्षणींच कांहीं चमत्कारिक यंत्रें शोधून काढिलीं, त्यांच्या योगानें त्या शहरांत दगड व शस्त्रें यांची तोफेच्या गोळ्याप्रमाणें मोठ्या वेगानें वृष्टी केली. यहूदी लोकांजवळहि त्या तऱ्हेचीं यंत्रें होतीं, परंतु त्यांना तीं चालवितां येत नव्हतीं. त्यामुळें त्यांपासून कांहींच फायदा झाला नाहीं. रोमन लोकांच्या छावणींतून मोठमोठे दगड आल्यामुळें त्या लोकांचे शूर शूर असे पुष्कळ शिपाई मरण पावले; शेवटीं सिमन आणि ज्यान यानी तटावर पाहारेकरी उभे करून त्यांस सांगितलें कीं, शत्रूनी शहराकडे दगड रोखिला ह्मणजे लागलीच खूण करावी; ते दगड पांढरे व फार मोठे असत ह्मणून त्यांस साफ दिसून येत, तेणेकरून ते लागलेच एका बाजूस होऊन आपला बचाव करीत. त्या यंत्रांच्या योगानें पहिल्यासारिखीं पुष्कळ मनुष्यें मरत नाहींत हें पाहून रोमन लोकांस फार आश्चर्य वाटूं लागलें, पुढें त्यांस असें समजलें कीं, ते दगड पांढरे आहेत ह्मणून जाते वेळीं साफ दिसून येतात, त्यामुळें शत्रूंस आपला बचाव करण्याची संधी सांपडती; मग त्यांस काळा रंग दिल्यावर त्या यहूदी

पाहारेकऱ्यांस ते दिसेनातसे झाले, तेव्हां अर्थात त्यांच्याने कांहीं निशाणी न करविल्यामुळें प्रत्यहि ते लोक पुष्कळ मरूं लागले.

सिमन आणि ज्यान यांस फारच भय वाटून त्या दोघांनीहि लष्करांतील सर्व शिपायांस हुकूम केला कीं, इतकी नासाडी करणारीं जीं भयंकर यंत्रें त्यांवर तुह्मी जाऊन हल्ला करावा; त्याप्रमाणें त्यांनी पुष्कळ मशाली पेटवून रोमन लोकांस जाळण्याकरितां अकस्मात त्या त्यांच्या अंगावर टाकून दिल्या, आणि त्यांच्या यंत्रांवर एकदांच तुटून पडून त्यांतील बहुतेक मोडून टाकिलीं, आणि कांहीं काळपर्यंत शत्रूंचें कांहीं चालूं दिलें नाहीं. त्याप्रसंगीं दोन्ही लष्करांची एकच गर्दी होऊन उभयपक्षांकडील पुष्कळ लोक मरण पावले. बाकी राहिलेलीं यंत्रें जाळून टाकून आपल्या प्रिय नगराचें संरक्षण करण्याकरितां यहूदी लोक अगदीं आपल्या जिवावर उदार होऊन लढले; आणि रोमन लोकहि त्याप्रमाणेंच मोठ्या शौर्यानें लढले. तैतस यानें आपले सर्वांपेक्षां मोठे शूर, असे घोडेस्वार शत्रूंवर चालविले, त्यांतून बारा असामी त्यास अडथळा करूं लागले, ह्मणून त्यानें त्यांस स्वहस्तें ठार मारून टाकिलें. हें पाहून यहूदी लोक भिऊन शहरांत पळून गेले, आणि शत्रूंहीं आंत येऊं नये ह्मणून दरवाजे लावून घेतले.

सर्व लोकांनीं शरण येऊन आपल्या बरोबर सल्ला करावा ह्मणून त्यांस भय घालण्याकरितां जो एक यहूदी सांपडला होता त्यास शहरच्या भिंतीजवळ क्रूसावर चढविला.

ही लढाई झाल्यानंतर लवकरच रोमन लोक त्या शहरच्या सभोंवतालची उंच भिंत घेण्याकरितां प्रयत्न करूं लागले, आणि त्याप्रमाणें ती भिंत त्यांच्या हस्तगत झाल्यावर त्यांस फारच आनंद झाला; परंतु तैतस याला जेव्हां समजलें कीं, त्या शहराच्या सभोंवतीं एकामागें एक अशा मजबूत भिंतीच्या हारी आहेत, तेव्हां त्यांस वाटलें कीं, शहर हस्तगत करण्याचा अझून अर्धा प्रयत्न झाला नाहीं.

आतां ह्या दोन्ही सैन्यांमध्यें एकसारिख्या सारा दिवसभर लढाया होऊं लागल्या ; रात्रीस यहूदी लोकांस तर झोंप येत नसे, दिवस केव्हां उजेडेल आणि शत्रूवर केव्हां हल्ला करूं याची ते मोठ्या उत्कंठेने वाट पाहत. मृत्युचें त्यांस कांहींच भय वाटत नसे; रोमन लोकांस मारावें, किंवा आपण मरावें, इतक्याचीच मात्र त्यांस अपेक्षा होती. तैतस यास मारण्याकरितां ते नेहमी जपलेले असत, कारण त्यांस ठाऊक होतें कीं शहरास असा वेढा घालायास त्याच्या शिवाय दुसऱ्या कोणत्याहि मनुष्याची बुद्धि किंवा धैर्य चालणार नाहीं.

कास्तर नामें एक यहूदी फार चतुर व मोठा धीट होता, त्याने आपल्या जिवावर उदार होऊन तैतस याला मारण्याची एक युक्ती काढिली; त्याने आपले दाहाजण मित्र बरोबर घेऊन तटापुढें येऊन रोमन लोकांस ह्मटलें कीं, सिमन व ज्यान यानी आह्मास फार त्रास दिला आहे, याजकरितां आह्मी तुमच्या स्वाधीन होतों, पाहिजे असल्यास आह्मास बंदीवान करावें, तेव्हां तैतस याने लागलाच हुकूम केला कीं, त्यांचें काय ह्मणणें आहे

तें मी ऐकेपर्यंत त्यांवर यंत्रांतून दगड उडवूं नये. तेव्हां कास्तर व त्याचे मित्र मोठ्यानें ह्मणूं लागले कीं, आमच्या जवळ पुष्कळ पैका आहे, तो जर तैतस स्वतः घ्यावयास येईल आणि आह्मास कांहीं अपाय करणार नाहीं, याविषयींची खातरी करण्याकरितां हातावर हात देईल तर तो सर्व पैका आह्मी तुह्मास देऊं. हें बोलणें संभवण्याजोगें दिसल्यावरून तें बहुतेकांनी कबूल केलें असतें; परंतु तैतस हा मोठा धूर्त होता, त्याला ह्यांत कांहीं संशय येऊन त्याने इनियस नामें एका शिपायास कास्तराबरोबर बोलणें करून पैका घ्यावयाकरितां पाठविलें. तो कांहींसा त्यांच्या जवळ गेला, इतक्यांत त्यांनी तैतस यावर टाकण्याकरितां तयार करविलेली मोठी शिळा याजवर लोटून दिली; परंतु दैवयोगाने हा एका बाजूस झाल्यामुळें त्यांतून बचावला; परंतु दुसरा एक शिपाई याच्या जवळ होता, त्याला ती लागून तो फार घायाळ झाला; नंतर कास्तर व त्याचे मित्र हे ज्या बुरूजावर उभे होते त्यास त्यांनी आग लाविली, तो जळून खालीं पडणार इतक्यांत त्यांनी त्या ज्वाळांतून खालीं एक भुयार होतें त्यांत उड्या टाकिल्या, आणि त्यांतून शहरांत पळून गेले. तैतस आणि त्याचें लष्कर यास वाटलें कीं, कास्तर व त्याचे मित्र यानी ज्वाळांत उड्या घालून आपणास मारून घेतलें ह्मणून त्यांनी त्यांच्या धैर्याची वाहवा केली; अशा शूर लोकांस अशा तऱ्हेचें मरण प्राप्त झाल्यामुळें त्यानां फार वाईट वाटूं लागलें.

हें झाल्यानंतर लवकरच रोमन लष्कराने दुसरी भिंत हस्तगत करून घेतली; आतां त्यांमध्यें व शहरामध्यें का-

यती एकच भिंत बाकी राहिली. यहूदी लोकांस ही फारच दुःखकारक गोष्ट झाली; या समयीं तैतस हा मोठ्या उदारपणानें वर्तूं लागला; त्यानें असा हुकूम केला कीं, जे कोणी बंदिवान असतील त्यांस मारूं नये किंवा त्यांचीं घरेंहि जाळूं नये; कारण त्याला असी आशा उत्पन्न झाली कीं, यहूदी लोकांस तट संभाळवत नाहींत म्हणून ते लवकरच सला करून शहर आपल्या स्वाधीन करतील.

यरूशालेम शहर व तेथील पवित्र देवालय यांचा नाश करूं नये असें तैतस याच्या मनांत फार होतें, यहूदी लोकांचीहि आपल्या शहरावर फार प्रीति होती, व ते आपल्या देवालयाच्या रक्षणाकरितां आपले प्राण देण्यास तयार होते. परंतु ज्यापेक्षां ईश्वराचे मनांतूनच विपरित करावयाचें होतें, त्यापेक्षां तेथें मनुष्याच्या इच्छेचें काय चालणार; दगडावर दगड राहणार नाहीं असा निर्णय चाळीस वर्षांपूर्वींच झाला होता; दोन्ही बाजूंकडून त्यांच्या रक्षणाकरिता पुष्कळ प्रयत्न चालले होते, परंतु ते उलटे ईश्वरेच्छेप्रमाणें पवित्र धर्म पुस्तकांतील भविष्य पूर्ण होण्यास कारण झाले.

त्या हतभाग्य यहूद्यांमध्यें कांहीं काळपर्यंत अन्नाचा दुष्काळ पडल्यामुळें त्यांतून पुष्कळ असामी भुकेनें मरण पावले; व जे कोणी जिवंत राहिले त्यांस क्षुधेपासून इतकी पिडा होऊं लागली कीं ते वारंवार मरणाची अपेक्षा करूं लागले; आपले आप्त मरतात हें पाहून त्यांची त्यांस कांहींच दया आली नाहीं; उलटें त्यांस वाटूं लागलें कीं, असे पुष्कळ लोक मेले असतां थोडकेसे जे कांहीं धान्य

राहिलें आहे तें कांहीं अधिक दिवस पुरेल. असी अवस्था झाली तथापि यहूदी लोक तैतस याला शरण जाईनात, ते असा आग्रह धरूं लागले कीं जरीं आह्मास भयंकर मृत्यु प्राप्त झाला तरी कांहीं चिंता नाहीं, परंतु आह्मी रोमन लोकांचे गुलाम कधींहि होणार नाहीं.

त्या काळीं रोमन लोकांच्या छावणींत जोसीफस नामें एक विद्वान यहूदी होता, त्यानें आपल्या स्वदेशीय लोकांची यरूशालेम शहरास रोमन लोकाहीं वेढा घातला त्या समयीं कसी काय दशा झाली, त्याचा इतिहास लिहून ठेविला आहे. यावर तैतस याची फार कृपा असे ह्मणून त्याने त्यास आपला वकील करून यहूदी लोकांकडे सला करावयास पाठविला; कां कीं, त्यांची असी दुर्दशा पाहून त्यांच्यावर दया करावी, असें त्यास वाटलें. त्याने जोसीफस याजबरोबर असें सांगून पाठविलें कीं, जर यहूद्यानी आपलें शहर आमच्या स्वाधीन केलें तर त्यांचे प्राण वांचतील; परंतु जर कां त्यानी ह्या गोष्टीस विलंब केला तर आमचें लष्कर हातांत तरवार घेऊन यरूशालेम शहरांत प्रवेश करून सर्व लोकांची कत्तल करून टाकील; हें तहाचें बोलणें ऐकून तैतस याचा आभार मानावा तो न मानितां, उलटें त्या लोकांस असें वाटलें कीं, तैतस हा आपणास भिऊन गेला ह्मणून तो तह करावयास इच्छितो. मग ते हंसून जोसीफस याजला अपशब्द बोलूं लागले, तो उभा होता तिकडे दगड उडवून शेवटीं त्यावर भालेहि टाकूं लागले; असे होऊं लागल्यावर तो माघारा परतला, आणि कांहींसा दूर जाऊन त्यांची विनवणी करून मोठ्याने ह्मणाला कीं, "पा-

हा तुह्मी शरण जाऊन आपले प्राण वांचवा, आपला देश वांचवा व आपलें देवालयहि वांचवा ;" नाहीं तर इतक्या सर्वांचा नाश होईल. जोसीफस याने अणखी त्यांस असें सुचविलें कीं, "वनपशूंसहि बरेंच ज्ञान असतें, त्यांस एकादा बळकट शत्रू भेटला असतां ते त्याच्या स्वाधीन होतात." ईश्वराने तुमच्या दुष्टपणासाठीं तुमचा त्याग केला आहे असें दिसतें कां कीं, ह्यापूर्वी एकदा तुह्मी फार पाप केलें होतें, तेणेंकरून ईश्वराने फारच कोपायमान होऊन, तुमचें शहर शत्रूच्या हातांत दिलें होतें, आणि जर ईश्वरच तुह्मावर फिरला आहे, तर तुह्मी जय मिळविण्याची आशा धरून उपयोग नाहीं. जोसीफस याने आपलें भाषण संपवितेवेळीं इतकें ह्मटलें कीं, माझ्या स्वदेशी लोकहो, तुह्मी कदाचित् असें समजत असाल कीं, माझी आई, स्त्री, व कुटुंबहि यरूशालेमांत आहेत, त्यांचे जीव वांचवायाकरितां मी हें इतकें ह्मणत आहें, तर तसें नाहीं, तुमची पक्की खातरी असूं द्या कीं, जर तुह्मी माझ्या उपदेशाप्रमाणें चालत असलेत तर मी तुह्माकरितां मरायास सिद्ध आहें, व माझें कुटुंबहि मेलें तरी कांहीं चिंता नाहीं.

हें जोसीफस याचें भाषण ऐकून पुष्कळ लोकांचे मनांस तह करून रोमन लोकांस जाऊन मिळावें असें होतें; परंतु आतां शहरांतून बाहेर पडणें फार कठीण झालें, कां कीं सिमन व ज्यान यानी तटावर पाहरेकरी उभे करून त्यांस असी ताकीद केली कीं, जे कोणी पळूं लागतील, किंवा ज्याजवर पळण्याचा वहमा येत असेल, त्यांचा बेलाशक शिरछेद करावा, ह्मणून घराबाहेर पाय

ठेवण्यासहि कोणाचा हिय्या होईना. बरें यांतूनहि निभावून जे कोणी आपल्या संरक्षणाकरितां थोडासा पैका घेऊन तैतस याच्या छावणींत जात, त्यांची कांहीं एक दया न जाणतां रोमन लोक त्यांजवळचा सर्व पैका हिरावून घेत, तेणेंकरून त्या गरिबांस जसें शहरांत दुष्काळामुळें दुःख काढावें लागे, तसेंच तेथेंहि काढावें लागे. त्यांस आपला पैका ठेवायास चांगलें ठिकाण नव्हतें, ह्मणून त्यांतून कित्येक जण घरांतून बाहेर पडण्याच्या पूर्वींच आपला पैका गिळून टाकीत. ही बातमी रोमन लोकांस कळल्यानंतर ते ज्या कोणा यहूद्यास आपल्या छावणीकडे भटकतां पाहत, त्याला लागलेंच धरून त्याच्या पोटांत सोनें आहे किंवा नाहीं, हें पाहण्याकरितां त्यांचें पोट चिरीत. आमच्या जवळ कांहीं नाहीं असें त्या बापुड्यानी कितीहि सांगितलें, व जरी तें सत्य असलें तरी त्यांची खातरी होत नसे; ते त्यांचीं पोटें चिरून तसेच तडफडत टाकीत; हा क्रूरपणा जेव्हां तैतस याच्या कानावर गेला, तेव्हां तो होऊं नये ह्मणून त्याने पुष्कळ प्रयत्न केला; असें झाल्यानंतर, रोमन लोकानी त्या यहूद्यांस लुटायाचें किंवा मारायाचें सोडून दिलें.

यासमयीं यरूशालेम एथें या भयंकर दुष्काळामुळें लोकांची जसी दुर्दशा झाली, तसी दुसऱ्या कोठेंहि झाली नसेल; धान्य किंवा भाकर कोठेंच विकत मिळेनासी झाली; शहरांत जिकडे तिकडे दांडगे लोकांचें फारच प्राबल्य झालें; ह्मणून ते लोकांच्या घरांत शिरून खाण्याजोगे जे पदार्थ सांपडत, ते बेधडक घेऊन जात. लपवून

ठेविलेली भाकर किंवा मांस ह्या चोरांचे दृष्टीस पडले तर तें ज्यांनीं लपवून ठेविलें असेल त्यांस ते मोठी शिक्षा करीत ; जर एखाद्या घरांत कांहींच सांपडलें नाहीं, तर ते लोकांवर जुलूम करून कोठें कांहीं दडवून ठेविलें असेल तें त्यांच्याकडून कबूल करवीत.

जर एकादा पुष्ट व टवटवीत मनुष्य यहूदी शिपायाच्या दृष्टीस पडला, तर त्याला कोठून तरी गुप्त रीतीने अन्न मिळतें, असें समजून ते निर्दयपणाने त्याचे हाल हाल करीत; मग त्याने कबूल होऊन अन्न दाखविलें असतां तें एका क्षणांत लुटून नेत. परंतु जर एकादा मनुष्य कृश दिसला, तर ते त्याची चौकसी करीत नसत कारण ते असें समजत कीं, त्याच्या जवळ अन्नाचा संग्रह नाहीं ह्मणून तो असा दिसतो, व तो लवकरच भुकेने मरून जाईल.

अशा समयीं जे कोणी श्रीमंत यहूदी होते त्यांचें फार पाप; कां कीं, चोर त्यांस फारच उपद्रव देत, त्यानी आपल्या घरांत द्रव्य पुरून ठेविलें आहे असें समजून ते त्यांस मारून टाकीत; याजकरितां पुष्कळ मातबर लोकानी आपल्या घरांतील सोने रुपें देऊन जितकें धान्य मिळेल तितकें भरून ठेविलें.

कोणासहि सकाळीं किंवा दोन प्रहरीं बरोबर जेवण मिळत नसे, कदाचित् एखादा घांस मिळालाच तर तो चोरांचे भयास्तव घराचे सर्व दरवाजे व खिडक्या लावून एखाद्या कोपऱ्यांत बसून खावा लागे; धान्य दळून त्याचें पीठ करायास किंवा त्याची भाकर भाजायास कोणासहि सवड सांपडत नसे, कारण, ते इतकी खटपट करूं

लागले असतां ती बातमी चोरांस कळल्याशिवाय राहत नसे.

पुण्यवान लोकांस सुख प्राप्त होतें व पाप्यांस दुःख प्राप्त होतें, ही गोष्ट वारंवार किती पाहण्यांत येती बरें! यहूदी लोक पूर्वीं ईश्वराचे फार आवडते होते, आणि ज्याच्या कृपेमुळें ते फार सुखी होते, व त्यांस कोणाचेंहि भय नव्हतें; परंतु आतां त्यांच्या पापासाठीं व अविश्वासासाठीं, ईश्वर त्यांस विन्मुख झाल्यामुळें, त्यांस जसीं दुःखें प्राप्त झालीं तसीं पृथ्वीचा इतिहास पाहतां दुसरे कोणतेहि लोकांस प्राप्त झालीं नाहींत. परम दयाळू तारणारा जो येशू ख्रिस्त, तो यरूशालेम शहरावर असीं दुःखें येऊन पडणार ह्मणून रडूं लागला; व आतां त्या दुःखाचें वर्णन करूं गेलें असतां सर्व लोकहि रडतील. चोरी, खून, क्षुधा, रोग, द्वेष, बंड हीं सर्व शहरामध्यें चालूं झालीं; आणि अग्नी, कत्तल व लढाई इत्यादिकांपासून उत्पन्न होणारीं जीं सर्व भयें तीं शहराबाहेर चालूं झालीं.

अझूनहि दुष्काळ वाढतच चालला; लोक धडाधड मरूं लागल्यानें त्यांची दया माया तुटून गेली. मुलांनी आपल्या आईबापांस एखादा भाकरीचा तुकडा खातां पाहिला, तर लागलाच त्यानी तो त्यांच्या तोंडांतून हिसकून घेऊन आपण खावा; स्त्रिया वारंवार असें इच्छित कीं, एक तर मुलानी मरावें, किंवा आपल्या तोंडांतील घांस त्यांस देऊन आपण उपासीं मरावें. चोर एखाद्या भाकरीसाठीं अथवा घांसभर अन्नासाठीं देखील लोकांस मोठमोठ्या भयंकर यातना करूं लागले; परंतु गुप्तरूपें संग्रह केलेलें धान्य अगदीं सरून गेल्यामुळें त्यांस कांहीं एक मिळत नसे.

कित्येक फारच कंगाल व क्षुधेनें पीडित असे यहूदी आपल्या जिवावर उदार होऊन, रात्रीच्या समयीं रांगत रांगत शहराबाहेर निघत, आणि रोमन लोकांच्या छावणी नजीकच्या शेतांत जो भाजीपाला उगवत असे, तो काढून आणीत; परंतु चोरांस यांचाहि शोध लागून ते त्या बापुड्यांपासून मोठ्या शरतेने आणलेला भाजीपालाहि हिरावून घेत.

ही बातमी रोमन शिपायांस समजल्यावर ते रात्रीं त्या शहराजवळ लपून राहून जे लोक बाहेर पडत, त्यांस धरून लागलेच क्रूसावर देत; याप्रमाणें एका दिवसांत हजारो यहूदी निर्दयपणाने मारले जात. असें होतां होतां शेवटीं क्रूस करण्याकरितां लांकूड व ते उभे करण्याकरितां जागाहि मिळेनाशी झाली.

तारणारा याला क्रूसावर देते वेळेस जेव्हां पैलेत याने म्हटलें कीं, त्याला उगीच कशासाठीं क्रूसावर देतां, तेव्हां यहूदी लोक मोठ्याने म्हणाले, "याचें रक्त आम्हावर व आमच्या मुलाबाळांवर पडो." बहुधा या समयीं त्यांतील कित्येक लोक यरूशालेम एथें जिवंत असावे, त्यानी हा जो श्राप आपल्यावर ओढून घेतला होता, त्याचीं फळें आतां ते किंवा त्यांचीं मुलें हीं भोगूं लागलीं. जर त्या पापी यहूद्यानी अशा संकटांतहि पश्चात्ताप पावून नम्रता धरली असती, तर त्याना क्षमा झाली असती; कां कीं, येशू ख्रिस्तास क्रूसावर देतेवेळीं त्यास या लोकांची दया येऊन त्याने ईश्वराची प्रार्थना करून मागितलें होतें कीं, "बापा, यांना क्षमा कर, कां कीं, ते काय करीत आहेत तें त्यांस समजत नाहीं;" परंतु

असें दिसतें कीं, ज्या गोष्टीने त्यांस सुख प्राप्त व्हावयाचें त्या त्यांस अगदीं अदृश्य झाल्या होत्या, व शहरभर इतके दुष्ट लोक झाले होते कीं, त्यांत एकहि धार्मीक मनुष्य राहिला नव्हता.

हे लोक दुःखावेगळे होऊन त्यांचें पवित्र देवालय व शहर यांचाहि नाश होऊं नये ह्मणून त्यांस शरण आणण्याकरितां तैतस याने अणखी एक नवी युक्ति योजिली. त्याने कित्येक बंदिवानाचे उजवे हात कापून पुनः लढाईस उभे न राहतील असें करून त्यांस सोडून दिलें, आणि त्यांजबरोबर शहरांत निरोप पाठविला कीं, जर आतां तुह्मी तह न केला तर तुमचा सूड भयंकर रीतीने घेऊं.

यहूदी लोकांचा तर अझून हट्ट जाईना, त्यानी उत्तर पाठविलें कीं, आह्मी मरून जाऊं परंतु कधींहि गुलाम होणार नाहीं; आणि आमचा असा निश्चय आहे कीं तुह्माला हांकून लावूं तरच आमचें जीवित्व.

तैतस याने पुनः एकदां पहिल्यापेक्षां भयंकर लढाई चालविली; परंतु यहूदी लोकानी आजपर्यंत फारच दुःख भोगिलें होतें, त्यामुळें ते आतां आपल्या जिवाविषयीं अगदीं निश्चित होऊन विलक्षण शौर्याने लढूं लागले; आणि जसे आपण आपल्या मित्रांकडे निर्भयपणें जातों त्याप्रमाणें ते आपल्या शत्रूंवर चालून जात आणि रोमन लोकांचे यंत्रांजवळ जाऊन त्यांस आग लावण्याचा प्रयत्न करीत. त्याकाळीं रोमन लोकांस आपलें स्थळ सोडणें ह्मटलें ह्मणजे केवळ मरणप्राय वाटे, याजकरितां आपण भ्याड ठरून मग मारलें जावें, त्यापेक्षां लढाईंत मरावें

हेंच ते पसंत करीत. मग हे लोकहि यहूद्यांप्रमाणें मोठ्या शौर्यानें लढूं लागले असतां, यहूदी आणि रोमन या दोहोंतून एकादा ठार मरे किंवा अगदीं घायाळ होई तोंपर्यंत जागचे हालत नसत. असी मोठ्या निकरानें लढाई चालली असतां फौजेच्या गर्दीमुळें इतकी धूळ उडे कीं, शिपाईलोकांना हा आपल्यांतला आहे किंवा शत्रूंमधला आहे, हें ओळखूं येत नसे, त्यामुळें कोणी कोणास न ओळखतां जो कोणी समोर येई त्यास मारून टाकीत.

आतां त्या शहराची व त्यांतील लोकांची स्थिति विचारायास नको; जसजसी लढाई अधिक निकरानें चालू लागली, तसतसे लोक अगदी घाबरून जाऊन रस्त्यांतून एकहि शब्द कानीं पडेनासा झाला; कां कीं जो तो आपल्याच दुःखांत असे, तेणेंकरून आपल्या शेजाऱ्याची काय अवस्था आहे, याची चौकसी न करितां मुकाट्यानें चालला जाई. घरोघर कुटुंबें, आपल्या खोल्यांत मेलेलीं पडत, त्यांस पुरायास कोणीहि जात नसे; तसींच रस्तोरस्तीं व गल्लोगल्लींहि जिकडे तिकडे प्रेतें पडूं लागलीं; लहान लहान मुलें गिऱ्ह्यासारिखीं अन्नाच्या शोधार्थ व्यर्थ इकडून तिकडे हिंडत आणि क्षुधेनें व्याकूळ होऊन रस्त्यांतच पडत, आणि मरून जात; परंतु त्यांचा कोणीहि शोक करीत नसे. कित्येक लोक, ज्याना वाटे कीं आतां आपण लवकरच मरूं, ते जिवंत असतांच मढ्याच्या पेटींत निजत आणि तींतच मरण पावत, त्याच्या मनांत होतें कीं, कोणाचेहि पोटांत दया उत्पन्न होऊन तो ही आपली पेटी थड्यांत नेऊन ठेवील.

यावरून ईश्वराची आपणावर व आपले कुटुंबावर केवढी

दया आहे यांचा आपण विचार करावा, कां कीं लढाई, महामारी, व दुष्काळ यापासून मनुष्यास काय काय दुःखें होतात तीं आपण कधींहि अनुभविलेलीं नाहींत, त्याचें नुसतें केलेलें वर्णन मात्र वाचितों, प्रतिदिवसीं आपण अन्नवस्त्राकरितां व सर्व सुखाकरितां ईश्वराचे आभार मानितेसमयीं असा विचार करावा कीं, जर ईश्वराने आपला सांभाळ न केला, तर क्षण न लागतां, ह्या हतभाग्य यहूद्यांसारखीच, आपली दशा होईल; कां कीं, ईश्वर मनुष्यांस पापापासून रक्षितो, व त्यांस जें जें कांहीं लागतें तें तें आपल्या औदार्येंकरून पुरवितो.

ह्या दुष्काळामध्यें चोरानी फारच कहर मांडिला, त्यांच्या सारिखी क्रूरता कोणी कधीं कानानी ऐकिली नसेल. त्यानी लोकांचीं घरें फोडून त्यांत जे अजारी असत त्यांस ठार मारावें, व जे नुकतेच मेलेले असत त्यांस जीव आहे किंवा नाहीं हें पाहण्याकरितां त्यांचीं प्रेतें तरवारीने भोसकून टाकावीं; नंतर उचलून नेण्याजोग्या ज्या कांहीं जिनसा हातीं लागत, त्या घेऊन जाव्या, आणि मोठ्याने हांसत हांसत घरांतून बाहेर पडावें. जे कोणी फारच अत्यावस्थ होऊन दुःखांतून सुटावें ह्मणून मरणाची अपेक्षा करीत, त्यांस मात्र ते चोर मारीत नसत; कां कीं तसें केलें तर दया केल्यासारिखें होईल.

जेव्हां आपण अशा मनुष्यांचें वर्णन वाचतों, तेव्हां धर्मपुस्तकांत सांगितल्याप्रमाणें भ्रष्ट झालेल्या मनुष्याचें अंतःकरण किती दुष्ट असतें, हें आपणास स्पष्ट समजतें; आणि जे नियमाने व धर्माने वागतात, त्यांचें अंतःकरण स्वस्थ असून ते किती सुख भोगितात, हेंहि आपणास

समजतें; याजकरितां आपण विचार करून पाहावें कीं, जर या पृथ्वीवर नियम व धर्म हीं नसतीं तर मनुष्याची काय दशा झाली असती.

एका दिवशीं सकाळीं, शेंकडो प्रेतें शहराबाहेर उड-विलेलीं आहेत असें पाहून तैतस यास फार वाईट वाटलें आणि लढाईपासून जे हे इतके अनर्थ होतात, ते केव्हां बंद करीन असी त्यास उत्कंठा लागली.

सिमन याने तर यरूशालेम शहरांत जुलमाची परा-काष्ठा केली; त्याने जीं पुष्कळ अघोर कर्मे केलीं; त्यांत लोकांस अगदीं दुःसह असेंहि एक केलें, तें एथें लिहिलें असतां तो किती दुष्ट होता हें समजेल. माथियस ह्मणून एक यहूदी लोकांचा अत्यंत प्रियकर मुख्य उपाध्याय होता, याच्याच योगाने सिमन हा मोठ्या योग्यतेस चढ-ला; तथापि त्याने याचे उपकार न स्मरून उलटा या-जवर फितुरीचा आळ आणून यास व याचे तिघां पुत्रांस देहांत शासन करावें, असा हुकूम केला. माथिअस यास, आपलीं मुलें आपल्या डोळ्यादेखत मारणार हा विचार सहन न होऊन त्याने सिमन याची प्रार्थना क-रून मागितलें कीं, कृपा करून मला मुलांच्या पूर्वीं मा-रून टाकावें; परंतु ही त्याची प्रार्थना न ऐकतां सिमन याने हुकूम केला कीं, त्या मुलांस बापासमक्ष मारावें; त्याप्रमाणें माथियस यास त्याच्या मुलांच्या मरणकाळींच्या वेदना दाखवून शेवटीं त्यासहि मारून टाकिलें.

जे यहूदी शहरांतून पळून रोमन लोकांच्या स्वाधीन होत, त्यांवर तैतस हा फार ममता करी, कां कीं त्यांचीं दुःखें पाहून त्याला फार दया येई; शहरांत असतां त्या-

नी फार दिवस उपास काढिले होते, ह्मणून त्यांस एथें यथेच्छ अन्न मिळू लागतांच ते इतके खाऊं लागले कीं, त्यांचीं पोटें फुगून ते मरून जात, परंतु त्यांस कोणाच्यानेहि अडथळा करवत नसे.

रोमन लोकानी तिसऱ्या भिंतीचा एक भाग हस्तगत केल्यावर तैतस यास समजलें कीं, जान याच्या हुकुमावरून यहूदी लोकानी त्या जुन्या भिंतीच्या आंत मोठी मजबूद असी एक नवी भिंत बांधिली आहे, त्यावरून त्यास फारच आश्चर्य वाटलें.

रोमन लोकानी इतके दिवस श्रम केल्यामुळें ते अशक्त होऊन त्यांची हिम्मत खचूं लागली; परंतु यहूदी लोकांचें धैर्य कांहीं केल्या कमी होईना, त्यांवर दुःखें पडून पडून ते अधिक अधिक धीट होऊं लागले; त्यांस असें वाटूं लागलें कीं, दुःखें सोसीत राहावें, त्यापेक्षां तीं दूर करण्यांत मरून जावें हें बरें; ह्मणून त्यानी असा निश्चय केला कीं, मरून गेलों तरीं बेहत्तर, परंतु यरूशालेम शहर हातचें जाऊं द्यावयाचें नाहीं. हा त्यांचा निश्चय पाहून तैतस याने आपल्या लष्करापुढें एक मोठें भाषण केलें, त्यांत त्याने सुचविलें कीं, तुह्मी अणखी एकदां हिमत धरून तटावर हला करावा, कां कीं, शिपायास विछान्यांत पडून मरणें ह्मटलें ह्मणजे मोठी लज्जेची गोष्ट आहे, लढाईंत मरून कीर्त्ति मिळवावी हेंच त्यास योग्य होय.

इतकी हुशारी दिली तथापि रोमन लोकानी पहिल्याप्रमाणें पुढें न सरतां यरूशालेम शहरच्या तटावर अतःपर चढूं नये असा बेत केला, परंतु ह्या प्रसंगीं साबिनस ना-

में एका शिपायानें आपलें शौर्य दाखवून तैतस यास अगदीं चकीत करून टाकिलें. हा बाबिनस काळा ठेंगणा, किडकिडीत आणि दिसण्यांत साधारण असा मनुष्य होता, त्याच्या तोंडावरून त्यास कांहीं शौर्य आहे असें कोणाच्याहि लक्षांत येत नव्हतें. हा मनुष्य आपले पलटणींतून बाहेर येऊन तरवार उपसून मोठ्यानें ह्मणाला कीं, मी सर्वांच्या अगोदर जाऊन तटावर चढेन. अणखी तो ह्मणाला कीं, तैतस यासाठीं मी आपल्या जिवाची अगदीं खातर बाळगीत नाहीं. हें पाहून दुसरे अकरा शिपाई त्याच्या मागून निघाले; यहूदी लोकानी वरून बाणांचा वर्षाव चालविला, यास्तव त्यानीं आपल्या डोक्यांस ढाली बांधिल्या; परंतु त्यानी तटावरून शिळा लोटून देऊन त्या सर्वांसहि ठार केलें; त्यांतून बाबिनस मात्र वांचला, त्यानें त्या भिंतीच्या शिखरावर सुखरूप जाऊन ती हस्तगत करून घेतली. यहूद्यांस वाटलें कीं, ह्याच्याबरोबर सारी पाळटण आली असेल ह्मणून ते पळूं लागले; परंतु बाबिनस हा त्यांच्या मागें लागला असतां त्याचा एका दगडावरून पाय सरून मोठा अवाज होऊन तो खालीं पडला; व त्याच्या आंगांतील कवच दगडावर आपटून कडाडलें तें ऐकून यहूदी लोक भयानें मागें पाहूं लागले, तों एकच रोमन त्यांच्या दृष्टीस पडला, तेव्हां ते लागलेच त्यावर तुटून पडले. बाबिनस यानें आपल्या गुडघ्यांवर उभा राहून त्याच्यावर जे दगड व तीर येत त्यांपासून फार वेळ आपलें रक्षण केलें, व जे कोणी पुढें आले त्यांस घायाळ केलें; असी त्यानें आपल्या शौर्याची शर्त करून दाखविली; परंतु शत्रू पुष्कळ

असल्यामुळें याचा यत्न खुंटून याचे तुकडे तुकडे झाले.

दुसरा एक जुलियस नामें मोठा शूर शिपाई होता, त्याचाहि असाच परिणाम झाला; त्याने तर आपल्या हाताने इतके यहूदी मारिले कीं तैतस हाहि त्यांचें बळ व शौर्य पाहून चकीत झाला परंतु रणामध्यें, त्याचा पाय सरून तो खालीं पडला व त्याच्या आंगावरून शत्रूंची गाडी गेली, त्यामुळें व शत्रूंनी फारच नेट केला ह्मणून तो मारला गेला.

या समयीं यरूशालेम एथें रोमन लोकांस ठकविण्याकरितां दुसरी एक नवी युक्ति काढिली ती सिद्धीस जाईल असी कोणासहि आशा नव्हती परंतु ती सिद्धीस गेली. त्या लोकानी एका मोठ्या इमारतींत सुकीं लांकडें, पेंढा, राळ, डांबर व दुसरे अणखी कांहीं लवकर जळतील असे पदार्थ भरून ठेविले; नंतर त्या स्थळाचें रक्षग आपल्याच्याने करवत नाहीं, असें दाखवून तेथून पळूं लागले; हें रोमन लोकांचे दृष्टीस पडतांच त्यांतून कित्येक शूर शिपायी त्या घरास शिड्या लावून खिडक्यांतून आंत गेले. ते आंत शिरतांच यहूद्यानी त्या सुक्या लांकडास आग लावून दिली, त्यांतून ज्वाळा निघून एका क्षणांत त्या घराने पेट घेतला. तेव्हां तेथें जे रोमन होते ते बहुतेक जळून मेले. जे कोणी खिडक्यांतून उड्या टाकीत त्यांस, यहूदी खालीं उभे होतेच ते मारून टाकीत; कित्येकानी तर जळून मरायाचें, नाहीं तर शत्रूंच्या हातीं सांपडून मरायाचें, कोणीकडून तरी मरायाचेंच, हें पाहून आपल्या तरवारीने आपणास मारून घेतलें.

या लोकांतून आरतोरियस नामें एका शिपायाने आ-

पला प्राण मोठ्या युक्तीनें वांचविला, परंतु तो ज्याच्या साह्यानें वांचला त्याचा मात्र प्राण गेला. त्या घरांतून ज्वाळा निघूं लागल्या त्यासमयीं तो एका उंच खिडकीजवळ होता, तेथून पळून जाण्याची अगदीं आशा नव्हती; तेव्हां त्याचा लुशियस ह्मणून एक मित्र खालीं होता, त्यास त्यानें हाक मारून सांगितलें कीं, जर तूं मला जमिनीवर पडूं न देतां वरचेवर झेलसील तर मजजवळ जें कांहीं आहे तें सर्व मी तुला माझ्या मरणकाळीं देईन. लुसियस यानें आपल्यास हा मोठा लाभ होईल असें पाहून त्याला झेलायास लागलेच हात पसरले; नंतर आरतोरियस यानें वरून उडी मारिली, त्याच्या भारानें लुसियस याचा चूराडा होऊन तो मरण पावला, परंतु आरतोरियस यास फारसें न लागतां तो लागलाच उठून उभा राहिला, आणि आपली युक्ति सिद्धीस गेली ह्मणून आनंद करूं लागला.

यरूशालेम शहराची असी दशा झाली कीं, तेथील दुष्ट चोर, ज्यानीं पूर्वीं घरें लुटून लोकांजवळ होतें जें नव्हतें तितकें सर्व धान्य खाऊन टाकिलें, ते आतां स्वतां क्षुधेनें पीडून पिसाळलेल्या कुत्र्याप्रमाणें रस्तोरस्तीं भटकून मद्यप्यासारिखे झोके खात खात लोकांच्या घराजवळ येऊन पडूं लागले. त्यानीं जे लोक मरायाला पडले असत त्यांच्याजवळ येऊन त्यांचें सर्वांग शोधून पाहावें, मनांत होतें कीं, त्यानीं आपल्याजवळ घांसभर तरीं अन्न लपवून ठेविलें असेल तेवढें शोधून खावें; परंतु कांहीं इलाज चालेनासा झाला तेव्हां चामड्याचे जोडे, गवताचे चोथे, मेलेल्या जनावरांचीं रस्त्यांत पडलेलीं धडें व ज्यांस हिंस्र

पशूंहि तोंड लावणार नाहींत असे हिडीस पदार्थ ते खाऊं लागले.

तेथें एक असें अघोर कर्म झालें कीं, तें ऐकून त्या दुष्ट चोरांसहि वाईट वाटलें; तें कर्म एथें लिहावयाचें नव्हतें, परंतु तेणेंकरून यरूशालेमाचा नाश होतेसमयीं तेथील स्त्रिया आपल्या मुलांस शिजवून खातील असें सांगितलेलें भविष्य (विलाप अ० ४. ओ० १०) पूर्ण झालें ह्मणून लिहिलें आहे. एका मेरी नावाच्या स्त्रिच्या खोलींत रांधलेल्या मांसाचा वास येत होता, त्यावरून तिने चोरून अन्न खालें असावें असा त्या चोरांस वहमा आला होता; ह्मणून ते तिचें घर शोधूं लागले तेव्हां त्यांस कांहीं हाडें सांपडलीं, त्याजविषयीं चौकशी करितां ती कबूल झाली कीं, तीं माझे लाहान मुलांचीं आहेत, त्यास मी मारून खाल्ला. हें कृत्य केल्याच्या पूर्वीं आपण मरून जावें याकरितां ती स्त्री वारंवार त्या चोरांस सांगत असे कीं, मला मारून टाका, परंतु त्यानी तिचें ऐकिलें नाहीं. हें अघोर कर्म करावयास ती स्त्री कसी प्रवर्तली असेल तें ईश्वरास ठाऊक. परंतु ही गोष्ट घडण्याच्या पूर्वीं चाळीस वर्षांवर ख्रिस्ताने जें ह्मटलें होतें, त्याचा एथें बरोबर संबंध आहे; त्याला क्रुसावर द्यावयास नेला तेव्हां त्याच्या मागून पुष्कळ स्त्रिया शोक करीत चालत होत्या, त्यांस त्याने ह्मटलें कीं, "यरूशालेम एथील कन्यानों तुह्मी मजकरितां रडूं नका, आपल्या स्वतःकरितां व मुलांकरितां रडा." ह्या स्त्रीने हें भयंकर पाप केलें तें ऐकतांच तैतस याने मोठ्या रागाने ह्मटलें, ज्या शहरांत असा महत अपराध झाला, तें ह्या पृथ्वीवरून एका दिवसांत नाहींसें क-

रून टाकिलें पाहिजे. इतके दिवसपर्यंत त्या शहरास वेढा घातल्यामुळें हे सर्व अनर्थ व दुःखें होऊं लागलीं, ह्मणून त्यांचा शेवट करण्याकरितां तो फारच उतावळा होऊन शेवटीं त्याने मोठ्या दीर्घ प्रयत्नाने तें शहर आपल्या स्वाधीन करून घेतलें.

इतकें झालें असतांहि यरूशालेम एथील शोभिवंत देवालयाचा नाश होऊं नये ह्मणून तो फारच काळजी वाहूं लागला; त्याने शिपायांस असा हुकूम केला कीं जो कोणी त्या देवालयास जाळील किंवा मोडील अथवा त्याचीं कांहीं खराबी करील तो ठार मारला जाईल; मनांत होतें कीं, तें अक्षय राहिलें असतां आपल्या जयाचें स्मरण राहील. धर्मपुस्तकांत दुसऱ्या संख्याच्या साहव्या अध्यायाप्रमाणें दुसरा कोणताहि उत्कृष्ट अध्याय नाहीं, हें सर्वांस ठाऊक आहेच, त्यांत सालोमन याने यरूशालेम एथील देवालय देवास अर्पण केलें, त्याविषयीं लिहिलें आहे. ही गोष्ट, तैतस हा आपलें लष्कर घेऊन यरूशालेम शहरांत येण्याच्या पूर्वीं एक हजार एकशें तीस वर्षांवर झाली तेव्हांपासून एकदां त्या देवालयाचा सैरस बादशाहाच्यावेळीं नाश झाला होता, परंतु तें नीट होऊन तैतस याच्या वेळीं फार सुंदर दिसत होतें; याजकरितां इतकी पुरातन व पवित्र इमारत मोडून टाकणें, हें तैतस याच्या जिवावर आलें. ईश्वराने आपला हुकूम बजाविण्याकरितां तैतस याला निमित्तासाठीं मात्र पुढें केला, जेव्हां ती निश्चित घडी आली, तेव्हां त्या भव्य इमारतीचें रक्षण करण्याचीं कोणाची शक्ति झाली नाहीं.

कांहीं वेळ मोठें तुमुल युद्ध होऊन, रोमन लोक त्या

देवालयाजवळ जाऊन पोहंचल्यावर ते तैतस याचा हुकूम व भय न बाळगितां, तें लुटून त्याचा नाश करावा या हेतूने त्यावर तुटून पडले; त्यांतून एका धीट शिपायाने दुसऱ्या एका शिपायाचे खांद्यावर उभा राहून हातांत जळतें कोलीत होतें त्याने त्या देवालयाची एक सोनेरी खिडकी पेटविली, तिच्या ज्वाळा चोंहीकडे पसरून सर्व देवालयाने पेट घेतला.

यहूदी लोक मोठा कल्होळ करून त्या ज्वाळा विझवाव्या किंवा मरून जावें ह्मणून त्या देवालयाकडे धांवत गेले. हा दुःखकारक परिणाम ऐकून तैतस हा तेथें गेला, याच्या पाठीमागून त्याचें सर्व लष्कर गेलें, तेव्हां त्याने त्यांस उपदेश करून मोठ्याने ओरडून सांगितलें कीं, तुह्मी यहूद्यांस त्यांचे देवालयाचे रक्षण करण्याकरितां साह्य व्हावें; परंतु ते त्याचा हुकूम न ऐकतां मोठ्या आवेशाने त्या पवित्र स्थानीं जाऊन तेथें जे कांहीं त्याच्या हातीं लागलें तें लुटीत व जाळीत सुटले. तैतस याने फारच संतापून एका लिबरेलियस नामक सरदारास हुकूम केला कीं, जे कोणी दांडगाई करतील त्यांस खूब ठोक द्यावा, आणि त्यांस ठार मारून टाकूं असें भय दाखवावें; परंतु तें सर्व निष्फळ झालें, कां कीं त्या ज्वाळा उंच उंच जाऊं लागल्या व ते शिपायी त्यांस अधिक अधिक चेतवूं लागले.

त्या देवालयांत परम पवित्र साधू असतात, व तेथें आचार्यांशिवाय दुसरे कोणासहि जाण्याची परमानगी नसती, व त्यांतील देवाचीं भांडीं व अलंकार हीं फारच सुंदर आहेत, असें तैतस याने पुष्कळ वेळ ऐकिलें होतें;

याकरितां तें देवालय स्वतः जाऊन पाहावें ह्मणून तो निघाला असतां, त्याच्या बरोबर सर्व सरदार लोकहि निघाले; त्यांनी देवळांत पाय ठेवितांच त्याची आरास पाहून ते अगदीं चकीत झाले. जांबळे व सोनेरी रंगाचे पडदे एकीकडेस सारून आंत पाहतात तों मेणबत्त्यांचीं घरें मेज, व खजिने व शिशा इत्यादि सर्व लहान मोठ्या वस्तु भरीव सोन्याच्या केल्या आहेत, असें त्यांच्या दृष्टीस पडलें. तैतस हा मोठें आश्चर्य करून त्या सर्व वस्तु पाहत आहे इतक्यांत आगीच्या ज्वाळा एकदांच आंत आल्या त्यामुळें त्यांस लवकर परत जावें लागलें, त्यांच्या मागें त्या देऊळाची अगदीं राख होऊन गेली.

ह्या आठवायाजोग्या प्रसंगीं दाहा हजार यहूदी मरण पावले; ह्मातारीं मनुष्यें, स्त्रिया, आणि लहान मुलें या सर्वांस निर्दयपणानें मारून टाकिलें; त्यांच्या दुःखाच्या आरोळ्या व आगीची हांकाहांक यांचा शहरांत प्रतिध्वनी निघूं लागला. तेथें लोकांची त्रेधा होऊन नासाडी किती झाली याची कल्पनाहि करितां येत नाहीं. जोसिफस हा त्या वेळीं तेथें होता, त्यानें तें सर्व आपल्या डोळ्यानें पाहिलें, तो असें सांगतो कीं, जिकडे तिकडे मनुष्यांचीं प्रेतें इतकीं पडलीं होतीं कीं, कोठें पाय ठेवायासहि जागा नव्हती; रक्ताचे ओहोळ सर्वत्र इतके वाहत चालले होते कीं, तेणेंकरून त्या ज्वाळाहि विझून गेल्या असत्या. आणि ज्या टेकडीवर तें देवालय बांधलें होतें ती त्या आगीमुळें तप्त होऊन तींतून वाफा निघत होत्या.

अशा कल्होळांत पुष्कळ लोकांनी, वेडे होऊन या दुःखांतून सुटावें ह्मणून, आगींत उड्या टाकिल्या, सिमन

आणि त्याचे मित्र व अणखीहि दुसऱ्या पुष्कळ लोकांनी रोमन आपल्या शहरांतून निघून जात तोंपर्यंत, जमीनीमध्यें भुयारांत व गुहांत दडून राहूं असा निश्चय केला. रोमन लोकांनी हे पळून गेलेले शेंकडो लोक शोधून काढून मारून टाकिले, आणि शेवटीं त्यांस मारतां मारतां जेव्हां कंटाळा आला तेव्हां त्यानी असा ठराव केला कीं, आतां जे सांपडतील त्यांस जिवंत ठेवून गुलामाप्रमाणें विकून टाकावें. या समयीं नेमप्रकरणांतील २८ वे अध्यायाचे ६८ वे ओवींत मुसा याने सांगितलेलें जें भविष्य कीं, "चाकर व चाकरणी होण्यासाठीं तुह्मी आपल्या शत्रूंकडून असे विकले जाल कीं, कोणी विकत घेणारा मिळणार नाहीं" तें घडून आलें.

याप्रमाणें रोमन लोकांनी अकरा लक्ष यहूद्यांस मारून व सत्याण्णव हजारांस बंदिवान करून यरूशालेम एथील वेढा उठविला. महा दुष्ट व घातकी असे जे सिमन आणि जान त्यांनीं जितकें लोकांस दुःख दिलें होतें तितकें ते आतां स्वतः अनुभवूं लागले. ते कांहीं काळपर्यंत शहरामध्यें अंधाऱ्या व गुप्त अशा भुयारांत दडून राहिले होते; परंतु त्यांची अन्न वगैरे सामग्री संपल्यावर ते आपोआप रोमन लोकांचे स्वाधीन झाले.

तैतस याने जान याला जन्मपर्यंत अंधारकोठडींत टाकावा असा हुकूम केला; परंतु ह्या दोघांमध्यें सिमन हा फार क्रूर होता ह्मणून असा हुकूम केला कीं, त्याला आपल्या स्वारीबरोबर रोम एथें घेऊन जावा आणि मग सर्वांस प्रसिद्धपणें दाखवून हाल हाल करून त्याला मारून टाकावा.

जेव्हां तैतस याने यरूशालेम एथील मोठे खंबीर असे तट व उंच उंच बुरूज पाहिले, तेव्हां असें मोठ्या बंदोबस्तीचें शहर आपण जिंकिलें हें पाहून तो विस्मय करूं लागला; आणि जरी त्याला खऱ्या परमेश्वराचें ज्ञान नव्हतें, व त्याचे स्वतःविषयीं व लष्कराविषयीं कथिलेलीं भविष्यें याचें त्याला कांहींच ठाऊक नव्हतें, तथापि एकाएकी त्याच्या मनास विवेक झाला कीं यरूशालेमासारिख्या शहराचा मोड करणें ह्मटलें ह्मणजे शुद्ध अमानुष कृत्य होय; असा विचार करून तो मोठ्याने ओरडून ह्मणाला कीं, "आह्मी ही लढाई ईश्वराच्या साह्यावांचून अगदी शेवटास नेली नसती; त्याच्यावांचून यहूद्यांस अशा मजबूद तटाबाहेर कोणाच्यानेंहि काढून टाकवतेना ; कां कीं असले दुर्घट किल्ले मोडून टाकण्यास मनुष्याचे हात काय करतील!"

तैतस याने तीन उंच तट खेरीज करून बाकीचें सर्व शहर आपल्या इच्छेप्रमाणें जमीनदस्त करायास सांगितलें; ते तट किती अजिंक्य आहेत हें पुढील संततीने पाहावें, ह्मणून ते रक्षून ठेविले. मग फारसा विलंब न लागतां सर्व शहर इतकें धुळीस मिळविलें कीं त्या जागीं शहर होतें असें कोणासहि वाटणार नाहीं. त्या देवालयाखालीं पुष्कळ धन सांपडेल या हेतूने रोमन लष्कराने त्याचा पाया अगदीं खणून काढिला, तेणेंकरून दगडावर दगड असा एकहि राहिला नाहीं. कांहीं काळाने ज्या जागीं पृथ्वींतील उत्कृष्ट इमारत उभी होती त्याच जागीं नांगर फिरूं लागला; याप्रकारें मीखा याचें भविष्य पूर्ण झालें. "याकरितां तुह्मामुळें जीयोन शेताप्रमाणें नांगरिली जाईल

आणि यरूशालेम ढीग होईल, आणि मंदिराचा पर्वत जंगलांतल्या उच्च स्थानांसारिखा होईल." मीखा अ० ३ ओ० १२.

रोमन लोक यरूशालेम एथें येण्याच्या पूर्वी चार वर्षांवर, तें शहर मोठ्या अमदानींत असतां व तेथें अगदी स्वस्थता असतां एक मोठी चमत्कारिक गोष्ट घडली, त्या शहरांत एक मनुष्य अवचित येऊन, "यरूशालेम, हायहाय, यरूशालेम, हायहाय, असे शब्द बोलत गल्लोगल्लीं फिरूं लागला. कोतवाल्याने त्यास मुकें राहावयास सांगितलें तरी तो ऐकेना, रात्रंदिवस दुःखाच्या स्वराने "यरूशालेम, हायहाय," असें ह्मणत रस्त्यांतून धांवत सुटे. शेवटीं त्याला कैद करून मोठी शिक्षा केली, तरी तो आपली चाल सोडीना, उलटा तो पहिल्यापेक्षां मोठ्याने ओरडूं लागला. तेथील कित्येक लोक त्याला नेहमी मारीत, व कित्येक त्याला खावयास घालून त्यावर ममता करीत; परंतु त्याने आपला स्वर न बदलतां सर्वांस एकसारिखे तेच शब्द बोलून दाखवावे. जेथें मोठा समारंभ असे अथवा आनंद चालला असे तेथें अकस्मात "यरूशालेम, हायहाय, यरूशालेम, हायहाय," असे याचे भयंकर शब्द मोठ्याने ऐकू येत.

याप्रमाणें या भविष्यवाद्याने, आपला हा क्रम अगदी थकल्याशिवाय अथवा घसा बसल्याशिवाय, एक सारिखा चार वर्षेपर्यंत चालविला; पुढें रोमन लोक शहर घेण्याकरितां नजीक आले असतांहि त्याने आपलें ह्मणणें सोडिलें नाहीं; शेवटीं लढाई होऊन देवालय घेणार तेव्हां एका उंच तटावर उभा राहून त्याने मोठ्या दुःखाच्या स्वराने सरते शेवटीं ह्मटलें कीं, "हाय हाय, शह-

राचा, लोकांचा, व पवित्र घराचा नाश आणि त्यांबरोबर माझाहि नाश!" असें ह्मणतांच, रोमन लष्करांतून त्याला एक दगड लागून तो लागलाच मरण पावला.

यरूशालेमाच्या लढाईविषयीं, धर्म पुस्तकांत सांगितलेलीं सर्व भविष्यें, बरोबर घडून आलीं हें पाहून जसें आपणास आश्चर्य वाटतें, तसेंच त्या शहराचा मोड झाल्यावर तेथील लोकांच्या दशेविषयीं सांगितलेलीं भविष्यें सारीं घडून आलीं, असें पाहूनहि आपणास आश्चर्य वाटतें. ईश्वराचे श्रापानें ते पृथ्वीवरील सर्व प्रजांत मिसळून जातील, असें सांगितलें त्याप्रमाणें आतां प्रत्यक्ष दृष्टीस पडतें. हल्लीं, ज्यांत यहूदी लोक राहत नाहींत, असा पृथ्वीवर एकहि देश नाहीं; अणखी असें सांगितलें आहे कीं, ते जातिभ्रष्ट आहेत असें समजून लोक त्यांचा तिरस्कार करतील, तसेंच हल्लीं पाहण्यांत येतें; कां कीं, यहूदी ह्मटला ह्मणजे सर्व पृथ्वींत अगदीं तुच्छ नाव आहे. जुलियन हा बादशाह मोठा पराक्रमी होऊन गेला, तो नास्तिक होता, ह्मणून धर्मपुस्तकांतील भविष्य खोटें पाडावें या हेतूने, मोठा प्रयत्न करून यहूदी लोकांस शहरांत एकत्र करूं लागला, परंतु त्याचा प्रयत्न सिद्धीस गेला नाहीं; या पापयुक्त कर्माकरितां निरर्थक तीन वर्षें यत्न करून, शेवटीं, तो मरण पावला; मरते समयीं तो मोठ्याने ओरडून ह्मणाला, "हे येशू, येशू, शेवटीं तुझाच जय झाला!"

बोनापार्त बादशाहानेंहि, यहूदी लोकांस गोळा करण्याचें काम आरंभिलें होतें, परंतु तें असाध्यसें समजून त्यानें तें सोडून दिलें; कां कीं, ईश्वराचें वाक्य कधींहि

फिरत नाहीं. सुमारें दीड हजार वर्षें होऊन गेलीं, यहूदी लोक सर्व पृथ्वीवर भटकत आहेत, त्यांस घरदार किंवा देश कांहीं नाहीं ; जर ते डोळे उघडून आपल्या कल्याणाच्या गोष्टीकडे लक्ष देत नाहींत, तर अझूनहि त्यांस तसेंच जातिभ्रष्ट राहावें लागेल. जर ते येशूला आपला तारणारा मानून, त्याच्या क्रूसापुढें दीनवाणेपणें पश्चात्तापाकरितां पायां पडतील, तर अद्यापिहि त्यांस क्षमा होईल. ईश्वरानें, कृपा करून, आपले प्रिय लोकांचा पुनः अंगीकार करावा, याकरितां सर्व ख्रिस्ती लोकांनी यत्न करीत असावा, व ईश्वराची प्रार्थना करीत असावी. यहूदी लोकांनी जुना करार रक्षून ठेविला, ह्मणून ख्रिस्ती लोकांस त्यांचे फारच आभार मानिले पाहिजेत; या ईश्वराचे आज्ञेवरून लिहिलेल्या करारांत, कदाचित कोणी आपले पदरचें लिहील, ह्मणून त्या लोकांनी त्या करारांतील एकून एक शब्द मोजून ठेविला होता; परंतु इतकें करूनहि, जर ते त्या पुस्तकावर भाव ठेवून त्यांतील सुबोध वाचते, तर ते ज्या तारणाराची इतका काळपर्यंत अपेक्षा करीत आहेत, तो केव्हांच आला असें त्यास समजतें, आणि येशू ख्रिस्ताने जें कांहीं सांगितलें होतें, तें जर मान्य करते, तर ते आजतागाईत जीं दुःखें भोगीत आले तीं न भोगिते.

यरूशालेम शहर जिंकिल्यावर तैतस याने, आपला बाप वेस्पेशियन व आपला भाऊ डुमिशियन यांसहवर्त्तमान, आपल्या जयाची स्वारी रोम शहरांत जसी धामधुमीने नेली, तसी कोणी कधींहि नेली नसेल. या प्रसंगीं लष्करांतील सर्व शिपायांनी, हातांत शस्त्रें न घेतां, व आ-

पला लष्करी पोशाक न करितां, व आतां लढाईचें कांहीं काम नाहीं असें दाखविण्याकरितां, रेशमी पोशाक केला होता, आणि जयाचीं चिन्हें दाखविण्याकरितां हातांत निशाणें घेतलीं होतीं. वेस्पेशियन व त्याचे दोघे पुत्र, जांवळा पोशाक करून हस्तीदंतीं म्यान्यांतून सर्वांच्या पुढें जात होते, व त्यांच्याबरोबर राज्यांतील मुख्यमुख्य अमलदार व सेनेत सभासद चालत चालत होते. शहरांत प्रवेश केल्यावर बादशाहाने आपल्या जयोत्छवासाठीं करविलेला पोशाक चढविला, आणि, शहरांतील सर्व लोकांच्या दृष्टीस पडावें ह्मणून आपणास गल्लोगल्लीं व नाटकगृहांत न्यावयास सांगितलें. याच्या मागून ज्या लोकांच्या हारी चालत होत्या त्या केवळ सोन्याच्या ओहोळासारिख्या दिसत होत्या; या लोकांत लखलखीत निशाणें व जवाहिराचे मुगुट धारण केलेले लोक फारच होते; यहूदी लोकांतून फार उंच व देखणे अशा सातशें लोकांस उंच उंच पोशाक देऊन बरोबर चालविले होते; ज्यानी लढाईंत सांपडलेला खजीना उचलिला होता, त्यांवर सोन्यांचे व जडावाचे अलंकार घातले होते. ह्या स्वारींत फारच सुंदर अशा वस्तु ह्मटल्या ह्मणजे यरूशालेमच्या देवालयांतील सोन्याचें मेज, व त्याच्यामागें चालविलेले सात दिवे व सोन्याचीं मेणबत्याचीं घरें, इतक्या होत्या, ह्या दिव्याचें वर्णन पाहवयाचें असल्यास पवित्र धर्मपुस्तकांत सांपडेल.'

तैतस याने, त्या पवित्र स्थानीं ठेवलेलीं मुसा याचीं पुस्तकें नेलीं हें पाहून जसें त्या बिचाऱ्या यहुद्यांस दुःख झालें तसें दुसऱ्या वस्तु नेल्याने झालें नाहीं. वेस्पेशि-

यन याने तीं पुस्तकें व देवालयांतील मोठे शोभिवंत जा-
बळे पडदे हे आपल्या माहालांत ठेवायास सांगितले.

ह्या स्वारीमध्यें हस्तीदंती व सोनेरी व रूपेरी अशा मोठमोठया उंच इमारती चालविल्या आहेत, असें पाहून रोमन लोकांस फारच आनंद झाला; त्यांतून कित्येक इमारती तीन तीन मजले उंच होत्या, व त्यांत लढाईंत सांपडलेल्या वस्तु ठेविल्या होत्या; आणि कित्येकांत सैन्य पुढें चालत आहे व त्या शहराचा नाश झाला आहे अशा प्रकारचीं चित्रें काढून ठेविलीं होतीं. यांत एक सर्वोत्कृष्ट चित्र होतें, त्यामध्यें देवालय जळत आहे असें दाखविलें होतें. त्याची रचनाहि फारच सुंदर केली होती, आणि त्याच्या शिखरावर यरूशालेम एथील कैद केलेला जुलूमगार, जो सिमन, त्याला बसविला होता, व त्याच्या मानेवर एक जाडा दोर ठेविला होता. स्वारी रस्त्यांतून जातानां, त्याला रोमन लोकानी फार यातना केल्या, आणि शेवटीं, ती मुख्य दैवताच्या देवालयाजवळ पोहंचली, तेव्हां त्यास ठार मारून टाकिलें.

हा जय झाल्यावर, वेस्पेशियन हा लवकरच मरण पावला, तेव्हां तैतस हा सैन्यास व लोकांस फारच प्रिय होता, ह्मणून त्यानी कांहीं विलंब न लावितां मोठ्या आनंदाने त्यास बादशाहा केला. तो मोठया शाहणपणाने राज्यकारभार करूं लागला, तेणेंकरून त्याला हें पद योग्य आहे, असें त्याने लवकरच दाखविलें; आतां, त्याला पाहिजे तसा अखत्यार मिळाला असतां त्याने उनाडकी किंवा ऐषआराम करावयाचा तो न करतां, इंद्रियदमन वगैरे सद्गुणाविषयीं तो फारच दृढतेने यत्न करूं

लागला; तेणेंकरून रोमन लोकांस वाटूं लागलें कीं, जो बादशाह आपलें मन हुकुमांत ठेवायाचें जाणतो, तो शाहाणपणानें आमल चालवील, यांत संशय नाहीं. तैतस यानें कांहींकाळ राज्य चालविल्यावर पुष्कळ उपयोगीं कायदे केले, व दुसरींहि मोठमोठीं कृत्यें केलीं. त्यानें लोकांच्या सुखाकडे फार लक्ष दिलें, तेणेंकरून त्याच्या रयतेनें त्यास "मनुष्य मात्राचा आनंद' असें नाव ठेविलें, व तें त्यास फारच योग्य होतें.

तैतस हा लोकांचें कल्याण करण्याविषयीं इतका उत्सुक असे कीं, एका दिवसीं रात्रीस निजायास जाते वेळीं जेव्हां त्याला स्मरण झालें कीं, आज साऱ्या दिवसांत लोकांच्या उपयोगी असें म्या कांहीं केलें नाहीं, तेव्हां तो दुःखाचा उद्गार काढून ह्मणाला कीं, "म्या एक दिवस निरर्थक घालविला. "ह्याप्रमाणेंच जर सर्व मनुष्यें सकाळपासून आपण काय केलें याविषयीं रात्रीस विचार करतील तर, तैतस यानें एक दिवस निरर्थक गेला हें जसें कबूल केलें, तसें त्यांस किती वेळा कबूल करावें लागेल; यावरून जे कोणी आपलें सर्व आयुष्य निरर्थक घालवितात, त्यांस विचाराअंतीं किती खिन्न व्हावें लागेल; कां कीं या जगांतून दुसऱ्या जगांत जाऊन ईश्वरापासीं प्रत्येक क्षणाचा हिशोब द्यावा लागतो तेव्हां सर्व दिवस फुकट गेले असतां मग कसें होईल.

तैतस यास चाहाड लोक अगदीं आवडत नसत ह्मणून एकदा मनुष्य आपले शेजाऱ्याची चाहाडी, त्याजवळ सांगायास गेला असतां, तो त्यास सर्वांदेखत चाबकानें मारायास सांगे. हा कायदा जर अजूनपर्यंत चा-

लू असता, तर दररोज पुष्कळ लोकांस शिक्षा करावयाची पडती; परंतु अशा चाहाड्या न सांगण्याविषयीं मनुष्यानें केलेले जे नियम त्यांकडे लोक लक्ष देत नाहींत, असें आहे तथापि एफेससकरांस पाठविलेल्या पत्राच्या ४ थ्या अध्यायाच्या ३१ ओवींत, सांगितलेली जी ईश्वराची आज्ञा, कीं, "सर्व कडूपण, व आवेश व राग व बडबड व निंदा, हीं अवघ्या दुष्टपणासुद्धां तुह्मापासून दूर केलीं जावीं, आणि तुह्मी एकमेकांसीं उपकारिक व फार दयाळू असा," ती सर्व लोक मान्य करतील.

आपल्या वर्त्तणुकीविषयीं लोक काय ह्मणतात, याची तैतस हा अगदी काळजी वाहत नसें; आपण उत्तम रीतीनें वर्त्तलों असी आपल्या मनाची खातरी झाली ह्मणजे झालें; एकदां कोणी त्यास सांगितलें, कीं, तुझ्या एका शत्रूनें तुला कांहीं वाईट ह्मटलें, तेव्हां तो गंभीरपणानें इतकेंच ह्मणाला कीं, "ज्यापेक्षां टपका मिळायाजोगतें म्या कांहींच केलें नाहीं, त्यापेक्षां तो कोणी दिला असतां उगीच मी आपलें मन कशाकरितां दुखवूं?" तो मरण पावला त्याच्या कांहीं काळ पूर्वीं असें ह्मणाला होता कीं, सर्व माझ्या आयुष्यांत मजपासून एकच कर्म झालें आहे, त्याचा मात्र मला पश्चात्ताप होतो; परंतु त्याविषयीं त्यानें पुढें कांहीं अधिक ह्मटलें नाहीं, ह्मणून तें कोणतें कर्म हें कोणास समजलें नाहीं. ह्या संसारांत जे मनुष्याचे धर्म ते सर्व जर तैतस याला ठाऊक असते, तर मी कृतकृत्य झालों असें तो आपले मनांत समजता ना. कांकीं, जरी त्यानें पुष्कळ चांगलीं कृत्यें केलीं तथापि त्याच्या हातून कित्येक हत्या व अपराधहि झाले होते, ह्मणून पा-

हिलें असतां त्याला खेद व्हावा; आणि जर त्यानें खऱ्या धर्माविषयीं कांहींतरी ऐकिलें असतें, तर आपल्या अंतःकरणांत बारीक शोध केल्यावर त्याला समजतें कीं, पवित्र ईश्वराच्या डोळ्यापुढें मनुष्याचे प्रत्येक विचार व कल्पना ह्या अगदी वाईट आहेत; आणि आपण आपल्या पुण्यें करून वाचतों असें नाहीं, ईश्वराच्या दयेमुळें ह्मणूनच आपलें सर्व चाललें आहे, नाहीं तर आपला केव्हांच फडशा झाला असता.

तैतस याच्या कारकीर्दींत आग्रिकला याच्या हाताखालच्या लष्कराने ब्रितन देशाचा बहुतेक भाग जिंकिला; ह्या प्रसंगीं त्याने त्या देशाची खराबी अथवा लोकांवर कांहीं जुलूम न करितां, पुष्कळ उपयोगी कळा शिकविल्या, तेणेंकरून त्या बेटांतील रानटी लोक पहिल्यापेक्षां थोडेसें सुधारून रोमन लोकांसारिखे पोशाक करूं लागले; त्यांस घरें, नाटकगृहें, आणि देवालयें बांधायास शिकविलें; रस्ते व तसेच पूल कसे करावे, तेंहि सांगितलें; परंतु आतां तीं सारीं मोडून जाऊन कित्येकांच्या भिंती वगैरे अद्यापहि कोठें कोठें दृष्टीस पडतात.

रोमन लोकांची असी भरभर चालली असतां त्यांस दोन मोठीं भयंकर अरिष्टें प्राप्त झालीं. शहरांत माहामारीचा वाखा उठला तेणेंकरून लोक इतके मरूं लागले कीं, एकाद्या दिवसीं हजार हजार प्रेतें नेऊन गाडावीं लागत, त्यावरून असें दिसूं लागलें कीं, कांहीं काळाने सर्व शहर ओस पडेल. त्याच समयीं तेथें एक भयंकर आग लागली ती एकसारखी तीन दिवस अहोरात्र चालली होती, ती विजविण्याकरितां पुष्कळ यत्न केला परंतु

त्यापासून कांहीं एक फळ न होतां गल्याच्या गल्या व माहालाचे माहाल अगदीं जळून खाक झाले.

कोणी आतां इताली देशांत गेला असतां, नेपल्स संस्थानाजवळ हरकुलेनियम व पांपैयी या नावाच्या दोन नगरांचा तैतस बादशाहाच्या कारकीर्दींत नाश झाला, त्याचा अवशेष दृष्टीस पडेल. हा असा अनर्थ होईल हें तेथील लोकांचे स्वप्नींहि नव्हतें, ते नेहमीप्रमाणें खुशाल आपले काम धंदे करीत होते; इतक्यांत एकाएकींच, त्यांच्या शेजारच्या विजुवियस नामक पर्वतांतून गडगडाटासारिखी गर्जना होऊं लागली; नंतर त्या पर्वताचा शिखर फुटून त्यांतून, वितुळलेल्या शिशासारिखा पातळ रस त्याच्या बाजूवर वाहूं लागला, आणि तेणेंकरून तीं दोन्ही शहरें सर्व लोकांसुद्धां गडप होऊन गेलीं. त्यांतून निघून जाण्याविषयीं पुष्कळ लोकानी प्रयत्न केले, परंतु तो रस चोंहींकडे पसरून हवा फारच उष्ण झाल्यामुळें व पर्वतांतील विस्तवासारिखे लाल झालेले दगड जिकडे तिकडे पडूं लागल्यामुळें ते बहुतेक मरून गेले. सोडम आणि गमोरा या शहरांचा नाश झाल्या दिवसापासून, हरकुलेनियम व पांपैयी या शहरांचा नाश होईपर्यंत, पृथ्वींत असा दुसरा अनर्थ कोठें झाला असें इतिहासांत अढळत नाहीं. या समयीं, मोठा तत्वज्ञानी प्लिनी हा त्या चमत्काराचा शोध करावा या हेतूने त्या पर्वताचे अगदी जवळ गेला असतां, त्याचाहि त्यांत नाश झाला.

हा रस बाहेर निघण्याचें बंद झाल्यावर, हरकुलेनियम आणि पांपैयी हीं त्या राखेंत गरक होऊन अगदीं

अदृश्य झालीं. या गोष्टीस पुष्कळ वर्षें झाल्यामुळें त्या पर्वताचे कोणते बाजूस तीं शहरें होतीं, अथवा असीं शहरें होतीं किंवा नव्हतीं याचीहि भ्रांत पडून गेली.

शेवटीं सन १७१३ यामध्यें, त्या जागीं मनुष्यें कांहीं काम करीत असतां, त्यांस अकस्मात जमीनींत ओंड पुरलेला असा एक पुतळा सांपडला; यावरून ते अधिक शोध करूं लागले असतां, त्यांस हरकुलेनियम शहराचा शोध लागला व त्याचप्रमाणें कांहीं वर्षांनीं पांपैयी शहराचाहि शोध लागला. इतका कालपर्यंत गडून गेलेलीं व ज्याविषयीं कोणास स्मरणहि नव्हतें असीं दोन शहरें ज्या लोकानी जमीनींतून पुनः निघतांना पाहिलीं त्यांस तें मोठें नवल वाटलें असेल. त्यांतील पुष्कळ घरें उभींचीं उभींच होतीं व तेथील लोकांवर हा अनर्थ आला त्या वेळेस ते जसे उभे किंवा बसलेले होते, त्याप्रमाणें त्यांचे हाडांचे पिंजरे राहिले होते; कांहीं पाहारेकरी हातांत शस्त्रें घेऊन पाहारा करीत होते, व एका मनुष्याने हातांत एक पिशवी धरली होती ती सुमारें एक हजार साहाशें वर्षेंपर्यंत तसीच त्याच्या हातीं राहिली होती ह्मणून त्याच्या पिंजऱ्याला "लोभी" असें ह्मणतात. जे लोभी पुरूष, आपलें आयुष्य नुसता पैका संचय करण्यांत घालवितात, व तो चांगले कारणीं लावीत नाहींत, त्यानी ह्या मनुष्याचा हेवा करावा, कां कीं, ह्याने आपली पिशवी इतका कालपर्यंत घट्ट धरली. शहरांतील पुष्कळ लोकांचीं नावें त्याच्या घराच्या दरवाज्यावर स्पष्ट लिहिलेलीं सांपडलीं आहेत, आणि तेथील पुष्कळ सुंदर सुंदर भांडीं विलायतेंत नेलीं आहेत, तीं अझून जशाचीं तसींच

आहेत. तसेंच तेथें हरकुलेनियम शहरांतील लोकांक-रितां, एक हजार साहाशें वर्षांमागें भाजलेली, भाकरहि अझून रक्षून ठेविली आहे. या ठिकाणीं नवे नवे चमत्कारिक व अपूर्व असे पदार्थ वारंवार सांपडतात; रस पडून फार वर्षें झाल्यामुळें तो फारच कठीण झाला आहे, याजकरितां, तो फोडून आंत शोध करण्याकरितां पराकाष्ठेची मेहनत व खर्च लागतो; असें आहे तथापि, त्या ठिकाणीं इतक्या प्राचीन काळच्या लोकांचीं घरें दारें, पोशाक, अलंकार, आणि दुसरे अनेक खाण्याचे पदार्थ, आहेत ते जाऊन पाहणें यासारिखी दुसरी मौज नाहीं.

तैतस याने आपल्या रयतेस मेजवान्या करण्यासाठीं खर्च करण्यांत मागें पुढें पाहिलें नाहीं; एकदां शुद्ध लोकांच्या हौसेकरितां एकसारिखे शंभर दिवस नाच रंग तमासे करविले; पुनः एकदां त्याने एका मोठ्या रंगशाळेमध्यें पांच हजार जंगली पशूंचीं लढाई लावविली; तसेंच, याच्या कारकीर्दींत पुष्कळ पेहलवान कुस्त्या करून मरण पावले.

तैतस याने आपल्या प्रजेंतून कोणासहि अपराधी ठरविलें नाहीं; एकदां रोम शहरांतील दोघा थोर गृहस्थानीं याला मारायाचा कट रचिला होता, तो याला समजल्यावर याने त्या घातक्यांस क्षमा केली, इतकेंच नाहीं, तर त्यास आपल्या बरोबर नाटकगृहांत नेऊन त्याच्या हातांत तरवारी देऊन आपल्या दोहों बाजूस दोघांस बसविलें. त्याचा भाऊ डुमिशियन हाहि त्या कटांत सामील आहे असा त्याजवर वहमा आला होता; परंतु तैतस याला त्याची दया येऊन त्याने त्यास क्षमा केली. कित्येक

असें सांगतात कीं, त्याजवर बादशाहाने इतकी दया केली, ह्मणून त्याला पुढें पस्तवावें लागलें असेल, कां कीं तो मरण पावल्यावर पुष्कळ लोकांस त्याच्या कृतघ्न भावाविषयीं असा संशय येत होता कीं, त्याला सिंहासनारूढ होण्याची फारच उत्सुकता आहे, ह्मणून त्यानेच बादशाहास विषप्रयोग केला असावा. अस्तु डुमिशियन यावर त्याचा पुरावा झाला नाहीं, ह्मणून त्याविषयीं कोणाचीहि पक्की खातरी झाली नाहीं, त्याच्या दुष्ट स्वभावावरून मात्र तें खरेंसें वाटतें.

याप्रमाणें मोठी कीर्त्ति चालली असतां, व लोकांवर उपकार करीत असतां, अकस्मात तैतस हा आपल्या वयाच्या एकेचाळीसाव्या वर्षीं मरण पावला, त्यावेळीं रोमन लोकांस फारच दुःख झालें, कां कीं ज्याने नुसत्या दोन वर्षांच्या कारकीर्दींत बाहेरील सर्व शत्रू जिंकून त्यांस त्यांच्या शहरांत अगदीं सुखी केलें होतें असा जो त्याचा प्रियकर व बहुमान्य बादशाह तो अणखी पुष्कळ वर्षें राज्य करील असी त्यांची आशा होती.

---



# डुमिशियन, रोम एथील बारावा बादशाहा.

[इ० स० ८१ पासून इ० स० ९६ पर्यंत.]

रोमन लोकांस तैतस याच्या मरण समयीं फार दुःख झालें इतकेंच नाहीं, परंतु ते त्याच्या पाठीमागेंहि त्याची आठवण करून शोक करूं लागले; कां कीं त्याचा भाऊ जो डुमिशियन, तो त्याच्या गादीवर बसला, तो दुष्ट व मूर्ख होता ह्मणून तो लोकांस फारच उपद्रव देऊं लागला. डुमिशियन यास वाटलें होतें कीं कसेंहि करून आपला भाऊ तैतस हा नाहींसा झाला ह्मणजे मग आपणास त्यासारिखे थोर व्हावयास उशीर नाहीं; ह्मणून जेव्हां तो रोम एथील बादशाह होऊन सीसर याचा सुंदर माहाल त्याच्या स्वाधीन झाला, तेव्हां तो आपला हलकेपणा अगदीं विसरून गेला.

जेव्हां एकाद्या थोर मनुष्याविषयीं आपण कांहीं ऐकतों तेव्हां आपणास वाटतें कीं, त्या मनुष्याजवळ पु-

ष्कळ दौलत असेल, त्याला मोठमोठे मान मरातब असतील, चांगले चांगले माहाल, व उंच उंच पोशाक वगैरे सर्व कांहीं असेल; परंतु जरी इतक्या सर्व वस्तु त्याला असल्या तरी तो वास्तविक थोर आहे, असें ह्मणवत नाहीं कां कीं या वस्तु नसल्या आणि तो स्वभावाने भला व सज्जन असला, तरीहि तो वास्तविक थोर होतो. इहलोकीं थोर होण्याकरितां मनुष्याला जितकें ऐश्वर्य व दौलत असावी, तितकीहि डुमिशियन याजवळ होती, परंतु तो इतका हलका व दुष्ट होता कीं, त्याला जों जों अधिक अखत्यार मिळूं लागला, तों तों लोक त्याचा अधिकाधिक तिरस्कार करूं लागले.

तैतस याला अध्ययन करण्याची व विद्वान लोकांचा समागम करण्याची फार आवड होती, आणि डुमिशियन याला सारादिवस मौज करावी, व आपला सारा वेळ उनाडकींत घालवावा, असें वाटत असे. याला जुगार खेळण्याची व धनुष्यबाणाने पारध करण्याची फारच आवड असे. ही त्याची पारध करण्याची रीति फार क्रूर होती; तो आपल्या दासांस हात वर करून दूर उभें राहावयास सांगे, आणि त्यांच्या बोटांवर बाण सोडी, ते जाऊन त्यांच्या बोटास रुतत, आणि तेणेंकरून त्यांस फार वेदना होत.

सर्व लोक आपला तिरस्कार करितात असें डुमिशियन याला समजलें, तेणेंकरून त्याच्या जिवास समाधान नाहींसें होऊन आपल्याला कोणी तरी मारून टाकितील, असी त्यास निरंतर धास्ती सुटली. या काळजीने रात्रीस त्याला अगदीं झोंप येत नसे आणि कदाचित् आपले

चाकर कट करून आपणास मारून टाकतील, या भयानें तो कधीं कधीं रात्रीस आपल्या बिछान्यांतून घाबरून उठे.

रात्रीस कोणी मारायाला आलाच तर त्यास सांपडूं नये, ह्मणून तो, आपल्या माहालाच्या गुप्त कोनांत जाऊन निजे; त्याच्या दिवसास बसायाच्या खोलींत सर्व बाजूंस आरसे लाविले होते; कारण, त्याला असें वाटत असे कीं, आपल्यास मारायास जरी कोणी पाठी मागून आला, तरी तो आरशांत दिसेल ह्मणजे मग आपणास लागलेंच सावध होतां येईल.

जर डुमिशियन याच्या ठायीं, सुजनपणा व भलेपणा असता तर तो तेणेंकरून किती सुखी झाला असता; परंतु ज्यास आपल्या दुष्ट वासनेंतच मौज वाटती ते इहलोकींच्या व परलोकींच्याहि सुखास अंतरतात; कारण धर्मपुस्तकांत असें सांगितलें आहे कीं, "दुष्टांला कांहीं स्वास्थ्य नाहीं असें माझा देव ह्मणतो." यशाया. अ० ५७ ओ० २१.

लोकांचीं दुःखें व यातना पाहून डुमिशियन यास फारच मौज वाटे; त्यानें असा एक नियम करून ठेविला होता कीं, कोणास ठार मारायाचें असलें ह्मणजे आपण तेथें जाऊन मुख्यस्थानीं बसावें. मग त्या बापुड्यांच्या प्राण जाते वेळींच्या यातना पाहून, तो दुष्ट आपल्या लालबुंद तोंडानें व भयंकर डोळ्यानें अशा समयीं जो संतोष दाखवी, तो सांगूं लागलें तर आंगीं रोमांच उभे राहतात.

डुमिशियन हा बाहेरून लोकांस मोठमोठ्या मेजवा-

न्या करी, परंतु त्याचीं अंतरंग कृत्यें इतकीं मूर्खपणाचीं व हलकीं असत कीं, तीं सांगतां पुरवत नाहींत. कधीं कधीं तो आपला सारा दिवस माशा धरून त्यांस टाचण्यास रोवून ठेवण्यांत घालवी, मग बादशाह एकलाच आहे काय, असें कोणी त्याच्या चाकरांस विचारिलें असतां, त्यानी उत्तर करावें कीं, होय एकलाच आहे, त्याच्याजवळ एक माशीहि नाहीं.

आपल्या अखत्यारांतल्या लोकांस भिववावें, यासारिखी डुमिशियन याला दुसऱ्या कशांतहि मौज वाटत नसे; त्याने एका दिवशीं आपल्या एथें सर्व सेनेट सभेने मेजवानीस यावें असें आमंत्रण करविलें; सर्व गृहस्थ जमल्यावर, त्यांस भोजनास न्यावयाचें तें न नेतां, बादशाहाच्या पाहेरकऱ्यानी त्यांस एकाएकींच एका मोठ्या आंधारे कोठडींत घातलें; तेथें भिंतीला सर्व काळें कापड लाविलें होतें, आणि ज्या कांहीं जिनसा ठेविल्या होत्या, त्या भयंकर दिसाव्या, ह्मणून तेथें थोडकेच दिवे लाविले होते. त्या भयंकर कोठडींत जाऊन आसपास पाहतात, तों तेथें मुडदे ठेवायाच्या पेट्या उघड्या करून एका हारीने ठेविल्या आहेत, व त्या दरएक पेटीवर प्रत्येक सभासदाचें नांव चांगल्या सुढाळ अक्षरानी लिहिलें आहे, असें जेव्हां त्यांच्या दृष्टीस पडलें, तेव्हां ते अगदीं घाबरून गेले. ते तर त्याक्षणींच आपल्या जिवाची आशा सोडून पुढें काय होतें, तें पाहावें ह्मणून तटस्थ उभे राहिले, इतक्यांत तोंडास मस लावून व हातांत पेटविलेल्या चुडी व नागव्या तरवारी घेऊन पुष्कळ लोक धडकून आंत शिरले, व त्या भ्यालेल्या सभासदांभोवतीं नाचूं लागले.

आतां आपण मेले जाऊं असी ते धास्ती करिताहेत, इतक्यांत त्या भयंकर खोलीचे दरवाजे उघडून त्या सर्वांस घरीं जाऊं दिलें, तेव्हां त्यांचे जिवांत जीव येऊन, त्यांस मोठें आश्चर्य वाटलें. काय चमत्कारीक थट्टा करण्याचा प्रकार हा!

डुमिशियन याने त्या काळच्या ख्रिस्ती लोकांची पाठ पुरवून त्यांस निर्दयपणाने ठार मारिलें, कां कीं, दावीदाचा वंशज सर्व पृथ्वीचें राज्य करील, हें भविष्य त्याने ऐकिलें होतें, ह्मणून त्यास धास्ती वाटत होती कीं, कदाचित् तसें खरेंच घडून येईल. येशू ख्रिस्त सर्वांचे मनांत राज्य करील ही गोष्ट सर्वांच्या लक्षांत असेलच; कारण त्याने असें ह्मटलें आहे कीं, माझें राज्य इहलोकींचें नाहीं. डुमिशियन हा फार द्वेषी होता; ख्रिस्ती लोक, उपदेश करून दिवसानुदिवस आपली संख्या वाढवूं लागले, हें पाहून त्याला मोठी धास्ती लागली; ह्मणून बनून आलें असतां त्या सर्वांस ठार मारून नाहींसें करून टाकावें, असा त्याने निश्चय केला.

पहिल्याने त्याने ख्रिस्ती भक्त योहान्न, यास मारण्याची तजविज केली, परंतु ती सिद्धीस गेली नाहीं; सबब त्यास देशपार करून पातमस नामें एका एकांत बेटांत जाऊन राहावयाचा हुकूम केला, तेथें कांहीं वर्षें राहिल्यावर त्यास प्रगटविण्याचे दृष्टांत झाले. नंतर जूड ह्मणून एक प्रेषीत होता, त्याचे दोघे नातू आपल्या राज्यांत आहेत, असें डुमिशियन यास समजलें, तेव्हां त्याने त्यांस त्या क्षणींच बोलावून आणिलें; परंतु ते अगदीं गरीब आहेत व दुसऱ्यास उपद्रव न करितां स्वहस्तें मेहनत करून

आपला निर्वाह करितात, ह्मणून अशा दीन लोकांपासून राज्यास कांहीं भय नाहीं असें जाणून त्याने त्यांस सोडून दिलें. थोडक्याच ख्रिस्ती लोकांस त्याने क्षमा केली; शेंकडो जणास ते आपला धर्म सोडीत नाहींत, याच कारणावरून ठार मारिलें.

या एकनिष्ट मनुष्यांस त्याने फारच हालहाल करून मारिलें; कित्येकांस जंगली पशूंच्या कातड्यांत शिवून कुत्र्यांजवळून फाडून खावविलें; दुसऱ्या कित्येकांस क्रुसावर देवविलें; अणखी कोणी असें सांगतात कीं, त्याने पुष्कळांच्या आंगास मेण लावून त्यांस मेणबत्यांसारिखें उभें करून डोकीकडून पेटवून त्यांचा प्राण जाईपर्यंत तसेंच जळत उभें ठेविलें. ह्या सज्जन लोकानी आपल्या पवित्र धर्मासाठीं काय काय दुःखें सोसिलीं हें जेव्हां आपण वाचतों, तेव्हां ज्यांस प्रति दिवसीं निर्भयपणें व स्वस्थ चित्ताने ईश्वराची भक्ति करायास मिळतें, त्यानी त्याचें किती आभारी झालें पाहिजे हें आपल्यास समजतें; प्राचीन काळच्या ख्रिस्ती लोकानी तशा भयंकर काळांत आपले जीव संकटांत घालून ख्रिस्ती धर्म सांगण्यास सांडिलें नाहीं, तर मग या सांप्रतकाळींच्या लोकानी असा हा चांगला काळ व्यर्थ घालविणें हें किती अघटित आहे बरें.

शेवटीं, डुमिशियनसारिख्या राक्षसापासून पृथ्वीला सोडवावी असी ईश्वरी इच्छा झाली. बादशाहाने आपल्या कित्येक चाकरांस मारण्याचा ठराव करून त्यांचीं नावें ज्या कागदावर लिहिलीं होतीं तो, अकस्मात त्यांच्या हातीं लागला, त्यावरून त्यानी आपला वध होण्याचे ठरविल्या दिवसा पूर्वीच बादशाहाला मारून टाकावें,

असा कट केला; त्याप्रमाणें स्तिफेनस ह्मणून बादशाहाचा एक रखवालदार होता, त्याने त्यास वाचायास एक पत्र आणिलें; तें तो वाचूं लागला, इतक्यांत त्या मनुष्याने त्याला आपली कटार भोसकली, परंतु डुमिशियन हा मोठा बळकट होता, ह्मणून त्या दोघांचें फार वेळ युद्ध होऊन शेवटीं स्तिफेनस याने त्यास ठार मारून टाकिलें.

रोमन लोकानीं डुमिशियन याच्या मृत्युची जेव्हां बातमी ऐकिली, तेव्हां त्यांस जो आनंद झाला, तो सांगतां येत नाहीं; लोक त्याचा किती तिरस्कार करीत होते, हें दाखविण्याकरितां त्यानी त्याचें नाव सर्व दप्तरांतून छेदून टाकिलें; आणि त्याचे सोन्याचे केलेले भरीव पुतळे जागोजाग उभे केले होते, ते फोडून टाकिले.

इतिहासांत ज्यांना बारा सीसर असें ह्मटलें आहे, त्यांतील शेवटले जे तैतस आणि डुमिशियन, त्या दोघांचेहि पोटीं संतान नव्हतें.



## नरवा, रोम एथील तेरावा बादशाह.

[इ० स० ९६ पासून ९८ पर्यंत.]

नंतर रोमन लोकानी एका परक्या स्पानियर्ड गृहस्थास बादशाह नेमिला, हा गृहस्थ फार भला व शाहणा होता ह्मणूनच त्यांची यावर इतकी प्रीति बसली. नरवा याची कारकिर्द परोपकार आणि न्याय याविषयीं प्रसिद्ध आहे; ती मागील बादशाह डुमिशियन याच्या कारकीर्दीसीं ताडून पाहिली तर, डुमिशियन याचा क्रूरपणा उघड दिसतो, ह्या बादशाहाने गादीवर बसल्यानंतर शपथ घेतली, कीं कोणताहि सेनेतर यास ठार मारण्याची शिक्षा जरी योग्य असली तथापि त्याला ती होणार नाहीं हें वचन त्याने फार विश्वासाने पाळिलें; एका समयीं त्यांतून दोघा गृहस्थानी त्याला ठार मारण्याची मसलत केली ती त्याला समजली; तेव्हां त्याने त्यांस सांगितलें कीं तुमची मसलत उघडकीस आली, आणि त्यांस ना-

टकगृहांत नेऊन सर्वांदेखत त्यांतून प्रत्येकास एकएक कटार दिली, आणि ह्मटलें कीं तुमच्या मनांत मला मारायाचें असलें तर बेधडक मारा अनमान करूं नका.

नरवा हा चांगल्या मनुष्यांवर ममता करी ह्मणून दुष्ट लोक त्याचा तिरस्कार करीत असत; परंतु त्याला मारण्याच्या मसलतींत जे असत त्यांला मात्र तो देशपार करीत असे. एक त्याचा द्वेषी होता त्याला त्याने कोतवालीची जागा दिली. जेव्हा रोम एथील फौज बेकैद झाली आणि त्याच्याने तिचा बंदोबस्त होईना तेव्हां त्याने असा विचार केला कीं आपल्या या अशा उत्तर वयांत कोणी तरी गादीचा मालककरून ठेवावा ही मोठी शाहणपणाची गोष्ट होय. त्याने आपल्या सोयऱ्यांतून कोणास तरी अधिकारी करावें तें तसें न करितां त्रेजन नामक एका परक्याच मनुष्यास पसंत केलें. हा त्रेजन, धैर्य, शाहणपण आणि न्याय यांविषयीं मोठा नामांकित असे; अणखी हा प्लुतार्क याचा शिष्य, ह्मणून लोक यास फार मोठा असें मानीत असत. त्याप्रसंगीं प्लुतार्क त्यास असें ह्मणाला कीं, "त्वां खुशामत न करितां आपल्या योग्यतेने राज्य मिळविलें, ह्मणून तुझ्या सद्गुणाची आणि माझ्या भाग्याची धन्य असो. आतां तूं आपल्या योग्यतेप्रमाणेंच जर राज्य कारभार चालविलास तर मला फार संतोष होईल. परंतु एवढा मोठा अधिकार प्राप्त झाल्यामुळें जर तूं बिघडलास, तर त्यापासून तुझा नाश होईल, आणि 'शिष्याच्या अपराधासाठीं गुरूस दंड' या ह्मणीप्रमाणें तुझ्या त्या वर्त्तणुकेपासून माझी अपकीर्त्ति मात्र होईल. नीरो याच्या अघोर पातकामुळें सिनिका यास

बट्टा लागला, आणि सोक्रोतीस याच्या शिष्याच्या दुराचरणाविषयींचा टपका त्याचाहि नशीबीचा चुकला नाहीं; मग तूं आतां आहेस तसाच पुढेंहि चाललास तर सर्व लोकांमध्यें मला मान मिळणें हें तुझ्या हातीं आहे." या लहानशा भाषणामध्यें शहाणपणाचा उपदेश असून तें कांहीं खुशामतीसारिखेंहि आहे. हें त्याचें ह्मणणें बहुत करून सुफळ झालें, कसें तर एथें इतके बादशाह झाले, परंतु त्यांमध्यें त्रेजन हा सर्वोत्कृष्ट बादशाह होऊन गेला असें सर्व लोकांच्या तोंडी राहिलें, आणि त्यावरून त्याच्या पाठीमागे कांहीं काळपर्यंत एक ह्मणहि पडून गेली होती; कोणी एकादा नवा बादशाह गादीवर बसूं लागला ह्मणजे, "आगस्तस यासारिखा दैववान् आणि त्रेजन यासारिखा सुजन असो," असें रोमन लोक ह्मणत असत.

खऱ्या धर्माच्या ज्ञानावांचून दैवतपुजकास जितके सद्गुण आणि ज्ञान संपादन करवेल तितकें त्रेजन याच्या ठायीं होतें खरें; तथापि ज्याला धर्मपुस्तकांतील उपदेश नाहीं, त्याच्या आंगीं पुष्कळ दुर्गुण राहतात, हें आपण इतिहासावरून पाहातों.

त्रेजन हा फार लोभी व गर्विष्ट होता, व त्याच्या ठायीं अणखीहि कित्येक दुर्गुण होते, त्यांच्या योगाने त्याची मोठी बुद्धि, आणि चांगली राजनीति याचें तेज कमी झालें; तथापि याच्या पूर्वीं जे जुलमी बादशाह झाले त्याच्यासीं, याची तुलना करून पाहिली तर याचे गुण फार आश्चर्य करण्याजोगे आणि वाखाणायाजोगे होते.

नरवा याच्या मागें त्रेजन हा बादशाह होणार असें जेव्हां जाहीर झालें तेव्हां सर्व लोकांस जो आनंद झाला

तो सांगतांहि येत नाहीं. त्रेजन याच्या संतोषार्थ नरवा जिवंत होता तोंपर्यंत त्याचा हुकूम ते अधिक आवडीने मानूं लागले. त्रेजन हा आपल्या हितकर्त्यास त्याच्या योग्यतेप्रमाणें मान देऊं लागला, तेणेंकरून नरवा याने आपल्या बाकी राहिलेल्या काळांत राज्य फार स्वस्थतेने व निर्विघ्नपणें चालविलें. शेवटीं एका राजसभासदाने कांहीं अयोग्य आचरण केल्यावरून यास फार राग आला; आणि त्या क्षोभाने त्यास फार ज्वर येऊन तो मरण पावला. यासमयीं त्रेजन हा जर्मनी देशांत स्वारांवर मुख्य होता, लोकानी त्यास बोलावून आणून मोठ्या उत्साहाने राज्याभिषेक केला.



# त्रेजन, रोमचा चौदावा बादशाह.

[इ० स० ९८ पासून इ० स० ११७ पर्यंत.]

त्रेजन् हा बादशाह झाला तेव्हां तो रोम शहरांत परत आला, आणि आपल्या पूर्वींचे कित्येक राजे जसे एकाद्या विजयी पुरुषासारिखे आपल्या राजधानींत मोठ्या उत्साहाने प्रवेश करीत, तसें न करितां आपण अधिकारी लोकांच्या समागमें शहरांत पायानी चालत गेला; त्यासमयीं त्याच्या मागून त्याचें सर्व लष्कर हारींनी चालत होतें; त्या सैन्याने रस्त्यांतून जात असतां लोकांवर कांहीं जुलूम किंवा दुसरा कोणताहि दंगा केला नाहीं, यावरून त्रेजन् याने त्यास फारच बंदोबस्ताने राखिलें आहे असें दिसून आलें.

हा नवा बादशाह शरीराने उंच व देखणा असा होता, त्याचा चेहरा भव्य दिसे, व त्याची ढब सत्ताधारी मनुष्यासारिखी होती. मागें नीरो यास त्याचा गुरु

सिनिका याने जो उपदेश केला तो जरी निष्फळ झाला, तथापि महान् तत्वज्ञानी जो प्लुतार्क याने त्रेजन् यास जो उपदेश केला तो बहुतकरून सफळ झाला; याचें कारण तो अधिक चातुर्यानें वर्तला हें असो, किंवा त्याचा शिष्य सद्गुण शिकण्याविषयीं सुपात्र होता हें असो. प्लुतार्क हा आपल्या शिष्याविषयीं जो अभिमान बाळगी, तो यथायोग्य असे, कारण कीं, त्रेजन् याने आपल्या गुरूचा उपदेश अनेक प्रसंगीं ध्यानांत ठेविला होता, असें पाहण्यांत येतें.

प्लुतार्क हा त्रेजन् यास पाठविलेल्या एका पत्राच्या शेवटीं असें लिहितो कीं, "जर तूं आपलें मन स्वाधीन ठेवीत आहेस, आणि जर तुझें आचरण शुद्ध आहे, तर मनुष्यमात्रांमध्यें मान्य होणें तुझ्या स्वाधीनचें आहे." अणखी तो ह्मणतो कीं, "जर तूं माझ्या उपदेशाप्रमाणें चालत असशील, तर तो उपदेश केल्याचें सार्थक होईल, आणि जर त्याचा अनादर करीत असशील, तर निदान प्लुतार्क याच्या मसलतीनें तूं अन्यथा वागतोस असें नाहीं, तर स्वेच्छेने वागतोस, हें ऐकून तरी मला समाधान होईल."

यावरून तुह्मी पाहा कीं, दैवतपूजक चांगलें ह्मणून जें कांहीं करीत, तें इतर मनुष्यापासून मान मिळावा या हेतूनें मात्र करीत असत; ते ईश्वराकडे दृष्टी देत नसत. बाहेरील वर्तणूक कितीहि आदरशीलतेची असो, तथापि अंतःकरणांतील विचार, व गर्व, आणि ढोंग, हीं जो जाणतो, अशा न्यायी व पवित्र ईश्वराविषयीं त्यांस ज्ञान नव्हतें. पवित्र धर्मपुस्तकावरून आपणास असें कळतें

कीं, प्रथम आपल्यास आपलें अंतःकरण त्याच्या दृष्टीनें शुद्ध आहे, असें करण्याविषयीं यत्न करणें आवश्यक आहे; "जगाची मैत्री ही देवाचें वैर आहे," याकोब अ० ४ ओ० ४; "जेव्हां सर्व माणसें तुह्मास चांगलें ह्मणतील तेव्हां तुह्मास हाय हाय," लूकास अ० ६ ओ० २६. आणि आपला तारणारा स्वतः असें ह्मणतो कीं, "मला माणसाच्या गौरवाची गरज आहे असें नाहीं," योहान्न अ० ५ ओ० ४१.

त्रेजन् यानें पुष्कळ उपयोगी कायदे करून कारभाराकडेहि फार लक्ष दिलें होतें, ह्मणून रोमन लोक त्याच्या गुणाचें आश्चर्य करून त्याच्या सदाचरणाचा स्तव करूं लागले. तो आपल्या शत्रूसीं दयेनें वागत असे आणि जे दयेस पात्र असत त्यासीं उदार असे, व ख्याली खुशाली करणें ती फार सावधगीरीनें करीत असे. एका प्रसंगीं तुंबळ युद्ध झालें, त्या वेळीं त्याच्या शिपायांच्या जखमा बांधावयास फडकें नव्हतें, ह्मणून यानें आपलें वस्त्र फाडून दिलें. दुसऱ्या एका दिवसीं एकानें त्यास असें सांगितलें कीं, तुला मारण्याची कोणीं गुप्त मसलत केली आहे, आणि त्या मसलतींत तुझा एक जिवलग मित्रहि आहे; परंतु तो अशा क्रूरपणाच्या खोट्या बातमीवर विश्वास न ठेवितां त्या वहम आलेल्या गृहस्थाकडे कांहीं शिपाई अथवा हत्यार घेतल्याशिवाय रात्रीस जेवावयास गेला.

त्रेजन् हा रोम शहरांत जे दुष्ट व सोदे लोक असत त्यांस शहरांतून हद्द पार करून देत असे, व जे सद्गुणी आणि सभ्य असत त्यांस आपल्या दरबारांत बोलावून

त्याचा आदर सत्कार करीत असे; जेव्हां तो एकाद्या कामगाराची नेमणूक मोठ्या हुद्यावर करी, तेव्हां त्यास एक तरवार बक्षीस करून असें ह्मणे कीं, "जोंपर्यंत मी चांगला वागेन तोंपर्यंत हिने माझें रक्षण कर, आणि जेव्हां मी अन्यथा वागूं लागेन तेव्हां हीच मजवर धर."

त्रेजन् याने दान्यूब नदीस एक सुंदर पूल बांधिला; तो शंभर हात उंच होता, आणि त्यास बाविसांवर कमाणी होत्या. जर्मनी देशांत गेले असतां त्या पुलाचा शेष अद्यापि दृष्टीस पडतो, त्याची विशेष मजबुदी व सुभकपणा पाहून रोमन लोकांत इमारती बांधण्याचें कसब किती उत्कृष्ट होतें हें दिसून येतें. त्रेजन् याने रोम शहरांतहि मोठमोठ्या सुंदर इमारती वगैरे बांधण्याकरितां पुष्कळ खर्च करून तें शहर चांगलें सुशोभित व शान्दार केलें. त्याने बांधिलेल्या इमारतींतून कित्येक अद्यापिहि उभ्या आहेत.

हा बादशाह राज्य करीत असतां रोमचे लोक एकसारिखे परदेशीं लढाया करीत होते, त्या लढाया, मोठा शिपाई असा जो त्रेजन्, त्याने स्वतः फार चातुर्याने चालविल्या होत्या, ह्मणून त्यांत तो विजयी असे. तो देश जिंकित जिंकित इराणी अखातापर्यंत गेला, आणि तेथून हिंदुस्थानाच्याहि कित्येक भागांत प्रवेश करून त्वरेने जितके देश जिंकवतील तितके जिंकीत चालला. त्रेजन् याच्या कारकीर्दींत रोमच्या राज्याचा जेवढा विस्तार झाला होता तेवढा पूर्वीं कधींच झाला नव्हता.

शेवटीं असा मोठा विजय करीत असतां बादशाहास कांहीं दुखण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं, व शक्तिहि क्षीण

होत चालली; ह्मणून, त्याने रोम एथें त्वरेने परत जा ण्याचा निश्चय केला; परंतु आतां तितका अवकाश राहिला नाहीं. इकडे रोम शहरांत तो येतो असें समजतांच, सर्व लोक मोठा उत्साह करून त्याचा सत्कार करण्याकरितां तयार होऊन राहिले होते, इतक्यांत त्याला भोवरोग होऊन तो इताली देशाच्या मार्गांत इ० स० ११७ मध्यें मरण पावला. त्याच्या मरणाने सर्व लोकांस फारच दुःख झालें, त्यांत रोमन लोकांस तर विशेषेंकरून झालें.

त्रेजन् याच्या मागें त्याचा पुतण्या एड्रियन् यास राज्य मिळालें, तो त्रेजन् यासारिखाच सद्गुणी होता. त्याने आपल्या चुलत्याचें स्मरण राहण्याकरितां त्याचें प्रेत रोम एथें आणविलें, आणि तो जिवंत माघारा आला असता तर त्यास जितका मान मिळता, तितका आतां त्याच्या प्रेतास द्यावा असा हुकूम केला.

या हुकूमावरून एक मोठी स्वारी निघाली, तींमध्यें मुख्यस्थानीं त्रेजन् याचा पुतळा चालविला होता. मरणानंतर असा मोठा उत्साह, कोणत्याहि रोमच्या सर्दाराचा किंवा बादशाहाचा झाला नव्हता. शिपाई व शहरचे लोक यांस त्याच्या परम प्रिय राजाचें अत्यंत दुःख वाटलें, आणि त्यांस असें झालें कीं, या राजाचा आपण कितीहि शोक केला, तरी थोडाच त्यानी त्याची राख एका सोन्याच्या भांड्यांत घालून ञ्यांण्णव हात उंच अशा एका खांबावर ठेविली, तो खांब अद्यापपर्यंतहि तसाच आहे. हा खांब फार सुंदर आहे ह्मणून त्यासारिखे दुसऱ्या कित्येक शहरांत तेथील जे सद्गुणी व बुद्धिमान

मनुष्य होऊन गेले, त्यांचें स्मरण राहाण्याकरितां केलेले आहेत.

त्रेजन् याच्या गुणदोषांचा विचार केला असतां असें दिसतें कीं, जे चांगले गुण ते बहुतकरून त्यांमध्यें होते, त्याला आपलें राज्य सुनीतीने चालविण्याची मनापासून इच्छा होती, ह्मणूनच तो न्यायी व दयाळू राजा होता असी त्याची कीर्ति आहे; परंतु त्याने आपल्या कीर्त्तीस निरंतर स्मरण राहण्याजोगा एक मोठा डाग लावून घेतला. त्याने एकूणीस वर्षें राज्य केलें त्यांत त्याने ख्रिस्ती लोकांचा फार द्वेष केला. येशू ख्रिस्ताचे जे भक्त त्यांस त्याने अतिशय यातना दिल्या, आणि त्यांचे प्राणहि घेतले; इतका दुष्टपणा कोणत्याहि दुसऱ्या रोमच्या बादशाहाने केला नसेल, याचा विचार केला असतां सर्व मनुष्यास मोठें दुःख होतें.

आपल्या तारणारावरचा विश्वास सोडावा त्यापेक्षां मरावें, हें बरें, असा ख्रिस्ती लोकांचा निश्चय होता, आणि असें करण्यांत त्यांस थोरपणाहि वाटत असे, यामुळें दररोज शेंकडो ख्रिस्ती लोक मारले जात. त्रेजन् हा त्यांजवर कांहीं अपराध लागू न करतां किंवा त्यांच्या वर्तणूकीची चौकसीहि न करितां त्यानी रोमन लोकांच्या चालीप्रमाणें त्यांच्या मूर्त्तीस बळी देण्याचें अथवा त्रेजन् याच्या पुतळ्यास भजण्याचें नकारलें ह्मणजे तत्क्षणींच त्यांस निर्दयपणाने ठार मारवी.

दया व न्याय यांजविषयीं प्रसिद्ध असा जो बादशाह त्याजमध्यें इतका क्रूरपणा असावा याचें कारण काय असेल तें असो; परंतु धर्मपुस्तकावरून मात्र असें सम-

जतें कीं, मनुष्याचा स्वभाव खऱ्या धर्माविरुद्ध आहे; आणि जे कोणी ख्रीस्त येशूकडे सुभक्तीनें चालायास इच्छितात त्या सर्वांचेहि पाठलाग होतील, टि० अ० ३, ओ.१२.

दैवतपूजक लोकांचे पुत्र किंवा चाकर ख्रिस्ती झाल्यानंतर चांगले वागूं लागले, तरी लोक त्यांचा द्वेष करीत असत. पाद्री लोकांनीं जर त्यांस सांगितलें कीं तुह्मी या निरर्थक मूर्त्ति टाकून द्या, आणि खरा जो परमेश्वर त्यास भजा, तर त्यांस त्याचा राग येई;" अदृश्य जो ईश्वर त्याचे अथीनियन् लोकांनीं जसें देऊळ बांधिलें होतें, तसें यानींहि खुशीनें बांधलें असतें, कारण कीं, तुला माझ्यापुढें दुसरे देव नसोत," ही जी सर्व शक्तिमान् ईश्वराची आज्ञा ती त्यांस आवडत नसे; आणि धर्मपुस्तकांत जो उपदेश व पवित्रपणा सांगितला आहे त्याचाहि त्यास राग येत असे. पापाचा नाश करणारें असें जें येशू ख्रीस्ताचें मरण तेणेंकरूनच तुह्मी मुक्त व्हाल स्वताच्या पुण्यानें मुक्ती होणार नाहीं. येशू ख्रीस्तावर विश्वास ठेवून व त्यावर प्रीति करून त्याच्या आज्ञा माना, वाईटाचा त्याग करून चांगलें करायास शिका; सारांश इहलोकींचा लोभ न धरितां परलोकाचें साधन करा, असा जर त्यास उपदेश केला तर तो त्यांस वाईट लागे.

त्रेजन् याची मूर्त्तिपूजेवर विशेष भक्ति होती ह्मणून मूर्त्तिपूजेस जे नकारीत त्यांस तो फार दुःख देई, व त्यांस वाटत असे कीं, ख्रिस्ती लोकांस पृथ्वीवरून नाहींसें करून टाकावें; यावरून विचार करून पाहिलें असतां, असल्या शाहण्या व दयाळू मनुष्याचें मन या गोष्टीविषयीं अवि-

चाराने इतकें आंधारांत पडून वाईट मार्गास लागलें, हीं फार दुःखाची गोष्ट आहे असें दिसतें.

त्रेजन् याचा मित्र धाकटा प्लिनि हा प्राचीन काळीं मोठा तत्वज्ञानी होऊन गेला; तो या बादशाहाप्रमाणेंच ख्रिस्ती लोकांचा द्वेष करून त्यांस त्रास देत असे. या पंडिताने त्रेजन् यास एक पत्र पाठविलें, त्यांत लिहिलें होतें कीं, "हे लोक दररोज सूर्योदयापूर्वी एकत्र जमून ख्रिस्ताची गायनसहित प्रार्थना करितात, नंतर ते आपण पाप करणार नाहीं, चोरी करणार नाहीं, आणि आपलीं सर्व वचनें पाळूं, याप्रमाणें शपथा घेतात; इतकें झालें ह्मणजे मग ते लागलेच उठून जिकडल्या तिकडे जातात, असें माझे ऐकण्यांत आहे." या लोकांपासून कोणास उपद्रव होत नाहीं, असें प्लिनि यास माहीत होतें, तथापि जे आपणास ख्रिस्ती ह्मणवीत असत त्यांस तो बुध्या मारवी आणि हें त्रेजन् याच्याहि मनास येत असे.

या राजाच्या कारकीर्दीत एशिया खंडांत एका जागीं ख्रिस्ती लोकांस फारच उपद्रव झाला, तेव्हां त्यानी विचार केला कीं, आपण आपला धर्म सोडावा त्यापेक्षां मरावें हें बरें; ह्मणून सर्व एकत्र जमून कोतवालाकडे गेले, आणि त्यास ह्मणाले कीं, तूं आह्मास मारून टाक. तो कोतवाल इतकीं मनुष्यें पाहून कदाचित् क्षमा करील, असी त्यांस आशा होती; परंतु त्याने तसें न करितां त्यांतून कित्येकांस फांसीं देण्याचा हुकूम केला; आणि बाकीच्यांस ह्मणाला कीं, "मूर्ख लोकानो, जर तुह्मास मरण्याची आवड आहे, तर कडे, व फांस पुष्कळ आहेत," याचा अर्थ कीं जर तुह्मी मरायाचा निश्चय केला

आहे तर मला इनसाफ करण्याची मेहनतन न देतां तुह्मी स्वतांच प्राण द्या. ख्रिस्ती लोक तर जिवा-वर उदारच होते पण आत्महत्येचा शास्त्रांत निषेध आहे, ह्मणून ते त्याजकडे गेले; हें कारण त्या कोतवालास ठाऊक असतें तर तो त्यांस असें उत्तर न देता. त्यांस आपलें वांचणें फारसें प्रिय वाटत नसे, आपला देह ठे-विल्यानंतर त्यांचें लक्ष ईश्वरासमीप जाऊन राहण्याकडे असे. त्यांचा असा निरधार असे कीं सर्वांचा कर्ता हर्ता भगवान आहे, जें कांहीं व्हायाचें तें त्याच्या इच्छेप्रमाणें होतें, आपल्याला बोलावणें येणें हींहि त्याचीच इच्छा आहे, त्याला वाटेल त्या काळीं तो बोलावून नेईल.

त्या वेळीं यरूशालेम एथें शिमियन हा धर्माध्यक्ष होता, तो एकशें वीस वर्षें वांचला, त्यास सर्व ख्रिस्ती लोक फार मान देत असत व त्याजवर प्रीतिहि करीत असत; त्रेजन् याच्या हुकुमावरून त्याला कित्येक दिवसपर्यंत कोर-ड्यांचा मार देऊन शेवटीं सुळीं दिला; त्यावरून लोकांस फार दुःख वाटलें. त्रेजन् हा कोणा कोणास जाळ्यांत बांधून मस्त झालेल्या बैलांकडून मारवी, आणि कोणास लोखंडी खुरच्या तापवून त्याजवर बसवी.

आन्तियोख नगरांतील धर्माध्यक्ष इग्नेशियस हा या पृथ्वीवर एक मोठा साधु व भक्तिमान पुरूष होऊन गेला; याला त्रेजन याने क्रूरपणाने मारिलें, या गोष्टीवरून ख्रिस्ती मंडळीस अत्यंत दुःख वाटून त्रेजन याची अपकी-र्ती पाठीमागें राहिली. आपण शिपाई लोकांचें धैर्य व त्यांचा निकर यांजविषयीं पुष्कळ गोष्टी ऐकतों, परंतु खरें बळ व खरें धैर्य या पुण्यशील मनुष्या इतकें कोणासहि नसेल

डुमीशियन् याच्या कारकीर्दींत जो ख्रिस्ती लोकांस उपद्रव होत असे त्यांतून हा निभावला होता; पण त्रेजन हा आन्तिओख एथें आला तेव्हां त्याने इग्नेशियस् यास दरबारांत बोलावून स्वतां त्याची चौकशी केली. या प्रसंगीं त्यांचा मोठा संवाद झाला तो अझूनपर्यंत* रक्षून ठेविला आहे, तो वाचायास फार मनोरंजक आहे. त्या संवादावरून, त्रेजन व इग्नेशियस यांचे स्वभाव आपणास दिसून येतात; या लोकींच्या वैभवावर त्रेजन याची दृष्टी होती आणि इग्नेशियस याच्या ठायीं ख्रिस्ती मनुष्यास योग्य असी लीनता ती होती, व त्यांतच तो थोरपणा मानी, त्या काळीं जो कोणी ख्रिस्ती धर्मावर विश्वास ठेवील त्यास ठार मारून टाकावें असें होतें, तथापि इग्नेशियस याचा त्याजवर दृढ निश्चय होता, हेंहि त्यावरून आपणास दिसतें.

इग्नेशियस याचे सद्गुण व शौर्य पाहून त्रेजन् याच्या मनास अगदीं द्रव आला नाहीं, त्याने त्यास रोम एथें नेऊन क्रूर पशूंकडून खाववावें असा हुकूम केला.

इग्नेशियस याला उतार वयामध्यें इतका लांब प्रवास करावयाचा होता, आणि पुढें असें भयंकर मरणहि प्राप्त होणार होतें, तथापि त्याने धीर सोडला नाहीं; कारण कीं धर्मावर त्याचा दृढ विश्वास होता, ह्मणून तो ईश्वरावर सर्व भरंवसा ठेवून मोठ्या आनंदाने वाट चालूं लागला. जर अशा प्रसंगीं एकादा साधारण ख्रिस्ती असता तर त्याने लागलेंच अवसान सोडिलें असतें.

---

* ख्रिस्ती मंडळीच्या इतिहासांत पाहा (रिलिजियस त्राक्त सोसैटि,) १,११२.

इग्नेशियस हा वाटेने जेथें जेथें मुकाम करी तेथें तेथें जागोजागचे हजारो लोक त्याजपासून शेवटला आशीर्वाद घ्यावयास मोठ्या भक्तीने येत. तो अशा संकटाच्या वेळींहि पृथ्वीवर जीं खिस्ती लोकांचीं ठिकाणें होतीं तेथें पत्रें पाठवी, आणि त्यांत असें लिही कीं तुह्मी नीतीनें वर्तो, आणि कसाहि प्रसंग प्राप्त झाला तरी आपला निश्चय सोडूं नका.

इग्नेशियस याने रोम एथील खिस्ती लोकांस लिहून पाठविलें कीं माझा प्राण वांचविण्याकरितां तुह्मी आपले जीव संकटांत घालूं नका; मला मरूं द्या, तेणेंकरून मला स्वर्गप्राप्ति होईल. अगखी तो ह्मणाला कीं "उलटे तुह्मी त्या रानटी पशूंस चेतवा, ह्मणजे ते मला खाऊन फडशा करून टाकतील. सर्व खिस्ती मंडळीस जाहिर करितों कीं मी ईश्वराकडे पाहून संतोषाने मरतों; सर्व पृथ्वीचें राज्य करावें त्यापेक्षां येशू खिस्ताकरितां मरावें हें मला योग्य दिसतें; ज्याने आह्माकरितां आपला प्राण दिला त्याच्याजवळ जावें असी माझी इच्छा आहे."

रोम एथील शिपाई जेव्हां इग्नेशियस याला मारायास नेऊं लागले तेव्हां त्याबरोबर दुसरेहि पुष्कळ खिस्ती लोक निघाले, त्यांनीं अशा प्रसंगींहि त्याजबरोबर ईश्वराची प्रार्थना केली, आणि मोठें धैर्य धरून या धर्माध्यक्षास फार प्रीतीने मान दिला. तो मरणाच्या जागेवर पोंचला तेव्हां त्रेजन याच्या हुकुमाप्रमाणें बुभुक्षित जंगली पशूंपुढें त्यास टाकिलें, मग त्यांनीं एका क्षणांत त्याला फाडून खाल्लें; बाकी जीं हाडें राहिलीं होतीं तीं त्या-

च्या मित्रांनीं मोठ्या प्रीतीनें जमा करून ठेविलीं; आणि तीं मोठ्या सन्मानानें आन्तियोख एथें नेऊन पुरलीं.

डेनियल हा ईश्वराची प्रार्थना करणें सोडीना ह्मणून डरायस बादशाहानें त्यास सिंहांच्या गुहेंत सोडून त्या गुहेच्या तोंडीं दगड बसविला; परंतु त्याचें संरक्षण करण्याकरितां ईश्वरानें आपला दूत पाठवून त्या सिंहांचीं तोंडें बंद करून टाकिलीं. त्याप्रमाणें त्यानें कृपा करून आतां जर तसें केलें असतें तर इग्नेशियस हा वांचला असता; परंतु त्याप्रसंगीं ईश्वरानें जसा चमत्कार दाखविला, त्याप्रमाणेंच या वेळेसहि आपल्या भक्ताचें मन दृढ करून त्यास मृत्यूचें भय वाटूं दिलें नाहीं, आणि प्राचीन काळचा जोब याच्याप्रमाणें बोलायाचें त्यास धैर्य दिलें. "जरी त्यानें मला वधिलें तरीं मी त्यावर आशा धरीन." इय्योब अ० १३ ओ० १५.

ख्रिस्ती लोकांस धर्माकरितां फार उपद्रव होत असतो, त्या वेळेस ख्रिस्ती धर्माची वृद्धि होत असती, हें सर्वांस माहितच आहे; यावरून असी एक ह्मण पडून गेली आहे कीं, "धर्मासाठीं मरणाराचें रक्त ख्रिस्ती मंडळीचें बीज होय." ही गोष्ट त्रेजन् याच्या वेळीं विशेषेंकरून घडून आली; त्यानें आपल्या राज्यकारभार संबंधीं ज्या मसलती केल्या त्या सर्व सिद्धीस गेल्या; परंतु ख्रिस्ती धर्माची वाढ खुंटविण्याविषयीं त्याचा इलाज कांहीं चालला नाहीं; तो धर्म याच्या कारकीर्दींत जितका त्वरेनें वाढला तितका कधींहि वाढला नव्हता. याप्रमाणेंच दुसऱ्याहि कित्येक मोठमोठ्या राजांनीं या धर्मास प्रतिबंध होण्यासाठीं आपलें सर्व सामर्थ्य खर्चिलें, पण

त्यांच्याने कांहीं झालें नाहीं. रोम एथील बादशाहानी त्यावेळेस जेवढी पृथ्वी माहीत होती तेवढी सर्व जिंकिली होती, आणि त्यांच्याजवळ मोठाल्या फौजाहि होत्या व त्यांची संपत्तिहि अपार होती; अशखी ख्रिस्ती लोक पाहिले तर गरीब त्यांस लोक तुच्छ मानीत आणि उपद्रव देत; असे होते तथापि ख्रिस्ती लोकांचाच जय झाला; कारण कीं ईश्वराचीच तशी इच्छा होती त्यापुढें मनुष्यांचें बळ काय चालणार आहे. ख्रिस्ती लोकानी तर आपल्या रक्षणाकरितां तरवारहि उपसली नाहीं किंवा लढाईहि केली नाहीं; तथापि रोमच्या राज्याचा लय होऊन पृथ्वीवर ख्रिस्ताच्या राज्याची स्थापना झाली. आरंभीं ख्रिस्ती धर्म हा लहानशा खड्याप्रमाणें होता, आणि तोच आतां मोठ्या पर्वतासारिखा आहे; अथवा एका मोहोरीच्या कणाप्रमाणें असून पुढें त्याचा वृक्ष झाला आहे. दानी० अ० २ ओ० ३४. मात्थी अ० १३ ओ० ३१. आतां ख्रिस्ती धर्माचा विस्तार होत चालला आहे, त्यावरून ख्रिस्ती शास्त्रांत जें भविष्य सांगितलें आहे कीं, सर्व मूर्त्तिपूजक येशू ख्रीस्ताचा धर्म घेतील, व पृथ्वीवरील एकहि देश ख्रिस्ती झाल्यावांचून राहणार नाहीं, तें खरें होईल.

---

समाप्त.